७५

द्वितीय वर्ष कला

मराठी अभ्यासपत्रिका क्र. तीन

भाषा विज्ञान परिचय व वैचारिक गद्य

PDF processed with CutePDF evaluation edition www.CutePDF.com

© UNIVERSITY OF MUMBAI

डॉ. संजय देशमुख
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. अंबुजा साळगावकर
प्रभारी संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. धनेश्वर हरिचंदन
प्रभारी, अध्ययन साहित्य विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रकल्प समन्वयक : **डॉ. दिनेश काळे**
समन्वयक, मराठी,
दूर एवं मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

अभ्यास समन्वयक : **डॉ. धनाजी गुरव**
प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
महाड, जि. रायगड

लेखक : **प्रा. दौलत गोविंद कांबळे**
साहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग
साकेत महाविद्यालय, विद्यानगरी, चिंचपाडा रोड,
कल्याण (पूर्व), जि. ठाणे

: **प्रा. दिलीपकुमार कांबळे**
प्र–प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य
रात्र महाविद्यालय, भोईवाडा – परळ मुंबई

: **प्रा. आनंद गांगण**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे
कला, वाणिज्य रात्र महाविद्यालय,

पुर्नमुद्रण : सप्टेंबर २०१६, द्वितीय वर्ष कला, मराठी अभ्यासपत्रिका क्र. तीन,
भाषा विज्ञान परिचय व वैचारिक गद्य

प्रकाशक : प्रभारी संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई – ४०० ०९८.

अक्षरजुळणी : **अश्विनी आर्टस्,**
गुरूकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ४०० ०९९.

मुद्रण : **प्रिंटोग्राफी सिस्टम्स (इं) प्रा. लि.**
१३/डि, कुर्ला इंडस्ट्रियल इस्टेट,
नारी सेवा सदन रोड, नारायण नगर,
घाटकोपर (प.), मुंबई – ४०० ०८६.

अनुक्रमणिका

क्रमांक	घटक		पृष्ठ क्रमांक
	विभाग - एक : भाषा विज्ञान परिचय		
	घटक क्र: एक		
१.	अ) भाषेचे स्वरुप	- प्रा. दौलत कांबळे	१
२.	ब) भाषेविषयीचे समज - गैरसमज		१७
	घटक क्र: दोन		
३.	अ) भाषेची विविध रुपे		२२
४.	ब) मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांत भाषेचा वापर		३०
	घटक क्र: तीन		
५.	अ) भाषाभ्यासाचे विविध प्रकार		३५
६.	ब) सामाजिक भाषा विज्ञान परिचय		४४
	विभाग - दोन : वैचारिक गद्य		
७.	वैचारिक गद्य : संकल्पना आणि स्वरुप	- प्रा. दिलीपकुमार कांबळे	५६
८.	मराठी वैचारिक वाङ्मयाची वाटचाल	- प्रा. दौलत कांबळे	६५
९.	घटक एक : वैचारिक गद्यातील लेख	- प्रा. आनंद गांगण	७३
१०.	घटक दोन : वैचारिक गद्यातील लेख		८६
११.	घटक तीन : वैचारिक गद्यातील लेख		९५
१२.	वैचारिक गद्य ग्रंथातील लेखांचा आशय		१०२

❖❖❖❖

PDF processed with CutePDF evaluation edition www.CutePDF.com

द्वितीय वर्ष कला
मराठी अभ्यासपत्रिका क्र. तीन
भाषाविज्ञान परिचय आणि वैचारिक गद्य

अभ्यासक्रम

विभाग : १

घटक - १ भाषेचे स्वरुप व भाषेविषयीचे समज - गैरसमज

अ) भाषा म्हणजे काय?

मानवी / मानवेतर संदेशन आणि भाषा

भाषेची लक्षणे / वैशिष्ट्ये : आनुवंशिकता, सामाजिकता, चिन्हामकता, द्विस्तरीय रचना, यादृच्छिकता

ब) भाषा विषयक समज - गैरसमज

भाषा : शुद्ध - अशुद्ध, भाषा : प्रमाण - अप्रमाण

भाषा : श्रेष्ठ - कनिष्ठ, भाषा : लिखित - मौखिक

घटक २ : भाषेचे विविध रुपे व भाषेचे कार्य

अ) भाषेची विविध रुपे :

प्रमाण भाषा - बोली

पिजिन - क्रिऑल

परिभाषा - व्यवसायभाषा

स्त्रियांची - पुरुषांची भाषा

ब) मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांत भाषेचा वापर

व्यवहार भाषा

विज्ञान भाषा

साहित्य भाषा

याकोबसनकृत भाषेची सहा कार्य

घटक क्र. ३ : भाषाभ्यासाचे विविध प्रकार :

अ) ऐतिहासिक भाषा विज्ञान, संरचनात्मक भाषाविज्ञान

वर्णनात्मक भाषा विज्ञान, सामाजिक भाषाविज्ञान व्याकरण

ब) सामाजिक भाषाविज्ञान - परिचय

भाषिक समाज म्हणजे काय हे सांगणारे दृष्टिकोन,

सामाजिक - सांस्कृतिक संरचना व भाषा, सामाजिक भाषाविज्ञानाची अभ्यासपद्धती, भाषा व बोली

विभाग : २

वैचारिक गद्य - (संपादक) डॉ. वसंत शेकडे, डॉ. धनाजी गुरव,
प्रा. श्रद्धा राणे, प्रा. राजेंद्र डोंगरदिवे

वैचारिक गद्यातील निवडलेले लेख

घटक क्र. १ :

१) 'गुलामगिरी'ची प्रस्तावना - जोतीराव गोविंदराव फुले
२) विनंती पत्र - गोपाळ बाबा वलंगकर
३) अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर
४) सामाजिक समता - मे. पु. रेगे

घटक क्र. २ :

१) आपला धंदा कोणता व कसा करावा ? - दादोबा पाडुरंग तर्खडकर
२) शेतकऱ्यांची निकृष्टस्थिती आणि ती घालावण्याचे उपाय - मुकुंदराव पाटील
३) स्त्रीविद्याभ्यास - ंशंकानिवारण - बाबा पद्मजी
४) संख्यत्वासाठी - शांता किर्लोस्कर

घटक क्र. ३

१) भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी - श्रीपाद महादेव माटे
२) मुंबई १९९९ - वसंत बापट
३) बुवाबाजीचा भस्मासूर - दि. के. बेडेकर
४) बुद्धीचा महिमा - पांडरंग सदाशिव साने

❖❖❖❖

१

भाषेचे स्वरुप व भाषेविषयीचे समज गैरसमज

भाषेचे स्वरुप

घटक रचना :

१.१ प्रस्तावना
१.२ भाषा मानवनिर्मित आहे
१.३ भाषेची व्याख्या
१.४ भाषेचे स्वरुप
१.५ मानवी आणि मानवेत्तर संप्रेषण
१.६ भाषेची लक्षणे / वैशिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

मानवाचा विकास, भाषा, चक्र, अग्नी यांच्या शोधामुळे झाला. त्यामुळे भाषा ही मानवाने मिळालेली श्रेष्ठ देणगी आहे. समाज आणि भाषा परस्परावलंबी असतात. त्यामुळे भाषाप्रगती आणि समाजप्रगती या दोन गोष्टी एकरेषीय ठरु शकतात. भाषा हे विचार, भाषण यांच्या विनिमयाचे साधन आहे. त्यामुळे आपण तीन हजार वर्षापूर्वीची वैदिक सूक्ते वाचू शकतो. हजारो मैल दूर असणाऱ्या देशबांधवांशी भाषेद्वारेच संपर्क साधू शकतो. आपल्या प्रत्येक नियोजित कृतीमागे विचारूपाने भाषा उभी असते. भाषा नसती तर मनुष्याची अवस्था केवळ काही ध्वनींचा उच्चार करणाऱ्या प्राण्यांसारखी झाली असती. त्यामुळे मानवाच्या प्रगतीमध्ये भाषेचा मोठा वाटा आहे. भाषा ही मानवी समाज आणि संस्कृतीला व्यापून राहिलेली पायाभूत गोष्ट आहे. मात्र भाषा हे दुधारी शस्त्र आहे. आपण जितके सभ्य बोलू शकतो तितकेच असभ्य बोलू शकतो, खोट्या साक्षी देऊ शकतो. मानवाच्या विधायक तसेच विघातक अशा दोन्ही बाबींत भाषा साक्षीदार असते. भाषा हे मानवाच्या दैंनदिन व्यवहाराचे मुलभूत साधन आहे.

भाषा म्हणजे नेमके काय हे समजून घ्यावे लागेल. हाताने लिहिलेला अथवा छापलेला मजकूर म्हणजे भाषा नव्हे. भाषेचा अभ्यास करावयाचा म्हणजे लिखित रुपाचा अभ्यास करावयाचा नव्हे. जी बोलली जाते ती भाषा. यामुळे भाषेच्या बाबतीत बोलणे महत्त्वाचे आहे, लिहिणे नव्हे. हवेत विरणारे ध्वनी लेखनाच्या साहाय्याने टिकवून धरता येतात. भाषा म्हणजे व्याकरण, अशीही एक समजूत असते. मात्र व्याकरण हे भाषेचे एक अंग असते. व्याकरण हे भूतकालीन भाषेचे विशिष्ट पद्धतीने केलेले वर्णन असते. या प्राथमिक विवेचनावरुन आपणास भाषेचे स्वरुप, विशेष अथवा लक्षणे व कार्य पुढे स्पष्ट करता येईल. ती पुढील विवेचनावर लक्षात येईल.

१.२ भाषा मानव निर्मित आहे

संप्रेषण व्यवहारासाठी मानवाने आपल्या मनातील भाव-भावना व्यक्त करण्यासाठी, भाषेचा वापर कौशल्याने केलेला दिसतो. भाषा ही मानवी ध्वनींनी बनलेली आहे. ध्वनींमध्ये काही गुण अंगभूत असल्यामुळे भाषा सामर्थ्यशाली बनली आहे. मानवी ध्वनींचे निर्मितीस्थान मानवाचे शरीर आहे. त्यामुळे मानवी ध्वनी सतत मानवासोबत असतात. या ध्वनींची निर्मिती आणि वहनासाठी मानवाला विशेष कष्ट करावे लागत नाहीत. याबरोबर ध्वनींमध्ये काही गुण आहेत. अलीकडे तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ध्वनी टिकवून ठेवता येतात. शेकडो मैल दूर पाठविता येतात. पुन्हा-पुन्हा ऐकता येतात. ध्वनी अंधार भेदातात. अशा प्रकारच्या गुणवैशिष्ट्यामुळे भाषा सामर्थ्यशाली बनली. भाषा मानवाला सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून नैसर्गिकपणे प्राप्त होते. ती मानवाच्या जीवनाशी - जगण्याशी एवढी एकरुप झालेली आहे की ; भाषेचा स्वतंत्र विचार केल्याखरीज तिचे अस्तित्व ध्यानात येत नाही त्यामुळे भाषेचा स्वतंत्र विचार करुन अभ्यास करावा लागतो.

माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजाचे अस्तित्व आणि विकासासाठी अविरत कार्यशील असलेली भाषा म्हणूनच मानवी जीवनामध्ये महत्त्वाची आहे. भाषेचे स्वरुप जाणीवपूर्वक समजावून घेतल्याशिवाय तिचे सामर्थ्य आपल्या लक्षात येत नाही. सर्व मानवी समूहांचा स्वतःच्या भाषेशी घनिष्ठ आणि अतूट असा संबंध दिसतो. स्वतःच्या भाषेविषयी प्रत्येक सामाजाला नितांत आदर असतो. त्यामुळेच भाषेच्या प्रश्नांवर समाजाच्या परंपरा, संस्कृती, श्रद्धा, ज्ञान इत्यादीचे जतन आणि पुढच्या पिढीकडे वहन करण्याचे कार्य भाषेमार्फत सुरु असते. परंपरेतून चालत आलेल्या, समाजाच्या संस्कृतीमध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व सूक्ष्म गोष्टी भाषेमुळेच मनुष्य शिकतो. म्हणून 'भाषा' हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. हे नाकारता येणार नाही.

भाषा बोलली जाते. बोलण्यासाठी भाषेचा प्रभावी वापर होणे, यावरच तिचे अस्तित्व अवलंबून असते. कोणत्याही भाषेचे लिखित रुप ही एक सोय असते. त्यामुळेच भाषेच्या या रुपाला दुय्यम समजले. जाते. कारण बोलणे पकडून ठेवण्यासाठौ, जतन करण्यासाठी लेखनकला अस्तित्वात आलेली आहे. त्यामुळे आधुनिक भाषाभ्यासात भाषेच्या लिखित रुपाला दुय्यम मानले जाते. मातृभाषेच्या बाबतीत तिचे लिखितरुप समजून घेण्याची प्रक्रिया; ही भाषा बोलीरुपात उत्तम प्रकारे अवगत झाल्यानंतर सुरु होते. पंरतु ही प्रक्रिया सर्वाच्याच बाबतीत घडते असे नाही. समाजातील जे लोक शाळेमध्ये प्रवेश घेतात; त्यांच्याच वाट्याला भाषेच्या लिखितरुपाचे ज्ञान येते. नाहीतरी भाषा येऊनही खूप मोठा वर्ग अशिक्षितच राहतो.

अशा भाषेचे स्वरुप समजावून घेणे म्हणूनच उद्‌बोधक आहे. भाषा सामर्थ्यशाली बनण्यामध्ये तिची अंतर्गत वैशिष्टये कारणीभूत ठरलेली आहेत. ही वैशिष्ट्ये आणि भाषेमार्फत चाललेली कार्ये समजावून घेता येईल. पण भाषा म्हणजे नेमके काय हे समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

१.३ भाषेची व्याख्या

भाषेच्या अभ्यासकांनी भाषा म्हणजे काय? हे आपल्या आपल्या पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

१. **कृ.पा. कुलकर्णी** हे महत्वाचे भाषाभ्यासक आहेत. त्यांनी 'मराठी भाषा उद्‌गम आणि विकास' या ग्रंथात भाषेची व्याख्या केली आहे ती पुढील प्रमाणे.

कृ.पा. कुलकर्णी - "भाषा हा शब्द भाष् (आवाज उत्पन्न करणे) या धातूपासून आला आहे. भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनीचा समुह."

२. **वा. गो. आपटे** यांनी मराठी शब्दरत्नाकर या ग्रंथातून. त्यांना भाहेची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

वा. गो. आपटे - "मनातील कल्पना शब्दांच्याद्वारे बाहेर प्रकरण्याचे साधन म्हणजे भाषा होय. "

३. मराठी संस्कृती आणि भाषेचे ज्येष्ठ अभ्यासक. **ना. गो.कालेलकर** यांनी आपल्या 'भाषा आणि संस्कृती' या ग्रंथामध्ये भाषा आणि तिच्या स्वरुपासंदर्भात व्यापक विचार मांडले आहेत.

ना. गो. कालेलकर - "मूळ आशयायी कार्यकारण संबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनलेली, समाजव्यवहाराला साह्यभूत अशी भाषा ही एक पध्दती आहे."

४. **श्री. न. गजेंद्रगडकर** यांनी आपल्या 'भाषा आणि भाषाशास्त्र' या ग्रंथामध्ये भाषेची व्याख्या संगितली आहे.

५. **श्री. न. गजेंद्रगडकर -** यादृच्छिक ध्वनिसंकेतावर आधारलेली, समाज व्यवहाराल साह्यभूत अशी पध्दती म्हणजे भाषा.

६. **भालचंद्र नेमाडे -** "खास मानवी असी संदेशवनाची व्यवस्था म्हणजे भाषा होय."

७. **एडवर्ड सपीर -** 'कल्पना, भावना आणि इच्छा दुसऱ्याला सांगण्याचे, स्वतःच्या इच्छेवर अवलंबून असणारे मानवी साधन म्हणजे भाषा.'

८. **फेर्दिना द सोस्यूर -** "ध्वनी व अर्त या सांगड घालण्याच्या चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय."

९. **मोरो केशव दामले यांनी -** "शास्त्रीय मराठी व्याकरण" या ग्रंथात मानवी भाषा दोन प्रकरची मानली आहे.

अ) **स्वाभाविक भाषा -** आवाज, चेहरा, व हावभाव यांच्या गुणांनी होणाऱ्या भाषेस स्वाभाविक भाषा असे म्हणतात.

ब) **सांकेतिक भाषा -** अमुक-अमुक खुणेने अमुक-अमुक बाबीचे दर्शन घडवितात येते. परंतु त्या कल्पनेचे ग्राहण करावे लागते. अशा भाहेस कृत्रिम भाषा किंवा सांकेतिक भाषा असे म्हटले जाते.

१०. थोडक्यात भाषेची व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल.
"मानवी मनोगत व्यक्त करण्याचे ध्वनीमय साधन म्हणजे भाषा होय."

भाषा ही संकेतांनी बद्ध असणाऱ्या चिन्हांची व्यवस्था आहे. भाषेमध्ये वापरण्यात येणाऱ्या चिन्हांना समाज अर्थ देतो. फळ्यावरती लिहिण्यसाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तूला मराठी भाषेमध्ये "खडू" म्हणतात. याच वस्तूला इंग्रजी भाषेमध्ये "चॉक" म्हटले जाते. एकाच वस्तूसाठी दोन भाषेमध्ये हे वेगवेगळे शब्द का अशा प्रश्नांची उत्तरे देता येत नाहीत. प्रत्येक सामाजाने समाजव्यवहारासाठी आपल्या आपल्या पद्धतीने वस्तंना नावे दिलेली असतात. काहीवेळा एकाच भाषेमद्ये एखाद्या वस्तूसाठी वेगवेगळू नावे आढळतात. मराठी बोलींचा अभ्यास केल्यानंतर ही गोष्ट प्रकर्षीने जाणवते. प्रत्येक भागात तेथील भाषा वेगळी असते. वऱ्हाडी भाषते काळ्या या शब्दांला "काया" असे म्हटले जाते. प्रत्येक भाषेततील बोलीभाषेमध्ये त्याच्या भागातील काही शब्द वेगळ्या स्वरुपाचे आहेत. तेथील संकेत बध्दंनाकाळी आहे.

१.४ भाषेचे स्वरुप

भाषेच्या वरील व्याख्या अभ्यासल्यानंतर आपल्याला भाषा म्हणजे काय हे समजले असेल. या सर्व व्याख्या पहाता, भाषेच्या स्वरुपाविषयी भाष्य करता येते. भाषा ही मानवाची एक अद्‌भूत निर्मिती आहे. आज जगभरामध्ये जवळपास सात हजार भाषा बोलल्या जातात. यापैकी जवळजवळ सोळाशे पन्नास भाषा भारतामध्ये बोलल्या जातात. मानवी जीवनाची सर्व अंगे भाषेने व्यापलेली आहेत. भाषा ही विचारविनिमयाचे प्रभावी साधन आहे. मानव समाजशील प्राणी असल्याने; भाषेशिवाय मानवाचे समायोजन अशक्य आहे. भाषेच्या स्वरुपाबाबतचे काही मुद्दे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. समाजव्यवहाराचे साधन :

मानव समाजात राहाणारा प्राणी आहे. जीवनामध्ये अनेक गोष्टींसाठी तो इतरांवर अवलंबून राहातो. स्वतःच्या सर्व गरजा तो स्वतः पूर्ण करु शकत नाही. त्याचबरोबर एकत्र राहणे ही मानवाची मुलभूत प्रवृत्तीच आहे. त्यामुळेच समाजाचे अस्तित्व निर्माण झाले; तर समाजाच्या निर्मितीसाठी भाषा साहाय्य करते. समाजव्यवहार मुख्यतः भाषेमुळे शक्य होतो. समाजामध्ये अनेक बाबींसाठी व्यक्त व्हावे लागते. जीवन संक्रमणासाठीची सर्वमान्य पद्धती समजावून घ्यावी लागते. आपल्या परंपरा, श्रद्धा, रुढी, चालीरिती या मागील पिढीकडून शिकाव्या लागतात. विचार, भावनांची देवाणघेवाण सतत सुरु असते. आपण मिळविलेले ज्ञानाचे संचित पुढील पिढीकडे संक्रमित करायचे असते. हा सर्वच व्यवहार भाषेच्या माध्यमातून चाललेला असतो. त्यामुळे भाषा ही समाजव्यवहाराचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. मानवी मनातील भावभावनाचे देवाणघेवाण भाषेच्या माध्यमातून केले जाते.

२. ध्वनिमाध्यमता :

भाषा ही ध्वनीयुक्त असते. भाषेतील निवडक ध्वनीचा वापर भाषते केला जातो. भाषा ही मानवी ध्वनींनी बनलेली व्यवस्था आहे. ध्वनी हे भाषेचे माध्यम आहेत. हे ध्वनी म्हणजेच संकेतबद्ध चिन्हे होय. भाषिक ध्वनींना समाजाने विशिष्ट असा अर्थ दिलेला असतो. म्हणजेच प्रत्येक समाजामध्ये चिन्हांचे संकेत ठरलेले असतात. भाषेचे माध्यम ध्वनी असल्यामुळे भाषा ही संप्रेषणव्यवहारासाठी सर्वश्रष्ठ साधन ठरली. कारण ध्वनी हे अनेक गुणांनी युक्त आहेत. ते नेहमी मानवासोबत, मानवाच्या अधीन असतात. भिंत, अंधार, अंतर यासारख्या नैसर्गिक अडचणींना ध्वनी पार करतात. ध्वनी म्हणजे वायुलहरी होय. त्यामुळे संप्रेषण जलद गतीने होते. कमी श्रमामध्ये सहज उपलब्ध होणारे ध्वनी हे भाषेचे माध्यम असल्यानेच भाषा वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली आहे, भाषा ही ध्वनीनी बनलेली असते.

३. संकेतबद्धता :

भाषा ही संकेतबद्ध व्यवस्था आहे भाषेतील निवडक ध्वनीचा वापर भाषेच्या व्यवहारामध्ये केला जातो. भाषा ध्वनिरुप संकेतानी बनलेली असते. ती ध्वनिसंकेतावर आधारलेली पद्धती आहे. भाषेतील ध्वनिसंकेताना सामाजिक मान्यता असते. ध्वनींच्या विशिष्ट जुळणीतून भाषेमध्ये संकेतांची निर्मिती होते. हे संकेत प्रत्येक समाजानुसार; त्यांच्या भाषेमध्ये स्वतंत्र दिसतात. मराठी भाषेमध्ये ज्या प्राण्याला 'वाघ' म्हटले जाते, त्या प्राण्याला हिंदी भाषेमध्ये 'शेर' म्हणतात. संस्कृत भाषेमध्ये 'व्याघ्र' यांनी इंग्रजी भाषेमध्ये 'टायगर' म्हटले जाते चारही भाषांमधील ध्वनी निरनिराळे आहेत. परंतु प्रत्येक भाषेतील ध्वनींतून व्यक्त होणारा 'संकेत' एकच प्राणी आहे. प्रत्येक भाषेमध्ये या प्राण्याला कोणत्या ध्वनिसमुच्चयाने ओळखायचे हे ठरलेले आहे. हे कोणी ठरविले, कधी ठरविले असे प्रश्न भाषाम्यासामध्ये अप्रस्तूत आहेत. भाषांमधील ध्वनिसंकेतांच्या वेगळेपणाबद्धल कोणालाही उत्तर देता येणार नाही. ही ज्या त्या भाषिकांची पद्धत आहे, असेच म्हणावे लागते. रस्त्यावर लावण्यात येणारे लाल, हिरवे, पिवळे हे सिग्नलचे दिवे यातूनही संकेत दिले जातात. परंतु अशा प्रकारच्या संकेताना निश्चितच मर्यादा आहेत. भाषेतील संकेतबद्धता मात्र भाषेचे एक खास वैशिष्टय आहे. अशा ध्वनिसंकेतबद्धतेस सोस्यूरने बुद्धिबळाच्या खेळाचे उदाहरण दिले आहे. भाषा ही ध्वनी संकेतावर आधारलेली आहे. विशिष्ट ध्वनिना संकेतिक अर्थ आहेत. या संकेतबद्धतेवर भाषा आधारली आहे.

४. प्रतिकात्मकता :

भाषेत वापण्यात येणारे ध्वनिसंकेत ज्या ज्या समाजाने ठरविलेले असतात. यादृच्छिकतेच्या तत्त्वाने हे ध्वनिसंकेत भाषेत वापले जातात. ध्वनींमुळे निर्माण होणारी प्रतिकात्मकता ही महत्त्वाची आहे. ज्ञानाची ग्रहण, समज या प्रतिकात्मकतेमुळे शक्य होते, सुलभ होते. मानव ध्वनिसंकेतांबरोबरच व्यवहारासाठी इतर काही संकेत वापरतो; त्यातूनही प्रतिकात्मकता दिसून येते. या भाषेतर संकेतांनाही आपण मानवाची एक भाषाच म्हणून ओळखतो. विजयी झाल्यानंतर दोन बोटांचा 'व्ही' दर्शविणे. हा 'व्ही' विजयाचे प्रतीक आहे. रागाने बोटे मोडणे, अंगठा दाखविणे, मानेला झटका देणे, दात विचकावणे, शिट्टी वाजवणे, नाक मुरडणे, कपाळावर हात मारणे, डोके बडवणे, डोळे मारणे, डोळे मिचकावणे, डोळे मोठे करणे, गालावर हात ठेवून बसणे, अलिंगन देणे, चुंबन देणे, हातात हात घेणे असे कितीतरी हावभाव ही मानवाची भाषा आहे. याला देहबोली असे म्हणतात. या देहबोलीतून प्रतिकात्मका व्यक्त होत असते.

५. भाषा : एक पद्धती :

भाषेमध्ये संदेशक सुटे सुटे ध्वनी वापरीत नाही. भाषेमध्ये ध्वनिसमुच्चयांना अर्थ असतो. ध्वनिसमुच्चय आणि आशय यांा संबंध अगोदर सांगितल्याप्रमाणे यादृच्छिक असतो. भाषा वापरताना एक पद्धती वापरली जाते. ध्वनिसमुच्चयांचे अर्थ भाषा वापणाऱ्या प्रत्येक भाषिकाला ज्ञात असतात. त्यामुळे भाषा वापताना आपण ध्वनी स्वीकारतो आणि त्या ध्वनीतून सूचविलेला आशय समजून घेतो. ध्वनींच्या स्वीकृतीपासून आशयाच्या स्वीकृतीपर्यंत जाणे म्हणजेच भाषा कळणे होय. ध्वनिसंकेतांना सामाजिक मान्यता असते. त्यामुळे ध्वनिसमुच्चयातून कोणत्या आशयाचा बोध करुन घ्यायचा हे ठरलेले असते. त्यामुळे भाषावापर ही एक पद्धती आहे. ही पद्धती पुढील आकृतीच्या साहाय्याने दर्शविता येईल.

'अ' बोलणारा (संदेशक)



६. भाषा मानवी आहे :

मानव हा स्वतंत्र बुद्धी असलेला, विचार करणारा प्राणी आहे. तो इतर प्राण्यापेक्षा वेगळा आहे. मानवाने स्वतःच्या बुद्धिकौशल्याने भाषेची निर्मिती केलेली आहे. सुलभता ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. सुलभतच्या प्रेरणेतूनच अनेक शोध मानवाने लावले. भाषा समाजामध्ये व्यवहारासाठी अस्तित्वात आलेली व्यवस्था आहे. भाषेचा वापर मानव स्वतःचे जगणे सुलभ, सुखकर करण्यासाठी करतो. व्यक्त होणे, भावनांचे प्रकाटीकरण ही मानवी गरज आहे. या गरजेतूनच भाषेचा शोध लागलेला आहे. मानवेतर प्रण्यांमध्ये संपेषणअची व्यवस्था मार्यदित पातळीपर्यंत दिसून येते. मानवी जीवनामध्ये मात्र संप्रेषणाची स्वतंत्र भाषेची व्यवस्था अस्तित्वात आलेली आहे. त्यामुळे भाषा पूर्णतः मानवी आहे.

१.५ मानवी आणि मानवेत्तर संप्रेषण

संप्रेषण करणे, संदेशांचे वहन करणे हेच भाषेचे मुख्य कार्य आहे; तर संप्रेषण करणे हा मानव आणि मानवेतर जीवांचा एक नैसर्गिक धर्म आहे. संप्रेषण ही मानव व मानवेतर प्राण्यांचा गरज आहे. विविध गरजांची पूर्तता, अस्तित्व टिकविणे, विकास साधणे, विचार - भावना व्यक्त करणे अशा अनेक करणांसाठी संप्रेषण सुरु असते. मानव अनेक कारणांसाठी संप्रेषण करतो. परंतु मानवेतर जीवांमध्ये संप्रेषणासंदर्भात खूपच मर्यादा आहेत. संप्रेषणामध्ये प्रतिसाद महत्त्वाचा आहे. संदेशक, संदेश आणि संदेशग्राहक या तीन संप्रेषणासाठी आवश्यक आहेत. मानव सातत्याने आपल्या मनातील भाव-भावना व्यक्त करण्यासाठी भाषेचा वापर करतो.

मानवी संप्रेषण :

माणूस एकटा राहू शकत नाही. तो समजाप्रिय प्राणी आहे. बदलत्या समाजजीवनाबरोबर मानवाच्या गरजा बदलताना दिसतात. तो अधिकाधिक परावलंबी बनलेला आहे. या परावलंबित्त्वामुळेच मानवला सतत भाषेची गरज लागते. त्यामुळेच मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्र भाषेच्या अस्तित्वाने व्यापलेले आहे. जीवनातील प्रत्येक गोष्टीच्या पूर्ततेसाठी मानव भाषेचा आधार घेतो. भाषेच्या आधाराने आपण विचार करतो, आपली भावना शब्दशः कळवितो, रागावतो, प्रेम करतो, शिव्या देतो, तिरस्कार करतो, अपमान करतो, आज्ञा देतो, खोटे बोलतो, लिहितो, कविता करतो एवढेच नव्हे तर आपण स्वप्नदेखील भाषेच्या मदतीने पाहतो. स्वतःशी व इतरांशी चाललेले हे मानवाचे संप्रेषण होय. प्रथम आपण मानवाच्या व्यापक संप्रेषणव्यवहाराचा आढावा घेऊ.

१. भाषा : मानव मनातील भाव - भावना भाषेच्या आधाराने व्यक्त करतो. मानवी जीवनाशी भाषा पूर्णतः एकरुप झालेली असते. बोलणे आणि लिहणे अशा दोन्ही पद्धतीने मानव भाषा वापरुन संप्रेषणाची क्रिया पूर्ण करतो. स्वतःची भावना व्यक्त करणे, हा संप्रेषणाचा उद्देश असल्यामुळे आपण, सुख, दुःख बोलून व्यक्त करतो. मनामध्ये निर्माण झालेल्या भावना विविध प्रकारच्या असतात. त्या व्यक्त करणे, न करणे यावर व्यक्तीची मानसिकता अवलंबून असते. शंकांचे निरसन करणे, मनातील गोष्ट बोलून मन मोकळे करणे, स्वतःची भावना व्यक्त करुन दिलासा मिळविणे, अशा प्रकारचे संप्रेषण मानवी जीवनामध्ये सतत सुरु असते. लेखक, कवी भाषेच्या आधाराने वाचकांशी संप्रेषण करतात. ते वाचकांशी संवाद साधतात. पत्र लिहिणे देखील भाषेच्या साहाय्याने सुरु असते. अलिकडे संप्रेषणासाठी प्रभावी ठरलेली इमेल, एस. एम. एस., वॉट शॉफ, फेसबुक, मोबाईल सारखी आधुनिक माध्यमे मानवाच्या संप्रेषणप्रकियेची उदाहरणे आहेत.

२. भाषेव्यतिरिक्त संप्रेषण माध्यमे : मानव भाषेबरोबरच अनेक भाषाबाह्य माध्यमे संप्रेषणासाठी वापरतो. शारीरिक हावभाव, रंग, रेषा, कपडे यांचा वापर, चित्राकृती, यंत्रनिर्मित ध्वनी इत्यादींचा समावेश भाषाबाह्य संप्रेषण माध्यमांमध्ये होतो. उदा. सिग्नलचे दिवे, रस्त्यावरील सूचना दर्शवणाऱ्या आकृती, कारखान्यातील भोंगे, याद्वारे ही भाषिक संप्रेषण साधले जाते.

हावभाव : मानव शारीरिक हालचालीद्वारेही भाषिक व्यवहार साध्य करतो. भाषेशिवाय देखील मानव संप्रेषण व्यवहार पार पाडतो. तो स्वतःच्या शरिराचा संप्रेषणासाठी कौशल्याने वापर करुन घेतो. शारीरिक हालचालींना संकेतबद्धता प्राप्त झालेली आहे. या हालचालीतून निर्माण होणाऱ्या संकेतांना सामाजिक मान्यता असल्याचे दिसून येते. नकारासाठी आडवी मान हालवणे, होकारासाठी उभी मान हालवणे, ये-जा यासाठी विशिष्ट हात करणे, निरोपासाठी विशिष्ट पद्धतीने हात हालवणे, विजयी झाल्यानंतर बोटांचा 'व्ही' करणे, डोळ्याने दटावणे, रागावणे, कपाळाला आट्या घालणे, चुंबन घेणे, डोळा लवविणे, डोळ्याने खुणावणे, बोटे मोडणे, टाळ्या वाजवणे इत्यादी हावभावांना, त्यातून प्राप्त होणाऱ्या संकेताना सामाजिक मान्यता आहे. त्यामुळेच या हावभावातून मानवाचे संप्रेषण होताना दिसते. म्हणजेच शारीरिक हालचालीतून भाषिक व्यवहार साध्य केला जातो.

रंग, रेषा : मानवी जीवनामध्ये रंग, रेषा, कपडे इत्यादीचा वापर संप्रेषणासाठी होताना दिसतो. लाल, हिरवा, पिवळा, गुलाबी, पांढरा, इत्यादी रंगांना विशेष संकेत आहेत. लाल रंग धोक्याची

सूचना देतो. हिरवा रंग सकारात्मक संदेश देतो. अलीकडे गुलाबी रंग प्रेमाचे प्रतीक मानले जाते. गुलाबी रंगाचा गुलाब देऊन प्रेम व्यक्त करणे हा संप्रेषणाचाच प्रकार आहे. पिवळा गुलाब, पांढरा गुलाब यांनादेखील विशिष्ट अर्थ आहे. काळ रंग अशुभ किंवा नजर लागू नये यासाठी वापरला जातो. हे रंग मानवी जीवनामध्ये एक प्रकारे संप्रेषणाचे कार्य करीत असतात. रेल्वे स्टेशनवर लाल-हिरवा झेंडा, राष्ट्रध्वजावरील रंग; त्यातून दिला जाणारा संदेश रस्त्यावर रेषांचा उपयोग करुन रस्त्याची स्थिती दर्शविणे, समांतर रेषातून आणि एकमेकीला तिरप्या रेषांतून सूचित होणारा आशय ही रेषांतून व्यक्त होणारी भाषा मानाच्या संप्रेषणाचीच उदाहरणे आहे. म्हणजेच रंग आणि रेषा या माध्यमातून संप्रेषण प्रक्रिया साध्य केली जाते.

इलेक्ट्रीनिक्स माध्यमे : संप्रेषणासाठी इलेक्ट्रीक माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मानवाने भौतिक प्रगती साधताना; अनेक वस्तू, उपकरणांचा शोध लावलेला आहे. गाड्यांचे हॉर्न दरवाजावरील बेल, कारख्यांन्यांचे भोंगे, रस्त्यावरील सिग्नलचे दिवे, रेल्वे, कुकरची शिट्टी इत्यादी कौशल्यपूर्वक वापर करुन संप्रेषण साधले जाते. या इलेक्ट्रीक माध्यमाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

इतर काही माध्यमांचा वापर : या सर्व माध्यमांव्यतिरिक्त आकाशामध्ये कबुतरे सोडून शांतता प्रदर्शित करणे, फटाकड्या वाजवून आनंद व्यक्त करणे, रणवाद्ये वाजवून युद्धाची सूचना देणे, राखी पाठवून नातेसंबंध जोडणे, फुले देणे,ध्वज फडकवणे इत्यादी उदाहरणे ही मानवाच्या संप्रेषण व्यवहाराचा विचार करताना लक्षात घ्यावी लागतात. मानवाच्या संप्रेषणव्यवहाराचा व्यापक विचार करताना संप्रेषणाची ही उदाहरणे आपण लक्षात घ्यावी लागतील.

मानवेत्तर संप्रेषण :

सृष्टीमध्ये मानवाबरोबर असंख्य मानवेतर प्राणी जीवन जगताना आपण पाहतो. या मानवतेवर प्राण्यांचे जीवन अनुभवणे हा मानवाचा आस्थाविषय आहे. काही प्राणी तर मानवी जीवानशी एकरुप होऊन जीवन जगतात. कुत्रा, मांजर, गाय, म्हैस, बैल, घोडा असे काही प्राणी हे मानवी जीवनामध्ये स्वतःचे योगदान देतात. मानवाचे जीवन सुखकर होण्यासाठी मदत करतात. या प्राण्यांचे जीवन जगणे आपण अनुभवतो. मालकाची आज्ञा कुत्रा, बैल, घोडा, म्हैस हे प्राणी पाळताना दिसतात. मालकाने 'जा' म्हटले तर कुत्रा बाहेत जातो. परंतु तोच शब्द दुसऱ्या व्यक्तीने उच्चारला तर त्याच्यावर काही परिणाम होताना दिसत नाही. पोपट विठू-विठू म्हणतो. शीळ घालतो. ही त्यांची भाषा असते का? मानवेतर प्राणी कोणती भाषा वापरत असावेत? असे प्रश्न आपल्याला पडतात. कारण पशू, पक्षी, जलचर प्राणी, कीटक या प्रकारच्या जीवांनी सृष्टी व्यापली आहे. हे सर्व जीव स्वतःचे जीवन सुरळीत व्यतीत करताना आपण पाहतो. त्यांच्या गरजा ते पूर्ण करुन गेतात. संकटांवर मात करतात. हवामान बदलासाठी पक्षी स्थलांतर करतात. जीवनाशी ते करीत असलेले हे समायोजनाच आहे. या सर्व व्यवहारावरुन पशू-पक्ष्यांच्या जीवनामध्ये संदेशन व्यवहार घडत असावा हे स्पष्ट होते. कारण बऱ्याचदा या प्राण्यांच्या जीवनाचे अस्तित्व संप्रेषण नाही झाले तर संपून जाऊ शकते. मानवेतर जीवांच्या संप्रेषण व्यवहारासंदर्भातील महत्त्वपूर्ण संशोधन प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ सी. एफ. हॉकेट यांनी केलेले आहे. त्यांच्या 'A Course in modern Linguistics' या १९५८ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकामध्ये हे संशोधन आहे.

१. भूक - मानवेत्तर प्राणी पक्षी यांच्या पिल्लांना जेव्हा भूक लागते तेव्हा ते विशिष्ट प्रकार आवाज काढतात. तेव्हा त्या प्राण्याची किंवा पक्ष्याची माता. त्याची भूक भागवण्यासाठी प्रयत्न करते. चिमणी आपल्या पिल्लांना चोचीतून अन्न आणून भरते किंवा गाय आपल्या पाडसाला स्तनपान करते.

२. भीती - प्राणी किंवा पक्षी जेव्हा त्यांना भीतीची चाहूल लागते तेव्हा आपल्याच जातीतील इतरांना सावध करण्यासाठी किंवा भीती व्यक्त करण्यासाठी विशिष्ट प्रकारे आवाज काढला जातो. म्हणजे भीती व्यक्त करण्यासाठी संप्रेषण साधले जाते. उदा. माकड जेव्हा वाघ पाहतं तेव्हा माकड इतर माकडांना सावध करण्यासाठी विशिष्ट आवाज काढते.

३. आनंद - मानवेत्तर प्राणी पक्षी आपला आनंद व्यक्त करण्यासाठी विशिष्ठ प्रकारे आवाज काढून आनंद व्यक्त करतात. उदा. एखाद्या झाडाला फळाचा आलेला बहर पाहून पक्षांची चिवचिवाट आनंद व्यक्त करणारी असते.

४. प्रजनन - प्राणी किंवा पक्षी एका विशिष्ट काळात आपली शारीरिक गरज पूर्ण करण्यासाठी विशिष्ट प्रकारे आवाज काढून मादी जोडीदाराला बोलावते. त्याला मिटिंग टाईम असे म्हणतात. पक्षी किंवा प्राणी आपल्याच जातीतील योग्य जोडीदाराची निवड करुन शारीरिक गरजन पूर्ण करुन घेतात. म्हणजेच प्रजनन कालावधीतील मादीचा आवाज वेगळा असतो तो आवाज त्याच जातीतील नर ओळखतो.

इतर काही पक्षी, प्राण्याचे संप्रेषण :

१. मधमाशांचे संदेशन.

मानवेतर जीवांच्या संप्रेषण व्यवहारासंदर्भात काही उदाहरणे आपल्याला पाहता येतील. या उदाहरणांचा अभ्यास करुन मानवेतर जीवसृष्टीमध्ये चालणाऱ्या संप्रेषण व्यवहाराचा अंदाज येईल. त्याचबरोबर त्यांच्या संप्रेषणासंदर्भात काही निष्कर्ष काढता येतील. मधमाशा पोळ्यामध्ये मधाचे संकलन करतात. एक चिकाटीचे आणि जिद्दीचे कार्य म्हणून आपण मधमाशांच्या या कार्याचे व्यवहारमध्ये नेहमी उदाहरण देतो. हे कार्य मधमाश्या कशा पद्धतीने करतात, हे पाहणे तेवढेच मनोरंजक आहे. मधमाशांच्यामध्ये मध मिळविणे, यासाठी संदेश पाठविणे हे काम नृत्याच्या आधाराने चालते. शेकडो मधमाशा एकत्र येऊन हे काम पूर्ण करतात. त्यांच्यामध्ये सुसंवादित्व कसे येते; हे आपण या उदाहरणामध्ये पाहणार आहोत. पोळ्यामध्ये मध संकलित करण्यासाठी, मध कोठे आहे, या संदर्भातील संदेश कामकरी मधमाशी तीन प्रकारामध्ये देते. मध सापडलेली ठिकाण पातळ्यापासून किती फूट लांब आहे; हे कामकरी मधमाशी नृत्याच्या साहाय्याने इतर मधमाशांना सांगते. (येथे फूट हा लांबीनिदर्शक शब्द केवळ अंतराच्या अंदाजासाठी उपयोजिलेला आहे.) ही कामकरी मधमाशी मधाचे ठिकाण शोधते आणि पोळ्यात परत येऊन विशिष्ट असे नृत्य करते. या नृत्यावरुन मध कोठे आहे, कोणत्या दिशेस आहे, किती लांब आहे, हे समजते. साधारणपणे मधाचे ठिकाण वीस फुटापर्यंत असेल तर मधमाशी पोळ्यांच्या आतल्या भिंतीवर वर्तुळाकृती पदन्यास करते. उलट सुलट अशा दोन्ही बाजूने ती वर्तुळ पूर्ण करते. मधाचे ठिकाण वीस ते साठ फुटापर्यंत असेल तर मधमाशी अरबिक आठ अंकाच्या आकाराचे नृत्य करते. मधाचे ठिकाण साठ फुटापेक्षा अधिक अंतरावर असले तर प्रथम नागमोडी, नंतर अर्धगोल, पुन्हा नागमोडी व त्यानंतर विरुद्ध बाजूला अर्धगोल अशा आकृतिबंधात अधिक गुंतागुंतीची हालचाल कामकरी मधमाशी करते. नृत्य किती जोरदारपणे

होते, यावरुन मधाचा दर्जा कळतो. या संदेशनाची मर्यादा म्हणजे हे संदेशन केवळ मध मिळविण्यासंधर्भातच होताना दिसते. जगभरात सर्वत्र आढळाऱ्या मधमाशा असेच नृत्य करतात. मधाखरीज कोणत्याही इतर बाबतीत असे संदेशन त्या करीत नाहीत. या संदेशनातून अंतर, दिशा व मधाचा दर्जा एवढ्याच गोष्टी समजतात. त्याचबरोबर हे संदेशन क्षितिजसमांतर अंतरासाठी असते. उभी दिशा व अंतर या नृत्यातून व्यक्त होत नाही.

२. स्टिकलबॅक मासा.

जननकाली मासा समुद्राच्या किंवा नदीच्या तळाशी एक घरटे बांधतो. ज्या मादीचे पोट आतील अंड्यामुळे पुढे आलेले असेल अशा मादीभोवती येऊन तो नाच करतो. या नाचाचा प्रतिसाद ती मादी माश्याच्या मागून घरट्यात जाते. घरट्यामध्ये मासा आपल्या तोडांने तिचे पोट घासतो. त्यानंतर ती मादी अंडी टाकते आणि निघून जाते. या अंड्यांवर तो नर आपले रेतुक सोडतो. ज्या वेळेस या हालचाली होतात. त्यावेळी नरमाशाचे पोट तांबडेलाल झालेले असते व डोळे निळे असतात. या दोन्ही गोष्टी असल्याशिवाय (म्हणजे नराचे पोट लाल व मादीचे पुढे आलेले पोट) ही घटनाच घडत नाही.

३. हेरिंग गल्स पक्षी इतर काही प्राणी.

हेरिंग गल्स पक्षांची पिले अंड्यातून बाहेर आल्यावर आई-बापाच्या चोचीवर चोच मारुन अन्न मागतात. या क्रियेला प्रतिसाद म्हणून आई पिलांना अन्न भरवते. उत्तर थायलंडमधील गिबन्स प्राणी नऊ पद्धतींनी हाक मारुन सोबत्यांना साद देतात. मानवेतर संदेशन तीन प्रकारचे असते. ध्वनिक किंवा चीत्कार हा एक प्रकार आहे. जपानमधील डुकरे २३ प्रकारचे ध्वनी काढतात. वेर्वेट जातीची माकडे ३६ प्रकारचे ध्वनी काढतात. अर्थात प्राण्यांचे जेवढे मूलध्वनी असतात, तेवढीच त्यांच्या संदेशांची संख्या असते. माणूस आपल्याजवळ असणाऱ्या मर्यादित मूलध्वनींच्या आधारे असंख्य संकेत निर्माण करतो, मात्र प्राणी अशी निर्मिती करुन शकत नाहीत. डुकरे २३ तर वेर्वेट माकडे ३६ संदेश निर्माण करु शकतील. त्यापेक्षा जास्त नाही. धान्याचा साठा कोणत्या जागी आहे, याचा अंदाज आल्यावर लाल मुंगळ्या विशिष्ट गंध असलेला द्रवरुप पदार्थ आपल्या शरिराबाहेर सोडतात, हा गंधावर आधारित दुसरा प्रकार आहे. मधमाशांचे संदेशन हे स्पर्शाधारित असे तसऱ्या प्रकारात माड़ते. या बरोबरच मानवेतर जीवनातील संदेशनासंदर्भात झालेल्या संशोधनामध्ये कुत्र, मोर-लांडोर, कोंबडा, बेडूक , पोपट यांच्या जीवनामध्ये होणाऱ्या संप्रेषण वर्गव्यहाराचा अभ्यास झालेला आहे.

मानवेतर जीवनामध्ये आढळणाऱ्या संदेशनाच्या विविध पद्धती या मोठ्या प्रमाणावर आनुवंशिक असतात. त्या एका पिढीकडून पुढच्या पिढीपर्यंत आनुंशिकतेमुळेच पोहोचतात. परंतु हे सर्वच मानवेतर प्राण्यांच्या बाबतीत घडते असे नाही. अलीकडे काही भाषाभ्यासकांनी पक्षी आणि सस्तन प्राणी यांच्या संदेशनपद्धतींमध्ये शिक्षणाचा थोडा भाग असल्याचे सिद्ध केलेले आहे.

१.६ भाषेची लक्षणे / वैशिष्ट्ये

मानवी जीवनामध्ये संप्रेषण प्रक्रिया भाषेमुळे गतिशील बनते. मानवेतर प्राण्यांमध्येदेखील संप्रेषण व्यवहार सुरु असल्याचे दिसते. परंतु त्यांच्या संप्रेषण व्यवहाराच्या मर्यादा आपण अभ्यासल्या आहेत. या संप्रेषव्यवहारातील मर्यादांमुळेच मानव इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरला. माणूस 'भाषा' वापरतो म्हणून तो इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरतो. मानवाकडे असलेले भाषा हे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. 'भाषा वापरणारा प्राणी' अशी मानवाची एक व्याख्या केली जाते. या

व्याख्येवरुन भाषेचे मानवी जीवनातील स्थान ध्वनित होते. भाषेचे सामर्थ्य अधिक ठळकपणे अधोरेखित होण्यासाठी किंवा भाषेचे स्वरुप मनावर यथार्थपणे बिंबविण्यासाठी भाषेची सर्व वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे महत्त्वाची बाब आहे.

परिवर्तनशील प्रवृत्ती हे भाषेचे एक विशेष आहे. या प्रक्रियेतूनच दरवर्षी काही बोली मृत होतात. या संदर्भातील बातम्या आपण नियमित वाचतो. जगभरात बोलल्या जाणाऱ्या भाषांचा आढावा घेता; या भाषेमध्ये साधारणतः तीस ते सत्तरच्या दरम्यान मूलध्वनींची संख्या असते. या सर्व भाषांचे मूलध्वनी, शब्दसंपत्ती आणि भाषावापराची पद्धती स्वतंत्र असते. समाज, समाजातील विविध स्तरभेद, भौगोलिक स्थान, शेजार, आर्थिक स्तरभेद, जाती धर्म, व्यवसाय इत्यादी अनेक बाबींमुळे भाषेमध्ये भेद पडत जातात. ध्वनींची भाषेतील मूलसंख्या, शब्दसंपत्ती इत्यादी बाबतीत भाषांमध्ये वेगळेपणा असला तरी; जगातील सर्वच भाषा संदेशवहानाचे काम करीत असतात. संदेशवहनाची प्रत्येक भाषेची क्षमता अफाट असते. कोणाताही नवा संदेश, नवी कल्पना, नवा विचार व्यक्त करण्याचे सामर्थ्य भाषेच्या अंगी असते. मानवी ध्वनी वैशिष्ट्येपूर्ण असल्यामुळे सर्व भाषांमध्ये वेगळेपणा किंवा प्रत्येक भाषेचे रुप स्वतंत्रपणे विकसित झालेले आहे. भाषा वेगवेगळ्या असल्या तरी; सर्वच भाषांचे 'ध्वनी' हे एकच माध्यम आहे. त्यामुळे भाषेची काही लक्षणे सार्वत्रित ठरविता येतात. भाषेच्या वैशिष्ट्यांचा विचार अनेक भाषाभ्यासकांनी केलेला आहे.

भाषेची लक्षणे / वैशिष्ट्ये :

प्रसिध्द भाषावैज्ञानिक सी. एफ. हॉकेट यांनी भाषेची सात प्रमुख वैशिष्ट्ये सांगितलेली आहे. ती पुढीलप्रमाणे.

१) द्विस्तरीय संरचना / दुहेरीपणी. (Duality)
२) निमितिक्षमता. (Productivity)
३) अदलाबदला. (Inter Changeability)
४) यादृच्छिकता. (Arbitrariness)
५) सांस्कृतिक संक्रमण. (Cultural Transimission)
६) विशिष्टता. (Specialization)
७) स्थलकालातीतता. (Displacement)

१. द्विस्तरीय संरचना / दुहेरीपणा. (Duality) :

मानवी मुखावाटे उच्चारल्या जाणाऱ्या असंख्य ध्वनींपैकी काही निवडक ध्वनी भाषेमध्ये मूलध्वनी म्हणून वापरले जातात. हे मूलध्वनी म्हणजेच त्या त्या भाषेची अक्षरे होय. ही अक्षरे अथवा वर्ण प्रत्येक भाषेनुसार वेगवेगळी आणि कमी-अधिक असल्याचे दिसतात. या मूलध्वनींची साधारणतः ३० ते ७० एवढी संख्या असते. या मूलध्वनींची जुळणी करुन अर्थघटक म्हणजेच शब्दांची निर्मिती केली जाते. हे मूलध्वनी स्वतंत्र असतात तेव्हा त्यांना काहीही अर्थ नसतो. उदाहरणार्थ न्, अ, क्, आ या मूलध्वनींना स्वतंत्रपणे मराठी भाषेत काहीही अर्थ नाही. परंतु या मूलध्वनींची न् + आ + क् + अ अशी जुळणी केल्यानंतर 'नाक' हा मानवी शरीरातील एक अवयव असा अर्थ प्रतीत होतो. हा शब्द मात्र अर्थपूर्ण ठरतो. त्यामुळे मानवी भाषेतील मूलध्वनींचा मर्यादित साठा हा भाषेतील एक स्तर व त्याची अर्थपूर्ण, नियमबद्ध जुळणी करुन

संदेशवहनासाठी यथार्थ रुप सिद्ध करणे हा भाषिक संरचनेचा दुसरा स्तर होय. ही द्विस्तरीय संरचना हे भाषेचे मूलभूत आणि महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

२. निर्मितिक्षमता. (Productivity) :

भाषा ही निर्मितीक्षम आहे. व्यवहारामध्ये संदेशन केवळ सुट्या-सुट्या शब्दांनी किंवा भाषेसाठी निश्चित करण्यात आलेल्या मूलध्वनींच्या उच्चाराने पूर्ण होत नाही. यासाठी भाषेमध्ये ध्वनींच्या, शब्दांच्या जुळणीला महत्त्व आहे. प्रत्येक भाषेमध्ये निवडक ध्वनींचा वापर करुन लाखो शब्द, वाक्यांची निर्मिती करता येणे ही भाषेची निर्मितीक्षमता होय. जीवनात पूर्वी कधीही न ऐकलेले वाक्य व्यक्ती निर्माण करुन शकते. तसेच पूर्वी न ऐकलेले वाक्य काहीही विशेष प्रयत्न न करता समजते. त्याचे कारण भाषेची नियमव्यवस्था, शब्दसंग्रह प्रत्येक भाषिकाला अवगत असतो. ही नियमव्यवस्था निर्मितीक्षम आहे. त्यामुळेच एक वाक्य समजले की भाषेच्या साहाय्याने अनंत प्रकारची वाक्ये आपण तयार करतो. एकाच विषयावर दिले जाणारे व्याख्याने किंवा लिहिले जाणारे पुरस्तक आपण भाषेच्या निर्मितिक्षमतेचे उदाहरण म्हणून पाहू शकतो. त्याबरोबर एखाद्या वाक्याच्या धरतीवर लहान मूल वेगवेगळी वाक्ये बनवायला सुरुवात करते ही भाषेची निर्मितीक्षमताच आहे उदाहरणार्थ, एखाद्या भाषा शिकत असलेल्या लहान मुलाला 'पाणी दे' असे वाक्य सांगितले तर ते मूल १. चेंडू दे, २. दूध दे, ३. खाऊ दे अशी अनेक वाक्ये बनविताना दिसते. या संदर्भात आणखी एक उदाहरण पाहू.

१. मी जेवत आहे.
२. मी खाऊ खात आहे.
३. मी शाळेला जात आहे.
४. मी बदलापूरला कामानिमित्त जात आहे.
५. मी उद्या चित्रपट पाहायला जात आहे.

ही वरील पाच वाक्ये एकाच पद्धतीने तयार झालेली आहेत. येथे क्रियेसंदर्भातील पहिले वाक्य येते. पुढील सर्व वाक्ये याच धर्तीने तयार करण्यात आलेली आहेत. अशी अजून शेकडो, हजारो वाक्ये तयार होऊ शकतात. आपण ती तयार करुन शकतो. ही भाषेची निर्मितीक्षमता आहे. निर्मितीक्षमते संदर्भात आणखी एक मार्मिक उदाहरण देता येईल. प्रवासामध्ये झालेल्या भीषण अपघातातून बचावलेले काही सहप्रवासी अपघाताचे, जीवनात येऊन गेलेल्या या प्रसंगाचे चित्र सांगताना; स्वतःच्या पद्धतीने सांगतील. आशय एकच असेल परंतु अपघातातल प्रत्येक व्यक्ती तो आपल्या-आपल्या भाषेमध्ये रचना करून व्यक्त करील. भाषेमध्ये अशा अनेक रचना निर्माण करण्याची क्षमता असते. ही भाषेची निर्मितीक्षमताच आहे. या निर्मितीक्षमतेमुळे भाषेची संदेशवहनाची क्षमता अमर्याद झालेली आहे. निर्मितीक्षमता हे भाषेचे एक वैशिष्ट्ये आहे.

३. अदलाबदल. (Inter Changeability) :

प्रत्येक वक्ता हा श्रोता असू शकतो, तसे श्रोता हा वक्ता असू शकतो. 'चांगलास शहाणाच आहेस तू' असे स्वतःलाच म्हणताना वक्ता व श्रोता या भूमिका आपणच करीत असतो. भाषण करताना आपण फार घाईघाईने, भलतेच बोलत राहिलो तर आपल्या लक्षात येताच आपण सावकाश, स्पष्टपणे बोलू लागतो. संकेतीकरणाचे व विसंकेतीकरणाचे नियाम वक्ता व श्रोता यांच्याबाबतीत एकच असावयास हवेत. नियंत्रकाप्रमाणे भाषा हे कार्य करीत असते. प्राण्यांमधील संदेशन साधारणतः एकाच दिशेन होत असते. हरणाने डरकाळी फोडली व वाघ पळत सुटला असे होत नाही.

४. यादृच्छिकता. (Arbitrariness) :

यादृच्छिकता हे भाषेच एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. यादृच्छिकतेचे तत्व सर्व भाषांमध्ये असते. त्यामुळे भाषेमध्ये होणारी अर्थपरिवर्तने भाषिकांच्या आकलनक्षमतेच्या आवाख्यात राहतात. भाषेमध्ये होणारे अर्थपरिवर्तन हे यादृच्छिकतेमुळे शक्य होते. ध्वनी तेच राहतात परंतु शब्दांचे अर्थ बदलतात. काही वेळा ध्वनींमध्ये परिवर्तन घडून येते परंतु अर्थ किंवा सूचित आशय कायम राहतात. याआधी आपण मानवेतर संप्रेषणाचा अभ्यास करताना; मधमाशांच्या संदेश वहनाचे उदाहरण पाहिले आहे. त्यांच्या संदेशवहनाचा किंवा कामकरी मधमाशीच्या विशिष्ट हालचालींना विशिष्ट असे अर्थ असल्याचे आढळले आहे. परंतु मानवी भाषेच्या बाबतीत असे घडतना दिसत नाही. त्यामुळेच एका वस्तूसाठी प्रत्येक भाषेमंध्ये वेगवेगळे शब्द आढळतात. नादानुकारी शब्द सारखेच असते तर क्रो आणि कावकाव यात काही फरक सापडला नसता. यादृच्छिकतेच्या तत्त्वामुळेच जगभरातील भाषा एकमेकंपासून भिन्न राहिलेल्या आहेत. भाषा शिकताना ग-गवतातील अथवा म-मक्यातील असे शिकवीण्याची पद्धत आहे. परंतु हे भाषा शिकण्याच्या प्राथमिक पातळीसाठी असते. अर्थाअर्थी 'ग' चा गवताशी व 'म' चा मक्याशी काही संबंध नसतो. प्रत्येक भाषा ही पूर्णतः स्वतंत्र विकसित झालेली दिसते. त्यामुळे ती स्वतंत्र असते. आकलनासाठी ती स्वतंत्रपणे शिकावी लागते. शब्दाने सूचित होणारा आशय आणि तो शब्द यांच्यामध्ये कोणताही कार्यकारण संबंध नसतो. म्हणजेच शब्द आणि त्या शब्दामुळे प्रतीत होणारा आशय पूर्णपणे यादृच्छिक असतो.

५. सांस्कृतिक संक्रमण : (Cultural Transimission) :

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला सामाजिक संस्कृतिचे संक्रमण होत असते. व्यक्तीला भाषा मागील पिढीकडून सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून मिळते. भाषा आनुवंशिक प्राप्त होत नसली तरी; भाषा शिकण्याची क्षमता आनुवंशिक असते. या क्षमतेमुळेच प्रत्येक व्यक्ती भाषा शिकू शकते. ही भाषा मागील पिढीचे संचित असते. समाजाची संस्कृती, परंपरा, श्रद्धा, रुढी, चालीरीती, ज्ञान इत्यादी बाबी भाषेच्या साहाय्याने संवर्धित केल्या जातात. हा समाजाचा ठेवा पुढील पिढीच्या भाषेतूनच प्राप्त होतो. त्यामध्ये ती व्यक्ती नव्याने काही भर घालते. ही संस्कृतिक वाढ भाषेमुळे शक्य होते. समाजामध्ये शिक्षणाची परंपरा वाढल्यानंतर, शिक्षण तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचल्यानंतर परंपरेने चालत आलेल्या अनेक गोष्टी कालबाह्य झाल्या आहेत. नव्या कल्पना, वैज्ञानिक दृष्टिकोण वाढला आहे. लोकांच्या समजुतीमध्ये बदल झालेले आहेत. हे सर्व भाषेच्या साहाय्याने होते. पुढील पिढीकडे हे संचित असेच पोहचते. ही सांस्कतिक वाढ, वहन भाषेमुळे शक्य होते. संस्कृतीचे संवर्धन आणि पुढील पिढीकडे संक्रमण करणे ही भाषेची महत्त्वाची क्षमता आहे.

६. विशिष्टता. (Specialization) :

भाषेतील संदेशवाहक प्रणालीची विशिष्टता संदेशसूचनांची प्रक्रिया आणि सूचित केलेला संदेश यामधी संबंधाच्या स्वरुपावर अवलंबून असते. मानवी संप्रेषण व्यवहारामध्ये शारीरिक पातळीवरील हालचालींचा उपयोग करुन दिला जाणारा संदेश आणि ध्वनिसंकेतांचा वापर करुन दिला जाणारा संदेश यामध्ये फरक करता येतो. रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखवणे आणि आपण रेल्वेगाडी सुरु करुन निघण्याची तयारी करणे या संदेशनामध्ये प्रत्यक्ष कार्यकारण संबंधाचे नाते आहे. परंतु आपण काही वेळा प्रवासाला निघालेलो आहोत, वाटेत विरुद्ध दिशेने जाणाऱ्या प्रवासाने पुढे अपघात झालेला असल्याने वाट बंद आहे; असे सांगताच आपण आपला मार्ग बदलतो. (ही वाट बदलण्याची कृती आपण प्रत्यक्ष अपघात न पाहता करतो) येथे प्रत्यक्ष न पाहता सूचित होते. हा एक भाषेचा विशेष गुण आहे. या विशिष्टतेमुळेच संदेशन व्यवहार सुलभ

होतो. 'जेवण तयार आहे' हे ध्वनी ऐकल्यानंतर हात धुऊन पाटावर येणे, या क्रियेतील संकेत विशिष्टपणे बनलेले आहेत.

७. स्थलकालातीतता. (Displacement) :

स्थळ, काळाची बंधने ओलांडून आशयाचे वहन, करण्याचे सामर्थ्य भाषेमध्ये असते. स्वतःच्याप्रदेशाचा इतिहास, घराण्याची परंपरा, राजकीय स्थित्यंतरे, वर्तमान स्थिती, भविष्यकाळअसंदर्भातील भाकिते, मनोदय किंवा पुढचे नियोजन याबाबतीत आपण बोलू शकतो. एखाद्या घटनेशी प्रत्यक्ष संबंध नसताना, तेथ आपण उपस्थित नसताना त्या घटेनविषयी बोलतो. त्या घटनेविषयी ऐकतो. त्यापासून योग्य तो अर्थबोध घेतो. निसर्ग प्रत्यक्ष न पाहता; त्या निसर्गावरील कविता आपल्याला समजते. एखाद्या कवितेतून, कथेतून न पाहिलेल्या, न अनुभवलेल्या घटनेचा, प्रसंगाचा आपण अनुभव घेतो. अमेरिकेचा नायगरा धबधबा, काश्मीर, हिमालय ही स्थळे न पाहताही आपण त्यांची वर्णने वाचून आनंद घेतो. भूत-देवदूत या काल्पनिक गोष्टीवरही आपण बोलू शकतो. न पाहिलेला प्रदेश, माणसे याबाबत आपण गप्पा मारतो. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आज हयात नाहीत परंतु त्यांच्या शौर्याच्या कथा आपण आजही श्रद्धेने ऐकतो, सांगतो, वाचतो; त्या घटनांची कल्पनेने अनुभूती घेतो. याचाच अर्थ आपण स्थळ, काळाची बंधने झुगारुन भाषेच्या मदतीनेच या गोष्टी करतो ही भाषेची स्थलकालातीतता भाषेचे सामर्थ्यच आहे.

सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेली भाषेची ही सात वैशिष्ट्ये सर्व भाषांमध्ये सार्वात्रिक दिसतात. भाषेच्या या महत्त्वाच्या वैशिष्ट्याबरोबरच भाषेची आणखी काही वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत. त्याचा थोडक्यात विचार करता येईल.

८. भाषा एक सामाजिक संस्था :

समाजातील प्रत्येक मानवाच्या आणि मानवाच्या तसेच मानवी समाजाच्या अनेक मूलभूत गरजा असतात. या गरजांच्या पूर्तता करण्यासाठी सामाजिक संस्था अस्तित्वात आलेल्या असतात. समाज टिकून राहणे, समाजाला स्थैर्य लाभणे व समाजामध्ये शिस्त येऊन एक व्यवस्था निर्माण होणे यासाठी समाजा अंर्तगत सामाजिक संस्था कार्यरत असतात. कुटुंब, धर्म, विवाह या प्रमाणेच 'भाषा' ही एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. प्रत्येक समाजातील सामाजिक संस्थांचे स्वरुप भिन्न असते. या नियमाप्रमाणे भाषेचे रुप देखील प्रत्येक समाजानुसार बदलताना दिसते.

भाषा हा एक सामाजिक दस्तऐवज आहे. भाषा समाजामध्ये राहूनच शिकावी लागते. समाजाच्या निर्मितीपासून, समाजाचे अस्तित्व आणि विकासासाठी भाषा कारणीभूत असते. या प्रक्रियेसाठी भाषेचे योगदान महत्त्वाचे आहे. भाषा समाजव्यवहाराचे सवश्रेष्ठ साधन ठरली आहे. भाषेमध्ये शब्दांना, वाक्यांना अर्थ हे समाजाकडून दिले जातात. त्यामुळेभाषा व्यक्ती वापरीत असली तरी; ती समाजाची असते. भाषेची सामाजिकता तपासण्यासाठी आजूबाजूची पुष्कळ उदाहरणे सांगता येतील. समाज ही संकल्पना व्यापक आहे. समाज अस्तित्त्वात येण्यासाठी एका विशिष्ट उद्देशाने लोक एकत्र यावे लागतात. त्यांच्यामध्ये सतत आंतरक्रिया सुरु राहावी लागते. सुसंवादित्वाची घनता समाजासाठी महत्त्वाची आहे, हे सुसंवादित्व भाषेमुळे शक्य होते. त्यामुळे भाषा आणि समाजाचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. कोणताही समाज एकसंघ नसतो. एक भाषिक समाजामध्येही विविध भेद पाहयाला मिळतात. धर्म, जाती, वर्ग, व्यवसाय, इत्यादी कारणांनी समाजामध्ये भेद अस्तित्वात येतात. या विविध भेदांनुसार भाषेचे रुप बदलते.

भाषा हे सादन चिन्हात्मक, प्रतिकात्मक आहे. संकेत वापरण्यात येतात ते ध्वनिरुप असतात. संकेतातून आशय व्यक्त होतो. तथापि, संकेतांचा आणि आशयाचा कार्यकारण संबंध असत नाही. भाषेतील संदेत यादृच्छिक स्वरुपाचे असून ते रुढीवर आधारित असतात. या संकेतांना सामाजिक मान्यता असते. त्यामुळेच व्यवहार सुरळीत पार पडतो. भाषा आकलनामध्ये अडथळे निर्माण होत नाहीत.

समाज स्वास्थायासाठी भाषा महत्त्वाची भूमिका पार पाडते. सामाजिक संबंध राखणे, वाढविणे, तोडणे या गोष्टी भाषेतून होत असतात. त्याच बरोबर सामाजिक, सांस्कृतिक मूल्येही भाषेतून व्यक्त होतात. लैंगिक व्यवहाराशी संबंधित किंवा स्त्री-पुरुषांच्या गुप्तांगांची नावे आपण उच्चारत नाही. तेथे उघडपणे भाषा न वापरता आपण काही मूल्ये जोपासतो. हे कार्य सामाजिक स्वास्थ्यासाठीच भाषा करते. सामाजिक स्वास्थ्य भाषेमुळे टिकते. या बाबींचा सखोल विचार केल्यानंतर भाषा एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे हे सिद्ध होते.

९. अर्जित भाषा :

भाषा ही दैवी देणगी किंवा निसर्गाची किमया नाही. भाषा ही मानवलाा अर्जित करावी लागते. भाषा शिकणे ही नैसर्गिक सहजप्रेरणा आहे.भाषा ही समाजाची निर्मिती आहे. भाषा समाजामध्ये विकसित होत राहते. भाषा माणसाला जन्मतळच किंवा उपजतपणे अवगत नसते. मात्र माणासाच्या मेंदूमध्ये भाषा शिकण्याची क्षमता उपजत असते मानवाच्या मेंदूमध्ये एक जैविक कळ (Biological Trigger) असते. विशिष्ट वयामध्ये सामाजिक संदर्भामध्ये ती कार्यान्वित होते. त्यामुळे सुरुवातीच्या साधारणतः ४८ महिन्यांपर्यत मूल जैविकदृष्ट्या भाषा शिकण्याचा तयारीमध्ये असते. एवढ्या कालावधीमध्ये मानवाला भाषा प्राप्त होते. मानव भाषा ही ऐकून ऐकून शिकतो. समाजामध्ये वापरण्यात येणारी भाषा वारंवार ऐकत राहिल्यामुळे ती शिकली जाते. त्यामुळे भाषा अर्जित आहे. ती समाजामध्ये राहूनच शिकावी लागते. लहान मूल विशेषतः आपल्या आईकडून भाषा शिकते. बडबडगीते, अंगाईगीते या शिकण्याचाच भाग असतो.

प्रसारमाध्यमांचा वाढलेला प्रभाव अशा असंख्य कारणांमुळे समाजजीवन बदलते आहे. हा समाज बदलतो. तशी त्यांची भाषा वदलते. संगणक-मोबाईल फोनचा वाढता वापर भाषेमध्ये परिवर्तन घडवून आणतो आहे. या क्षेत्रांशी संबंधित असंख्य शब्द आणि अर्थातच ध्वनी आता भाषेमध्ये प्रविष्ठ झालेले आहेत. कॉल कर, मिस्स कॉल दे, मेसेज दे, रिंग दे, मेल आलेला आहे. मेल पाठव, सर्फीग कर इत्यादी शब्दप्रयोग सर्रास वापरले जातात. 'डोके चालत नाही' असे सांगायचे असेल तर 'माझी मेमरी चालत नाही' किंवा 'डोकं हँग झालंय'. अशी वाक्ये आता वापरली जाऊ लागली आहेत. हा भाषेमध्ये झालेला बदल हे भाषिक परिवर्तन आहे. बदलत्या समाजजीवनाबरोबर भाषेमध्ये हे परिवर्तन अविरत होत राहणअर आहे याच प्रक्रियेला भाषेचा विकास म्हटले जाते.

१०. भाषेची रौखिकता :

भाषा शिकणे म्हणजे भाषेचा शब्दसंग्रह आणि भाषा वापरामागील नियम समजावून घेणे होय. भाषा वापरत असताना प्रत्येक व्यक्ती भाषेचे नियम पाळत असते. भाषा ही ध्वनींची संरचना आहे. भाषिक ध्वनीच्या सानुक्रम रचनेला समाजामध्ये विशिष्ट असे अर्थ असतात. झ्, आ, ड्र, अ या स्वतंत्र ध्वनींना काहीही अर्थनसतो. या ध्वनींची म + आ + न + अ अशी सानुक्रम रचना केल्यानंतर 'मान' हा अर्थपूर्ण शब्द तयार होतो. त्यामुळे 'मान' हा शब्द उच्चारायचा असेल तरट तो 'मान' असाच उच्चारावा लागतो. नमा, मना अशा रचनांना मराठी

भाषेमध्ये कोणताही अर्थ नाही. त्यामुळे अर्थ नसलेल्या रचनांचा उच्चार भाषेमध्ये केला जात नाही. भाषा वापरुन अर्थ निघणे सर्वात महत्त्वाचे आहे. नाहीतर मानवी ध्वनींचा अर्थही उच्चार म्हणजे लहान मुलांचे निरर्थक बडबडणे होऊन जाइल. विशिष्ट सानुक्रम रचना नसलेल्या ध्वनींना म्हणूनच भाषेमध्ये स्थान नाही. पदिमांच्या (शब्दांच्या) क्रम बदलाबाबत थोडे स्वतंत्र्य आपण येऊ शकतो. परंतु वर्णाच्या बाबतीत हे स्वतंत्र्य घेता येत नाही. आपण पोहायला जाऊ, जाऊ आपण पोहायला, पोहायला जाऊ आपण अशी शब्दाची जुळणी केली तरी अर्थामध्ये फरक पडत नाही. परंतु वरील 'मान' या शब्दातील वर्णाच्या जुळणीसंदर्भातील उदाहरणामध्ये येणारी अर्थहीनता आपण पाहिली आहेच. या दृष्टीने भाषेचा विचार केल्यास भाषा रैखिक असते हे सिद्ध होते.

११. भाषेची परिवर्तनशीलता :

भाषेची सामजिकता वरील मुद्यामध्ये आपण पाहिली. भाषा ही समाजाची असते. ती महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. त्यामुळे बदलत्या समाजजीवनाबरोबर भाषा बदलत राहते. म्हणूनच भाषा परिवर्तनशील आहे. पेशवेकालीन बखरीतील गद्द, इंग्रजांच्या कालखंडातील गद्द आणि आजची मराठी एकत्र ठेवली तर भाषेची परिवर्तनशीलता ध्यानातं येते. पतीचे नाव न घेणारी, पतीसाठी 'तिकडून येणे झाले नाही' यासारखी भाषा वापरणारी स्त्री आज पतीचे नाव घेते. आरे, तुरेच्या भाषेत बोलते. ही भाषेची परिवर्तनशीलता आहे. समाज बदलला म्हणून समाजाची भाषा बदलते. ऐतिहासिक कालखंडातील शस्त्रे, अवजारे आता काही कामाची राहिली नाहीत. ते शब्द कालाबाह्य झाले. त्यांची जागा नवीन शब्दांनी घेरली आहे.

बदलते समाजजीवन, नागरीकरण, औद्योगिकीकरण, नवे तंत्रज्ञान, नवे शोध, भौतिक साधनाची वाढती रेलचेल, या साधनांच्या आहारी चाललेली नवी पिढी, शिक्षणाचा सर्वदू झालेला प्रसार, भाषा विषयी अनेक समज व गैरसमज आहेत. तसं पहिलंतर पाहिल तर भाषा अवगत करणे ती भाषा व्यवहारसाठी वापरले ही बाब. सोपी आहे. पण व्यक्तीला भाषा बोलणे सोपे वाटते. भाषा लिहणे अवघड वाटते. कारण भाषा बोलताना तिच्या व्याकरणिक गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु भाषा लिहताना व्यवसायिक रुपाला महत्व द्यावे लागते. व रचना करावी लागते. म्हणजे व्यवहारासाठी ज्या पध्दतीने आपण वाक्यरचना करतो की वक्यारचना आपण लिखित स्वरुपात वापरु शकत नाही कारण लिखित भाषेमद्ये व्याकरणी नियमाचे पालन करावे लागते भाषे विषयी बरेच समज-गैरसमज आहेत. त्यांच्या विचार पुढील प्रमाणे करता येईल.

समारोप :

सी. एफ. हॉकेट यांनी भाषेची सात वैशिष्ट्ये सांगितली आहेत. एकूण भाषेची अकरा वैशिष्ट्ये भाषा अभ्यासकांनी सांगितली आहेत.

संदर्भग्रंथ :

१. भाषा व संस्कृती - ना. गो. कालेलकर.
२. भाषा विज्ञान आणि मराठी भाषा - डॉ. अनिल गवळी.
३. समाज भाषा विज्ञान - मराठी कादंबरी - डॉ.नंदकुमार मोरे.
४. भाषा आणि भाषा शास्त्र - श्री. न. गजेंद्र गडकर.

❖❖❖❖

२

भाषा विषयक समज - गैरसमज

घटक रचना :

२.१ प्रस्तावना
२.२ भाषा शुद्ध आणि अशुद्ध
२.३ भाषा प्रमाण - अप्रमाण
२.४ भाषा श्रेष्ठ व कनिष्ठ
२.५ भाषा लिखित मौखिक
२.६ भाषा भेद
२.७ संदर्भग्रंथ सूची

२.१ प्रस्तावना

भाषेविषयक समाज - समज गैरसमज आहेत. कोणतेही भाषा शुद्ध किंवा अशुद्ध नसते. प्रत्येक भाषा ही त्या भागाची प्रदेशाची शुद्ध भाषांच असते. भाषाश्रेष्ठ किंवा कनिष्ठ असा भेद करणे चुकीचे आहे.

२.२ भाषा शुद्ध आणि अशुद्ध

भाषा शुद्ध आणि अशुद्ध हा भाषांमध्ये समज मोठ्या प्रमाणात आढळतो. विशिष्ट भाषा शुद्ध व विशिष्ट भाषा अशुद्ध हे विशेषतः प्रमाणभाषा आणि बोलीभाषांच्या संदर्भात समज आहे. हा समज चुकीचा आहे.

भाषाविज्ञानाच्या दृष्टीने सर्व भाषा समान पातळीवर आहेत. प्रत्येक भाषा व्यवहारक्षम असते. ती कमी अधिक लोकांकडून वापरली जात असते. श्रष्ठ-कनिष्ठत्वाप्रमाणेच सुद्धशुद्धतेची कल्पनाही अवैज्ञानिक आहे. कोणतीही भाषा शुद्ध किंवा अशुद्ध नसते. सर्वसामान्यपणे प्रमाणभाषा शुद्ध तर बोलीभाषा अशुद्ध असा समज आहे. त्यामुळेच 'आनी' , 'पानी' म्हणणाऱ्या लोकांना गावंढळ ठरविले जाते. त्यांची ही भाषा गावंढळ भाषा म्हणून हेटाळणीचा विषय होते. दूरदर्शन, चित्रपटांमध्ये खेड्यातल्या माणसांच्या तोंडी अशी भाषा घातल्याखेरीज तो खेडूत ठरत नाही. हा भाषिक दृष्टिकोन अवैज्ञानिक आहे. एखाद्या बोलीरुपाची अशी संबावना करणे भाषाभ्यासकांना मान्य नाही. 'प्रमाणभाषा' म्हणून मान्यता मिळालेली भाषादेखील पूर्वाश्रमाची बोलीच असते. सामाजिक सांस्कृतिक वर्चस्वाच्या भावनेतून हा दृष्टीकोण तयार होतो. कोणताही समाज सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय वर्चस्वातून स्वतःच्या बोलीप्रमाणभाषेचा दर्जा मिळवू

शकतो. या वर्चस्वातून अशा समाजाची भाषा 'प्रमाण' आणि इतरांच्या भाषा 'बोली ' ठरविल्या जातात. नंतर प्रमाणभाषा ही शुद्ध आणि बोली अशुद्ध असा हे समाजमत चूकीचे आहे. कारण कोणतही भाषा शुद्ध अशुद्ध नसते.

२.३ भाषा प्रमाण - अप्रमाण

प्रत्येक भाषेमध्ये त्या भाषेच्या वापरासंबधी काही नियम केलेल असतात. हे नियम सर्वनाम, वचन, लिंग, विभक्ती अशा सर्वच बाबतीत नियम असतात. या नियमानुसार जी भाषा कार्य करते ती भाषा प्रमाणभाषा. 'एका विशिष्ट भ-भागाच्या मोठ्यात मोठ्या समूहाकडून जी भाषा बोलली जाते तिला 'प्रमाण भाषा' म्हणतात तर 'एका विशिष्ठ भू-भागाच्या लहानात लहान समुहाकडून जी भाषा बोलली जाते तिला 'बोली भाषा' म्हणतात. अशी थोडक्यात व्याख्या केली जाते. विशेषताः प्रंतिक भाषेमुळे प्रमाणभाषेला जासतच महत्व आलेले असते. त्यामुळे बोलीभाषेला महत्व कमी झालेले असते. मात्र असे असले तरी भाषा ही श्रेष्ठच असते. कोणतीही भाषा श्रेष्ठ, कनिष्ठ नसते.

२.४ भाषा श्रेष्ठ व कनिष्ठ

भाषेबद्दल श्रेष्ठ कनिष्ठ हा एक गैरसमज सार्वत्रिक आहे. काहींच्या दृष्टिकोनातून एक विशिष्ट भाषा ही श्रेष्ठ आहे. त्यामुळे बऱ्याचदा प्रमाणभाषा श्रेष्ठ व बोली भाषा कनिष्ठ असा समज झालेला असतो. तो चुकीचा आहे. भाषेविषयीची श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना समाजामध्ये खोलवर रुजलेली आहे. प्रत्येक समाजाला आपली भाषा श्रेष्ठ वाटते. त्यामुळेच ती समाजाची अस्मिता ठरते. या श्रेष्ठत्वाच्या भाव्नेतूनच भाषेसंदर्भातील मूल्यमापनात्म दृष्टी वाढते. या मागे समाजाचे सामाजिक - सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक वर्चस्व कारणीभूत ठरते. समाजामध्ये पुढरलेला वर्ग आपली भाषा श्रेष्ठ मानतो. इतरांची कनिष्ठ ठरवितो. भाषाभ्यासकांनी भाषेसंदर्भातील विकसित केलेला वैज्ञानिक दृष्टिकोन यासाठी महत्त्वाचा आहे. भाषेसंदर्भातील श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाची भावना, तिच्या विशुद्धतेसंदर्भातील समजुती समाजात खोलवर रुजलेल्या आहेत. ऐखादी भाषा किती लोकांकडून आणि किती विस्तृत भूभागावर बोलली जाते; यावरती तिची श्रेष्ठ-कनिष्ठता अवलंबून नसते. सर्वसामान्य मराठी भाहिक लोक आज इंग्रजी भाषेला अवास्तव महत्त्व देताना दिसतात. इंग्रजी ही जगभरामध्ये बोलली जाणारी भाषा आहे. ती जगातील आजची सर्वश्रेष्ठ ज्ञानभाषा आहे. अशी या भाषेची सर्व लोक भलावण करताना दिसतात. इंग्रजी भाषेसंदर्भात वरील मतांमध्ये तथ्य असले तरी; त्यामुळे ती भाषा सर्व श्रेष्ठ म्हणतात येणार नाही. भाषा कोणतीही असो संदेश देणे हे तिचे कार्य आहे. हे कार्य भाषेकडून पूर्ण होत असते म्हणून भाषा श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाचा प्रश्नच निर्माण होत नाही.

२.५ भाषा लिखित मौखिक

नैसर्गिक कृत्रिम कारणाने प्रत्येक भाषा वेगळी ठरते. कृत्रिम कारणे, नैसर्गिक कारणे, भाषेवर प्रभाव टाकत असतात. त्यातून अनेक भाषा बोली उदयास येत असतात. त्यांची चिन्हव्यवस्था, व्याकरणिक व्यवस्था भिन्न असते. मुळाक्षरे, स्वर भिन्न असतात. हिंदी व मराठी या भाषांचे उदाहरण घेतल्यास असते लक्षात येते की, मुळाक्षरे जवळजवळ सारखेच आहेत.

परंतु हिंदी मध्ये 'ळ' नाही. मराठीमध्ये मात्र 'ळ' आहे. इंग्रजीमध्येही 'ळ' ऐवजी 'ल' (L) वापरला जातो. क्रियापद मराठी व हिंदी या दोन्ही भाषांमध्ये वाक्याच्या शेवटी येते. तर याउलट इंग्रजी भाषेमद्ये मात्र क्रियापद बहुतांशी वाक्याच्या सुरुवातीलाच येते. उदा. Save the Boy, Kept this bag या सारख्या उदाहरणावरुन जे सहज लक्षात येते की, भाषांमध्ये लिखित भेद बऱ्याच प्रमाणात दिसून येतात. या व्यतिरिक्त बोलीवर मात्रा अनिक प्रमाणभाषांचा किंवा दुसऱ्या भाषांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

नैसर्गिक कृत्रिम भाषाभेद ज्या कारणामुळे निर्माण होतात. त्यामुळेच मौखिक भाषाभेद ही निर्माण झालेले दिसून येतात. परंतु या कारणाव्यतिरिक्त वागिंद्रियात काही बिघाड झाल्यास शब्द उच्चारता येत नाही. जीभ दुहेरी असणे त्याचप्रमाणे ओठ ढाटलेला असणे त्यामुळे भाषा नीट उच्चारता येत नाही. त्यामुळे 'स्त्री' चा उच्चार 'इस्त्री', 'स्क्रू' चा उच्चार 'इस्क्रू' अशा पद्धतीने केला जातो.

२.६ भाषा भेद

व्यावसायिक भाषाभेद :

व्यवसायानुसार भाषा बदलत असते. उदा. बँकिंग क्षेत्रामध्ये काम करणारे, न्यायालयीन क्षेत्रामध्ये काम करणारे, शासनाच्या विविध खात्यात असणारे, शैक्षणिक क्षेत्रात असणारे छोटे मोठे लघुउद्योग करणारे, शेतीशी निगडीत व्यवसाय करणारे, वाहतूक व्यवसाय करणारे अशा अनेक प्रकारचे व्यवसाय करणाऱ्यांची भाषा ही भिन्न असते. उदा. बँकिंग क्षेत्रात असणाऱ्यांचा संबंध बॅलन्स, चेक, अकाउन्ट, स्लीप, विड्रॉल, पासबुक या भाषेशी, शब्दांशी येतो. शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचा संबंध फळा, खडू, पुस्तक, पेन, ग्रंथालय, महाविद्यालय या शब्दांशी, येतो. न्यायालयीन क्षेत्राचा संबंध वकील, न्यायाधीश, कोर्ट, दावेदार, प्रतिवादी,वादी, दिवाणी, फौजदारी, आदेश निकालपत्र अशा अनेक शब्दांशी येतो. छोट्या मोठ्या व्यवसायाशी संबंधित गोष्टीशी येतो. अशाप्रकारे व्यवसायानुसार भाषेचे स्वरुप बदलते.

कृत्रिम भाषाभेद :

नैसर्गिक भाषाभेद हे नैसर्गिक वातावरण परिस्थिती यामुळे नैसर्गिक भेदाभेद निर्माण होतात. परंतु कृत्रिम भाषाभेद हे अनेक समूह आपल्या संस्कृती वैशिष्ट्यांनी युक्त आपली नैसर्गिक भाषा वापरत असतात. त्यावेळी भाषेमध्ये कृत्रिमता निर्माण होते. त्यामुळे जाणीवपूर्वक बऱ्याचदा "नाही" च्या ऐवजी "नाय" असे वापरले जाते. राजकारण, जात, धर्म, शिक्षण, सामाजिक स्थान, आर्थिक स्तर, परंपरा इ. घटक भाषेवर प्रभाव टाकतात आणि त्यातून बऱ्याचदा कृत्रिम भाषाभेद निर्माण होत असतो.

लिखित भाषाभेद :

नैसर्गिक कृत्रिम कारणाने प्रत्येक भाषा वेगळी ठरते. कृत्रिम कारणे, नैसर्गिक कारणे, भाषेवर प्रभाव टाकत असतात. त्यातून अनेक भाषा बोली उदयास येत असतात. त्यांची चिन्हव्यवस्था, व्याकरणिक व्यवस्था भिन्न असते. मुळाक्षरे, स्वर भिन्न असतात. हिंदी व मराठी या भाषांचे उदाहरण घेतल्यास असे लक्षात येते की, मुळाक्षरे जवळजवळ सारखेच आहेत. परंतु हिंदी मध्ये 'ळ' नाही. मराठीमध्ये मात्र 'ळ' आहे. इंग्रजीमध्येही 'ळ' ऐवजी 'ल' (L) वापरला

जातो. क्रियापद मराठी व हिंदी या दोन्ही भाषांमध्ये वाक्याच्या शेवटी येते. तर याउलट इंग्रजी भाषेमध्ये मात्र क्रियापद बहुतांशी वाक्याच्या सुरुवातीलाच येते. उदा. Save the boy, Kept this bag या सारख्या उदाहरणावरुन हे सहज लक्षात येते की, भाषांमध्ये लिखित भेद बऱ्याच प्रमाणात दिसून येतात. या व्यतिरिक्त बोलीवर मात्र अनेक प्रमाणभाषांचा किंवा दुसऱ्या भाषांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

मौखिक भाषाभेद :

नैसर्गिक कृत्रिम भाषाभेद ज्या कारणामुळे निर्माण होतात. त्यामुळेच मौखिक भाषाभेद ही निर्माण झालेले दिसून येतात. परंतु या कारणाव्यतिरिक्त वागिंद्रियात काही बिघाड झाल्यास शब्द उच्चारता येत नाही. जीभ दुहेरी असणे त्याचप्रमाणे ओठ फाटलेला असणे यामुळे भाषा नीट उच्चारता येत नाही. त्यामुळे 'स्त्री' चा उच्चार 'इस्त्री', 'स्क्रू' चा उच्चार 'इस्क्रू' अशा पद्धतीने केला जातो.

बोली भाषाभेद :

'एका विशिष्ट भू-भागाच्या लहानात लहान मानवी समूहाकडून जी भाषा बोलली जाते तिला 'बोलीभाषा' असे म्हणतात'. उदा. डांगी अहिराणी, नागपूरी, वऱ्हाडी या बोलीभाषा आहेत. एका विस्तीर्ण प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषेमध्ये त्या प्रदेशाच्या निरनिराळ्या विभागानुसार जे भेद निर्माण होतात. त्यांना त्या भाषेच्या 'प्रादेशिक बोली' म्हणतात. या प्रादेशिक बोली एकाच भाषेतून निर्माण झालेल्या असल्यामुळे त्यांच्यात बरेच साम्य असते आणि भेद ही प्रदेशानुसार असतात. व्यापारानिमित्त एखादा समुदाय स्थलांतरीत झाल्यास त्या-त्या भाषेमध्ये बोलीरुपामध्ये भेद निर्माण होत असतो. अशावेळी मग बोलीभाषेतही बदल घडून येतात. तसेच नाविन्याच्या ओढीमुळे भाषा बदलत असते. तरुणांच्या भाषेलाही असेच बोलीभाषेचे स्वरुप प्राप्त होते. महाराष्ट्रात व्यापारानिमित्त आलेल्या गुजराती समुदाय आपल्या भाषेत बदल करताना दिसतात. 'आहे' हेच गुजरातीमध्ये 'छे' असे म्हणतात. परंतु महाराष्ट्रातील गुजराती समुदाय 'छे' ऐवजी 'स' वापरतात त्यांना 'स' गुजर म्हणताना तीच कालांतराने त्यांची 'बोली भाषा' होते.

चिन्ह भाषाभेद :

प्रत्येक भाषेची चिन्हव्यवस्था ही वेगळी असते. काही सांकेतिक खुणा या प्रत्येक भाषेचा वेगळेपणा दर्शवित असतात. भाषा शिकणे म्हणजे भाषेची चिन्हव्यवस्था आत्मसात करणे होय. ज्यावेळी आपण एखाद्या भाषेची चिन्हव्यवस्था आत्मसात करतो, तिचा उच्चार करतो, तिची चिन्हव्यवस्था, व्याकरणव्यवस्था आत्मसात करतो. त्यावेळी ती भाषा आपण शिकत असतो. प्रत्येक भाषेची चिन्हव्यवस्था वेगळी असते. आपल्याकडे 'क' या उच्चारासाठी 'क' हे चिन्ह वापरतो. मात्र याच उच्चारासाठी इंग्रजीमध्ये c, k वापरतात असा भेद भाषांमध्ये आढळून येतो. असे असले तरी काही भाषांना चिन्हव्यवस्था नसते. त्यावेळी तिला चिन्हव्यवस्था देण्याचा प्रयत्न केला जातो. सिंधु संस्कृतीमध्ये सापडलेली चिन्हव्यवस्था आजही अभ्यासकांना कोडेच आहे. म्हणून चिन्हव्यवस्था भेद करत असली तरी तिचे उच्चार माहिती असणे आवश्यक ठरते. आपण जसाच्या तसा परभाषेतून स्विकारला. अशा पद्धतीने अनेक शब्द आपण परभाषेतून तसेच्या तसे स्विकारले. मुसलमानी व इंग्रजी राजवटीमुळे मराठी भाषेते फारसी, उर्दू, इंग्रजी या भाषांमधून काही शब्द मराठी भाषेते आपण जसेच्या तसे स्विकारले आहेत.

२.७ संदर्भ ग्रंथ

१) भाषा व संस्कृती - ना. गो. कालेलकर.
२) भाषा विज्ञान आणि मराठी भाषा डॉ. अनिल गवळी.
३) समाज भाषा विज्ञान - मराठी कादंबरी - डॉ. नदंकुमार मोरे.
४) वर्णनात्मक भाषा विज्ञान - स्वरुप आणि पध्दती - कल्याण काळे, अंजली सोमण.
५) भाषा विज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक - स.ग.मालशे, हे.कि.इनामदार.
६) भाषा आणि भाषाशास्त्र - श्री. न. गंजेंद्रगडकर.

❖❖❖❖

३

भाषेची विविध रुपे व भाषेचे कार्य

घटक रचना :

३.१ प्रस्तावना
३.२ प्रमाण भाषा - बोलीभाषा
३.३ पिजिन - क्रिऑल
३.४ परिभाषा - व्यवसायभाषा
३.५ स्त्रियांची - पुरुषाची भाषा
३.६ संदर्भग्रंथ

३.१ प्रस्तावना

भाषेच्या विविध रुपांचा अभ्यास करताना प्रमाणभाषा - बोलीभाषा, पिजिन - क्रिऑल, परिभाषा - व्यवसायभाषा, स्त्रियांची - पुरुषांची भाषा, या भाषेच्या विविध रुपांचा अभ्यास करावा लागतो. भाषेची विविध रुपांचा पुढील प्रमाणे सविस्तर अभ्यास करता येतील.

३.२ प्रमाण भाषा - बोलीभाषा

प्रमाण भाषा :

एका विशिष्ठ भू - भागाच्या मोठ्यातमोठ्या मानवी समुहाकडून जी भाषा बोलली जाते. त्या भाषेला प्रमाणभाषा असे म्हटले जाते. उदा. महाराष्ट्र राज्याची मराठी भाषा, कर्नाटक राज्याची कन्नड भाषा.

बोलीभाषा :

एका विशिष्ट भू - भागाच्या लहानात लहान मानवी समुहाकडून जी भाषा बोलली जाते त्या भाषेला बोलीभाषा असे म्हणतात. उदा. अहिरामठ, वऱ्हाडी, नागपुरी, डांगी.

प्रमाणभाषा : स्वरुप

प्रमाणभाषेची काही ठळक वैशिष्ट्ये अथवा विशेष आहेत. प्रमाणभाषा एका विस्तृत प्रदेशात बोलली जाते. जसे, मराठी ही प्रमाणभाषा महाराष्ट्रात आणि गुजराथी ही प्रमाणभाषा गुजरातमध्ये बोलली जाते. अशा प्रमाणभाषेचा वापर समाजातील निरनिराळ्या व्यवसाय व जातनिहाय अशा गटांकडून आपापसात व्यवहार करण्यासाठी होतो. प्रमाणभाषेच्या अंतर्गत अनेक बोली, स्थानिक बोली समाविष्ट होतात. प्रमाणभाषा राजकीय, शैक्षणिक, सामाजिक,

सांस्कृतिक, धार्मिक इत्यादी महत्त्वाच्या क्षेत्रातील व्यवहारासाठीही वापरली जाते. प्रशासकीय कामासाठी तसेच लेखन - भाषण व्यवहारासाठीही प्राय: प्रमाणभाषेचा आधार घेतला जातो. साहजिकच प्रमाणभाषेमुळे त्या त्या भाषिक समाजाचे एकसंधत्व टिकून राहते. समाजाचा सांस्कृतिक वारसा, ज्ञानव्यूह, इतिहास, परंपरा जपण्याचे कार्य प्रमाणभाषा करीत असते. तिच्या या विशेषामुळे एका समाजापासून दुसऱ्या समाजाचे स्वतंत्र अस्तित्व प्रमाणभाषा व्यक्त करीत असते. प्रमाणभाषा समाजाला स्थैर्य देते. बोलीपेक्षा प्रमाणभाषा जास्त स्थिर असते. अर्थात बोली व प्रमाणभाषा परस्पर पूरक असतात, मारक नव्हे. उच्चार आणि शब्दसंग्रह या दोन बाबीत प्रमाणभाषा बोलीच्या संदर्भात भेद दर्शवते. उदाहरणार्थ; पाणी - पानी, शेत - श्यात, तेल - त्याल, गोड - ग्वॉड हे उच्चारभेद आहेत. रामाने - रामानं, ती गेली होती- ती गेल्ती असे व्याकरण भेद आहेत. काही वेळा प्रमाण भाषेते नसणारे शब्द बोलीत असतात.

झाली. ग्रंथालये ओस पडली. यामुळे अर्थातच बोली आणि प्रमाणभाषा यात अत्यंत गतीने बदल घडत गेला आहे. प्रसारमाध्यमांचा जो बडेजाव सध्या चालला आहे त्यामुळे मराठीचा शब्दसंग्रह कसा बदलत आहे हे आपण मागील प्रकरणात पाहिले आहेच. प्रसारमाध्यमे, मोबाईल, वाहने या जणू प्रमाणभाषा आणि बोली वा उपभाषा यांचा विचार करताना आर्थिक वर्ग, जाती, वर्ण, स्त्री - पुरुष असे भेद तपासणे गरजेचे आहे. भाषिक व्यवहाराचा सामाजिक संदर्भ अत्यंत गतिमान आणि व्यामिश्र असतो. आधुनिक जगातील जनसंपर्क माध्यमांचा (Mass media) अभ्यासही महत्त्वाचा ठरेल. या क्षेत्रानुसार नियतकालिके, नभोवाणी, दूरचित्रवाणी इथे भाषिक व्यवहार कसे आहेत हे तपासणे ही काळाची गरज आहे. काही भाषावैज्ञानिकाच्या मते प्रमाणभाषा एक कल्पना आहे. आपल्या साम्यभेदाच्या कल्पना आपण बोली व प्रमाणभाषेस लावतो. त्यामुळे बोली व स्थानिकभेद यांची एक बेरीज म्हणजे प्रमाणभाषा, असे मानले जाते. काहींच्या मते प्रमाणभाषा ही एक आदर्श बोलीच असते. या आदर्श बोलीत वाङ्मय, लेखन - भाषण, शिक्षण - ज्ञानार्जन, सांस्कृतिक वारसा हे सर्व जपण्याचे कार्य चालते. बोली प्रमाणभाषेला समृद्ध करते, पण एक सर्वमान्य प्रमाणभाषेचा वापर विविध गटांकडून, विविध ठिकाणी, विविध पातळ्यांवर होत असतो. यामुळे एक प्रमाणभाषा अनेक बोलींना जन्म देऊ शकते. अशी बदलणारी भाषिक रुपे म्हणजे बोली आणि मूळ सर्वमान्य भाषा म्हणजे प्रमाणभाषा हे एक आदेशात्मक भाषिक रुप एवढेच ते मानतात. शिक्षण, राज्यकारभार, वर्तमानपत्रे, लेखन या माध्यमांशी संबंधित ते एक भाषिक रुप आहे, सोय आहे. या रुपाची, सोयीची सवय समाजाला असते. प्रणाणभाषा समाजमान्य भाषा असली तरी तिच्यात सातत्याने बदल होत असतात. आधुनिकीकरण, जागतिकीकरण आणि संगणीकरणाच्या रेट्याखाली प्रमाणभाषा वेगाने बदलत आहेत. मराठी या प्रमाणभाषेत सध्या या गतिमानतेमुळे अनेक नवशब्दांची भर पडत आहे. दूरदर्शन, चित्रपट आणि इंटरनेटच्या प्रसारामुळे मराठी भाषा वेगाने बदलत आहे. वाचकांची संख्या कमी आपल्या गरजाच बनल्या आहेत. तसेच शहर - खेडे, उच्च - नीच, गरीब - श्रीमंत, मागास - प्रगत हे भेद विरळ होत चालल्याने बोलीभाषांची विशिष्टता कमी होत चालली आहे. सर्व लोक जणू एकाच आशयाच्या, आवाजाच्या बोलीत बोलत आहे, असे वाटण्याचा काळ आला आहे. (संदर्भ - भाषा विज्ञान आणि मराठी व्याकरण - डॉ. अनिल गवळी)

प्रमाणभाषेची वैशिष्ट्ये :

१) प्रमाणभाषा एका विस्तृत प्रदेशात वापरली जाते.

२) समाजातील निरनिराळ्या समुहाकडून प्रमाणभाषेचा वापर.

३) राजकीय सामाजिक, सास्कृंतिक व्यवहारासाठी वापर.

४) शिक्षण व ज्ञानार्जनाचे माध्यम म्हणून वापर.

५) प्रमाणभाषेमुळे समाजात एकसंघता टिकते.

६) प्रमाणभाषा समाजाचा ज्ञानव्युह, इतिहास व सांस्कृतिक वारसा जतन करते.

७) प्रमाणभाषेमुळे एका समाजाचा दुसऱ्या समाजापासून लक्षणीय वेगळेपण जपली जाते.

बोलीभाषेचे स्वरुप :

एका विशिष्ट भू - भागाच्या लहानात लहान मानवी समुहाकडून बोलली जाणारी भाषा तिला बोलीभाषा असे म्हणतात.

बोलणे, बोली आणि भाषा असे तीन भेद भाषेच्या अभ्यासात होऊ शकतात. महाराष्ट्राची भाषा मराठी आहे; म्हणजेच अनेक बोलींचा गट एकत्र असणारा पण व्यापकपणे अमूक एक भाषा बोलणारा समाज; अशा नावाने आपण त्यास ओळखतो.

'मराठी' या नावाखाली येणाऱ्या व त्यांच्या प्रादेशिक नावावरुन ओळखल्या जाणाऱ्या वऱ्हाडी, खानदेशी, देशी, कोकणी या सर्वमान्य बोली आहेत. शिवाय बेळगावी, कोल्हापुरी, पुणेरी, मराठवाडी या सुद्धा मराठीच्या बोलीभाषा म्हणता येतील. मराठीची उर्दू बोली असे एक वर्गीकरण ना. गो. कालेलकर यांनी केलेले आहे. पुणेरी, सातारी, कोल्हापुरी या भेदांना आपण बोलींचे स्थानिक भेद म्हणू शकतो. अर्थातच विविध अशा भाषाभेदांना सामावून घेणारी त्या त्या समाजाची अशी जी एकसंघ भाषा मानली जाते. तिलाच प्रमाणभाषा म्हणता येईल. अशी भाषा लेखनासाठी प्रमाणभूत म्हणून स्वीकारली जाते. व्यक्तिभाषा, स्थानिक बोली, बोलीभाषा, प्रमाणभाषा अशा चार भेदांचा अभ्यास भाषाविज्ञानात होऊ शकेल. डॉ. विजया चिटणीस - माडगूळकर यांनी प्रमाण भाषेची व्याखा पुढीलप्रमाणे केली आहे, **"एका विशिष्ट भौगोलिक मर्यादित आपल्या अनेक प्रकारच्या स्थानिक किंवा वर्गीय भेदांनी आणि रुपांनी आपल्या नजरेसमोर येते ती वास्तव पण अमूर्त तात्त्विक विनिमयशक्ती म्हणजे भाषा."** (संदर्भ : आधुनिक भाषाविज्ञान : संपादक : डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण : १९९९ : पृष्ठ : २०६) बोलीसाठी पोटभाषा ही संज्ञा वापरतात. मात्र बोली ही संज्ञा व्यापक अर्थाने वापरतात. समाजव्यवहारासाठी वापरली जाणारी पण लिपी नसणारी भाषा म्हणजे बोली, अशी बोलीची व्याख्या केली तर; सर्व पोटभाषा ह्या बोली असतात पण सर्व बोलींना पोटभाषा म्हणता येणार नाही, असे म्हणावे लागेल. कोकणी ही पोटभाषा आहे, एवढेच म्हणून चालत नाही. ती मराठीची पोटभाषा आहे, असे म्हणावे लागते. पण काही बोली अशा आहेत की, त्यांचा अंतर्भाव कोणत्याच प्रमाणभाषेत करता येत नाही. त्यामुळे बोली (Dialect) ही संज्ञा योग्य आहे. 'पोटभाषा' या शब्दातील 'भाषा' हे पद लिखित रुपाचा बोध देते. व्यक्तिभाषा, गटभाषा, उद्योगभाषा, खाजगीभाषा, व्यवहारभाषा, अनौपचारिक भाषा हे भेद अधिक सजग होतील.

बोलीभाषेचे विशेष :

एकाच भू - प्रदेशातील मूळ बोली कालांतराने बदलते. वेगवेगळया भू - प्रदेशात ती नवीन रुपासह बोलली जाते. त्या भिन्न बोलीत ध्वनी, वाक्य, शब्द यात भेद असले, तरी भाषिकांच्या व्यवहारात अडथळा येत नाही. अशा तऱ्हेने नवीन बोली निर्माण होतात. दोन भिन्न भाषिक एकत्र आल्याने, जित - जेते यांच्यातील आक्रमण - संक्रमणामुळे बोलींची निर्मिती होते.

काही वेळा एकभाषिक प्रदेश कितीही सलग असला तरी भौगोलिक व सास्कृंतिक भेदांनी त्यात अनेक बोली निर्माण होतात. या बोलींचे काही महत्त्वाचे विशेष आपणास पाहता येतील. बोली केवळ बोलण्यातच वापरली जाते; लेखन - व्यवहारांसाठी ती क्वचित वापरली जाते. दलित - ग्रामीण साहित्यात अलिकडे बोलीभाषेचा वापर वाढला आहे. सांस्कृतिक - शैक्षणिक व्यवहारात लोक प्रमाणभाषेचाच वापर करताना आढळतात. मराठीच्या विविध बोली बोलणारे लोक परस्परात व्यवहार करताना साधारणपणे पुणेरी मराठीचा आश्रय घेतात. पुणेरी ही मराठीच्या संदर्भात प्रमाणभाषा (Standard Language) मानली जाते.

बोलीबद्दलचे गैरसमज :

बोली म्हणजे गावंठळ बोलीभाषेबद्दल बरेच समज गैर समज आहेत किंवा अप्रतिष्ठितांची भाषा आणि अशुद्ध वा चुकीची भाषा आहे, असा बोलीबद्दल एक गैरसमज आहे. समाजात एक गट प्रभावी असतो. असा गट इतरांना कमी लेखतो. हा गट सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टीने प्रगत असतो. शिक्षण, शासन, वाङ्मय या क्षेत्रात प्रमाणभाषा वापरली जाते, त्यामुळे बोली हलक्या दर्जाची मानली जाते. भाषाविज्ञानाच्या दृष्टीने कोणतीही बोली श्रेष्ठ - कनिष्ठ असत नाही. प्रत्येक बोलीचे विशेष ठरलेले असतात. विशेषतः उच्चार अथवा शब्दरुपांच्या आधारे बोलीला अशुद्ध ठरविले जाते. जसे, मुलगा - पोरगा, आणायला - हाणायला, होय - व्हय, जाधव - ज्याधव, पोट - प्वॉट, आम्ही - हामी, गणित गनित इत्यादी. बोलीतील या शुद्ध - अशुद्धतेच्या कल्पना भाषाविज्ञान मानली जात नाही कोणतेही बोलीभाषा ही त्या भागातील ती जिवंत भाषा, शुद्धभाषा अशी मानली जाते प्रमाणभाषा श्रेष्ठ आणि बोली भाषा कनिष्ठ असा भेद करणे भाषा विज्ञानाच्या दृष्टीने चूकीचे मानले जाते.

प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यात साम्यभेद :

बोलीभाषा आणि प्रमाणभाषा यामध्ये साम्यभेद दिसून येतो. कारण कोणत्याही राज्याची प्रमाणभाषा आणि त्या राज्यातील बोली यामध्ये काही प्रमाणात साम्यता असते. बोलीना स्वतःची अर्थ याबाबत साम्य - भेद असतो. साम्य नसेल तर ती स्वतंत्र भाषा होईल. प्रमाणभाषा प्रामुख्याने शासकीय, साहित्यिक, शैक्षणिक स्तरावर वापरली जाते. बोली हे दैनंदिन व्यवहाराचे उत्तम साधन आहे. मानवी संप्रेषणाची व्याप्ती वाढली की बोलीला स्वतंत्र भाषेचा दर्जा प्राप्त होताना दिसतो. तिच्यामध्ये वाङ्मय, तत्त्वज्ञान, कला, विज्ञान अशा विषयांतर्गत ग्रंथनिर्मिती होऊ लागली की तिला स्वतंत्र भाषा म्हणावे लागेल. संस्कृती, धर्म, इतिहास, शिक्षण, राजकीय सत्ता, जीवनपद्धती, व्यवसाय, ललितकला, वाङ्मय, परंपरा आणि भौगोलिक क्षेत्र याबाबत समानता असल्यास बोली निर्माण होणार नाहीत. अनेक बोली निर्माण झाल्या तरी त्या प्रमाणभाषेला मारक नसून पूरक असतात. शब्द, वाक्यप्रयोग, म्हणी यांची नवनवीन भर प्रमाणभाषते घालण्याचे कार्य बोली करीत असतात. त्यामुळे प्रमाणभाषा समृद्ध होते, विकसित होते. प्रमाणभाषेचे क्षेत्र अथवा वर्तुळ व्यापक, विस्तारित असते. बोलींची क्षेत्रे अथवा वर्तुळे लहान, सीमित असून अशा बोली प्रमाणभाषेच्या मोठ्या वर्तुळात समाविष्ट असतात. यामुळे विभिन्न बोलीत बोधगम्यता असते, पण दोन प्रमाणभाषांत अशी बोधगम्यता नसते. मराठी व फ्रेंच या दोन मूळ अथवा प्रमाणभाषा आहेत. या दोन्ही भाषांत बोधगम्यता नाही. त्या त्या भाषिकांना परस्परांच्या या भाषा शिकाव्याच लागतील. अर्थातच एकाच प्रमाणभाषेच्या बोली शिकण्याची गरज नसते. सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक संबंधात समाजात भेद निर्माण झाले की बोलींची संख्याही वाढत जाते. मराठी साहित्यामध्ये दलित, ग्रामीण, आदिवासी असे साहित्य प्रवाह निर्माण झाले आहेत. या साहित्यप्रवाहामध्ये मोठ्या प्रमाणात बोलीभाषेचा वापर केला जातो.

३.३ पिजिन आणि क्रिऑल

आदानाची अत्यंतिक अवस्था म्हणजे पिजिन अवस्था होय. या प्रकारात एखादा समाज सबंध भाषेची उसनवारी करतो. स्वत:च्या भाषेवर विविध प्रकारचे संस्कार केले जातात. भाषेतील शब्दांना नवभाषेतील शब्दांची जोड देऊन नवीन वाक्यप्रयोग केले जातात. उदा. व्यापारउदिम करणारे लोक, सतत प्रवास करणारे लोक, जिप्सी लोक, जिप्सी लोकांची भाषा या प्रकारची असते. उदा. पूर्वी मुंबईत चिनी व्यापारी येत त्यांनी चिनी मिश्रीत स्वत:ची भाषा बनवली होती. तर नेपाळी लोक लोकरीचे कपडे विकायला आजही मुंबईत येतात. त्यांची भाषाही हिंदी नेपाळी मिश्रीत असते. गोव्यामधील लोकांच्या भाषेत मराठी, कोकणी, पोर्तुगीज, इंग्रजी अशा भाषांचे मिश्रण आढळून येते. अशा भाषांना पिजिन म्हणतात. प्रत्यक्षात पिजिन आणि क्रिऑन सारख्या भाषा ह्या फार पुरातन काळापासून चालत आल्या आहेत. असे मत ॲडिव्टाक अशा तज्ञांनी मांडले आहे. पण भाषातज्ञांच्या मते पिजिनच्या निर्मितीची आवश्यकता गेल्या काही शतकांमध्ये झालेल्या राजकीय, ऐतिहासिक स्वरुपाच्या घटनांमुळे झाली आहे. डच, फ्रेंच, इंग्रज इ. युरोपीयन दर्यावर्दी जेव्हा आफ्रिका, आशिया या खंडात प्रथमच उतरले तेव्हा त्यांना इथल्या लोकांची भाषा समजणे शक्य नव्हते. तसेच इथल्या लोकांनासुद्धा युरोपीयांची भाषा समजणे शक्य नव्हते. परंतु संबंध प्रस्थापित करणे आवश्यक होते. म्हणून गरज ही शोधाची जननी या उक्तीप्रमाणे या भाषेतील काही शब्द व दुसऱ्या भाषेतील शब्द यांची मिळून एक वेगळीच भाषा तयार झाली आणि काही काळ टिकून राहिली. काही भाषातज्ञांच्या मते पिजिन सारखी भाषा बेबीटॉकच्या प्रक्रियेतून निर्माण होत नाही. तर काही तज्ञांच्या मते विशेषत: उबुकील च्या मते पिजिन भाषांची उक्ती बेबीटॉक सारख्या प्रक्रियेतून घडते.

पिजिनची वैशिष्ट्ये :

१. **कोणत्याही नैसर्गिक भाषेचे सुलभीकरण केल्यास ती भाषा पिजिन भाषेमध्ये बदलते.**
२. **पिजिन भाषेचे दुसरे वैशिष्टय म्हणजे संपर्काच्या सुलभतेसाठी ध्वनी शब्द आणि व्याकरण यांचे नियम सोपे करुन ही भाषा तयार होते.**
३. **पिजिन ही पूर्णपणे नैसर्गिक स्वरुपाची भाषा असते. ती कृत्रिम नसते.**
४. **कार्यक्षेत्राच्या दृष्टिने पिजिन ही अतिशय मर्यादित स्वरुपाची भाषा असते. उदा. व्यापार, शेती किंवा इतर ठिकाणच्या कामावर तिचा वापर केला जातो.**
५. **व्याकरणामुळे पिजिन ही कुणाचीही मातृभाषा असू शकत नाही.**
६. **त्यामुळे एखादी भाषा वापरणाऱ्या समाजाची अस्मिता म्हणजे ती भाषा असते. त्यामुळे पिजिन ही कोणत्याही समाजाची मातृभाषा, राजभाषा असू शकत नाही.**
७. **पिजिनला सामाजिक, सांस्कृतिक अशी प्रतिष्ठा नसते. कारण कोणत्याही अभिमानास किंवा आदरास पात्र असणारी भाषा नसते. ती संपर्क भाषा असल्यामुळे काही विशिष्ट मर्यादेपर्यंत सर्वच लोक तिचा वापर करतात. संप्रेषणाचे एक माध्यम या पलिकडे तिला प्रतिष्ठामूल्य नसते.**

पिजिन भाषेमुळे निर्माण होणारे प्रश्न :

१. पिजिन ही एखाद्या समाजाची, देशाची राजभाषा होऊ शकते का ?
२. पिजिन ही उच्चस्तरीय कार्यासाठी (राज्यकारभार, कायदा, ललित वाङ्मय, धर्मकार्य, शिक्षण) या क्षेत्रात वापरली जाणारी भाषा कधीतरी वापरली जाण्याची शक्यता निर्माण होऊ शकते का ?
३. मतितार्थाने पिजिन सारख्या भाषेला सामाजिक प्रतिष्ठा मिळण्याची शक्यता आहे का ?

या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी मुळात ही मालक आणि नोकर यांच्यातील संभाषणाची भाषा आहे. पिजिन ही अपघाताने म्हणा किंवा योगायोगाने ती एखाद्या मानव समुहाची भाषा निर्माण होऊ शकते आणि त्यामुळे एखाद्या समुहाची, देशाची मातृभाषा पिजिन स्वाभाविकपणे होते. याप्रमाणे एखाद्या मानव समुहाची एखादी पिजिन मातृभाषा झाली तर त्या पिजिनला क्रिऑल असे म्हटले जाते.

पिजिन भाषेची जेव्हा स्वतंत्रपणे वाढ होऊ लागते तेव्हा तिच्या व्याकरणात व शब्द समुहात संपन्नता होऊन ती वापरण्याची व्यवहारिक भाषा न राहता मातृभाषेच्या पदवीस पोहचते. अशा भाषेला क्रिऑल भाषा म्हणतात. उदा. मॉरेशिअस मधील भाषा अशीच क्रिऑल आहे. मॉरिशिअसमध्ये गेलेल्या भारतीयांची भाषा आणि मॉरेशिअसची मुळची भाषा अशीच क्रिऑल आहे. पिजिन व्यवहाराची भाषा होते परंतु प्रतिष्ठा मात्र क्रिऑलला भेटते. क्रिऑल भाषा समाजाची मातृभाषा असल्यामुळे त्या समाजाच्या अनेक विविध गरजा भागवण्याचे काम तिला करावे लागते. ती एक नैसर्गिक भाषा असल्यामुळे व ती अनेक विविध कार्यासाठी वापरली जात असल्यामुळे पिजिनच्या शब्दसंपत्तीपेक्षा जास्त असते. एखादा क्रिऑलचा मूळ इतिहास माहित नसेल तर ती पिजिन होती. तिचे रुपांतर क्रिऑलमध्ये झाले असे समजणे अशक्य होऊन बसते. परंतु सामाजिक तत्वाचा विचार केल्यास आपणांस असे आढळून येते की, पिजिनच्या जडणघडणीत त्या देशाचे आणि भाषेचे सामाजिक व राजकीय पैलू दिसतात. उदा. दक्षिण अमेरिकेतील सुरीनाम ह्या देशाची मान्यताप्राप्त भाषा प्रत्यक्षच आहे. पण ती दोन टक्क्यांपेक्षाही कमी असणाऱ्या समाजाची मातृभाषा आहे. उरलेले ९८% पैकी बरेच लोक स्त्रनान आणि जुका ह्या इंग्लिशवर आधारलेल्या क्रिऑलचा वापर करतात. असे असले तरी पिजिन आणि क्रिऑल मध्ये साम्यही दिसून येते. ह्याखेरीज अनेक भाषातील संरचनात्मक वैशिष्ट्य व शब्दसंग्रह यांचे आदान करुन एक कृत्रिम भाषा जागतिक स्तरावरील संदेशवहन सुलभ व्हावे म्हणून भाषा शास्त्रज्ञांनी बनवलेली आहे.

३.४ परभाषा - व्यवसाय भाषा

परभाषा :

आपल्या भारत देशावर पोर्तुगीज, इंग्रज, मोगल या परकीयांनी अनेकवेळा आक्रमणे केलेली आहेत. हा देश जिंकून त्यांनी आपली राज्यव्यवस्था या भूमीवर स्थापली आहे. जेते म्हणून बराच मोठा काळ या भूमीवर या लोकांचे वास्तव होते. त्यामुळे त्यांची भाषा आणि तेथील मूळच्या स्थानिक लोकांची भाषा यांचा परस्परसंबंध येणे अपरिहार्य होते. या संपर्कामुळे निर्माण झालेले भाषामिश्रण तपासायला आपल्याला फार यातायात करावी लागत नाही. मराठीच्या शब्दसंग्रह सहज पाहिला तरी परकीय शब्दांचे या संग्रहामध्ये असणारे प्राबल्य नजरेत भरेल.

आज या परकीय भाषांमधून आलेले शब्द मराठी शब्दसंग्रहामध्ये स्थिर झालेले आहेत, हे आपल्या लक्षात येईल. जागतिकीकरण, शिक्षणाचा सर्वदूर झालेला प्रसार, नोकरी व्यवसायानिमित्त परदेशामध्ये स्थायिक होणाऱ्यांच्या संख्येमध्ये होत चाललेली वाढ अशा कारणांमुळे इंग्रजी - मराठी, इंग्रजी - हिंदी असा द्वैभाषिकसमाज या भाषासंपर्कातून अस्तित्वात आलेला आहे. या द्वैभाषिक समाजाच्या निर्मितीमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसते आहे.

अशा प्रकारे भाषासंपर्क प्रक्रियेमुळे भाषिक आदान - प्रदान अटळ बनते आहे. निम्नलिखित वर्गाला उच्चवर्गीय समाजाचे आकर्षण असते. त्यातून होणारे अनुकरण, विविध कारणांनी भिन्न भाषांशी वाढत चाललेला संपर्क, नोकरी निमित्त परदेशी वास्तव्य, शिक्षणाचा प्रसार या सर्वच कारणांमुळे भाषासंपर्काची प्रक्रिया वाढते आहे. या अव्याहत चाललेल्या प्रक्रियेचे अध्ययन समाजभाषाविज्ञानाचे कार्य आहे.

व्यवसायभाषा :

भाषाव्यवहारामध्ये प्रत्येक ठिकाणी त्या व्यवसायानुसार भाषा बदलत असते. उदा. बँकिंग क्षेत्रामध्ये काम करणारे, न्यायालयीन क्षेत्रामध्ये काम करणारे, शासनाच्या विविध खात्यात असणारे, शैक्षणिक क्षेत्रात असणारे छोटे मोठे लघुउद्योग करणारे, शेतीशी निगडीत व्यवसाय करणारे, वाहतूक व्यवसाय करणारे अशा अनेक प्रकारचे व्यवसाय करणाऱ्यांची भाषा ही भिन्न असते. उदा. बँकिग क्षेत्रात असणाऱ्यांचा संबंध बॅलन्स, चेक, अकाउन्ट, स्लीप, विड्रॉल, पासबुक या भाषेशी, शब्दांशी येतो. शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचा संबंध फळा, खडू, पुस्तक, पेन, ग्रंथालय, महाविद्यालय या शब्दांशी, येतो. न्यायालयीन क्षेत्राचा संबंध वकील, न्यायाधीश, कोर्ट, दावेदार, प्रतिवादी, वादी, दिवाणी, फौजदारी, आदेश निकालपत्र अशा अनेक शब्दांशी येतो. छोट्या मोठ्या व्यवसायाशी संबंधित गोष्टीशी येतो. अशाप्रकारे व्यवसायानुसार भाषेचे स्वरुप बदलते.

काही विशिष्ट कार्यालयातील दैनंदिन व्यवहारात येणारे कार्यालयीन व्यावसायिक शब्दसंग्रह वेगळे आहेत. (उदा. बँका, कोर्ट, दवाखाना, पोलिस स्टेशन, शाळा, कॉलेज इ.) त्यांचा वापर सातत्याने होत असतो. यालाच व्यवसाय भाषा

३.५ स्त्रियांची आणि पुरुषांची भाषा

अनेक कारणांमुळे भाषाभेद निर्माण होत असतो. परंतु लिंगभेदामुळेही भाषाभेद निर्माण होतो का? स्त्री म्हणून असलेले नैसर्गिक वेगवेगळपण भाषेतही काही प्रमाणात प्रतिबिंबीत होते. उदा. स्त्रीची शरीरयष्टी, तिच्या शरीरगत होणाऱ्या घडामोडी, स्त्रीचा आवाज हेरुन या क्षेत्रात विशिष्ट शब्दांना सर्व भाषिकात स्वतंत्र जागा आहे. काही शब्द तर खास स्त्रीसाठीच निर्माण झालेले आहेत. उदा. चि.सौ.का., सौभाग्यवती, माहेरवाशीण, लेकुरवाळी, जोगीन, गर्भाशी, पोटूशी असे शब्द फक्त स्त्रियांसाठीच वापरतात. वस्त्र, अलंकार, फॅशन याबाबतीत स्त्री पुरुषांच्या भाषेत दिसणारा वेगळेपणा त्या-त्या सांस्कृतिक, सामाजिक संकेतांचा भाग असतो. आधी नऊवारी साडी नेसणारी स्त्री आता आधुनिक पोशाख करताना दिसते. परंतु तरीही ती एकवेळ डोक्यामध्ये टोपी घालेल पण पागोटे चढवणार नाही. म्हणजे काही पोशाख हे खास स्त्रियांसाठीच असतात. स्त्रीला तिच्या वेगळेपणाची किंबहुना नैसर्गिकतेची ओळख लाभलेली आहे. पुरुषांच्या मानाने स्त्रियांच्या भाषेमध्ये बऱ्याचदा शब्दांची पुनरावृत्ती केली जाते. उदा.

धुसफुस, गप्पा-बिप्पा, दुखणी-खुपणी, आवारा-आवर अशा अनेक अभ्यस्त शब्दांचा वापर स्त्रियांच्या भाषेत येणारी विशेषणे वेगळी असतात. अवळ-चिवळ, गारगोळ, फुनफुनलेला यासारखे शब्द तसेच स्त्री अनुभवावर आधारित म्हणी, वाक्प्रचारांचा वापर भरपूर प्रमाणात करताना दिसतात. "पावसानं झोडपलं व नवऱ्याने मारलं तर जायचे कुठे","बायकांचा जन्म","बायका त्या बायकाच" अशा पद्धतीचे शब्द वापरतात. बऱ्याचदा स्त्रीच्या बोलण्यामध्ये आगतिकता (काय करावं बाई) अशी आगतिकतेची भावना त्यांच्या बोलण्यामधून दिसून येते. तसेच स्त्रीच्या भाषेत रुढी पद्धतींना, संकेतपालनाला महत्व देणारे शब्द विपूल आढळतात. "दिल्या घरी सुखी रहा","आंघोळ केल्यानंतर मोकळ्या केसांनी हिंडू नये","मुलगी हे परक्याच धन","चुलीच लाकूड चूलीतच जळायचं","वटसावित्री","वटपौर्णिमा" यासारखे सण स्त्रियाच करत असल्यामुळे या शब्दांचा त्यांच्या भाषेत भरपूर वापर असतो. स्त्रियांच्या भाषेत व्यंजना शक्तीचा भरपूर वापर असतो. (लेकी बोले सुने लागे) स्त्रिया या बऱ्याचदा एकमेकींचे उणे-दुणे काढण्यात पटाईत असल्यामुळे त्यांच्या भाषेत व्यंजनाशक्तीला भरपूर वापर असतो. स्त्रियांच्या भाषेमध्ये स्त्री-सुलभ शब्दांचा वापर असतो. उदा. अय्या, इश्श, आम्ही नाही जा यासारखे शब्द. याउलट पुरुषांच्या भाषेमध्ये अशा शब्दांचा वापर नसतो. पुरुषार्थाला साजेशी किंवा रुढींना धरुन असे शब्द वापरले जातात.

३.६ संदर्भग्रंथ

१. मराठीभाषा : उद्रगम व विकास - कृ. पा. कुलकर्णी
२. भाषा आणि सस्कृंती - ना. गो. कालेलकर
३. भाषा आणि भाषाशास्त्र - श्री. न. गंजेगडकर
४. मराठीभाषा आणि शैली - रमेश घोंगडे
५. आधुनिक भाषा विज्ञान - संपादक डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण.

❖❖❖❖

४

मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात भाषेचा वापर :

घटक रचना :

४.१ प्रस्तावना
४.२ व्यवहारभाषा
४.३ विज्ञानभाषा
४.४ साहित्याची भाषा
४.५ याकोबसनकृत भाषेची सहा कार्य
४.६ संदर्भग्रंथ

४.१ प्रस्तावना

मानवी जीवनामध्ये विविध क्षेत्रात भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र प्रत्येक क्षेत्रात वापरली जाणारी भाषा त्या भाषेतील विशिष्ट्य शब्द हे त्या भाषेतील व्यवहारासाठीच प्रामुख्याने वापरले जातात. भाषेतील विविध क्षेत्रानुसार कसा वापर केला जातो यांचा विचार येथे करायचा आहे.

४.२ व्यवहारभाषा

पूर्वी ग्रामीण भागात बलुतेदारी पद्धती अमंलात होती. पण ही पद्धत काळाच्या ओघात नष्ट झाली आहे. आधुनिक जीवनशैली मुळे समाज व्यवस्था बदलत आहे. पण पूर्वी व्यवसायावर अवलंबून असणारी भाषेतील शब्द प्रयोग आजही समाजात रुढ झालेले दिसतात. बलुतेदारी पद्धतीमध्ये अठरापगड जातीचे लोक राहत होतो. त्याच्या व्यवसायावरुन अनेक शब्द प्रयोग रुढ होते. त्याचा प्रभाव आजही भाषेवर असलेला दिसून येतो. उदा. चांभाराचे कातडे कापण्याच्या हत्याऱ्याला आरी अशे म्हणतात. किंवा चप्पल तुटले टाका घाल, टाका घालणे हा शब्द प्रयोग भाषते वापरला जातो. सुताराच्या भाषते पाचर मारणे हा शब्द प्रयोग वापरला जातो, लोहार लोखंडाच्या हत्यारांना धार देण्यासाठी पाणी पाजणे हा शब्द प्रयोग वापरतो किंवा अलिकडच्या काळात विटाचे बांधकाम करणारा गंवडी भिंत बांधताना वळंबा घालणे असा शब्द प्रयोग वापरला जातो.

अलिकडच्या काळात व्यवसायावरुन स्वतंत्र शब्द भाषते वापरले जातात. ठेकेदार, घाऊक माल, दलाल, यासारखे शब्द मोठ्या प्रमाणात वापरले जातात.

४.३ विज्ञानभाषा

विज्ञानाची भाषा हि वस्तुनिष्ठ भाषा असते. यामध्ये नेमकेपणा, चित्रमयता, अचूकपणा दर्शवण्यासाठी योग्य त्या आकृत्या, चित्र, आलेख यांचा उपयोग केला जातो. वाच्यार्थ, एकच अर्थ, सर्वसामान्य विज्ञान भाषेते असतो. श्रोत्यांवर भाषिक परिणाम करणे. त्यांना भारुन टाकणे हे विज्ञान भाषेचे उद्देश नाही. विज्ञान भाषा ही श्रोते, वाचक निरपेक्ष असते. त्यामुळे अशी 'पुनरक्ती' ची सुंसगती विज्ञान भाषेते नसते. शास्त्रातील भाषा तार्किक असते व ती तार्किक सुंसगती देते. ही भाषा आवश्यक ते सर्व सांगते पण अनावश्यक ते काहीही सांगत नाही. विज्ञान भाषेते वाचकांचा यामध्ये विचार नसतो. विज्ञान भाषेते संकल्पनांच्या व्याख्या परिभाषिक संज्ञा, पूर्व - अभ्यास म्हणून आवश्यक ते पुर्वसंदर्भ दिले जातात. विज्ञान भाषा ही वस्तुनिष्ठ स्वरुपाची भाषा असते. या भाषेमध्ये नेमकेपणा आणि अचूकपणा यांना अधिक महत्त्व दिले जाते. वाङ्मयीन भाषेपेक्षा विज्ञानाची भाषा वेगळी आहे.

४.४ साहित्याची भाषा

भाषेची संरचना द्विस्तरीय असते. भाषेची व्यवस्था दोघांनाही ज्ञात असल्यामुळे कधी हुंकार एखादा शब्द हो, नाही, बरं का? असे छोटे उद्‌गार संपूर्ण वाक्याचे काम करतात. साहित्याच्या भाषेतही भाषा वापराची लकब दिसते. कथात्मक साहित्यामध्ये संवाद लिहताना किंवा नाटकांमध्ये संवादासाठी पात्रांच्या तोंडी, अशी भाषा आलेली दिसते. साहित्याची भाषा व्यवहाराच्या भाषेसारखी केवळ संवेद वहनाचे कार्य करीत नाही. ती संदेशवहनाबरोबर आणखी काहीतरी विशेष कार्य करीत असते. लेखकाला आलेल्या अनुभवाची पूननिर्मिती साहित्याच्या भाषेतून होत असते. भाषेच्या माध्यमातून वाचक लेखकाच्या अनुभवाचीच अनुभूती होत असतो. या अनुभवाची प्रचीती होत असताना वाचकाला अनुभवाबरोबर आनंदही मिळत असतो. कारण साहित्याची भाषा अनुभवाचे केवळ चित्रण करीत नाही तर या चित्रणाबरोबर आशय संपन्न सौंदर्यनिर्मितचेही कार्य करते.

लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनावर पडलेले असते. बहुतांश साहित्य साहित्याच्या निर्मितीसाठी व्यवहारभाषेचा वापर अतिशय कौशल्याने करताना दिसतात. व्यवहाराच्या भाषेमध्ये जीवनासापेक्ष लवचिकता, जिवंतपणा असतो. भावनांचे आरोह - अवरोह आणि भाषा वापरणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष व्यवहाराची भाषा लीलया पेलते. त्यामुळे तिच्या वापराने साहित्यामध्ये भावनात्मकता येते. मध्ययुगीन मराठी साहित्यामध्ये वारकरी संप्रदायातील संतानी व्यवहार भाषेतून अभंगरचना केलेली आहे. म्हणूनच संताचे अभंग जन मानसात लोकप्रिय ठरले आहेत. बनगरवाडी या कादंबरीमध्ये व्यकंटेश माडगुळकरांनी निवेदनामध्ये योजलेले धनगरांच्या तोंडचे संवाद त्यांच्या व्यवहारी बोलीत येतात. हे संवाद एवढे एकजीव झालेले आहेत की, त्यामुळे बनगरवाडीतील भाषेलाच मेढ्यांच्या शेणा - मुताचा वास येतो. गोतावळा, धग, सेझ, पाचोळा, तहान बारोमास या कादंबऱ्या बाबतीत हा अनुभव येतो. काव्य, कथन, कादंबरी नाटक या साहित्य प्रकारामध्ये वापरली जाणारी साहित्याची भाषा वेगळी असते.

४.५ याकोबसनकृत भाषेची सहा कार्य

भाषेची कार्य :

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. भाषा समाज व्यवहाराचे उत्तम साधन आहे. भाषेमुळे आपण एकमेकांशी संपर्क साधू शकतो. भाषा हे आत्मप्रकटीकरण, विचारप्रकटीकरणाचे साधन आहे. माणसाच्या संस्कृतीचे, संदेशाचे अस्तित्व भाषा टिकवू शकते. भाषेचे कार्य व्यक्तिगत, व्यक्ती - व्यक्ती, व्यक्ती - समाज अशा विविध पातळ्यांवर सुरु असते. साहजिकच भाषा विचारविनिमय करण्याचे, ज्ञाननिर्मिती करण्याचे साधन आहे. याच कार्याचे विभाजन रोमान याकोबसन (१८९६-१९८२) या रशियन भाषा वैज्ञानिकाने भाषेच्या संरचनेच्या अगांने केलेले आहे. भाषिक संदेशनाच्या प्रक्रियेमध्ये वा चिन्हव्यापारामध्ये सहा मूलघटक असतात. त्यांना मिळणाऱ्या महत्त्वानुसार सहा मूलभूत स्वरुपाची कार्ये भाषिक चिन्हे बजावत असतात, असा विचार त्याने मांडला.

रोमान याकोबसन याने भाषेची सहा कार्य सांगितली आहेत. भाषेच्या कार्याचे केलेल्या विभाजनामध्ये एक विचार आहे. भाषिक संदेशनाच्या प्रक्रियेमध्ये किंवा चिन्ह वापरामध्ये सहा मूलघटक असतात. त्यांना मिळणाऱ्या महत्त्वानुसार भाषिक चिन्हे सहा मूलभूत स्वरुपाची कार्ये करतात; असा हा विचार आहे. भाषिक चिन्हव्यापारातील परिसर किंवा संदर्भ, संदेश, प्रेषक, ग्रहणकर्ता, संपर्क, माध्यम असे सहा मूलघटक रोमान याकोबसन याने सांगितले आहेत. संदेशनाच्या प्रत्येक क्रियेमध्ये हे घटक असतात. या घटकांपैकी ज्या घटकाला प्रत्यक्ष संदेशनाचे प्राधान्य मिळेल त्यानुसार विशिष्ट प्रकारचे संदेशनात्मक कार्य घडून येईल. रोमान याकोबसन याने भाषेच्या कार्याचे भाषेच्या संरचनेच्या अंगाने विभाजन केलेले आहे. सहा मूलघटकानुसार भाषेची सहा कार्ये ठरविताना रोमान याकोबसन याने खालील आकृतीप्रमाणे मूलघटक निश्चित केलेले आहेत.

परिसर / संदर्भ (Context)

संदेश (Message)

प्रेषक (Sender)..... ग्रहणकर्ता (receiver)

संपर्क (Contact)

माध्यम (Code)

वरील मूलघटकांनुसार भाषेच्या कार्याची विभागणी त्यांनी खालीलप्रमाणे केलेली आहे.

संदर्भनिष्ठ / निर्देशात्म (referential)

काव्यात्म / सौंदर्यात्म (Poetic / aesthetic)

आविष्करात्मक ..... परिणामनिष्ठ

(emotive / expressive) (Conative / affective)

संपर्कनिष्ठ (phentic)

भाषाविषयक / चिन्हव्यवस्थाविषयक (metalingual)

रोमान याकोबसन यांने भाषेची सांगितलेली सहा कार्य :

१) संपर्कनिष्ठ कार्य
२) परिणामनिष्ठ कार्य
३) संदर्भनिष्ठ किंवा निर्देशात्मक कार्य
४) अविष्कारात्मक कार्य
५) काव्यात्म वा सौंदर्यात्मक कार्य
६) भाषाविषयक वा अतिभाषात्म कार्य

१) संपर्कनिष्ठ कार्य :

संपर्कनिष्ठ कार्यामध्ये प्रेषक व ग्रहणकर्ता यांच्यातील संपर्क वाढविणे किंवा कमी करणे ही प्रक्रिया घडते. संदेश न करणारी व्यक्ती कोणत्या संदर्भात बोलते हा भाग महत्त्वाचा असतो. एखादा डॉक्टर आपल्या व्यवसाया संबंधी दुसऱ्या डॉक्टरशी बोलताना, पेशंट, औषध, गोळ्या, शस्त्रक्रिया, यांचा संदर्भ येतो. तर दोन विद्यार्थ्यांच्या संर्पकातून शाळा, कॉलेज, अभ्यास, मित्रांची चौकशी, किंवा खेळांशी संबंधी यासारखी चर्चा होत असते. आपण कुठेतरी प्रवासाला निघालो की शेजारच्या सहप्रवाशाबरोबर कुठे जाणार, असे प्रश्न केल्यानंतर तुम्ही कुठे जाणार असा प्रतिप्रश्न करुन त्या दोघांची प्रवासात चर्चा सुरु राहते. म्हणजेच आपण संपर्क साधण्यासाठी भाषेचा वापर करतो. हे भाषेचे कार्य संपर्कनिष्ठ कार्य आहे.

२) परिणामनिष्ठ कार्य :

भाषेचे हे कार्य ग्रहणकर्त्यांवर (श्रोत्यावर) विशिष्ट परिणाम करते. बाबासाहेब पुरंदरेंचे व्याख्यान ऐकताना; श्रोते व्याख्यानातून येणाऱ्या ऐतिहासिक संदर्भामध्ये, ऐतिहासिक कालखंडाच्या पार्श्वभूमीमध्ये मानसिक पातळीवर जातात. पुरंदरे ज्या काळाशी एकरुप होऊन बोलतात; त्या काळाचे एक कल्पनारम्य चित्र श्रोत्यांच्या डोळयांसमोर उभे राहते. हा परिणाम भाषेचा आहे. भाषा स्थळ, काळाच्या सीमा ओलांडते या संदर्भाथ विवेचन आपण केलेले आहे. पुस्तके, चित्रपट, नाटके यामधून होणारे भाषेचे कार्य हे परिणामनिष्ठ काय असते. ते वाचक, श्रोत्यांवर परिणाम घडवून आणते. वेगवेगळ्या प्रकारच्या जाहिराती, नोटीस, आवाहने, निवेदने, लिलाव यामधून वापरलेल्या भाषेतून परिणाम साधला जातो. ग्रहणकर्त्यावर भाषेचा सकारात्मक, नकारात्मक अशा स्वरुपाचा परिणाम करण्यासाठी भाषा कौशल्यपूर्ण रीतीने वापरली जाते. येथे भाषावापरामागे ग्रहणकर्त्यावर परिणाम घडवून आणणे हा हेतू असतो.भाषेचे हे कार्य परिणामनिष्ठ कार्य म्हणून पाहता येईल. परिणामनिष्ठ हे भाषेचे महत्त्वाचे कार्य आहे.

३) संदर्भनिष्ठ वा निर्देशात्म कार्य :

संदर्भनिष्ठ वा निर्देशात्म कार्यामध्ये परिसरातील घटकांचा निर्देश वा त्यांचे वर्णन होत असते. संदेशन हे केवळ बोलणारा व ऐकणारा यांच्यापुरते मर्यादित नसते तर त्यास भोवतालच्या परिस्थितीचाही संदर्भ असतो. का, कोण, कोणास, काय म्हणतो हे ही महत्त्वाचे असते. शेतकरी, एखाद्या कार्यालयातील साहेब, प्राचार्य, कार्यकर्ता, सैनिक इत्यादींच्या संदेशनात अर्थातच वेगवेगळे संदर्भ येतील. आपल्या क्षेत्रांशी निगडीत संदर्भ त्यांच्या संप्रेषण व्यवहारात येत असतात.

४) अविष्कारात्मक कार्य :

मानवी मनातील भावभावनाचे प्रकटीकरण यालाच अविष्कारात्मक असे याकोबसनने म्हटले आहे. आविष्कार करणे म्हणजे व्यक्त होणे होय. समाजजीवनामध्ये प्रत्येक व्यक्तीला व्यक्त व्हावे लागते. साहित्यव्यवहारामध्ये आविष्कार हा शब्द ज्या अर्थाने उपयोजिला जातो; तो अर्थ येथे अपेक्षित नाही. रोमान याकोबसन याला साहित्यामध्ये अपेक्षित असणारे भाषेचे सौंदर्यात्मक आशयवहनाचे कार्य म्हणजे अभिव्यक्ती असा मर्यादित अर्थ अभिप्रेत नाही. मानव हा बोलणारा प्राणी आहे. त्याला आपल्या मनातील भावभावना, विचार, गुपिते इतरांना सांगावी लागतात. कारण आत्मप्रकटीकरण ही मानवाची नैसर्गिक गरज आहे. व्यक्त होणे हे भाषेचे प्राथमिक कार्य आहे. या कार्यालाच याकोबसन आविष्कारात्म अथवा अभिव्यक्तिनिष्ठ कार्य असे म्हणतो. प्रत्येक व्यक्ती आणि व्यक्तीला प्राधान्य देत असतो.

५) काव्यात्म वा सौंदर्यात्मक कार्य :

या कार्यामध्ये संदेश हा घटक केंद्रस्थानी असतो. हा घटक स्वयंमेव संदेशनाचे उद्दिष्ट बनतो. त्याला इतर कोणतीही उद्दिष्टे नसतात. इतर कोणत्याही प्रकारे तोच संदेश या कार्यामध्ये पाठविता येत नाही. भाषेच्या या कार्यात आशयाला व संदेशाला वेगळे; सुटे असे महत्त्व नसते. जो आशय तोच संदेश अथवा शैली असते.

६) भाषाविषयक वा अतिभाषात्म कार्य :

भाषेच्या या कार्यामध्ये भाषेच्या स्वरुपाची चर्चा भाषेच्याच साहाय्याने होत असते. उदा. भाषा एक सामाजिक संस्था आहे. या वाक्यातून भाषेच्या स्वरुपाविषयी चर्चा आपण भाषेच्या साहाय्याने करतो. ज्ञान देणे, ज्ञान मिळवणे, वाढवणे, जतन करुन ठेवणे ही कार्ये भाषेच्या माध्यमाने चाललेली दिसतात. भाषेमुळेच शिकण्याची प्रक्रिया घडते. कोणत्याही विद्याशाखेतील ज्ञान भाषेच्या माध्यमानेच जतन केले जाते, वाढविले जाते. एवढेच नव्हे तर भाषेसंदर्भातील विचार, अभ्यासदेखील भाषेतूनच करावा लागतो. भाषा म्हणजे काय याचे उत्तर आपण भाषेतूनच देतो. भाषेच्या या कार्यामध्ये भाषेसंदभातील विचार करण्यासाठी भाषेचे होणारे साहाय्य गृहीत धरले आहे. भाषेची संरचना, भाषिक व्यवहार, व्याकरण अशा घटकांची चर्चा भाषेच्या साहाय्यानेच करावी लागते; म्हणूनच या कार्यास अतिभाषात्म असे म्हटलेले आहे.

रोमान याकोबसने ही भाषेची सहा कार्य सांगितली आहेत.

४.६ संदर्भग्रंथ

१) भाषा विज्ञान आणि मराठी व्याकरण - डॉ. अनिल गवळी.
२) भाषा विज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक - स. ग. मालशे, हे. वि. इनामदार.
३) मराठी भाषा : उद्‌गम व विकास - कृ. पा. कुलकर्णी.
४) भाषा आणि संस्कृती - ना. गो. कालेलकर.

❖❖❖❖

५

भाषाभ्यासाचे विविध प्रकार

घटक रचना :

५.१ प्रस्तावना
५.२ भाषाभ्यास म्हणजे काय ?
५.३ भाषाभ्यासाचे स्वरुप
५.४ भाषाभ्यासाच्या पद्धतीविषयी
५.५ ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धत
५.६ वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती
५.७ समारोप
५.८ संदर्भग्रंथ

५.१ प्रस्तावना

भाषेचा उदम, भाषेचा विकास, आणि भाषेची वाटचाल यांचा अभ्यास ज्या शाखेत केला जातो त्याला भाषाभ्यास असे म्हणतात. भाषाभ्यास पद्धती वेगवेगळ्या आहेत. या भाषाभ्यास पद्धतीमध्ये भाषेचा विकास आणि भाषिक परिवर्तन यांचा अभ्यास केला जातो.

५.२ भाषाभ्यास म्हणजे काय?

भाषेला मानवी जीवना अनन्यसाधारण महत्त्व आहे. भाषा ही परिवर्तनशील असते. तिच्यात सतत बदल होतात, हे बदल मानवसुलभ असतात. अशा सुलभीकरणाच्या प्रवृत्तीतून होतात. हे बदल दोन पातळीवर होतात. एक म्हणजे ध्वनिपातळी व दुसरी अर्थपातळी होय. उदाहरणार्थ तृण तण, भाषेकडे दळणवळणो, अभिव्यक्तीचे, भावनाभिव्यक्तीचे साधन म्हणून पाहिले जाते.

भाषेची उपत्ती आणि भाषेचा विकास याचा आढावा घेणाऱ्या अभ्यासपद्धतीला भाषाभ्यास म्हणतात.

भाषेचा अभ्यास करताना प्रामुख्याने भाषाभ्यासात शब्दशास्त्र (Philology), कोश (Dictionary), व्याकरण (Grammer), भाषाविज्ञान (Linguistics) यांचा समावेश होतो. तसेच इतर विज्ञानांचाही (भूगोलविज्ञान, शरीरविज्ञान, समाजविज्ञान, मानसशास्त्र,

मानवशास्त्रविज्ञान) समावेश होतो. केवळ ध्वनी उच्चारण म्हणजे भाषा नव्हे, तर त्याच्या साहाय्याने शब्द बनविणे, त्याचा संबंध अर्थाच्या दृष्टीने पाहणे, शब्दांचा क्रम व्यवस्थित पाहणे इत्यादी म्हणजे सर्वांचा उचित असा मेळ निर्माण झाल्याशिवाय भाषा आकाराला येऊ शकत नाही. यासाठीच भाषा ही समग्रपणेच अवतरते.

भाषेचा अभ्यास करणाऱ्या शाखेस सर्वसाधारणपणे 'भाषाविज्ञान' असे म्हणतात. पूर्वी 'भाषाशास्त्र' हा शब्दप्रयोग केला जात होता. परंतु या शब्दातून एक प्रकारची अपरिवर्तनीयता, दृढता दिसते. सध्याच्या काळात सर्वच क्षेत्रात बदल जाणवतो. तसा तो भाषेतही दिसतो. सर्वत्र ज्ञानाची क्षेत्रे विस्तारलेली दिसतात. म्हणून हे ज्ञान पुस्तकात न राहता जीवनात उतरले पाहिजे असा माणसात सकारात्मक बदल झाल्यामुळे 'शास्त्र' या शब्दाऐवजी 'विज्ञान' हा शब्द वापरणे योग्य ठरते. विज्ञान म्हणजे विशिष्ट ज्ञान होय.

भाषाभ्यासात मानवीमनाचा विचार महत्त्वाचा आहे. हा विचार करणारी अनेक क्षेत्रे आहेत. त्यापैकी भाषाविज्ञान हे एक होय. भाषेचा अभ्यास अनेक पद्धतीने करता येतो. वर्णनात्मक, ऐतिहासिक, तौलनिक या पद्धती आपल्या परिचयाच्या आहेत. पण सर्जनशील, रुपविश्लेषण, भौगोलिक किंवा स्थूलमूलक, संख्याशास्त्रीय, उपयोजित, संरचनात्मक, समाजभाषाविज्ञान अशा नव्या पद्धतीही अस्तित्वात आहेत. प्रत्येक पद्धतीचे महत्त्व हे असतेच. पण या सर्व पद्धतींच्या मुळाशी असणाऱ्या तीन पद्धती महत्त्वाच्या आहेत. त्यातही वर्णनात्मक पद्धती ही सर्व अभ्यासाच्या मुळाशी असणारी पद्धत असल्याचे दिसून येते. वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती ही इतर भाषाभ्यास पेक्षा विकसीत पद्धत आहे असे काही संशोधकाचे मत आहे.

५.३ भाषाभ्यासाचे स्वरुप

भाषाभ्यास (Philology) :

भाषेचा वापर मानव प्राचीन काळापासून म्हणजे अदिम अवस्थेपासून करत आहे. मात्र त्यावेळची भाषा आता एवढी विकसीत भाषा नव्हती. माणसाचे माणूसपण भाषेत सामावलेले आहे. मानवेतर प्राणिमात्रावरती आज असलेली सत्ता ही भाषेमुळेच निर्माण झाली आहे. या प्रकारे भाषाविषयक जिज्ञासेमधून व विचारांतून भाषाविज्ञानाची सुरुवात होणे साहजिकच आहे. प्रारंभीच्या काळात व्याकरण व भाषाशास्त्र हे दोनही विषय एकच मानीत होते. परंतु पुढे व्याकरण हे भाषाशास्त्र नाही हे लक्षात आल्यावर फिलॉलाजी (Philology) असे भाषाशास्त्रास म्हटले जाऊ लागले. शास्त्र व विज्ञान हे नेहमी तुलनात्मक असते हे लक्षात आल्यावर फिलॉलाजी हा शब्द भाषाविज्ञानास रुढ झाला. Philos या ग्रीक शब्दाचा अर्थ आवड, प्रेम असा असून to gos म्हणजे बोलणे, संभाषण, शब्द, भाषा असा आहे. या ग्रीक शब्दाचे रुपांतर लॅटिनमध्ये Philolgia आणि फ्रेंचमध्ये Philologie असे होऊन त्याची अर्थव्याप्ती वाढली. त्यामुळे व्युत्पत्ती, ज्ञानाबद्दलची आवड, व्याकरण, साहित्य - समीक्षा, भाषांचा ऐतिहासिक अभ्यास असे अनेक अर्थ फिलॉलाजी या शब्दापासून निघतात. फिलॉलाजी या शब्दात प्राचीन भाषा व लेखपद्धती यांचा अभ्यास अभिप्रेत आहे. यात लिखित भाषा तपासली जाते. यातील 'logy' हा शब्द भाषाविज्ञानाने नाकारला आहे. 'logy' तील तर्क, अनुमान, तत्त्वज्ञान या गोष्टी समावेश भाषाविज्ञानात होत नाही.

भाषांचा अभ्यास जगामध्ये गेल्या अनेक शतकांपासून होत आहे. हा भाषाभ्यास भारतातही होत होता. जुन्या काळात भारतात वाणीला देवता मानले जात होते. त्यामुळे भाषेचा पारंपरिक अभ्यास पाहणे महत्त्वाचे ठरते. भाषाभ्यासाची सुरुवात ग्रीकमध्ये झाली. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांनी कधी व्याकरणाच्या एखाद्या भाषेचे विशिष्ट काळातील व्याकरण हेही ऐतिहासिक असते. भाषेचे आपण भूतकालीन वा भविष्यकालीन व्याकरण तयार करु शकत नाही. पद्धती गतिशील व विकासात्मक आहे. भाषेचे भूतकालीन व्याकरण म्हणजेच ऐतिहासिक व्याकरण होय. भाषेला इतिहास असतो, त्याचा अभ्यास करताना ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा वापर करावाच लागतो. म्हणजेच ऐतिहासिक भाषाभ्यास हा ध्वनिपरिवर्तनावर आधारलेला नाही. यात प्रामुख्याने अभ्यासाच्या सोयीसाठी वेगवेगळे घटक पाडण्यात आलेले आहेत.

ध्वनिविचार : भाषा ही मुखावाटे (वांगिन्द्रियाद्वारे) उच्चारलेल्या ध्वनींच्या साहाय्याने तयार होते. मानवी ध्वनी भाषेमध्ये रुढ झालेले असतात. ध्वनी म्हणजे वागिन्द्रियांच्या माध्यमातून हवेत निर्माण होणारी कंपने असतात. मानव असख्यं ध्वनी उच्चारतो. परंतु हे ध्वनी जसेच्या तसे लिहून दाखविता येत नाहीत. उदाहरणार्थ : शिंक, खोकला, उचकी, जांभई, हसणे, रडणे, ढेकर यांचे ध्वनी या प्रकारचे असतात. त्यामुळे हे ध्वनी म्हणजे भाषा नव्हे, तर ध्वनींच्या अभ्यास दोन पातळीवर केला जातो.

अ) स्वनविज्ञान : यात कोणत्या स्वनो उच्चारण कशाप्रकारे होते, त्यावेळेस होणारी वागिन्द्रिंयाची हालचाल, उच्चारण स्थान व प्रयत्न याचा विचार यामध्ये केला जातो. स्वन हा मानवनिर्मित असला तरी त्यात व्यक्तिविशिष्टता असते.

ब) स्वनिमविज्ञान : एखादा भाषानिरपेक्ष स्वन ज्यावेळी विशिष्ट भाषते वापरला जातो. तेव्हा तो भाषासापेक्ष बनतो. म्हणजे तो विशिष्ट भाषेपुरता मर्यादित बनतो. त्यालाच 'स्वनिमविज्ञान' म्हटले जाते. म्हणजेच स्वनाचे उच्चारण हे विशिष्ट पद्धतीने होत असते. उदाहरणार्थ ज, च या स्वनांपासून जहाज, चमचा हे विशिष्ट स्वन मराठी भाषेच्या उच्चारणाचे संदर्भ घेऊनच उच्चारले जातात.

व्याकरण :

एखादी वाक्यरचना ही संगतवार असावी लागते. तर वाक्यातील संप्रेषण ही प्रक्रिया साध्य होते. मनातील विशिष्ट आशय एक किंवा अनेक शब्दांच्याद्वारा संपूर्णपणे प्रकट केला जातो. त्या रचनेला 'वाक्य' म्हणतात. म्हणजेच एखादी वाक्यरचना नियमानुसार 'विशिष्टत्वाने स्पष्ट करणे' म्हणजे 'व्याकरण' होय.

अर्थविचार :

भाषिक संदेश अर्थाद्वारेच पूर्ण होत असतो. भाषा ही जितकी शारीरिक तितकीच बौद्धिक व मानसिकही असते. कोणतीही भाषिक क्रिया ही एकाचवेळी इंद्रियगोचर म्हणजे शरीराला जाणवणारी आणि मनोज्ञ मनाने जाणता येणारी अशी प्रक्रिया असते. मानवी जीवन मन हे गूढ व गुंतागुंतीची प्रक्रिया असल्यामुळे भाषा ऐकणे, त्याचा अर्थ लावणे या बाबींचा विचार अर्थविचारात करावा लागतो.

शब्दसंग्रह :

भाषा ही ध्वनींनी बनलेली असते. एखादा सुटा ध्वनी उच्चारणे म्हणजे बोलणे नव्हे. तर त्यात शब्दांच्या क्रमाला महत्त्व असते. त्यामुळे अर्थच्छटा बदलते. म्हणूनच शब्दांचे वर्गीकरण विविध प्रकारे केले जाते. त्यात शब्दांच्या जाती, विकारी शब्द, अविकारी शब्द, साधित शब्द, स्वकीय शब्द, परकीय शब्द, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द येतात. या शब्दांचा विचार भाषाभ्यास केला जातो.

५.४ भाषाभ्यासाच्या पद्धती विषयी

भाषेचा अभ्यास जुन्या काळापासून होत आला आहे. भाषा जितकी जुनी असेल तितके त्या भाषेचे अभ्यासक्षेत्र व्यापक असल्याचे दिसून येते. पूर्वी भाषेच्या अभ्यासाला धार्मिकतेचे स्वरुप असल्याचे दिसते. भारतीय परंपरेत आजही अनेक लोक संस्कृतला देववाणी समजतात. यावरुन भाषेबद्दलचा धार्मिक दृष्टिकोणच अधोरेखित होतो. हा दृष्टिकोण अभ्यासाअंती जसा बदलत गेला, तसे भाषेच्या अभ्यासाचे क्षेत्र अनेक अंगांनी विस्तारलेले दिसते. यामधूनच भाषेच्या अभ्यासपद्धतींचा उदय झाल्याचे दिसून येते. भाषेबद्दलचे दृष्टिकोण हे चिरंतन स्वरुपाचे नसतात. त्यात सतत बदल होत असतो. म्हणून भाषेच्या अभ्यासाच्या अनेक शाखा उदयाला आलेल्या दिसून येतात. त्यातील काही महत्त्वाच्या अभ्यासपद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

१) ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती / कालक्रमिक भाषाभ्यास पद्धती (Historical)
२) तौलनिक भाषाभ्यास पद्धती
३) वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती / एककालिक भाषाभ्यास पद्धती

१) ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती / कालक्रमिक भाषाभ्यास पद्धती (Historical) :

१८ व्या शतकात भाषाभ्यासाला एक नवी दिशा प्राप्त झाली ती विल्यम जोन्स यांनी केलेल्या भाषेच्या अभ्यासामुळेच होय. त्यांनी भाषेच्या सूक्ष्म अभ्यास करुन एक महत्त्वाचे गृहितक मांडले. कलकत्ता येथील रॉयल एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात निबंध वाचताना इ.स. १७८६ मध्ये त्यांनी एक विधान केले. ते असे म्हणाले की, 'संस्कृत, ग्रीक व लॅटिन ह्या भाषात जे साम्य आढळते ते इतके घनिष्ठ आणि खोलवर रुजलेले आहे की, या भाषा कोणत्यातरी एका भाषेपासून उद्‌भवल्या असल्या पाहिजेत असे मानावे लागते.' हे विधान करुन सर विल्यम जोन्स यांनी ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा पाया घालण्याचे काम केलेले दिसते.

ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे क्षेत्र खूप व्यापक आहे. यात वेगवेगळ्या भाषांची तुलना करणे, निष्कर्ष मांडणे ही कामे परिश्रमाची असतात. या काळात अनेक भाषा अभ्यासकांनी या पद्धतीने अभ्यास करुन या पद्धतीच्या विकासाला हातभार लावल्याचे दिसून येते. त्यात बॉप यांनी इंडो - युरापियन भाषेचा, कॉल्डवेल यांनी द्रवीड भाषेचा, ग्रिअर्सनने भारतीय भाषांचा अभ्यास केला. व्हिटने व ग्रिम यांनी ध्वनिपरिवर्तनाचे नियम मांडून ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीत महत्त्वाची भर घातली. एखाद्या भाषेची वाटचाल चालू असताना त्या भाषेच्या ध्वनिव्यवस्थेत, रुपव्यवस्थेत व शब्दकोशात फरक पडतो, म्हणजे त्या भाषेला इतिहास असतो, याची जाणीव त्या काळातील अभ्यासकांना होती. तरीही सर विल्यम जोन्स यांची कल्पना अगदी नवीन आहे. त्यामुळे जी मूळ भाषा सुरुवातीला मानावी, ती कदाति आज अस्तित्वात नसण्याची शक्यता आहे.

आजच्या आधुनिक भाषा कोणत्या ना कोणत्या भाषांमधून विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे भाषिक परिवर्तनाचे विवेचन करण्यासाठी ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच वापरावी लागते.

खऱ्या अर्थाने ही पद्धत युरोपमध्ये १९ व्या शतकात उदयाला आली. या पद्धतीत दोन कालखडातील किंवा त्यापेक्षा जास्त कालखंडातील भाषेच्या स्वरुपात काय बदल झाले याचा अभ्यास होतो, यालाच ऐतिहासिक भाषाभ्यास म्हणतात म्हणजे यात एखाद्या काळात कोणते स्वन नाहीसे झाले, कोणते स्वन नव्याने आले, वाक्याचे स्वरुप कसे बदलत गेले, अर्थामध्ये कोणते परिवर्तन झाले या सर्व बाबींचा विचार या पद्धतीच्या माध्यमातून केला जातो. यात दोन किंवा दोनपेक्षा जास्त कालखंडाचा अभ्यास होत असल्याने याला 'कालक्रमिक' अभ्यास पद्धती असेही म्हटले जाते. भाषेतील परिवर्तन हे नियमित व सातत्याने होत असते. याचा विचार करुन या पद्धतीत भाषेचा अभ्यास करावा लागतो.

ज्या भाषा आपण एक भाषाकुळातील मानतो, त्या सर्व इतिहास काळात कोणत्या तरी एका भाषेपासून निर्माण झालेल्या असतात. म्हणजेच त्या साऱ्या एकभाषोद्भव असतात. ही मूळ भाषा माहिती नसेल, तर तिच्या माहितीसाठी प्रयत्न करावे लागतात. यादृष्टीनेही ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती उपयोगी ठरते कारण ऐतिहासिक पद्धती कालक्रमाने भाषेत घडणाऱ्या परिवर्तनाचा इतिहासच लिहित असते. दोन भाषिक अवस्थांमधला इतिहास लिहिताना ध्वनी, व्याकरण, शब्दसंग्रह यांचे तपशिलवार वर्णन आवश्यक असते. म्हणजेच या अभ्यासपद्धतीत दोन कालखंडातील दोन वेगवेगळ्या रुपांची तुलना अभिप्रेत असते.

संस्कृतमधून मराठी, हिंदी, गुजराथी, बंगाली, लॅटिनमधून स्पॅनिश, फ्रेंच या भाषा जन्माला आल्या हे भाषिक परिवर्तनाच्या अनुषंगाने सिद्ध करण्याचे काम ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे असते. यासाठी आपणाला लिखित साधनेच प्रमाण मानावी लागतात. कारण त्या काळातील बोलल्या जाणाऱ्या भाषेचे पुरावे गोळा करणे अशक्य असते; परंतु लिखित भाषा ही खरी भाषा नसते यामुळेच ऐतिहासिक भाषाभ्यासाची पीछेहाट सुरु झालेली दिसून येते. मुख्यत्वे भाषिक परिवर्तनाच्या अंगाने हा अभ्यास केला जातो. कोणत्या भाषेतून कोणती भाषा अस्तित्वात आली याचा अभ्यासही यातून केला जातो व त्यातून कुलसंकल्पना अस्तित्वात आल्याचे दिसते. यात मग एकाच भाषेतील बदलाचा शोध घेतला जातो. त्यालाच एकभाषिक पुनर्रचना असेही म्हणतात. यात स्वन, शब्द, अर्थ व व्याकरणिक रुपे यांच्यात कसे बदल झाले, याचा अभ्यास केला जातो.

ऐतिहासिक भाषाष्यास करताना तुलनात्मक पद्धतीनेही भाषेचे रुप निश्चित करता येते. यात फक्त एकच भाषा तुलनेसाठी न येता दोन किंवा तीन भाषा घ्यावा लागतात. त्यामुळे पूर्णपणे भिन्न वाटणाऱ्या भाषांचाही अभ्यास करता येतो. उदाहरणार्थ संस्कृत : शर्कर, हिंदी : शक्कर, मराठी : साखर आणि इंग्रजी : शुगर या शब्दांमध्ये साम्य दिसते. तसेच गुजराथी : दीवो, हिंदी : दिया, मराठी : दिवा, संस्कृत : दीप या शब्दांमध्ये साम्य दिसते. अशा पद्धतीचे शब्द ऐतिहासिक भाषाभ्यासातील पुनर्रचनेसाठी घेता येतात.

भाषेच्या अभ्यासात ऐतिहासिक पद्धतीचे महत्त्व विशेष आहे. इंडो - आर्यन भाषांच्या अभ्यासाच्या बाबतीत ही पद्धत वापरली गेली. त्यातून प्रामुख्याने यातील सर्व भाषा एकाच कुलातील आहेत. तसेच त्या एकाच भाषावंशातील वेगळ्या - वेगळ्या भाषा बोलणारे ग्रीक, फ्रेंच,

इंग्रज, रोमन, पारशी, हिंदू इत्यादी समाज एकाच आर्यवंशाचे आहेत हे दिसून आले. त्यामुळे आर्यवंशीय भाषांचा वंश निश्चित करण्यात आला. या अभ्यासामुळे 'हिब्रू' ही मानवाची आद्यभाषा आहे या समाजालाही तडा गेला. कारण या अभ्यासातूनच अनेक भाषांचे वंश निश्चित करण्यात आले. या दृष्टिने ऐतिहासिक भाषाभ्यासाचे महत्त्व निश्चित आहे.

५.५ ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती

ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या मर्यादा :

या अभ्यासपद्धतीवर काही आक्षेप घेतले जातात. 'भाषिक परिवर्तन' या संकल्पनेवर आधारित असलेली ही पद्धत मृत झालेल्या भाषिक रुपांच्या आधारे वेगवेगळे निष्कर्ष काढते, त्यामुळे व्यवहार भाषेला यात महत्त्व नसल्यामुळे या अभ्यासाला समग्रता प्राप्त होत नाही. त्यामुळे त्या काळातील बोलींचे व भाषे स्तर लक्षात येत नाहीत. तसेच या पद्धतीत शब्दांच्या चिकित्सेवर भर दिला जातो. त्यात शब्दाचा ध्वनि, अर्थ, वाक्यातील त्याचा परस्परसंबंध याची माहिती अभिप्रेत आहे. परंतु प्रत्यक्षात ती भाषा बोलणाऱ्या समाजघटकांचा कसलाही संबंध यात होताना दिसत नाही. भाषा ही सामाजिक असते, त्यामुळे भाषेवर समाजाचे प्रतिबिंब असते तरीही या पद्धतीत सामाजिक घटकांचा विचार केलेला दिसत नाही.

तसेच या अभ्यासपद्धतीत भाषेच्या निरनिराळ्या घटकांपैकी प्रत्येकाचा सांगोपांग अभ्यास होतो. त्यात वर्णप्रक्रिया, शब्दप्रक्रिया, प्रयोगप्रक्रिया इत्यादीचा अभ्यास होतो. परंतु हा अभ्यास एकत्रितपणे न झाल्यामुळे कोणत्याही भाषेची पुनर्रचना करताना अडचणी निर्माण होतात. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीने जनक भाषा शोधण्यास अवघड जाते. 'भाषिक परिवर्तन' या संकल्पनेवर ही पद्धत अवलंबून असली तरी परिवर्तन बिंदू निश्चित करता येत नाही. एकंदरीत, भाषेच्या कालिक टप्प्यांचा एककालिक / वर्णनात्मक अभ्यास केल्याशिवाय ऐतिहासिक भाषाभ्यासाला पुढे जाता येणार नाही, हे सोस्यूरने सांगितलेले मतच शेवटी ग्राह्य मानावे लागते.

५.६ वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती

वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती / एककालिक भाषा पद्धती :

"कोणत्याही एका कालखंडातील भाषिक रुपाचा अभ्यास करण्याच्या पद्धतीला वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती असे म्हणतात."

कोणत्याही एका कालखंडातील भाषिक स्वरुपाचा अभ्यास यात केला जातो. एकाच काळातील ते भाषेचे स्वरुप असल्यामुळे ह्या पद्धतीला 'एककालिक पद्धत' असे म्हणतात. यात एकाच काळातील भाषेचे स्वरुप पाहात असल्यामुळे ते स्थिर आहे असे मानावे लागते. यातून व्याकरणाच्या नियमांना अनुसरुन शब्दांची रुपे होवोत अगर ती स्वतंत्ररित्या सिद्ध होवोत. सर्व भाषेचे जसेच्या तसे वर्णन या पद्धतीत केले जाते, म्हणून तिला वर्णनात्मक पद्धती असे म्हणतात. फर्दिनांद सोस्यूर या भाषाभ्यासकाने थ्री भाषाभ्यास पद्धतीचा पाया घातला आहे. सास्यूरने सर्वप्रथम याचा अभ्यास करुन यातील भाषिक भेद दाखवून दिले. त्यातूनच आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया घातला गेला. सर्व अभ्यास पद्धतीच्या मुळाशी असणारी ही पायाभूत पद्धती आहे.

ध्वनीच्या मूलभूत घटक स्वनिम असतो. हा आपणाला समजल्याशिवाय भाषेचे वर्णनच करता येणार नाही. या पद्धतीने भाषेचे वर्णन करणे म्हणजे विश्लेषण करणे होय. भाषा ही कालसापेक्ष असते. परिवर्तनशीलता हा भाषेचा गुण आहे. या पद्धतीने अभ्यास करताना भाषेची पूर्वोत्तर अवस्था (इतिहास) लक्षात घ्यावयाची नसते किंवा किंवा एका भाषेचा अभ्यास चालू असताना या भाषेची दुसऱ्या भाषेशी तुलनाही करु नये. म्हणजे आजच्या वर्तमान मराठीचा अभ्यास करीत असताना त्यावर संस्कृत भाषेशी छाप पडू नये. भिन्न वंशीय भाषांमध्ये अनेक प्रकारचे साम्य असू शकते, पण वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास करताना दुसऱ्या भाषेच्या प्रकृतीशी तुलना केल्यास ते अप्रस्तुत ठरेल. कारण या अभ्यासात विशिष्ट भाषेचे विशिष्ट काळातील वर्णन देणे एवढाच हेतू असतो.

वर्णनात्मक भाषा स्वरुप :

विशिष्ट काळात भाषेचे रुप कसे होते, याचे विश्लेषण या पद्धतीतून केले जाते. यात प्रामुख्याने व्यवहार भाषेचा विचार केला जातो. लिखित भाषेचा नाही. त्यात ध्वनिविचार, वर्णविचार, रुपविचार, वाक्यविचार, अर्थविचार, व्युत्पत्तिविचार, शब्दसंग्रहविचार यांचे विश्लेषण करायचे असते. भाषेचे यथातथ्य, अचूक, तपशिलवार, परिपूर्ण वर्णन करणे हे वर्णनात्मक अभ्यास पद्धतीचे उद्दिष्ट असते. यातील वास्तव वर्णनामुळे परंपरागत मते बदलावी लागतात. उदाहरणार्थ १) स, ला, ते हे एकवचन; स, ला, ना, ते हे अनेकवचनी विभक्तीचे प्रत्यय आहेत परंतु यातील 'ते' हा प्रत्यय बोलण्यात येत नाही. २) द्वितीया व चतुर्थीचा 'स' हा प्रत्यय बोलण्यात क्वचित येतो. लेखनात जास्त येतो. ३) च, ज या व्यंजनाचे उच्चारण दोन प्रकारे होते ४) तृतीयेचा 'ने' हा बोलताना 'नं, नी' असा उच्चारला जातो. ५) 'ऋ' ची जागा 'रु' या प्रत्ययाने घेतली. तसेच भाषा ही कालसापेक्ष असते. उदाहरणार्थ यादवकाळात आपल्याला जंबिया, फिरंगी हे शब्द आढळत नाहीत, तर ते फारशीतून मराठीत आलेले दिसतात. कोणत्याही काळाचा परिणाम हा त्या भाषेच्या स्वनिमांवर परिणाम करतो, हे या पद्धतीतूनच समजते. तसेच मराठीतील 'ळ' हा ध्वनी विशिष्ट स्थानीच उच्चारला जातो. मराठीत तो शब्दाचा सुरुवातीला कधीच येत नाही. तर काही भाषेतील मोजकेच ध्वनी असे असतात की, त्यामुळे अर्थभिन्नता निर्माण होते. दोन वस्तू भिन्न आहेत हे आपणाला ध्वनीमुळेच समजते. उदाहरणार्थ नळ - नल, फळ - फूल इ. म्हणजेच येथे 'ल' आणि 'ळ' हे भाषेतील स्वनिम ठरतात. अशा पद्धतीने भाषांच्या सर्व स्तरांचा अभ्यास करुन त्याचे पद्धतशीर व शास्त्रशुद्ध वर्णन देणे, हे वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीचे कार्य आहे.

वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती ही भाषाशास्त्रीय अभ्यासाचा पाया समजली जाते. दोन काळातील भाषांचा ऐतिहासिक किंवा तौलनिक अभ्यास करावयाचा असेल तरी सुरुवातीला वर्णनात्मक पद्धतीने भाषेची चिकित्सा करावीच लागते. भाषा ही मानवी संकेतावर अवलंबून असते. त्यामुळे ती भाषा लोक बोलतात तेव्हा काय काय घडते याची नोंद घ्यावी लागते. प्रत्येक भाषेचे उच्चार, व्याकरण, शब्दसंग्रह स्वतंत्र असतात. त्यामुळे दुसऱ्या एखाद्या प्रमाणभूत मानलेल्या भाषेला गृहीत धरुन चालू भाषेचे स्वरुप पाहता येत नाही. प्रत्यक्ष वापरात भाषेचे जे रुप असते, त्याच रुपाला शुद्ध समजावे लागते. कारण भाषा ही व्यक्तिसापेक्ष असते.

भाषा ही एक सामाजिक संस्था हे. त्यामुळे भाषेच्या अभ्यासात समाजवास्तव दुर्लक्षित करुन चालत नाही. परंतु ऐतिहासिक अभ्यासात ही समाजघटना बाजूला राहत होती. वर्णनात्मक पद्धतीतून समाजवास्तवाची भाषाच अभ्यासली जात असल्यामुळे ह्या पद्धतीला

महत्त्व प्राप्त झाले. कोणत्याही समाजातील सामाजिक घटना त्या ज्या त्या समाजाशी निगडीत असतात आणि ह्या घटनाच त्या विशिष्ट भाषिक घटनांच्या मुळांशी असतात. या अभ्यासात भाषेतील ध्वनी, शब्द, प्रयोग, व्याकरण, कोश, अर्थविकास, भाषिक समाज यांच्या अभ्यास येतो, पण व्यक्तीलाही महत्त्व असते. पण ते केव्हा तर ती व्यक्ती व तिच्या भोवतालचे वातावरण लक्षात घेतले तरच. त्यामुळे वर्णनात्मक पद्धतीत व्यक्ती व समाज हेही यांचा अभिप्रेत आहेत.

वर्णनात्मक पद्धतीने भाषेचा अभ्यास करतना काही गोष्टी लक्षात घ्यावा लागतात. त्यात प्रत्येक भाषेची संरचना अनन्य असते. परंतु त्या संरचनेचा शोध घेणाऱ्या अभ्यास पद्धती मात्र समान असतात. त्यावरुन भाषेचे सहज निरीक्षणासाठी उपलब्ध असणारे अंग म्हणजे ध्वनी होय. भाषेचा अभ्यास हा ध्वनीपासून करायला हवा; म्हणून भाषिक अभ्यासात 'अर्थ' हा निरीक्षणसुलभ नसल्यामुळे वर्णनात्मक अभ्यास पद्धतीत अर्थविचार अमान्य आहे. त्यामुळे ध्वनी - स्वन - पद - वाक्य या क्रमाने जावे लागते. म्हणजेच या पद्धतीत वाक्यरचनेला महत्त्वाचे स्थान आहे.

वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीची वैशिष्ट्ये :

१) वस्तुनिष्ठ पद्धतीने भाषेचे वर्णन करणे. हा प्रधान हेतु आहे.

२) भाषा कधीही श्रेष्ठ कनिष्ठ, शुद्ध, अशुद्ध नसते.

३) आधुनिक भाषा विज्ञानाने या चुकीच्या समजूतीचा तीव्र विरोध

४) भाषा ही प्रवाही असते ही परिवर्तनशील असते.

वर्णनात्मक अभ्यास पद्धतीतील मर्यादा :

वर्णनात्मक अभ्यास पद्धतीत एकाच काळातील भाषेचा अभ्यास केला जातो. त्यासाठी लागणारी साधनेही अपंरपार असतात. ती सर्व गोळा झालीत असे कधीही म्हणता येणार नाही. कारण ज्या भाषेचा अभ्यास करावयाचा आहे ती भाषा एका काळातील असल्याने साधने बदलत जातात. त्यामुळे बदलत जाणारी सर्व साधने गोळा झाली असे कसे म्हणता येईल ? आणि साधने अपुरी असली म्हणजे अभ्यास व्यवस्थित होणार नाही.

या अभ्यास पद्धतीने एका काळातील स्वरुपाचा अभ्यास होतो. त्यामुळे भाषेच्या एका विशिष्ट अंगावरच प्रकाश पडेल, परंतु तिचा समग्र स्वरुप आपणाला समजणार नाही. ह्या मर्यादा जाणवतात. तरीही वर्णनात्मक पद्धती ही सर्व पद्धतीच्या मुळाशी असणारी पद्धत आहे, असेच मान्य करावे लागते.

५.७ समारोप

भाषाभ्यास पद्धतीत ऐतिहासिक, तुलनात्मक आणि वर्णनात्मक या तीन प्रमुख पद्धती आहे. यातील वर्णनात्मक पद्धत ही पायाभूत मानली जाते. विशिष्ट काळातील भाषेचे यथार्थ वर्णन करता आले तरच त्यातील परिवर्तनाचा किंवा दोन कालखंडातील भाषेच्या भिन्न रुपांचा अभ्यास करणे, परस्पर संबंध ठरविणे शक्य होते. उदाहरणार्थ; पाणिनीने रचलेले संस्कृत भाषेचे व्याकरण म्हणजे त्याच्या काळातील संस्कृत भाषेचा वर्णनात्मक अभ्यास होता. कालांतराने व्युत्पतिशास्त्राकडे भाषा अभ्यासकांचे लक्ष गेल्यानंतर ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती उदयास आली.

गेला दशकात गणिती, संरचनात्मक, उपयोजित, तात्विक अशा अनेक पद्धती अस्तित्वात आल्या. भाषेचे वर्णन जास्तीत जास्त अचूक करता यावे हाच नव्या पद्धतीचा हेतू आहे. भाषाविज्ञान हे समाजशास्त्रीय अभ्यासाचे एक क्षेत्र आहे. सर्व ज्ञानशाखांशी भाषाविज्ञानाचा जवळचा संबंध येतो. साहित्य आणि भाषाविज्ञान याचे अत्यंत जवळचे नाते आहे. समाजशास्त्रात प्रयोग करता येतात. पण त्यात शंभर टक्के वस्तुनिष्ठता असते.

१८ व्या शतकात पाश्चात्य भाषाभ्यासाला एक नवी दिशा प्राप्त झाली ती विल्यम जोन्स यांनी केलेल्या भाषेच्या अभ्यासामुळेच होय. संस्कृत, ग्रीक व लॅटीन या भाषात जे साम्य आढळते ते खूप खोलवर रुजलेले आहे की या भाषा कोणत्या तरी एका भाषेपासून उद्‌भवल्या असल्या पाहिजेत असे मानावे लागते. या विधानातूनच ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा पाया घालण्याचे काम केल्याचे दिसुन येते. यात दोन कालखंडातील किंवा त्यापेक्षा जास्त कालखंडातील भाषेच्या स्वरुपात काय बदल झाले याचा अभ्यास होतो. यात स्वन, शब्द, अर्थ व व्याकरणिक रुपे यांच्यातील बदलांचा अभ्यास केला जातो.

एकाच भाषेच्या निरनिराळ्या कालखंडातील स्वरुपे व भिन्न भाषांची स्वरुपे ह्यांची तुलना या भाषाभ्यासात केली जाते. तसेच कोणत्याही एका कालखंडातील भाषिक स्वरुपाचा अभ्यास वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीत केला जातो. सर्व अभ्यास पद्धतीच्या मुळाशी असणारी ही पायाभूत अभ्यास पद्धती आहे. यात भाषेची पूर्वोत्तर अवस्था लक्षात घ्यावयाची नसते तर विशिष्ट भाषेचे विशिष्ट काळातील वर्णन देणे एवढाच हेतू असतो.

५.८ संदर्भग्रंथ

१) वर्णनात्मक भाषाविज्ञान : स्वरुप आणि पद्धती - कल्याण काळे अंजली सोमण
२) भाषा विज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक - स. ग. मालशे, हे. वि. इनामदार
३) अभिनव भाषाविज्ञान - ग. ना. जोगळेकर
४) समाज भाषा विज्ञान आणि मराठी कादंबरी - डॉ. नंदकुमार मोरे
५) भाषा आणि भाषाभ्यास श्री. न. गजेंद्र गडकर

❖❖❖❖

६

समाजभाषा विज्ञान परिचय

घटक रचना :

६.१ प्रस्तावना
६.२ समाज भाषा विज्ञान - विकास
६.३ समाज भाषा विज्ञानात येणारे घटक
६.४ समाज भाषा विज्ञानाची व्याप्ती
६.५ सामाजिक - सांस्कृतिक संरचना
६.६ भाषा आणि संस्कृती
६.७ भाषिक सापेक्षतावाद आणि न्यूनसिद्धांत (सफीर, व्होर्क)
६.८ जागतिकिकरणारे निर्माण केलेली भाषिक आव्हाने
६.९ समाजभाषा विज्ञानातील विविध संकल्पना
६.१० प्रमाण भाषा आणि बोली
६.११ संदर्भग्रंथ

६.१ प्रस्तावना

सममाजभाषा विज्ञान या अभ्यास क्षेत्राचा उदय साधारणतः १९६० नंतर झाला आहे. या अभ्यासक्षेत्राचा विकास एडवर्ड सपीर, बेंजमिन ली, वोर्फ, ग्किशमन, डेल हाईम्स, जॉन गम्फर्स, विल्यम लॅबाव्ह इत्यादी भाषाभ्यासकांनी केला आहे. सामाजिक - सांस्कृतिक दृष्टिकोणातून भाषेकडे पाहणारी ही भाषाभ्यासाची सर्वात आधुनिक पध्दती आहे.

६. २ समाज भाषा विज्ञान - विकास

समाज भाषा विज्ञान या अभ्यास क्षेत्राचा उदय साधारणतः १९६० नंतर झालेला आहे. भाषा आणि समाज यांच्यामध्ये असलेल्यासंबंधाचा अभ्यास समाजभाषाविज्ञानामध्ये केला जातो. भाषा हे समाज व्यवहाराचे माध्यम आहे. या व्यवहारामधूनच भाषेची व्यवस्था आकारला येते. तरीही भाषाव्यसामध्ये व्यवहारापेक्षा भाषेच्या व्यवस्थेवरतीच भाषाभ्यासकांनी लक्ष केंद्रित केलेल दिसते. समाजभाषा विज्ञानाच्या उदयापूर्वी भाषा व्यवहाराकडे पूर्णतः दुर्लक्ष होते झालेले दिसते. समाजामध्ये सर्वत्र एकच भाषा अथवा एखाद्या भाषेचे सर्वत्र एकासारखे रुप आढळत नाही. म्हणूनच जगभरात शेकडो भाषा प्रचलित झालेल्या दिसतात. याला भाषेच्या विविध रुपामागे समाजाची समाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी, तसेच भौगोलिक, राजकीय परिस्थिती कारणीभूत

असते. त्यामुळे भाषा आणि भाषा व्यवहाराचे अभ्यास या संदर्भाधारेच करावा लागतो. भाषांकडे पाहण्याचा हा नवा दृष्टिकोन समाजभाषाविज्ञानाने दिला. भाषाभ्यासाचे सर्वात विकसित रुप म्हणून या अभ्यासापध्दतीकडे पाहिले जाते.

६.३ समाजभाषा विज्ञानात येणारे घटक

भाषा ही एक महत्वाची सामाजिक संस्था आहे समाजाची निर्मिती, सामाजाचे अस्तित्व आणि विकास या गोष्टी भाषेमुळेच शक्य झालेल्या आहेत. भाषेतील शब्दांना प्राप्त होणारा अर्थपूर्णत: समाजसापेक्ष असतो. त्यामुळे कोणत्याही भाषेचा विचार ती भाषा बोलणाऱ्यामाजाच्या संदर्भात करावा लागतो.

समाज, संस्कृती आणि भाषा यांचा सहसंबध समाजाअंतर्गत विविध भेद, परंपरा श्रध्दा समजूती, पर्यावरण आणि भाषिक प्रभाव पौराणिक संदर्भ, ऐतिहासिक संदर्भ, जीवन पध्दती उद्दोग-व्यवसाय धार्मिकता, भाषिक सापेक्षतावाद अशा प्रकारच्या विविध घटकांचा समावेश या समाजभाषा विज्ञानात केला जातो.

६.४ समाजभाषा विज्ञानाची व्याप्ती

आधुनिक युगांमध्ये नांगरीकरण, जागतिकिकरण आणि प्रसारमाध्यमांचा वादता प्रभाव यामुळे व्यक्तीचा संपर्क प्रक्रिया विलक्षण गतीमान झालेली आहे. बदलत्या जीवनपध्दतीचा भाग म्हणून, विविध भाषांवर प्रभुत्व मिळविणे, अनेक भाषिकांच्या संपर्कात येणे, भिन्न भाषिकांशी समयोजना साधणे अपरिहार्य बनले आहे. या प्रक्रियेमुळे संपर्क व्यवस्था विस्तारण्याबरोबर व गतीमान बनलेली आहे. मानवाने जीवनाच्या सर्वच क्षेत्रात वैज्ञानिक प्रगती साधली आहे.

जगातील प्रत्येक भाषा बोलीकडून त्या भाषिक समाजातील प्रत्येकाचा संदेशव्यवहार पूर्ण केला जातो.

६.५ सामाजिक-सांस्कृतिक संरचना

एकाच समाजामध्ये अस्तित्वात असणाऱ्या विविध भाषिक रूपांमागे भौगोलिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती कारणीभूत असते. त्यामुळे भाषेचा आणि भाषाव्यवहाराचे अभ्यास या संदर्भातच करावा लागतो. भाषाव्यवहारामध्ये शब्दांना प्राप्त होणारे अर्थ हे समाजाकडून निश्चित झालेले असतात. त्यामुळे त्या अर्थाचे अन्वयार्थ हे त्यांना 'अर्थ' प्राप्त करुन देणाऱ्या समाजाच्या संदर्भातच करावे लागतात. विविध स्तर, वर्ग, धर्म, जाती, प्रदेश, नोकरी-व्यवसाय, वय, लिंग इत्यादींमुळे समाजात दिसणारे भेद भाषेमध्येही पाहावयास मिळतात. या भाषिक भेदांचा आणि आधुनिक भाषाविज्ञानामध्ये भाषाभ्यासासाठी गृहीत धरलेल्या ध्वनी, शब्द वाक्य या भाषेच्या स्तरांचा विचारही या अभ्यासपद्धतीमध्ये केला जातो. त्याचबरोबर धातू, धातूला लागणारे प्रत्यय, सर्वनाम, नाम, विशेषणे, क्रियापदे, अन्वये यांचाही विचार सामाजिक संदर्भाच्या आधारनेच केला जातो.

मानवाचा भाषाव्यवहार व्यपक आणि संदर्भबहुल असतो. एखाद्या समाजाच्या भाषाव्यवहाराचे निरिक्षणा केल्यानंतर अभ्यासकांचा समोर येणअरे निष्कर्ष; दुसऱ्या समाजाच्या भाषाव्यवहाराशी तुलना करु पाहता संदिग्ध आणि अपुरे वाटतात. कारण प्रत्येक समाजानुसार भाषावापराचे संकेत बदलतात.

एकंदरीत मानवी भाषाव्यवहाराचे जेवढे त्याच्या स्वरुप अनुभवास येईल, तेवढे या अभ्यासपद्धतीचे स्वरुप व्यापक होत जाणार आहे मानवाच्या व्यापक भाषाव्यवहाराचे निरीक्षण केल्यानंतर भाषेची असंख्य रुपे आणि नानाविध प्रकारचे भेद अस्तित्वात असल्याचे आढळतात. अशा भाषाव्यवहाराचे स्वरुप तपासणे आव्हानात्म आहे. असे असले तरु, या अभ्यासपद्धतीचे सूत्र एकच आहे आणि ते म्हणजे भाषेला असलेला सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ होय.

- **विविध भेद**

भाषेला असलेल्या सामाजिक संदर्भाचा शोध घेणे हे समाजभाषाविज्ञानाचे उद्दिष्ट आहे. हा सामाजिक संदर्भ पडताळून पाहाण्यासाठी आजुबाजूला पुष्कळ उदाहरणे सापडतात. भारतीय समाजात लिंग, धर्म, जाती आणि उपजाती, विविध जातींचे परंपरागत व्यवसाय, उद्दोग, समाजातील समजुती, नागरिकरणानंतर उदयाला आलेले आर्थिक स्तर, या आर्थिक स्तरानुसार अस्तित्वात आलेले नवे वर्ग, श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या पारंपरिक आणि आधुनिक कल्पना असे बहुस्तरीय भेद पाहावयास मिळतात. भाषावापरातही या भेदांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रतिबिंब पडलेले दिसते. व्यक्तीला सामाजिकरणाच्या (Sociolization) प्रक्रियेतून भाषा प्राप्त होताना त्या समाजाच्या सर्व संदर्भासहित प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येकाच्या भाषावापरावर समाजा अंतर्गत भेदांचे परिणाम जाणवतात.

- **परंपरा, श्रद्धा-समजुती.**

प्रत्येक समाजाची भाषा त्या समाजाशी संबंधित परंपरा, रुढी, समजुती, संस्कृती, व्यवासाय इत्यादी गोष्टीमुळे समृद्ध बनलेली असते. भाषाभ्यासाला भाषेचे हे सर्व संदर्भ बाजूला सारुन भाषेचा विचार करता येत नाही. प्रत्येक समाजामध्ये आढळून येणारे हे संदर्भ त्या त्यासमाजाच्या भाषेमध्ये खोलवर रुजलेले व भाषेशी एकजीव झालेले असतात. मराठी भाषते रुढ झालेले लगीनघाई, गावगोंधळ, गाबभवानी यासरखे शब्द पाहता हे संदर्भ लक्षात येतात. श्रद्धा समजुतीतून प्रत्येक समाजाचे भाषावपराचे काही संकेत ठरलेले असतात. उदारणार्थ कुंकू पुसले, बांगडया फुटल्या या वाक्याप्रयोगांचा अशुभसूचक अर्थ असल्यामुळे ही वाक्ये कुंकू वाढले. बांगड्या वाढल्या आणि उच्चारली जातात. तसेच घरातून जाताना 'जातो' न म्हणता; 'येतो' म्हणणे किंवा दुकान बंद करताना 'दुकान वाढवतो' असे म्हणणे ही त्याची आणखी काही उदाहरणे. समाजजीवन, राहणीमान, समाजाच्या बदलत्या मूल्यकल्पना यामुळे भाषा बदलत राहते. परंतु परंपरा, रुढी, श्रद्धा या प्रत्येक समाजामध्ये खोलवर रुजलेल्या असतात. पर्यायाने बदलत्या भाषेवरही त्याच छाप दिसतेच. त्यामुळे समाजभाषाविज्ञान ही अभ्यासपद्धती अधिकाधिक सर्वसमावेशक, संदर्भबहुल आणि बहुव्याप्त झालेली दिसते.

या भाषिक प्रभावाचा विचार अद्याप विस्ताराने झालेला आहे. हा विचार केल्याखेरीज भाषेचे विश्लेषण करता येणार नाही. तसेच व्यक्तीच्या भाषिकतेवर विशिष्ट प्रभाव असतो. उद्दमनगरीमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या भाषेवर 'उद्दोगजगताचा' प्रभाव जाणवतो.

खेळाडूंच्या भाषेवर 'खेळाचा' , मंदिरात पूजा-अर्चा करणाऱ्या पुजाऱ्याच्या भाषेवर 'धार्मिकत्तेचा', डॉक्टरच्या भाषेवर 'वैद्दकीय क्षेत्राचा' प्रभाव दिसतो. इंग्रज भातात आल्यापासून येथील भाषांवर पडलेला इंग्रजीचा प्रभाव हा बदलत्या सांस्कृतिक पर्यावरणाचाच भाग आहे.

- **पौराणिकतेचा संदर्भ.**

समाजाला, प्रदेशाला विशिष्ट अशी सांस्कृतिक परंपरा असते. त्यातून त्या समाजाच्या भाषेलाही सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि पौराणिकतेचे संदर्भ लाभतात. भारतीय भांषांच्या संदर्भात हे विशेषत्वाने जाणवते. भारतीय संस्कृती प्राचीन आहे. भारतीय हिंदू समाजांमध्ये रामायण, महाभारत या आर्षमहाकाव्यांबरोबर वेद, उपनिषदे, भगवद्गीता अशा ग्रंथांना विशेष महत्त्व आहे. त्यामुळे सर्वत्र भारतीय भाषांमध्ये या महाकाव्यांशी संबधित संदर्भ प्रतिबिंबत झालेले आहेत. उदाहरणासाठी मराठी भाषेतील काही भावाप्रयोग पाहता येतील. कळीचा नारद, कुबेर, कंसमामा, शकुनीमामा, कुंभकर्ण, कर्ण, कृष्णकृत्य, कैकयी, चित्रगुप्त, जमदग्नी, हिंडिंबा, नारदमुनी, पूतनामावशीचे प्रेम, भीष्मप्रतिज्ञा, विश्वमित्री, पवित्रा, वाल्याचा वाल्मिमी, एकलव्य इत्यादी व्यक्तिरेखा या महाकाव्यांमधील आहेत. दैनंदिन व्यवहारामध्ये व्यक्तीच्या वर्तनाची, गुण-दोषांची तुलना नकळत या व्यक्तिरेखांशी होते आणि तशी तुलनात्मक प्रतिमा साकारणारी भाषा व्यवहारासाठी वापरली जाते. भाऊ असावा लक्ष्मणासारखा, रामलक्ष्मणाची जोडी, कर्णासारखा दानशूर, कृष्णकारस्थानी, सतिसावित्री असे असंख्य भाषाप्रयोग या संदर्भाने भाषेमध्ये प्रचलित झालेले आहेत. भारतीय राजकारणांमध्ये नेते, पुढारी आणि राजकीय विश्लेषक-पत्रकार यांच्याकडून 'कुरुक्षेत्र' हा शब्द नेहमी वापरला जातो. याचे कारण ही महाभारतीय युद्धाची प्रसिद्धी 'रणभूमी' आहे. अलिकडे या कुरुक्षेत्राच्या ठिकाणी खोदण्यात आलेल्या कुपनलिकेमध्ये 'प्रिन्स' नावाचा लहान मुलगा खेळता-खेळता पडला. शर्थीच्या प्रयत्नानंतर प्रिन्सला बाहेर काढण्यामध्ये यश आले. त्यामुळे अनेक वर्तमाननपत्रांमधून 'प्रिन्सने करुक्षेत्र जिंकले' असे वृत्त प्रसिद्ध झाले. त्याला 'बाहेर काढतना प्रशासनाची 'युद्धपातळीवरील धापळ, तसेच 'प्रिन्स' आणि 'कुरुक्षेत्र' या दोन शब्दांशी 'जिंकणे' या शब्दाचा जोडला गेलेला संदर्भ यातून वरील वाक्य वर्तमानपत्रामध्ये छापले गेले. भाषा कशी आकारला येते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

- **ऐतिहासिक संदर्भ.**

पौराणिक संदर्भाबरोबरच समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी देखील भाषेच्या अभ्यासासाठी विचारात घ्यावी लागते. प्रत्येक समाजाला इतिहास आहे. हा इतिहा समाजाच्या वर्तमानावर परिणाम घडवून आणत असतो. मराठी समाजाच्या संदर्भात शिवरायांचे स्वराज्य, शिवकाळ, पेशवेकाळ खूपच महत्त्वाचा आहे. शिवाय येथील इंग्रजांचे राज्य हा देखी ऐतिहासिक संदर्भ भाषाविचारात महत्त्वाचा आहे. गड राखला, झेंडा आटकेपार रोवला, किल्ले खिंड लढविली, गमिनीकावा, तोफ डागली, 'ध' चा 'मा' केला. पाठीमागून वार केला. तलवारी म्यान केली, सुलतानी संकट, ग्यानवाची मेख, बाजीरावाचा नातू, यादवी, पानिपत झाले, विश्वास गेला पानिपतात, हुजरेगिरी, पगडी उतरवणे अशी अनेक प्रचलित भाषिक रुपे ही भाषेचा ऐतिहासिक संदर्भ तपासून घ्यानात घ्यावी लागतात. मराठी भाषेते स्थिर झालेले इंग्रजी, हिंदी, फार्सी शब्द समजून येण्यासाठी ही ऐतिकासिक पार्श्वभूमी महत्वाची ठरते.

भारत हा बहुभाषिक देश आहे. येथील सांस्कृतिक-भौगोलिक विविधता, ऐतिहासिक पार्श्वभूमी, नैसर्गिक संपन्नता, प्राचीन परंपरा, विविध धर्म, जाती, विविध गर्व यामुळे भाषाभेद

निर्माण झाले आहेत. पर्यायाने अनेक बोलीची निर्मिती झालेली आहे. त्यामुळे समाजभाषावैज्ञानिक अभ्यासासाठी ही विविधता अधिक पोषक ठरु शकते.

या सर्व गोष्टी बरोबरच भाषाभ्यासासाठी समाज विज्ञानामध्ये अनेक या संकल्पना-सिद्धांतांच्या आधारे भाषाव्यवहाराची चिकित्सा केल्यास, भाषा आणि समाजव्यवस्थेसंदर्भात महत्त्वाचे निष्कर्ष हाती येतात. समाजभाषाभ्यासपद्धतीमध्ये भाषिक सापेक्षतवाद, संवेदवहनात्मक क्षमता, भाषिक भांडार, लघुक्षेत्र, भाषिक समाज, भाषासंपर्क, भाषाव्यवहार, भाषाद्वित्व, बहुभाषिकता, भाषामिश्रण, भाषापरिवर्तन, भाषानिर्मिती, भाषिक लिंगभेद, भाषाजनतत्व, भाषाप्रदूषण, भाषाबदल, भाषादंडक, भाषालघुत्व अशा काही संकल्पनांची मांडणी करण्यात आलेली आहे. यापैकी काही संकल्पनांची आपण ओळख करून घेऊ या.

६.६ भाषा संस्कृती

संस्कृती हा मूलतः व्यापक विषय आहे. भाषाशिवाय संस्कृती किंवा संस्कृती विरहित भाषा हा विचारही अशक्य आहे. संस्कृतीमध्ये कला, साहित्य, नाट्य, धर्म व अध्यात्म, रीती, परंपरा, सामाजिक संबंधाविषयीचे निती-नियम, वैवाहिक, कौटुंबिक नातेसबंधाविषयीचे रितीरिवाज, सामाजिक अस्मितेच्या संदर्भात भाषातून, भाषारचनेतून व्यक्त होणारे संकेत इ. उपविषयांचा समावेश होतो. संस्कृतीशी निगडीत असलेल्या या आणि इतर घटकांशी निगडीत असलेल्या या व इतर उपविषयांच्या सूक्ष्म घटकांचा समावेश या उपविषयाच्या कक्षेत होतो. भाषा आणि संस्कृती यांचा संबंध फार पुरातन काळापासून आहे. संस्कृतीचे अपत्य भाषा असते.

भाषा आणि संस्कृती :

संस्कृतीचा संबंध मानवी जीवनाशी व समाज जीवनाशी आहे. जीवन गतिमान आहे, विकसनशील आहे. त्याचप्रमाणे संस्कृती ही गतिमान व विकसनशील आहे. संस्कृतीची गतिमानता आणि विकसनशीलता भौतिक जीवनाच्या घटकावर अवलंबून असते. जुन्याचा ऱ्हास आणि नव्याचा उद्‌भव. जून्यातूनच नव्याची निष्पत्ती अथवा संपूर्णपणे नवेपण हे संस्कृतीत घडू शकते. इरावती कर्वे म्हणतात, ''**संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देश काल विशिष्ट रीत म्हणजेच संस्कृती**''. तर एडवर्ड टायलर याच्या मते, ''समाजाचा सदस्य या नात्याने समाजात राहून हस्तगत केलेले ज्ञान, विज्ञान, कला, वाङ्‌मय आणि त्याच्या जोरावर परिस्थितीशी समायोजन करुन मिळवलेले कौशल्य, समता तसेच नितीमत्ता, कायदा, रुढी यांना अनुसरुन केले जाणारे वर्तन याचा संच म्हणजे संस्कृती होय''. संस्कृती हे मानवाचे वैशिष्ट्य आहे. पशू-पक्षी, प्राण्यांना संस्कृती नसते. त्यांचे जीवन एकाच चाकोरीत चाललेले दिसते. याउलट मानवाचे जीवन गतिमान आहे. मानव समाजात राहून बदल घडवून आणू शकतो, उन्नती करु शकतो. नितीनियम मूल्य रुजवू शकतो. पशू-पक्षी, प्राणी करु शकत नाही आणि म्हणून संस्कृती हे मानवाचे वैशिष्ट्य आहे समाजातून भाषा उदयास येत असतात. संस्कृतीचे अपत्य समाज असतो. म्हणून संस्कृती आणि भाषा यांचा जवळचा संबंध आहे. भाषा हे सुद्धा मानवाचे वैशिष्ट्य आहे. भाषेतून संस्कृतीची ओळख पटवणे सोपे जाते. संस्कृती भाषेला घडवत असते. संस्कृतीचे अपत्य असल्यामुळे ज्या वेगवेगळ्या उद्देशानुसार संस्कृती बदलते तशी भाषासुद्धा बदलत जाते. शेती, पशुपालन, स्थापत्य, धातूकाम, यंत्रनिर्मिती, वस्त्रोत्पादन, अर्थउत्पादन या गोष्टी भौतिक संस्कृतीत अभिप्रेत असतात. तर धर्म, नीती, कायदा, विद्या,

ललित, वाङ्मय, सभ्यता, शिष्टाचार यांचा समावेश अध्यात्मिक संस्कृतीत असतो. अध्यात्मिक आणि भौतिक या दोन्ही संस्कृतीना भाषा पुरुन उरते. म्हणून भाषा आणि संस्कृती यांचा जवळचा संबंध आहे. संस्कृती म्हणजे संस्कार, परंपरा हे संस्कार एका पिढीकडून संक्रमित होत असतात. अनेक कारणांनी ते संक्रमित होत असतात. परंतु भाषा हे संस्कृती, संस्कार संक्रमणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. संस्कारशील मनाला बनवण्यासाठी भाषा उपयोगी पडते. शाळा, महाविद्यालय, आईवडील, घर, कौटुंबिक वातावरण यातून येणाऱ्या पिढीवर सातत्याने संस्कार केले जातात. या संस्काराचे प्रभावी माध्यम भाषा असते. खाणे, पिणे, बोलणे, पोशाख करणे, श्रद्धा, समृद्धी इ. अनेक गोष्टीतून संस्कृती व्यक्त होत असते. ती व्यक्त होताना भाषेचा जास्त प्रमाणात वापर होतो. भाषा संस्कृतीला व्यक्त करते. म्हणजेच भाषासुद्धा संस्कृतीचा एक अन्वर्थक घटक आहे. अध्यात्मिक संस्कृतीमध्ये साहित्य येते, ललित, वाङ्मय येते. ललित वा्ङ्मय साहित्य व्यक्त करण्याचे काम भाषा करत असते.

भाषा संस्कृती जतन, संवर्धन आणि संक्रमण :

भाषा ही संस्कृतीची वाहक असते. भौतिक, अध्यात्मिक संस्कृतीला पुढे नेण्याचे काम भाषा करत असते. त्यामुळे भाषा एक प्रकारे संस्कृतीचे जतन करत असते. समाज आणि संस्कृती भाषेला घडवण्याचे, आकार देण्याचे काम करत असतात आणि भाषा ही संस्कृतीला व्यापक करण्याचे काम करत असते. विशेषतः प्रत्येक एका समाजाची वेगळी समाज वैशिष्ट्ये असतात. या वेगळ्या वैशिष्ट्यानुसार त्यांची वेगळी संस्कृती घडत असते. त्यानुसार भाषा ही बदलते. उदा. प्रत्येक समाजाला पूर्व समाज असतो. काही पारंपारिक वारसा असतो. अलिकडे शैक्षणिक, वैचारिक क्षेत्रात लागणारे शोध नव्या क्षेत्राचा विकास होत असतो. त्यातच समाजाला प्रारंभकाळी समाज कृषीप्रधान होता याचेही भान ठेवावे लागते. संस्कृतीमध्ये या कुठल्या गोष्टीची भर पडत असते. त्याचेही भान ठेवावे लागते. प्रादेशिकतेचे भान ठेवावे लागते.

६.७ भाषिक सापेक्षतावाद आणि न्यूनसिद्धांत (सफीर, व्होर्क)

भाषा हे वास्तव आहे. भाषा बदलली की वास्तव बदलते; अशा धारणा असणारा आणि 'सपिर बोर्फ हायपोथिसिस' म्हणून परिचित असलेला 'भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत समाजभाषाविज्ञानामध्ये प्रसिद्ध आहे एडवर्ड सपिर, बेंजगिन ली वोर्फ यांच्या लेखन-संशोदनातून निर्माण झालेला भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत भाषा आणि वास्त या संबंधीचा एक महत्वपूर्ण सिद्धांत आहे. भाषापूर्व आणि भाषाबाह्य असे कोणतही वास्तव नसते. प्रत्येक मनुष्य त्याच्या निजभाषेने दिलेल्या किंवा निजभषेकडून प्राप्त झालेल्या संकल्पनांच्या आधारेच अनुभव घेत असतो. वास्तवाचा अनुभ घेण्याच्या क्रियेमधील एक कार्यरत घटक म्हणूनच भाषा वावरते; वास्तवाच्या मानवी अनुभवाला घाट देण्याचे कार्य भाषा करीत असते. त्यामुळे भाषाबाह्य वा्तव नसते. भाषेनुसार मानवी अनुभव बदलत असतो. म्हणजेच भाषा बदलली की वास्तव बदलते. सपिरच्या या सिद्धांताविषयी आपले मत नोंदविताना डॉ.मिलिंद मालशे म्हणतात, "मानवी जाणिवा, भावना, आचार-विचार, रुढी-परंपरा, दृष्टिकोण यांच्यावर भाषेचा खोलवर परिणाम घडत असतो हे सपिर-वोर्फ यांच्या सिद्धांताचे सूत्र आहे." (आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मय गृह, मुंबइ, पृष्ठ क्रमांक १५९)

एक विमा कंपनीमध्ये अग्निप्रतिबंधनिरीक्षक म्हणून काम करणाऱ्या बेंजमिन ली वोर्फ याने आगी कशा लागतात याचा शोध घेणाऱ्या अनेक अहवालांचा अभ्यास केला. या अहवालांचा अभ्यास करताना त्याने आगी लागण्याला भाषाही कारणीभूत ठरते असा निष्कर्ष काढला. त्यानें स्वतःच्या व्यावायिक अनुभवातून भाषेने व्यक्तीचा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोण तयार होतो असा काढलेला निष्कर्ष पूर्णतः स्वीकारलाही नसला तरी त्याच्या या व्यावसायिक अनुभवामुळे भाषाण्यासाला मदत झाली. समाजाच्या भाषिक सवयींनी मानवाचा जीवनविषयक दृष्टिकोण नियंत्रित होतो. त्यामुळे कोणत्याही समाजाची जडण घडण त्या समाजाच्या भाषिक सवयीवरून लक्षात येते. महाराष्ट्रीय समाजामध्ये अनेक जाती-जमातीचे लोक राहातात पैकी बहुतां लोकांची मातृभाषा मराठी आहे. जातीमध्ये पुन्हा पोटजाती आहेत. एका जातीअंतर्गत विविध पोटजाती, लोकश्रद्धा, परंपरा, रितिरिवाज या बाबतीत स्वतःचा वेगखेपणा जपताना दिसतात. त्याचे ज्ञान या जमातींच्या बोली भाषेवरून लक्षात येते. कारण समाजाच्या जीवनसरणीच्या भाषेवर खोलवर परिणाम झालेला असतो.

मानवी विचार, संकल्पना, अनुभव या गोष्टी मूलतः भाषासापेक्ष असतात किंवा भाषने नियंत्रित असतात. हा सपिर-बोर्फच्या विचारचा सार आहे. भाषेतून समाजाची लक्षात येणारी घडण, समाजाच्या जीवणसरणीच्या भाषेवर दिसून येणाऱ्या परिणामाचे मर्म उलघडून दाखविणे हे सपिर-बोर्फच्या सिद्धांताचे

६.८ जागतिकिकरणाने निर्माण केलेली भाषिक आव्हाने

जागतिकीकरणामुळे संज्ञापनासाठी भाषेची आवश्यकता असते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये पृथ्वी हेच जणू एक खेडे झालेले आहे. म्हणून त्यास ग्लोबल व्हिलेज अशी संकल्पनाही हळूहळू रुढ होत आहे. अशा परिस्थितीत साहजिकच अनेक गोष्टींसाठी आणि त्यातही विशेषतः व्यापारासाठी एकमेकांवर अवलंबून रहावे लागते. परंतु ह्या सगळ्याकडे भाषा ही एक अडचण ठरु शकते. व्यापार उद्दीमासाठी जागतिक स्तरावर एक सामाईक भाषा तयार करण्यात आली आहे. तिला 'लिग्वाप्रराका' असे म्हणतात. म्हणजेच भाषेच्या दृष्टिकोनातून कुठलीही अडचण जागतिक स्तरावर येऊ नये अशी अपेक्षा आहे.

जागतिकीकरणामध्ये व्यापार, रुढी त्याचबरोबर कला, साहित्य, विविध क्षेत्रातील तंत्रज्ञान यांचाही समावेश आहे. त्यामुळे व्यापार उदिमासाठी ही ठराविक भाषा झाली तरी विविध क्षेत्रातील ज्ञान तंत्रज्ञान हे जास्तीत जास्त इंग्रजीतच आहे. तसेच विज्ञान तत्वज्ञान हे इंग्रजी भाषेबरोबरच जपानी आणि चीनी तर काही इतर काही भाषांमध्ये आहे. त्याचा परिणाम असा होतो की, ज्ञान देण्याघेण्यामध्ये अडचणी निर्माण होतात आणि हे ज्ञान ज्या भाषेमध्ये आहे त्या भाषेचा विस्तार, विकास झपाट्याने होतो. त्याचा परिणाम म्हणून समाज हा त्या भाषेची आस धरतो. त्या भाषेकडे आकर्षला जातो आणि पर्यायाने आपल्या भाषेकडे दुर्लक्ष होते आणि त्यामुळे त्या-त्या भाषेसमोर भाषीक आव्हान निर्माण होते. बऱ्याचदा या आव्हानामध्ये आत्यंतिक आदानाची अवस्था असते. आत्यंतिक आदानामुळे आपली भाषा व्यापक होत असली तरी तिच्या मूळ रुपाकडे दुर्लक्ष होते. उदा. मराठीच्या संदर्भातच बघायचे गेलो तर १६ व्या शतकामध्ये मुघल, अरबी, पोर्तुगीज, डच या भाषांच्या आक्रमणामुळे मराठीमध्ये इतर भाषेतील शब्द आले आणि मूळचे शब्द मागे पडले. इंग्रजी कालखंडामध्ये आपणास तेच बघायला मिळते. आत्यंतिक

आदानाची अवस्था बघावयास येते आणि आजही रोजच्या व्यवहारात आपण भरपूर इंग्रजी शब्दांचा वापर करत असतो.

अत्यंतिक आदानाची आवश्यकता हे भाषिक आव्हान स्विकारल्यानंतर पुढचे आव्हान म्हणजे भाषेमध्ये व्याकरणिक बदल होतात. मराठीमध्ये संयुक्त क्रियापद म्हणजे हिंदी भाषेने दिलेली भेट ठरते. मराठीमध्ये क्रियापद हे शब्दाच्या शेवटी येते व वाक्य संपते. परंतु आपल्याला सध्याचे रुप बऱ्याचदा असे दिसते की, वाक्यात संयुक्त क्रियापद आलेले आहे. "मै आ रहा हूँ" चे "मी येत आहे" असे रुप बदलते. असे करुन ही भाषा टिकते. कारण तिचा वापर होत असतो. परंतु ही भाषा टिकण्यासाठी संस्कृती, समाज, परंपरा यांचा मोलाचा सहभाग असतो. परंतु जागतिकीकरणामुळे संस्कृती, परंपरा, समाज अनेक क्षेत्रांमध्ये बदल घडवून आणत असतो. त्यामुळे संस्कृती, समाज, परंपरा खिळखिळ्या झालेल्या, बदलल्या की ती भाषा नष्ट होण्याचा धोका असतो आणि जागतिकीकरणामुळे दुसऱ्या भाषेचे आक्रमण मूळ भाषेवर होत असते. त्यामुळे ही भाषा टिकवणे हे आव्हान होते.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेबरोबर समान व्यक्ती भाषा यांच्यातील परस्पर संबंध ही नविन वळणे नवीन रुपे घेऊ लागले आहे. एकीकडे इंग्रजीसारखी भाषा साम्राज्यवादी इतिहास तसेच विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, आंतरराष्ट्रीय व्यवहार यामुळे जागतिक संपर्क भाषा म्हणून वेगाने वाहत आहे तर दुसरीकडे शेकडो भाषा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. बदलत्या आर्थिक धोरणांमुळे व जीवन संघर्षामुळे समाजाच्या भाषा निवडीवर व भाषा वृत्तीवरही परिणाम होताना दिसत आहे. सांस्कृतिक संदर्भापेक्षा आर्थिक संदर्भ समाजाच्या भाषिक वर्तनात निर्णायक ठरत आहे.

जग जवळ येत आहे. तशी भाषिक प्रश्नांची तीव्रता आणि गुंतागुंतही वाढली आहे. कारण भाषा ही केवळ संप्रेषणाचे बहुतेक प्रगतीचे साधन नसून त्या पलिकडेही तिला एक सामाजिक, सांस्कृतिक भूमिका असते. भाषा ही त्या समाजाची मुख्य ओळख असते. भाषेला हजारो वर्षांची परंपरा असते आणि भाषा संप्रेषणाच्या कार्याबरोबर समाजाची सांस्कृतिक जडणघडण करणारी एक व्यवस्था असते आणि त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे जगातील प्रत्येक भाषा जगली पाहिजे, जगवली पाहिजे यासाठी आग्रह धरला जातो. जगात आज उपलब्ध असणारे भाषिक संचित नष्ट होऊ दिले तर ती मानवी इतिहासाची आजवरची सर्वात मोठी दुर्घटना असेल असा इशारा डेव्हिड क्रिस्टल यांनी देऊन ठेवला आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जी भाषिक आव्हाने निर्माण होतात ती आव्हाने पेलण्यासाठी भाषा नियोजन होणे महत्वाचे आहे. भाषा नियोजनामध्ये भाषा ही समाज पातळीवर कसे कार्य करते. म्हणजेच तिचा समाज, भाषा, विज्ञान या दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक आहे आणि दुसरे ही भाषा कुठे कुठे/कोणत्या स्तरावर कशी वापरली जाते याचाही विचार होणे आवश्यक आहे. या दोन्ही दृष्टिकोनातून भाषेचे नियोजन केल्यास जागतिक स्तरावर भाषा टिकवून ठेवणे सोपे होते. समाजाच्या भाषिक वर्तनात तसेच भाषीक संरचनेत बदल घडवून आणण्यासाठी भाषा नियोजन महत्वाची भूमिका पार पाडते.

भाषिक नियोजन केल्यास राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्वरुपाची नवीन सामाईक भाषा वापरात आणता येते. तसेच समाज गटाच्या भाषिक वर्तनावर भाषिक संरचनेवर, संकेत व्यवस्थेवर प्रभाव टाकता येतो आणि म्हणून जागतिकीकरणाने निर्माण केलेली भाषिक आव्हाने

पेलण्यासाठी भाषा नियोजन होणे आवश्यक आहे. कारण भाषा नियोजन ही भाषिक प्रश्न सोडवण्यासाठी केलेली कृती आहे.

भाषिक नियोजन ही केवळ भाषिक प्रक्रिया नसून ती व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. भाषिक नियोजनाबरोबर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये भाषा टिकवण्यासाठी आपल्या भाषेचा जास्तीत जास्त प्रचार-प्रसार करावा. संस्कृती व परंपरा टिकवण्याचा प्रयत्न करावा कारण भाषेच्या मुळाशी या दोन गोष्टी महत्वाची भूमिका बजावतात आणि भाषेच्या विविध वापर क्षेत्राकडे, उपयोजन क्षेत्राकडे लक्ष द्यावे. भाषेचे अध्यापन, भाषांतर, विविध कोश निर्माण करावे. माहिती व तंत्रज्ञान यामध्ये आपल्या भाषेचा कसा वापर करता येईल हे पहावे आणि समाजाला भाषिक वर्तन म्हणजे काय आणि भाषेबद्दल त्यांचे प्रेम जागृत करावे. सामाजिक ऐक्याची, सामाजिकतेची जाणीव करणे, लिपीबद्दल, लेखन पद्धतीबद्दल सुधारणा घडवून आणणे हे महत्वाचे आहे. कारण जगातील सुमारे ६००० भाषांपैकी ५ ते १०% भाषा सुरक्षित असून २०% ते २५% भाषांची स्थिती वाईट आहे. ४०% ते ७५% भाषा मरणाच्या स्थितीत आहेत आणि म्हणून ज्ञान, इतिहास आणि संस्कृती यांचे संचित असलेली भाषिक विविधता टिकवायची असेल आणि आधुनिक परंपरांचा आणि प्रगत व्यवहारासाठी भाषा संयम बनवण्यासाठी इच्छाशक्तीची व प्रयत्नांची गरज आहे व त्यासाठी भाषा नियोजन करणे महत्वाचे आहे आणि भाषा वापरण्याच्या दृष्टिकोनातून आणि सैद्धांतिक दृष्टिकोनातून सक्षम बनवण्यास भाषिक आव्हान पेलणे शक्य आहे.

६.९ समाजभाषविज्ञानातील विविध संकल्पना

- **भाषिक भांडार**

समाजभाषाविज्ञानातील 'भाषिक भांडार' ही संकल्पना जॉन गम्पर्झ यांनी मांडली आहे. प्रत्येक भाषिक समाजाचे एक भाषिक भांडार असते. या भाषिक भांडारामध्ये संदर्भानुसार विविध कप्पे तयार झालेले असतात. कोणत्याही समाजातील व्यक्ती एकाच प्रकारची भाषा वापरताना दिसत नाही. कोणाशी, कधी, काय, किती, कसे बोलावे याचे काही संकेत ठरलेले असतात. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी बोलत असताना समोरच्या व्यक्तीचे वय, लिंग, समाजातील स्थान, प्रसंग याचा विचार करुन बोलत असते. अशाप्रकारे व्यक्ती, स्थळ काळ, वेळ यांचा विचार करुन विचार करुन बोलण्याचा क्षमतेला 'संदेशनक्षमता' असे म्हणतात. ही संदेशनक्षमता त्या व्यक्तीच्या भाषिक भांडावर अवलंबून असते.

नोम चॉम्स्की याने आपला क्षमतेचा सिद्धांत मांडतना भाषिक प्रयोगामधून पूर्णतः एकजिनसी आणि स्थिर अशी नियमव्यवस्था वेगळी काढता येईल असे सांगितले आहे. ही एकजिनसी स्थिर अशी भाषा वापरणारा असा एकसंध समाज तो गृहीत धरतो. तथापि समाजभाषावैज्ञानिकांना चॉम्स्कीचे हे मत स्वीकारार्ह वाटत नाही. समाजामध्ये भाषिक प्रयोगातील आढळणारी विविधता पाहिली तर समाजभाषावैज्ञानिकांचे मत योग्य ठरते. कारण समाजामध्ये भाषा अनेकविध कार्यकरीत असते. भाषा वापरासंबंधी समाजामध्ये अनेक अलिखित सामाजिक संकेत पाळावे लागतात. त्यामुळेच भाषा वापरण्याची क्षमता सर्वच भाषिकांच्याजवळ आढळते. या क्षमतेला समाजभाषाविज्ञानामध्ये 'संदेशवहनात्मक क्षमता' (Communicative Completance) या नावाने ओळखले जाते.

चॉम्स्की आणि त्याच्या अगोदरच्या भाषाभ्यासकांनी गृहीत धरलेली भाषेची एकसंध आणि स्थिर नियमव्यवस्था समाजामध्ये वापरली जाऊ लालगी तर भाषिक गोंधळ निर्माण होईल. कारण समाजामध्ये समायोजन करताना व्यक्ती, प्रसंग, संदर्भ, काळ, विषय, परिस्थिती इत्यादी गोष्टी ध्यानात घेऊन आपली भाषा बदलावी लागते. पूर्णपणे एकजिनसी, स्थिर, एकसूत्री भाषिक नियमव्यवस्था कोणत्याही समाजाच्या भाषेमध्ये आढळत नाही. कोणत्याही समाजाच्या भाषेचे सूक्ष्म निरीक्षण केले तर वेगवेगळे पेलू, अनेक पातळ्या असणारे 'भाषिक भांडार' त्या सामाजाच्या भाषेमध्ये नांदत असल्याचे आढळून येईल.

विशिष्ट समाजातल लोक परस्पर बनविण्यासाठी ज्या भाषा-बोलीचा प्रयोग करतात त्या सर्वांचा मिळून एक 'भाषिक कोश' तयार होतो. उदाहरणअर्थ, पुण्या-मुंबईसारख्या महानगरामध्ये एकच एक भाषा बोलणारे समाज आढळत नाहीत. तेथील समाज दैनंदिन गरजा भागविण्यासाठी किंवा इतर विविध कारणांसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी किंवा यापेक्षा वेगळ्या सीमावर्ती भाषांचा वापर करीत असतो. त्यामुळे अशा ठिकाणचा भाषिक कोश हा या सर्व भाषांचा मिळून बनतो. या कोशवर या समाजातील व्यवसाय, शिक्षण, श्रद्धा, समाजविशेष, आर्थिक-समाजिक स्तर या सर्व गोष्टींचा प्रभाव असतो.

- **लघुक्षेत्र**

वरील भाषिक भांडाराच्या संकल्पनेमध्ये प्रत्येक समाजाचे एक भाषिक भांडार असते; हे भाविक भांडार प्रत्येक समाजानुसार भिन्न असते ही गोष्ट आपण नोंदविली. एखाद्या विशिष्ट व्यवसायातील किंवा क्षत्रातील लोक परस्पर विचार विनिमयासाठी ज्या भाषाबोलींचा किंवा भाषिक भांडाराचा प्रयोग करतात; त्या सर्वांचा मिळून एक भाषिक कोश तयार होतात. उदाहरणार्थ एखाद्या आरोग्य विभागामध्ये किंवा आरोग्याशी संबंधित क्षेत्रामध्ये शरीर, रोग, जंतू, आरोग्य, डॉक्टर, औषधे, गोळ्या, टॉनिक, सलाईन, एपाय, इलाज, निदान, नर्स, डोस, इंजेक्शन, वार्ड, उपचार, काळजी, ड्रेसिंग, सलम, पेस्ट. ऑपरेशन इत्यादी कितीतरी स्वतंत्र शब्दांचा प्रयोग होत असलेला पाहावयास मिळतो. विशिष्ट समाजाच्या भाषिक भांडारात संदर्भागणिक वरील उदाहरणाप्रमाणे वेगवेगळे कप्पे तयार होतात. भाषा वापराच्या या क्षेत्रांना 'लघुक्षेत्रे' (domain) असे म्हणतात.

लघुक्षेत्राची संकल्पना सर्वप्रथम जर्मन अभ्यासक श्मिट आणि रोर यांनी मांडली. समाजातील व्यक्ती आपल्या गरजांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या कारणासाठी एकत्र येत असतात. प्रत्येक व्यक्तीचे परस्परांच्या सहकार्यमुळे निर्माण झालेले सामाजिक नात्यांचे स्वरुपही निरनिराळे असते. या सर्व घटकांचा त्यांच्या भाषिक व्यवहारावर परिणाम होत असतो. एखाद्या महाविद्यालयामध्ये शिकणारा विद्यार्थी, क्रीडांगणावर, महाविद्यालयातील मित्रांमध्ये, घरी आई-वडिलांच्याबरोबर, परिसरातील मित्रांव्यामध्ये प्राचार्य किंवा शिक्षकांच्या सोबत एकच प्रकारच्या भाषा वापरताना आढळत नाही. तो विद्यार्थी प्रसंग, संदर्भानुसार आपली भाषा बदलतो. संकल्पना क्षेत्र बदलते की व्यक्तीची भाषा बदलते; कारण प्रत्येक बदललेला संदर्भ म्हणजे एक स्वतंत्र 'लघुक्षेत्र' असते.

लघुक्षेत्राचे स्वरुप बोलणाऱ्या हेतू, विषय, बोलणारे एकमेकांशी कोणत्या नात्याने बांधले गेले आहेत, परस्परांचे बोलण्याचे ठिकाण कोणते आहे यावरुन ठरते असते. उदाहरणार्थ;

१. शिक्षण क्षेत्र : अभ्यास, प्रवेश, वर्ग, पदवी, शिक्षण, अभ्यासक्रम, संशोधन, समीक्षा, टीका, सिद्धांत, प्रतिदन, मत, विचार, वक्तव्य, चर्चासत्र, परिसंवाद, चर्चा, परिषद, निबंध, शोधनिबंध, निष्कर्ष, उदाहरण, पुस्तके, संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, नियतकालिके, प्रयोग, प्रयोगशाळा, विद्यार्थी शिक्षक, सर, टिचर, मॅडम, प्राचार्य, अध्ययन, अध्यापन इत्यादी कितीतरी शब्दांचा प्रयोग या क्षेत्रामध्ये पाहावयास मिळेल.

२. न्यायालय : जज्ज, वकील, वकील, अपराधी, साक्ष, साक्षीदार, पुरावा, पोलीस, शोध, गुन्हा, आरोप, आरोपी, न्याय, कायदा, साक्षी, कलम, शिक्षा, अपराध, वादी, प्रतिवादी, पुरावा, तहकूब, कोर्ट न्यायनिवाडा इत्यादी शब्द या क्षेत्रात आढळतात.

३. क्रिकेट : क्रिकेट हा खेळ भारतामध्ये सुमारे २०० वर्षापूर्वीपासून खेळला जात असल्याने हा खेळ मूळ ज्या देशातून आला त्या इंग्लड देशातील इंग्रजी भाषेसह मराठी भाषेमध्येही या खेळाचा स्वतंत्र शब्दसंग्रह तयार झालेला आहे. बॉल (चेंडू), स्टम (यष्टी), रन (धाव), सिक्सर (षटकार), फोर (चौकार), रनआऊट (धावचित), टिम (संघ), आऊट (बाद), प्लेअर (खेळाडू), बॅटमन (फलंदाज), बॉलर (गोलंदाज),बॉलिंग (गोलंदाजी), बॅटिंग (फलंदाजी), धावफलक, विकेट, रनरेट, कॅच (झेल), बोल्ड (त्रिफळ), दांडी, स्कोर (धावा), पिच (खेळपट्टी), फिल्डिंग (क्षेत्ररक्षण), ग्राऊंड (मैदान), अन्पायर (पंच), कप्तान (कर्णधार) इत्यादी शब्द.

४. व्यापार : खरेदी, विक्री, दर, चढ-उतार, तेजी, मंदी, कमिशन, किंमत, नफा, तोटा, नुकसान, फायदा, माल, पत, पैसा, व्याज, कर्ज, सुटे पैसे, दलाली, हमाली, व्यवहार, उधारी, रोख, रोखड, पॅकींग, वाहतूक, पोस्टेज, पार्सल, माल, नग, डॅमेज इत्यादी शब्द.

वरील लघुक्षेत्रामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील शब्दांचे मिश्रण दिसते. तथापि लघुक्षेत्रामध्ये अशा विविध भाषांचा समावेश जातिकीकरणासारख्या कारणामुळे वाढतोच आहे. काही वेळा एकच वस्तू वेगवेगळ्या लघुक्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते किंवा वेगळ्या अर्थाने वापरली जाते. उदाहरणाअर्थ; स्वयंपाक घारातील हळद, तांदूळ, जेवण, नारळ या वस्तू देवघरामध्ये अनुक्रमे भंडारा, अक्षता, नैवेद्द, श्रीफळ या नावाने ओळखल्या जातात.

६.१० प्रमाण भाषा आणि बोली

प्रमाणभाषा -

"एका विशिष्ट भू-भागाच्या मोठ्यात मोठ्या मानवी समुहाकडून जी भाषा बोलली जाते तिला प्रमाणभाषा असते म्हणतात."

(उदा. महाराष्ट्राची - मराठी भाषा, कर्नाटकाची कन्नड भाषा).

बोलीभाषा -

एका विशिष्ट भू-भागाच्या लहानात लाहान मानवी समुहाकडून जी भाषा बोलली जाते तिला बोलीभाषा असे म्हणतात.

(उदा. डांगी, नागपुरी, आहिराणी, हळवी या बोली भाषा)

भाषा सामजिक संस्था आहे. तिच्यावर कोणा एकाची माली नाही. त्यामुळे व्यक्तिगणिक भाषा बदलू शकते. शब्दवापर, विशिष्ट वाक्यरचान, विशिष्ट भाषाशैली इत्यादींमुळे एका व्यक्तीची भाषा दुसऱ्यापेक्षा वेगळी असते. एका व्यक्तीच्या भाषा वापरण्याचा या लकबीला व्यक्तिभाषा अथवा व्यक्तिबोली (Idiolect) असे म्हणतात. मात्र इतक्या सूक्ष्म भाषाभेदाकडे लक्ष देण्याची गरज नाही. बोली म्हणजे परभाषकांना सारख्या वाटणाऱ्या तर तद्भाषकांना एकरुप वाटणाऱ्या व्यक्तिभाषांचा समूह असतो. काही सामान्य वैशिष्ट्ये असलेल्या आणि त्याच भाषेच्या इतर बोलीपेक्षा एकमेकींशी अधिक साम्य असलेल्या बोलींचा एकंदर समूह म्हणजे पोटभाषा अथवा बोली होय. त्यामुळे बोली म्हणजे एका निश्चित भूभागात बोलले जाणारे भाषेचे स्वरुप होय. उच्चारण, व्याकरण, म्हणी, वाक्प्रचार या बाबत प्रमाणभूत भाषा आणि बोलीत फरक असतो. त्यामुळे बोलीला स्वतंत्र्य अस्तित्व असते. मात्र हा फरक इतका नसतो, की ज्यामुळे एखादी बोली स्वतंत्र भाषाच मानता येईल. काही बोली एकमेकीला जवळच्या असतात. गुजराथी भाषा मराठी भाषेला हिंदीपेक्षा जवळची वाटते. तसेच इतर देशी बोलीपेक्षा खानदेशी बोलीला वऱ्याडी बोली जवळची ठरते. साहजिकच बोलीभाषा मान स्वरुपाच्या असतात.

बोलीभाषेचे स्वरुप.

बोली अभ्यासात प्रथम नामकरण महत्त्वाचे ठरते. खानदेशी, वऱ्हाडी, देशी, कोकणी असे वर्गीकरण भौगोलिक असते. तर कधी वर्गानुसार वा जातीनुसार चित्पावनी, सारस्वती, बंजारा असेही बोलीचे नामकरण होते. लोहार, चांभार, बुरुड, सुतार, न्हावी अशा व्यवसायनिष्ठ बोली आहेत. स्त्रियांची बोली वेगळी असते. वयोगटानुसारही बोली बदलत असते. शिक्षण, दूरध्वनी, विद्युत, पाटबंधारे येथील कार्यालयाची बोली अभ्यासविषय ठरावा अशी असते. वृद्ध, हॉटेल कामगार, शिक्षक, विद्यार्थी, तरुण-तरुणी यांच्याही एकेक बोली निर्माण होतील. अशा बोलींच्या अभ्यासाचे स्वरुप पाहण्यापूर्वी काही संज्ञा पाहू. बोलीच्या अभ्यासाचे एक परिक्षेत्र म्हणून बोली-भूगोलात (Dialect geography) ही संज्ञा विकसित झाली. बोलीचे प्रदेशनिष्ठ वर्तन या भूगोलात येते. बोलीतील उच्चारण तपासण्यासाठी शब्दघटक घेतला जातो. त्यांना भाषांश-घटक (Gloss) म्हणतात. यानंतर बोलींमधील साधर्म्य-वैधर्म्य निश्चित करुन बोली-नकाशाद्वारे Dialect atlas) त्या त्या बोलीची क्षेत्रमर्यादा (Dialect boundry) आखता येते. बोलीच्या अभ्यासाच्या शास्त्रास बोलीविज्ञान (Dialectology) म्हणतात.

६.११ संदर्भ ग्रंथ

१) वर्णनात्मक भाषा विज्ञान स्वरुप आणि पध्दती - कल्याण काळे, अंजली सोमण.

२) भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक स.ग.मालशे, हे.लि. इनामदार.

३) भाषा आणि संस्कृती - ना.गो.कालेलकर.

४) भाषा विज्ञान आणि मराठी भाषा - डा. अनिल गवळी.

❖❖❖❖

७

वैचारिक गद्य : संकल्पना, आणि स्वरूप

घटक रचना:

७.१ प्रस्तावना
७.२ वैचारिक गद्याची संकल्पना
७.३ वैचारिक गद्याची स्वरूप
७.४ वैचारिक वाङ्मयाची तत्वे
७.५ वैचारिक वाङमयाची मुल्ये
७.६ समारोप
७.८ संदर्भग्रंथ सूची

७.१ प्रस्तावना

'वैचारिक गद्य' या संपादित वैचारिक गद्याचा अभ्यास करण्यापूर्वी वैचारिक वाङ्मय ही संकल्पना समजून घेऊन मराठीतील विविध वैचारिक साहित्यकृतींचा अभ्यास करावयाचा आहे. वाङ्मय आणि साहित्य हे शब्द साधारणत: एकाच अर्थाने वापरले जातात. "वाङ्मय" हा संस्कृत शब्द आहे. "वाक्" म्हणजे बोलणे तर "मय" म्हणजे युक्त. बोलण्याने जे युक्त आहे ते वाङ्मय असे म्हटले जाते. शब्दांच्या आधारे आपण बोलतो. शब्दयुक्त बोलणे म्हणजे वाङ्मय असेही म्हणता येऊ शकते. पूर्वी मुखावाटे निर्माण झालेल्या उच्चारलेले शब्द जतन करून ठेवण्याची गरज निर्माण झाली. त्यातून लिपी निर्माण झाली. लिपीच्या आधारे वाङ्मय लेखनबद्ध झाले. वाङ्मयामध्ये विविध साहित्य प्रकार आहेत. वैचारिक वाङ्मय हा त्यातील एक भाग आहे.

वैचारिक वाङ्मयप्रकार हा स्वतंत्र वाङ्मय प्रकार मानला जातो. वैचारिक वाङ्मयाचा समावेश हा गद्यलेखनात केला जातो. शिवाय वाङ्मयाचे ललित आणि ललितेतर असे दोन प्रकार मानले तर वैचारिक वाङ्मयाचा समावेश हा ललितेतर वाङ्मयात केला जातो. असे असले तरी प्रत्येक वाङ्मयप्रकारात इतर वाङ्मयप्रकाराचीही वैशिष्ट्ये कमी-अधिक प्रमाणात प्रतिबिंबित होत असतात. वैचारिक वाङ्मयाचेसुद्धा काही वेगळे विशेष आहेत. हे अभ्यास केल्यावर लक्षात येते.

कोणतेही वाङ्मय समाजजीवनाशिवाय निर्माण होत नाही. वैचारिक वाङ्मयाची निर्मिती समाजसाठी, समाजजीवनाच्या आधारे झाली आहे. इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वैचारिक वाङ्मयाच्या निर्मितीची कारणे वेगळी आहेत. समाज प्रबोधन, करण्याच्या उद्देशाने वैचारिक.

७.२ वैचारिक गद्यांची संकल्पना

साहित्य आणि समाज यांचा घनिष्ट संबंध आहे, समाजाला दिशा देणे. विचारप्रवृत्त करायला लावणे हे वैचारिक वाङ्मयाचा मुख्य उद्देश आहे. मानवी जीवन हा वाङ्मयाचा विषय असू शकतो तर वैचारिक वाङ्मयाचा विषयसुद्धा मानवी जीवनच असतो. माणसाचे जगणे आणि त्याविषयीचे भान; त्या भानातून वाङ्मय निर्माण होते. वि.का.राजवाडे म्हणतात, "मनुष्यजातीच्या मुखातून जे जे म्हणून सार्थ व संपूर्ण विधान शब्दरूपाने भूत, वर्तमान व भविष्यकाली बाहेर पडले, पडते व पडेल ते ते सर्व वाङ्मय होय." (राजवाडे लेखसंग्रह, पृ.१०५) या बाङ्मयाचे विविध प्रकार पडतात. भाषेचे काव्यात्म वापर यातून पद्य निर्माण होते तर गद्यात्म वापर यातून गद्य वाङ्मय निर्माण होते. वैचारिक वाङ्मय हा गद्यसाहित्याचा प्रकार आहे. समाजाला वस्तुनिष्ठ माहिती देऊन समाजाला सुस्कांरीत घडवणे, समाज परिवर्तन करणे हे या प्रकाराचे वैशिष्ट आहे.

मनातील कल्पना, भावना, मानवी विकार आणि मानवी मनाच्या आधारे ललित वाङ्मय निर्माण होते. कविता, कथा, कादंबरी, नाटक हे काही ललित वाङ्मयप्रकार आहेत. ज्या वाङ्मयप्रकाराच्या केंद्रस्थानी प्रामुख्याने विशिष्ट एक विचार असतो ते वैचारिक वाङ्मय म्हणता येईल. वैचारिक वाङ्मयात विचार मांडतना कल्पना, मानवी विकार, मानवी मन याचा फारसा उपयोग होत नाही. त्यासाठी तर्कशुद्ध, पद्धतशीर प्रतिपादनाची गरज भासते. म्हणजे वैचारिक वाङ्मयाची संकल्पना पाहताना विचार आणि विचाराभोवती असलेली वाङ्मयीन वैशिष्ट्ये यांचे स्वरूप पहावे लागते.

ज्याप्रमाणे साहित्यप्रकार पद्यात कविता, पोवाडा, लावणी, अभंग असे प्रकार दिसून येतात त्याप्रमाणे वैचारिक वाङ्मयातही असे प्रकार संभवतात. निबंध (ESSAY), लेख, शोधनिबंध, टीकालेख, लघुशोध निबंध, प्रबंद असे विविध प्रकार सांभवतात. त्यामुळे या वाङ्मयप्रकराची वैशिष्ट्ये कमी-अधिक प्रमाणात वैचारिक वाङ्मयाच्या संकल्पनेत शोधता येतात.

समाज परिवर्तनाचा विचार हा वैचारिक वाङ्मयाचा प्राण मानला तर विचार म्हणजे काय? हे शोधावे लागले. विचार ही एक प्रक्रिया असते; ती मानवी मनातच चाललेली असते. विचार ही एक चर्चा असते ती सारासार पाहून केली जाते. विचार हा एक तर्क असतो तो वास्तवाच्या आधारे मांडला जात असतो. विचार ही एक कल्पना असते जिला वैज्ञानिकतेचा आधार असतो. विचार हे एक चिंतन असते ज्याच्या मूळाशी पद्धतशीरपण असतो. इंग्रजीमध्ये त्यास थॉट (thought) असे म्हणतात. Thought म्हणजे 'the act of process of thinking.' Think म्हणजे विचार करणे. थिंकर म्हणजे विचार करणारा. वैचारिक वाङ्मयात अशा प्रकारे विशिष्ट विचार मांडला जातो.

वैचारिक लेखाविषयी वाङ्मयाची संकल्पना स्पष्ट करताना असे म्हणता येते की "विशिष्ट विचार अथवा विषय तर्कसुद्ध प्रतिपादन करीत काही एका निष्कर्षाप्रत घेऊन जाणारे लेखन म्हणजे वैचारिक वाङ्मय होय किंवा वाचकांच्या बुद्धीला सतत आवाहन करणारी आणि साधार, सप्रमाण, संदर्भासह विषय मांडणारी विचारप्रधान रचना म्हणजे वैचारिक वाङ्मय होय."

७.३ वैचारिक गद्यांचे स्वरूप

साहित्यातील इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा वैचारिक वाङ्मयाचे स्वरूप वेगळे असते. वैचारिक साहित्यकृतीचे वाचन करताना या वाङ्मयाचे वेगळेपण लक्षात येते. हा गद्य प्रकार असला तरी शब्दांचा वस्तुनिष्ठपणे वापर केला जातो. शब्दांमधून विविध अर्धछटा व्यक्त व्हाव्यात असा प्रयत्न नसतो. शिवाय इतर वाङ्मयप्रकारांप्रमाणे वैचांरिक वाङ्मयाचे घटक नसतात. त्यामुळे या वाङ्मयाचे स्वरूप पाहण्यासाठी वेगळा विचार करावा लागतो.

वैचारिक वाङ्मय समाजाला दिशा देणारे, समाज परिवर्तन करु पाहणारे असे स्वरुपाचे असते. विषय कोणता असावा यावर बंधन नसते. त्या विषयातून विचार स्पष्ट होणे महत्त्वाचे असते. विचार हा वैचारिक वाङ्मयाचा गाभा असतो. त्यामुळे विचारप्रतिपादन करणे हा वैचारिक वाङ्मयाचा हेतू मानता येतो. साहित्य, समाज, धर्म, शिक्षण, संस्कृती, इतिहास, विज्ञान, भूगोल अर्थशास्त्र, वैद्यकीय अशा कोणत्याही विषयाच्या आधारे लेखक विवेचन करीत जातो. त्यातून वैचारिक वाङ्मय निर्माण होते. विषयाचा मागोवा घेताना लेखक शास्त्रीय, बुद्धिवादी तर्कशुद्ध भूमिका घेत असतो. अशा वेळी लेखकाच्या डोक्यात त्याच्या लेखनाचा हेतूही गृहीत धरलेला असतो. शक्यतो माहिती देणे अथवा ती समजावून देणे या उद्देशाने वैचारिक वाङ्मयाची वाटचाल सुरू असते. त्यासाठी काल्पनिक पात्रे अथवा घटनांचा आधार न घेता वास्तवातील घटना-प्रसंग व व्यक्तीचे दाखले दिले जातात. म्हणजे वास्तवाच्या आधारे वैचारिक वाङ्मय आकारास येत असते.

समाज परिवर्तन, समाजातील वास्तव चित्रण करणे हे वैचारिक वाङ्मयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. वैचारिक वाङ्मयात तटस्थपणा असतो. पक्षपातीपणा टाळून विशिष्ट विचार मांडला त्यामध्ये मांडले जातात. एखाद्या विषयाची बाजू घेऊन दुसऱ्या बाजूकडे दुर्लक्ष करणारी भूमिका वैचारिक वाङ्मयात अपेक्षित नसते. म्हणजे लेखक त्रयस्तपणे विषयाची मांडणी करीत असतो. असे झाले नाही तर एकांगीपणाचा दोष वैचारिक वाङ्मयात येऊ शकतो. याचा अर्थ लेखकाने स्वतःला पूर्णपणे तोडून घेणे असे नाही. त्याचे व्यक्तिमत्त्व, त्याचे विचार, त्याची तळमळ, वैचारिक वाङ्मयात येतातच पण त्या येताना फारच तारतम्याने आल्या पाहिजे. म्हणजेच विचार आणि भावना, अंतःकरण आणि बुद्धी यांच्या सरमिसळीतून वैचारिक वाङ्मय निर्माण होत असते.

वैचारिक वाङ्मयात प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रश्नांशिवाय विचार मांडता येत नाही. लेखक सभोवताल न्याहाळतो-त्यातून त्याला प्रश्नांचे स्वरूप लक्षात येते. प्रश्नांची उकल म्हणजे विशिष्ट निष्कर्षापर्यंत पोहोचणे, म्हणजे वैचारिक वाङ्मयाचा शेवट हा विशिष्ट निष्कर्ष, उत्तर या स्वरूपात होणे अपेक्षित असते.

वैचारिक वाङ्मयाची रचना ही मुद्देसूद असते. प्रत्येक मुद्देची मांडणी यथायीग्य स्वरुपाची असते. त्यातून विषयाची मांडणी बांधेसूद व समतोल होते. ज्या विषयाची मांडणी करावयाची आहे त्यात क्रमबद्धता असते. विचार अर्धवट सोडून दुसरा विचार मांडण्याचा प्रयत्न केला व त्यात विस्कळीतपणा येतो. प्लॅशबॅक पद्धतीने मांडणी करावयाची ठरली तर तसा निर्देश केला जातो. त्यामधून वैचारिक वाङ्मयाला सुसंगत रचनेचे स्वरूप मिळते. त्यामुळे वैचारिक वाङ्मयाच्या लेखकाचे व्यक्तिमत्व हे बहुश्रृत असणे आवश्यक असते.

एकंदरीत वैचारिक वाङ्मयात विशिष्ट विषयाची क्रमवार चर्चा करीत, संदर्भाच्या आधारे, क्रमवार मांडणी करीत निष्कर्षाप्रत नेले जाते. त्यामुळे अशा लेखनास चिंतनाची पातळी मळते. सुव्यवस्थित, साधकबाधक विवेचन करून मध्यवर्ती विचाराचे प्रतिपादन केले जाते. त्यामुळे वैचारिक वा्मयास विवेकशील, वस्तुनिष्ठ, तटस्थ, तर्काधिष्ठित असे स्वरूप मिळते.

७.४ वैचारिक वाङ्मयाची तत्त्वे

वैचारिक वाङ्मयात काही तत्त्वांचा निर्देश होत असतो. त्यामुळे तत्त्व म्हणजे काय हे पाहणे आवश्यक ठरते. विशिष्ट उद्दिष्टांचा साररूप अंश म्हणजे तत्त्व होय. एखाद्या धोरणाचे वास्तविक स्वरूप म्हणजेही तत्व म्हणता येईल. तत्त्व हे एक ताप्तर्य असते, हे एक सत्य असते काही वेळ तत्त्व हे मूल्य बनून येते. वैचारिक वाङ्मयाचे भूषण असते. त्या लेखनाचे ते एक सामर्थ्य असते. वैचारिक वाङ्मयात साधारणतः पुढीलप्रमाणे तत्त्वे आढळतात.

१. प्रबोधन करणे :

समाज प्रबोधन म्हणजे समाजाला योग्य दिशा देऊन समाजपरिवर्तन करणे. प्रबोधन हे वैचारिक वाङ्मयाचे एक तत्त्व आहे. प्रबोध म्हणजे जागृती किंवा यथार्थ ज्ञान होणे. प्रबोधक म्हणजे ज्ञान देणारा तर प्रबोधन म्हणजे जागे करणे किंवा शिकविणे. वैचारिक वाङमयातून प्रबोधन केले जाते, याचा अर्थ साहित्याचा एक साधन म्हणून उपयोग केला जातो असे म्हणता येते. कोणत्याही घडामोडीमागे विशिष्ट कार्यकारण असते, त्याची समज येणे फार आवाश्यक असते. त्यातून प्रबोधनाची प्रक्रिया लक्षात येते. वैचारिक वाङ्मयाचा आरंभ हा इंग्रजी काळात गृहीत धरला तर त्यावेळी निबंधाच्या माध्यमातून लोकांपर्यंतमाहिती, स्थिती, विचार पोहोचविला जात होता. लोकहितवादी यांची शतपत्रे वाचली वा "शतपत्राचा इत्यर्थ" वाचला तर मी का लिहितो? याचे स्पष्टीकरण ते देताना दिसून येतात. ते लिहितात, "…. लोकांस त्यांची वास्तविक स्थिती आहे ती कळावी, त्यानी सुधारावे, त्यास इहलोकी सुखवृद्धी व्हावी… आपले बहुत काळापासून दृढग्रह झाले आहेत त्यापैकी काही अविचाराने व काही मूर्खपणाने जडलेले आहेत ते कमी व्हावेत, किंवा नाहीसे व्हावेत, इतक्याच हेतूने मी यथामतीने व स्वइच्छेने वेतनावाचून श्रम केले आहेत." (लोकहितवादी निबंधसंग्रह, पृ.२५१) यावरून प्रबोधनाचे स्वरूप समजून येते. 'प्रबोधन' हा वैचारिक गद्याचा मुख्य हेतू होता.

वैचारिक वाङ्मयाची मूळ प्रवृत्ती ही विचार सांगणे, त्यातून वाचकाला, समाजाला माहिती देऊन जागृती करणे, त्यांच्यामध्ये परिवर्तन करणे ही असल्यामुळे 9प्रबोधन" तत्त्वाचा आढळ असणे हा वैचारिक वाङ्मयाचा एक विशेष बनतो. त्यामुळे वैचारिक वाङ्मय हे शिकविण्याचे कार्य करते, शिक्षकांच्या भूमिकेतून समाजाशी (वाचकांशी) संवाद साधते. यातून समाजप्रबोधनाचे साधन म्हणून वैचारिक वाङ्मयाकडे पाहता येते.

२. व्यक्तिवादाचा पुरस्कार :

वैचारिक वाङ्मयाचे दुसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे व्यक्तिवाद हे होय. व्यक्तिवाद म्हणजे असा विचार की जो व्यक्तीच्या सुखदुःखास महत्त्व देतो. व्यक्तिवादी म्हणजे व्यक्तिवादाचा पुरस्कार करणारी व्यक्ती, ज्या अर्थी व्यक्तिवाद हे वैचारिक वाङ्मयाचे तत्त्व बनते त्या अर्थी लेखकही व्यक्तिवादी असतो असे म्हणता येते. व्यक्ती समाजात राहत असते. समाजजीवनात विविध समस्या निर्माण होतात. त्यांना सामोरे जात व्यक्ती स्वतःची प्रगती करीत जीवन जगत

असते. शिवाय स्वतःचे जगणे अधिक सुखमय करण्याचा व्यक्तीचा प्रयत्न असतो. त्यासाठी ज्या प्रयत्नांचा, विचाराचा, आणि मूल्यांचा अंगिगार व्यक्तीने करण्याची गरज असते. त्याचा विचार करणारा एक प्रवाह या अर्थाने व्यक्तिवादाकडे पाहाता येते. वैचारिक वाङ्मयात व्यक्तीच्या सुख-दुखाचा विचार मांडला जातो. व्यक्ती म्हणून जगत असताना आलेले अनुभव याचाही विचार केला जातो. व्यक्तीच्या पलीकडे असलेल्या अन्य बाबींचा विचार होत नाही. हे माणसाला समोर ठेवून विचार करण्याचा प्रयत्न इंग्रज काळात झाला. आरंभीच्या निबंधकारांनी व्यक्तिवाद हे तत्त्व स्वीकारूनच लेखन केलेले दिसून येते.

३. इहवादी विचार :

इहवादी विचारसरणी ही वैचारिक वाङ्मयाचे प्रमुख तत्त्व आहे. हे वैचारिक वाङ्मयाचे आणखी एक तत्त्व आहे. इह म्हणजे येथे; याचा अर्थ आपण ज्याठिकाणी जन्मतो, वाढतो, वृद्ध होऊन वा आजाराने मृत्युला सामोरे जातो ती जागा. पृथ्वी ही अशी एकमेव जागा आहे. ज्याठिकाणी माणूस जन्मतो आणि मरतो. 'इह' या शब्दावरून 'ऐहिक' हा शब्द आला. ऐहिक म्हणजे इहलोक संबंधाने. इहलोक म्हणजे प्रत्यक्ष दिसणारा, बोवणारा, जगणारा, वाणारा आणि मरणारा माणूस आणि तो तेथे जीवनमान जगतो ते ठिकाण. इहवादामुळे 'परलोक' या संकल्पनेला सह मिळाला. परलोक, स्वर्ग, नरक, पाताळलोक अशा भ्रामक समजुती इहवादामुळे नाकारल्या गेल्या. माणासाच्या पुनर्जन्मालाही त्यामुळे नाकारावे लागते. ईश्वर भक्तीच्या आधारे परलोकात प्रवेश मिळावा यासाठी अनुष्ठाण, जप, तप, उपवास करणे आदिंच्या क्रियांना त्यामुळे आळा बसला. आध्यात्मनिषठेमुळे मानवाचे कल्याण होणार नाही त्यामुळे इंद्रिय, ऐहिक सुखाचा उपभोग घेण्याचे समर्थन इहवादात येते. वैचारिक वाङ्मयाचे लेखन हे इहवादी तत्त्वाच्या अनुषंगाने होते. अलौकिक, अंधश्रद्धाळू, पाप-पुण्य, अशा पारंपारिक समजुतिंना इहवादामुळे शह बसला. मानवांच्या सुख-दुःखासाठी अन्य कोणी जबाबदार असत नाही तर; तो स्वतःच यासाठी कारण ठरू शकतो. कारणे आणि उपायांसाठीही तोच कारणीभूत ठरतो हा विचार वैचारिक वाङ्मयात येतो. याला कारण इहवादी तत्त्वज्ञान असे म्हणतात.

४. विवेकनिष्ठ भूमिका :

विवेकनिष्ठपणा ही वैचारिक वाङ्मयाचे एक तत्त्व आहे. वैचारिक लेखनात लेखक विवेकनिष्ठ भूमिका घेऊन लिहित असतो. 'विवेक' म्हणजे सारासार विचार करणे. सारासार म्हणजे सत्य आणि असत्य, खरे-खोटे या बाजू तपासून घेणे. सत्य आणि वास्तवाचा आधार घेऊन विचार करणे. सत्याच्या आधारे मानवहिताचा विचार करणे या सर्व बाबी 'विवेक' या संकल्पनेत सामावलेल्या आहेत. एखाद्याचा विवेक जागविणे म्हणजे बरे-वाईट हे तारतम्याने ठरविणे. विवेकवंत हा विचारी असतो. त्यामुळे विवेकहीन म्हणजे अविचारी हे सहजपणे समजून घेता येते. या अनुषंगाने विवेकवाद हा तर्कशुद्ध आणि बुद्धिवादावर आधारलेले तत्त्व आहे असे म्हणता येते. त्यातही बुद्धी ही विनाशक किंवा संहारक विचार करू शकते परंतु विवेक हा नेहमीच मनुष्यहिताचा, सत्याचा, चांगुलपणाचा विचार करीत असतो. वैचारिक वाङ्मयात लेखक हा आपला विचार व निरीक्षणे मांडताना सारासार विचार करून मांडतो. वैज्ञानिक शोध हे जेवढे सुखकारक असतात तेवढेच ते संहारकही असतात. विवेकवाद हे तत्त्व मानवी जीवनाच्या सुखाचा विचार करते आणि वैचारिक लेखनात या तत्वाचा अढळ असणे ही त्या लेखनाची जमेची बाजू असते. म्हणजेच त्याठिकाणी विवेकवाद सहजपणे जोपासला जातो.

५. विज्ञानवादी दृष्टीकोन :

समाजाला प्रगतीचा विचार द्यायचा असेल तर समाजाला विज्ञानवादाचा पुरस्कार करावा लागले विज्ञानवादी विचार समाजात रुजले पाहिजेत. विज्ञान म्हणजे विशेषज्ञान. विशेष ज्ञान मिळविण्यासाठी प्रयोग करावे लागतात. प्रयोगांनी मिळालेल्या माहिती वा ज्ञानाची पुनः पुन्हा प्रचिती घेता येते. शिवाय विज्ञान हे एक शास्त्र आहे. प्रत्यक्ष, साक्षात, वास्तवात जे आहे व प्रयोगाच्या आधारे पुन्हा पुन्हा सिद्ध करता येते असे जे आहे त्यास विज्ञान म्हणता येते. विज्ञानावर विश्वास ठेवून त्यानुसार वर्तन करणारी व्यक्ती किंवा तिने केलेले लेखन हे विज्ञाननिष्ठ आहे, असा मानता येते. विज्ञाननिष्ठा ही व्यक्तीला सभोवतालच्या घडामोडीमागील कारणमीमांसा करण्यासाठी उपयोगी पडते. परंपरेने चालत आलेल्या अनेक श्रद्धा-अंधश्रद्धा, समजूती, रूढी, प्रथा-प्ररंपरा यावर विश्वास न ठेवता त्यामागील कार्यकारणाचा शोध घेतला जातो. सभोवतीच्या नैसर्गिक घडामोडीचाही शोध घेतला जातो. त्यामुळे विज्ञाननिष्ठा ही व्यक्तीला बुद्धीप्रमाण्यवादी बनविते. त्यानुषंगाने वैचारिक वाङ्मयात विज्ञाननिष्ठ भूमिकेचे दर्शन घडते. त्यामुळे वैचारिक वाङ्मय काल्पनिकतेपासून दूर जाते. वास्तवाच्या भक्कम अधारावर ते उभा राहते.

वैचारिक वाङ्मयातील तत्त्वांचा शोध घेत असताना प्रबोधन, व्यक्तिवाद, विवेकवाद, इहवाद आणि विज्ञाननिष्ठ ही पाच तत्त्वे समोर येतात. सामाजिकता, वास्तवता, बुद्धिप्रामाण्य, कर्तनिष्ठता असा किती तरी तत्त्वांचा समावेश करता येऊ शकतो. वैचारिक वाङ्मयाच्या आधारे सामाजाचे प्रबोधन करणे, व्यक्तीच्या सुख-दुःखाशी निगडित प्रश्नांचा शोध घेणे, मनुष्यहिताचा विचार मांडणे, वास्तवात असलेल्या ऐहिक बाबींचा शोध घेणे आणि विज्ञानावर आधारित विचारांची मांडणी करणे या तात्विक अंगाने वैचारिक वाङ्मयाची वाटचाल सुरू असते. वैचारिक वाङ्मय हे समाज परिवर्तन करणारे साहित्य आहे.

७.५ वैचारिक वाङ्मयाची मूल्ये

मूल्य ही संकल्पना प्रामुख्याने न्याय किंवा उपयोगिता यावर आधारलेली आहे. मूल्य म्हणजे मोल. मूल्य ही अमूर्त संकल्पना आहे. मूल्यांची बांधणी किंवा जडणघडण होण्यामागेही कारणे असतात. ज्या ज्या वेळी मानवासाठी विघातक परिस्थिती निर्माण होते त्या त्या वेळी त्यावरील उपाय या अर्थाने मूल्य निर्धारित होत असते. काही मूल्ये ही प्रासंगिक असतात. उदा. शील, श्रद्धा, स्वामीनिष्ठा, शिस्त, सहकार, नामस्मरण, भक्ती तर काही मूल्ये ही सर्व काळासाठी लागू पडतात. वैचारिक वाङ्मयात प्रतिबिंबित होणारी मूल्ये ही मानवाचे अस्तित्व असेल तोपर्यंत लागू पडणारी आहेत. त्यातील काही मूल्यांचा पुढीलप्रमाणे अभ्यास करता येईल. त्यामुळे या वाङ्मयाचे मूल्य अधिकतेने स्पष्ट होईल.

१. स्वातंत्र्य :

व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार हा या वाङ्मय प्रकाराचे महत्त्वाचे मुल्य आहे. हे मूल्य सार्वकालिक स्वरूपाचे आहे. कोणत्याही व्यक्तीला जन्मतःच प्राप्त झालेले हे मूल्य आहे. स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार नव्हे. असे झाले तर स्वातंत्र्य हे मूल्य राहात नाही. कोणत्याही व्यक्तीला भाषणाचे, मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य असते. व्यक्तीला संस्था किंवा संघ स्थापता येतो. भारतीय राज्यघटनेमध्ये स्वातंत्र्य या मूल्याचे स्वरूप विशद केले आहे. भारतीय समाजव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही व्यक्तीला कोणताही व्यवसाय करता येतो. याचा अर्थ

तो व्यवसाय मनुष्यहितासाठी मौलिक ठरला पाहिजे. व्यक्तीला धर्म, शिक्षण, रोजगार, राजकारण अशा सर्वच क्षेत्रात स्वातंत्र्य मिळणे आवश्यक असते. ज्यावेळी व्यक्तीला बंधनाला सामोरे जावे लागते, तिच्यावर पारतंत्र्य लादले जाते त्या वेळी स्वातंत्र्य या मूल्याचे महत्त्व समजून येते. वैचारिक वाङ्मयात स्वातंत्र्य या मूल्याची मांडणी लेखक करतो. या मूल्याचा विचार मांडून त्याचे लेखन चाललेले असते. स्वातंत्र्यावादी विचारसरणी हा वैचारिक गद्याचा आत्मा आहे.

२. समता :

समाजा मध्ये जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती समान संधी, समान न्याय असला पाहिजेत. समता म्हणजे समानता. समतेचा अर्थ खूपच तारतम्याने घ्यावा लागतो. समतेचे काही निकष आता मागे पडले आहेत. उदा. समान मोबदला, समान परिश्रम, समान गुणवत्ता, समान फलप्राप्ती. सर्वच व्यक्तींमध्ये याबाबत समानता नसते. समाजातील दुर्बल घटकांकडून अशा समानतेची अपेक्षा करता येत नाही. त्यामुळे समतेचा निकष हा मनुष्यता या मूल्यावर आधारलेला असणे गरजेचे आहे माणसामाणसांमध्ये काही बाबतीत कमी-जास्त प्रमाण असते परंतु मनुष्यता ही बाब सर्वांकडे समान असणे आवश्यक असते, त्यावेळी समता हे मूल्य मानता येते. स.रा.गाडगीळ म्हणतात, "समता म्हणजे सर्वांना एकाच पातळीवर आणणे (Levelling) नव्हे. पण मनुष्य म्हणून सन्मानाने जगण्यास त्याला ज्या ज्या सुविधांची आवश्यकता आहे त्या त्याला मिळणे." (विचारमंथन, पृ.४१) अशा सुविधांमध्ये शिक्षण, अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, नोकरी, सांस्कृतिकता यांचा उल्लेख करता येतो. शिवाय धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थळ यानुसार दर्जा व संधीचा भेदभाव न करता समतेचे मूल्य राबवणे आवश्यक असते. वैचारिक वाङ्मयात समतेचे मूल्य वरील अर्थाने आढळणे आवश्यक असते.

३. बंधुभाव :

बंधुता म्हणजे समाजामध्ये बंधुभाव ही विचारमुल्य रुजली पाहिजेत. Brotherhod नात्याच्या अनुषंगाने आलेले हे मूल्य आहे. यातून एकता हे तत्त्व आकारास येते. त्यामुळे संघटितपणा आणि एकजूटतेची शक्ती तयार होते. जैविक अर्थाने भाऊ अथवा बंधू असे न मानता मनुष्यतेच्या पातळीवर बंधुभाव जोपासला तर बंधुता हे एक मूल्य बनते. या मूल्यांमुळे आप-पर भाव गळून पडतो. कोणत्याही राष्ट्राच्या संबर्धन, संरक्षणासाठी बंधुतेची गरज असते. राष्ट्रीय एकात्मता हे तत्त्व साक्षात होण्यासाठी बंधुता हे मूल्य प्रत्यक्षात अमलात आले पाहिजे. वैचारिक वाङ्मयात लेखक हा विशिष्ट एका व्यक्ती वा समाजाची बाजू घेत नाही. परस्परांमधील ऐक्याची जोपासना वाढी लागेल, त्यादृष्टीने विचारांची मांडणी करीत असतो. वैचारिक वाङ्मयातील बंधुता या मूल्याला फार मोठे स्थान आहे.

४. न्याय :

समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान न्याय असला पाहिजेत. न्याय हे वैचारिक वाङ्मयातील अत्यंत महत्त्वाचे मूल्य आहे. भारतीय पार्श्वभूमीवर न्याय या मूल्यांचे महत्त्व तर अनन्यसाधारण आहे. चातुर्वर्ण्यव्यवस्था, धर्माधता, जातीय विषमता ही पार्श्वभूमी लक्षात घेता न्याय हे मूल्य प्रत्यक्षात राबविणे आणि त्याची वाङ्मयात मांडणी करणे हे आवश्यक बनते. न्याय म्हणजे सारासार तर्क मांडून एखाद्या व्यक्तीबाबत होणारे वर्तन, न्याय या शब्दावरून न्यायनिष्ठा हा शब्द येतो. न्यायनिष्ठा म्हणजे नि:पक्षपाती भूमिका घेऊन वर्तन करणे. न्यायभ्रष्ट व्यक्ती ही पक्षपाती भूमिका घेते. खरेपणा, प्रामाणिकपणा, सत्यता, नैतिकता या आधारे न्याय मांडला जातो. वैचारिक वाङ्मयात लेखक हा न्यानिष्ठ भूमिकेतून लेखन करीत असतो. भारतीय

संविधानात 'न्याय' हे मूल्य अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. त्याचा पुरस्कार वैचारिक वाङ्मयातून करण्यात आला आहे.

५. नीतीमता :

नीतीमता ही मानवाच्या वर्तन, शिष्टाचार यावर अवलंबून आहे. नीती या मूल्याचा विचार वैचारिक वाङ्मयाच्या अनुषंगाने केला जातो. नीती हे मूल्य वर्तनाशी अधिक निगडित आहे. न्याय वर्तन, सदाचार, शिष्टाचार या अनुषंगाने नीती हे मूल्य लक्षात घ्यावे लागते. न्याय या मूल्याशीच नीती हे मूल्य अंतर्भूत आहे. व्यक्तीचे परस्पर वर्तन हे सहजीवनाशी सुसंगत व्यवहार, परस्परहितसंबंधाची काळजी, नातेसंबंधाबाबतचे सौहार्द वर्तन, कौटुंबिक व्यवहारामध्ये सहभाग हा जितका पारदर्शी, स्वच्छ, विश्वासवर्धक असेल तितकी नैतिकता टिकून राहते. त्यामुळे महात्मा फुले यांनी 'नीती' या मूल्यांना आपल्या लेखनात महत्त्वाचे स्थान दिले आहे. विद्येविना मती जाते आणि मतीविना नीती जाते असा विचार महात्मा फुले मांडतात. मती म्हणजे बुद्धी, मन, अंतःकरण, विचार किंवा हेतू. व्यक्तीचे वर्तन हे नैतिकतेने व्हावे याचा अर्थ अंतःकरणातून तिने मनुष्यहितपर दृष्टीचा अवलंब केला पाहिजे. वैचारिक वाङ्मयात नीती या मूल्याची मांडणी अपेक्षित असते. ते वैचारिक वाङ्मयातून दिसून येते.

६. सहिष्णुता :

वैचारिक वाङ्मयातील सहिष्णुता हे महत्त्वाचे मूल्य आहे. सहिष्णुता म्हणजे सोधिकपणा अथा क्षमाशील वृत्ती. समाजजीवनात राहात असताना व्यक्तीकडे सहिष्णुता असली पाहिजे. एखाद्या व्यक्तीने जाणते - अजाणतेपणाने केलेली चूक ही सहिष्णु वृत्तीने दुरूस्त करता येऊ शकते. त्यामुळे सहिष्णुता या मूल्याची सामाजहितासाठी अत्यंत गरज असते. चुकीसाठी होणारी चूक, गुन्हेगाराबरोबर गुन्हेगारी वृत्तीने होणारे वर्तन समाजस्वास्थ्य बिघडवू शकते. गौतम बुद्धाने क्षमासीलतेचा पुरस्कार केलेला होता. पुढे महात्मा गांधी यांनीही या वृत्तीचा अंगिकार केला होता. वैचारिक वाङ्मात इतर मूल्यांप्रमाणे सहिष्णुता या मूल्याचा पुरस्कार केलेला असतो. लेखकाची सहिष्णु वृत्ती विचारमांडणी मधून दिसून येते.

७. करुणा :

दुसऱ्या व्यक्ती विषयी मनात असणारा दयाभाव म्हणजेच करुणा होय. करूणा हे मूल्य सहिष्णुता या मूल्याच्या संदर्भानेच येते. मानवी वर्तनाशी, व्यक्तीच्या मनोभावाशी करूणा हे मूल्य जोडून घ्यावे लागते. करूणा म्हणजे दयाभाव. दया या भावनेत कळवळा किंवा कीव हा भाव दिसून येतो. 'दया' हा मूल्यभाव परस्परांकडे असला पाहिजे. दया करणे आणि दयेची याचना करणे; या दोन्ही वृत्तीतून दया या मूल्यांकडे पाहता येते. त्यातून कृपाळू वृत्ती लक्षात घेता येते. भौतिक गरजांपेक्षाही अधिक मूल्यवान बाब म्हणून करूणा या मूल्याकडे पाहिले जाते. वैचारिक वाङ्मयात करूणा या मूल्याचा अंतर्भाव करता येतो. लेखकाचा समाजजीवनाप्रती असलेला करूणेचा भाव अथवा व्यक्तींमध्ये परस्परांत हवी असणारी करूणा याचा उल्लेख प्रामुख्याने वैचारिक लेखनात होत असतो.

७.६ समारोप

वैचारिक वाङ्मयाचा विचार केल्यास या वाङ्मय प्रकारामुळे समाज परिवर्तन, समाजहित लक्षात घेऊन या वाङ्मय प्रकाराचे लेखन होत असते. वैचारिक वाङ्मय हे स्वतंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती, सहिष्णुता, करूणा अशा अनेक मूल्यांचा आधार घेत अविष्कृत होत

असते. समाजाला, व्यक्तीला केवळ कल्पनेच्या आधाराने जगता येत नाही. समाजाच्या प्रत्यक्ष व्यवहाराला तिला सामोरे जावे लागते. परंपरेने चालत आलेल्या अनेक रूढींशी तिला सामना करावा लागतो. अनेक सत्ता कार्यरत असतात. उदा. धर्मसत्ता, राज्यसत्ता, अर्थसत्ता, अशा सत्तांबरोबर तिचा संघर्ष सुरू असतो. अशा वेळी लेखक म्हणून काही कर्तव्ये पार पाडावी लागतात. प्रबोधकाच्या, शिक्षकाच्या भूमिकेतून काही तत्त्व आणि मूल्यांचा निर्देश लेखनात करणे अत्याचे ठरते. लेखकाने जर या मूल्यांचा पुरस्कार नाही केला तर तो पुराणमतवादी, पारंपारिक, प्रतिगामी विचारांचा असल्याचे लक्षात घ्यावे लागते. याचा अर्थ पुरोगामी भूमिका घेणाऱ्यांना काही जीवनमूल्यांचा अंगिकार करावा लागतो. हे वैचारिक वाङ्मयातून लक्षात येते.

७.७ संदर्भग्रंथ सूची

१. मराठी निबंध - डॉ. म. मा. आळतेकर.
२. मराठी निबंध - उद्‌गम आणि विकास, डॉ. गिरीश मोरे, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद.
३. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास म. रा. के. लोचे, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.
४. शतपत्रे (लोकहितवादी निबंधसंग्रह) गोपाळ हरि देशमुख.

❖❖❖❖

८

वैचारिक वाङ्मयाची वाटचाल

घटक रचना :

८.१ प्रस्तावना
८.२ इंग्रजी वैचारिक वाङ्मय
८.३ मराठी वैचारिक वाङ्मय
८.४ समारोप
८.५ संदर्भग्रंथ सूची

८.१ प्रस्तावना

वैचारिक वाङ्मयाची संकल्पना, स्वरूप, त्यातील तत्त्व आणि मूल्यांचा अभ्यास केल्यानंतर आपणास वैचारिक वाङ्मयाचा उदय, विकास आणि वाटचाल अभ्यासावयाची आहे. मराठी वैचारिक वाङमयाचा उदय हा इंग्रजी वैचारिक वाङ्मयाच्या आधारे झालेला आहे. शिवाय निबंधलेखनाच्या आधारे वैचारिक वाङ्मय विकसित झाले आहे. त्यामुळे इंग्रजी वैचारिक लेखनाचा परिचय घेऊन मराठी वैचारिक वाङ्मयाची स्थिती-गती शोधता येईल.

८.२ इंग्रजी वैचारिक वाङ्मय

इंग्रजी वाङ्मयामध्ये वैचारिक वाङ्मय निर्मिती प्रामुख्याने झालेली दिसून येते. इंग्लंडमध्ये १६ व्या शतकात मायकेल एक्किम सियर डे माँतेन हा फ्रेंच लेखक होऊन गेला. त्याने १५८० मध्ये व १५८८ मध्ये एकूण ती खंड लिहून गद्यात्म स्वरूपाचे लेखन केले. 'ऑफ आयडेलनेर', 'ऑफ फ्रेंडशिप', 'ऑफ एक्सप्रिअन्स' या विषयाच्या अनुषंगाने त्याने विचार मांडले. माँतेननंतर बेकॉन याने लेखन केले. १६१२ ते १६२५ या काळात बेकॉन याने वस्तुनिष्ठ भूमिकेतून वचार मांडले आहेत.

पाश्चिमात्य साहित्याच्या अभ्यासकांनी वैचारिक वाङ्मयाविषयी मते मांडली आहेत.

'डॅनियल डिफो' या लेखकाने केलेले वैचारिक लेखन उल्लेखनीय स्वरूपाचे होते. मात्र जॉन मिल्टन यांनी सामाजिक सुधारणेविषयी मांडलेले विचार विशेष स्वरूपाचे होते. उदारमतवाद घटस्फोट, शिक्षण या विषयाच्या अनुषंगाने मिल्टन याने मांडलेले विचार त्या काळी गाजेल. १६४४ मध्ये मुद्रण स्वातंत्र्याविषयी मिल्टनने मांडलेली भूमिका विशेष गाजली. त्यानंतर जॉन ड्रायडन यांचे लेखन आढळते.

अठराव्या शतकात 'जोसेफ ॲडिसन' आणि 'रिचर्ड स्टील' या संपादकांनी १७११ मध्ये 'स्पेक्टेटर' हे पत्र सुरू केले. त्यामधून त्यांनी मांडलेले विचार हे इंग्रजी वैचारिक वाङ्मयातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. नाटक, तमाशा, स्त्रियांचा पेहराव, पती-पत्नीची भांडणे, विवाह अशा विविध विषयांवर त्यानी मांडलेल्या चिंतनामुळे वाचकांची वाचानाबद्दलची अभिरूची घडली. त्यानंतर डॉ.सॅम्युअल जॉन्सन याने विद्या आणि धर्म या संबधाने विचार मांडले. पुढे गोल्डस्मिथ याने 'सिटिझन ऑफ द वर्ल्ड' मधून लेखन केले. लि हंट नावाचा लेखक त्यावेळी अत्यंत विक्षिप्त वाटणाऱ्या विषयावर लिहित असे. पुढे एकोणिसाव्या शतकाच्या सुमारास इंग्रजी साहित्यात चार्ल्स लँब, हॅजलिट, जेफरी, मेकॉले, कार्लइल, मॅथ्यू अर्नाल्ड, जॉन मॉरले, आर.एच. हटन हे लेखक लिहित होते. गिबन आणि जॉन स्टुअर्ट मिल्ल यासारखे लेखक बुद्धिप्रामाण्यवादी भूमिका घेऊन लिहित होते. या पार्श्वभूमीवर मराठी वैचारिक वाङ्मयाचा प्रवास पाहता येतो. इंग्रजी वाङ्मयातील वैचारिकता कालातंराने ती मराठी वाङ्मयात आलेली दिसून येते.

८.३ मराठी वैचारिक वाङ्मय

इंग्रजी साहित्याच्या पार्श्वभूमीवर मराठी साहित्यात वैचारिक वाङ्मयाचा विकास आणि वाटचाल पाहता येते. आरंभीचे गद्यलेखन हे प्रामुख्याने भाषांतरित स्वरूपाचे होते. स.का.छत्रे यांनी १८२८ मध्ये 'बालमित्र' हा ग्रंथ भाषांतरित स्वरूपात रचला. यामध्ये त्यांनी सदगुणांची प्रशंसा करून अन्यायाचे वाईट परिणाम होतात याविषयी उपदेश केला आहे. हरि केशवजी पठारे यांचे लेखनही भाषांतरित स्वरूपाचे आहे. १८३३ मध्ये त्यांनी 'सिद्धपदार्थ विज्ञानशास्त्रविषयक संवाद' या ग्रंथातून विज्ञानविषयक विविध बाबींबाबत विचार मांडले. मराठीमध्ये वैचारिक वाङ्मयाची सुरूवात खऱ्या अर्थाने बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून मानता येते.

बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ पासून 'दर्पण' पत्रामधून विविध विषयांवर लेखन केले. 'इंग्लड देशांतील राज्यरीतीत बदल', 'शेतकरी लोकास सरकारचे उत्तेजन', 'विद्या हे बळ आहे' अशी किती तरी विषयासंबंधी जांभेकरांनी आपली मते मांडली आहेत. समाजप्रबोधन ही त्यांच्या वाङ्मयलेखनाची प्रेरणा मानता येते. पुरोगामी इहवादी विचारसरणीची जोपासना त्यांनी केली. आपल्या लेखातून त्यांनी शेतकरी, सामान्य जनांविषयी तळमळ व्यक्त केली आहे. बाळशास्त्री जांभेकर हे पक्षपातरहित वर्तनाचे समर्थन करतात. 'रामलदास देसाभाई इंग्लंड देशाहून परत आला' या वृत्तपत्रामध्ये त्यांचे प्रगतीशील विचार दिसून येतात. ते विचार परिवर्तनवादी होते.

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी १८३६ मध्ये मराठी व्याकरण व भाषाशास्त्र या अनुषंगाने लेख लिहिला आहे. १८४८ मध्ये 'विद्येच्या लाभाविषयी' या विषयावर ज्ञानप्रसारक सभेपुढे त्यांनी मांडलेले विचार हा वैचारिक वाङ्मयाचा उत्कृष्ठ नमुना मानता येतो. 'धर्मविवेचन' या ग्रंथात त्यांनी व्यवहारिक धर्म आणि पारमार्थिक धर्म यांचा सार सांगितला आहे. मानवी सुखाच्या आड येणाऱ्या रूढींवर ते हळुवारपणे बोट ठेवतात. शिक्षण हे सर्वासाठी असायला पाहिजे असे त्यांना वाटते. मोरोपंतांच्या 'श्लोककेकावली' वरही त्यांनी टीका लिहिली आहे.

गो. ना. माडगावकर यांनी १८५१ मध्ये 'सृष्टीतील चमत्कार' या विषयावर ग्रंथ लिहिला. त्यांनी आपल्या लेखनातून उद्योगाचा पुरस्कार केला. 'पत्रावळी' व 'द्रोण' या लेखातून त्यांचे विचार दिसतात. त्यांनी शास्त्रीय विषयाला अधिक महत्त्व दिले आहे. 'वृक्षवर्णन' या ग्रंथात

त्यांनी १२३ वृक्षांची माहिती दिली आहे. 'अभिजन्य पदार्थ' (१८५६) या ग्रंथातून माणसाच्या सेवनात येणाऱ्या पदार्थाविषयी व फळभाज्याविषयी ते माहिती देतात. त्यांच्या लेखनात समाजसुधारणेपर विचारही आढळतात, 'शुचिर्भूतपणा' या लेखात ते स्वच्छतेचे महत्त्व सांगतात तर 'मादक पदार्थ' व 'दारूपासून अनर्थ' या लेखातून व्यसनापासून होणअरे नुकसान ते मांडतात.

'मिसेस फेरार' यांनी 'कुटुंबप्रवर्तननीती' (१८३५) हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ इंग्रजी ग्रंथावरून मराठीत आणला आहे. मुला-मुलींनी, आई-वडिलांनी परस्परांशी कसे वागावे या बाबी त्यांनी या लेखनात सांगितल्या आहेत. शिवाय स्त्रियांच्या शिक्षणाबाबत पुरोगामी विचारही त्यांनी मांडले आहेत. म्हणजेच कुटुंबसंस्थेच्या ऊर्जितावस्थेसाठी कोणत्या मूल्यांची जोपासना होणे आवश्यक आहे याबद्दलची भूमिका मिसेस फेरार यांनी मांडली आहे.

भाऊ महाजन यांनी १८४१ मध्ये 'प्रभाकर' पत्राची सुरूवात केली. समाजमनातील लोकभ्रम त्यांनी पाहिले. त्यामुळे धर्माची सुधारणा होण्यासाठी त्यांनी विचार मांडले. इंग्रजी राज्यपद्धतीवर टीका करणारा अद्यलेखक म्हणून भाऊ महाजन यांच्याकडे पाहता येते. त्यांचे मराठी भाषेवरचे प्रेमही उल्लेखनीय स्वरूपाचे होते. विद्येशिवाय समाज जागा होऊ शकत नाही याची जाणीव त्यांनी मांडली. लोकहितवादी म्हणजे गोपाळ हरि देशमुख. त्यांनी 'प्रभाकर' मधून १८४८ मध्ये 'इंग्लिस लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैरसमजुतीविषयी' हा लेख लिहिला. त्यांची १०८ पत्रे 'शतपत्रे' या नावे प्रसिद्ध आहेत. त्यामधून त्यांनी स्त्रीसुधारणेविषयी विचार मांडले. स्वतः ब्राम्हण असूनही ब्राह्मण लोकांमधील दोषांचा ते निर्देश करतात. पारंपरिक रूढी आणि प्रथांना ते नकार देतात. ग्रंथप्रामाण्याला विरोध दर्शवून धर्माची व्यापक संकल्पना ते मांडतात. जातिभेदास काय आधार? हा प्रश्न विचारून त्यांनी इंग्रजी राजवटीचे केलेले स्वागत त्याकाळी क्रांतीकारक स्वरूपाचे ठरले. एका बाजूला क्रांतीकारक विचार आणि दुसऱ्या बाजूला समाज प्रबोधन असे त्या काळच्या वर्तमानपत्राचे स्वरुप प्रामुख्याने दिसून येते.

कृष्णाशास्त्री चिपळूणकरांची ग्रंथसंपदा ही प्रामुख्याने भाषांतरित स्वरूपाची आहेत. मराठी व्याकरणावर त्यांनी लिहिलेला लेख हा त्या काळी वेगळा विषय ठरतो. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी 'वेदोक्त धर्मप्रकाश' या ग्रंथामधून लोकव्यवहारातील बाबींचा शोध घेतला आहे. या ग्रंथातील 'राजनीती' हा लेख राजकारभारांविषयी चिंतन मांडतो. 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' या लेखात श्रमविभागणी करून ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणे काम देऊन सुखाचे राज्य कसे चालवता येईल याचा विचार मांडला आहे.

मराठी वैचारिक वाङ्मयात महात्मा जोतीराव फुले यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागतो. त्यांनी लिहलेले - 'शेतकऱ्याचा असूड' (१८८३) 'हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन' (१८८२), 'सार्वजनिक सत्यधर्म' (१८९१) आदि ग्रंथलेखनातून त्यांचे विचार दिसून येतात. बुद्धीवादाबरोबर मानवतावाद हे त्यांच्या लेखनाचा विशेष लक्षात घेता येतो. व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, अस्पृश्योद्धार, समता या मूल्यांचे दर्शन त्यांच्या लेखनात होते. फुल्यांनी वेदप्रामाण्य नाकारले. शेतकऱ्यांच्या अधोगतीची कारणे सांगितली. शिक्षणविषयक विचार मांडले. सत्यधर्माची मांडणी केली. ब्रिटिश राजवटीचे मूल्यमापन केले. वैचारिकतेच्या आणि कलात्मकतेच्या अंगाने त्यांचे वाङ्मय विशेष स्वरूपाचे आहे. 'मुक्ता' ही महात्मा फुले यांच्या शाळेतील विद्यार्थिनी. तिने 'मांगमहाराच्या दुःखाविषयी निबंध' लिहिला तर ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरूष तुलना' (१८८२) या ग्रंथातून पुरूषांची ढोंगी वृत्ती मांडली. स्त्रियांचे शोषण

कसे होते, पुनर्विवाह कसा फायद्याचा आहे, याविषयी त्यानी रोखठोक भाषेत मांडलेले विचार आजच्या स्त्रीवादी विचारसरणीला प्रेरणादायी ठरतात.

या काळात विष्णुशास्त्री पंडित यांनी 'बालविवाह', 'पुनर्विवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह' अशा प्रश्नांवर विपुल लेखन केले. बाबा पद्मनजी यांना कादंबरीकार म्हणून ओळखले जाते. परंतु 'निबंधमाला' (१८५१) या ग्रंथात विविध विषय व धर्मावर स्वतंत्र लेख लिहिले. त्यातून त्यांच्यातील वैचारिक लेखकाचे गुणविशेष दिसून येतात. 'स्त्री विद्याभ्यास', 'कुटुंबाची सुधारणा' या लेखांतून त्यांचे समाजोपयोगी विचार दिसून येतात. या काळात वि.ना.मंडलिक, वामन आबाजी मोडक यांचेही लेखन आढळते.

स्त्री - पुरुष समानता, स्त्रियांचे शिक्षण, स्त्रियांचे अर्थार्जन यानुषंगानेही त्यांनी लेखन केले. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे लेखन मात्र वेगवेगळ्या विषयावरचे आहे. त्यांच्या लेखांतून समाजशास्त्रीय विचार दिसून येतात. 'सिनेमाचा धंदा', 'बालसंरक्षण', 'स्त्रियांचे संसारशास्त्र' या लेखात ते समाजशास्त्रीय भूमिका घेतात. ल. रा. पांगारकर यांची विचारसरणी ही टिळक - चिपळूणकरी परंपरेत बसणारी. 'मराठी भाषेचे स्वरुप' (१८९८) हा लेख ४८ पृष्ठांचा आहे. त्यांनी 'मुमुक्षू' हे साप्ताहिक १९०७ मध्ये सुरु केले. त्यांच्या लेखनात काही प्रमाणात पुराणमतवादी विचार आढळतात. पारमार्थिक, धार्मिक आणि नैतिक विषयाच्या अनुरोधाने त्यांचे लेखन आढळते.

वि. का. राजवाडे हे व्यासंगी संशोधक आणि इतिहासकार म्हणून प्रसिद्ध होते. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' याचा पहिला खंड प्रस्तावनेसह प्रसिद्ध केला. असे २२ खंड प्रकाशित करुन त्यांनी आपले विचार मांडले. त्यांनी इतिहासाची मिमांसा जशी केली तशी भाषाशास्त्रीय विचारही मांडले. 'कादंबरी' या लेखात त्यांचे साहित्यविषयक विचार दिसून येतात. राजवाड्यांची भूमिका सामाजिक विचारात काही ठिकाणी पूर्वग्रह दिसत असली तरी त्यांनी इतिहासाच्या अनुषंगाने मांडलेले विचार महत्त्वपूर्ण आहेत. वासुदेवशास्त्री खरे यांनीही इतिहास संशोधनपर लेखन केले आहे. 'इचलकरंजी संस्थानाचा इतिहास', 'मिरज प्रकरण', 'हरिवंशाची बखर' अशा ग्रंथातून त्यांचे इतिहासविषयक लेखन आढळते.

मराठी वैचारिक वाङ्मयाच्या इतिहासात सत्यशोधक विचारसरणीच्या लेखनाचा वेगळा विचार करावा लागतो. महात्मा फुले यांनी स्थापन केलेला 'सत्यशोधक समाज', त्यानुसार गतिमान झालेली सत्यशोधक चळवळ आणि या चळवळीच्या अनुषंगाने होणारे लेखन वेगळा आशय व्यक्त करते. यामध्ये 'कृष्णराव भालेकर' यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागतो. १८७७ मध्ये त्यांनी 'दीनबंधू' हे पत्र सुरु केले. बहुजन समाज हा हिनावस्थेला गेला त्यामागे वर्णव्यवस्था कारणीभूत असल्याचे ते सांगतात. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी विद्या आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी डोळे उघडले पाहिजे असे त्यांना वाटते. याच परंपरेत नारायण मेघाजी लोखंडे याचा विचार करता येतो. ब्राह्मणेत्तर चळवळीला पोषक असे लेकन त्यांनी केले. परिवर्तनवादी विचारसरणीचा पुरस्कार त्यांनी केला. 'इंग्रज सरकारच्या राज्यात मोगलाई' या लेखात कामगारांवर होणाऱ्या अन्यायाचा विचार ते मांडतात. पुढे मुकुंद पाटील यांनी बंद पडलेले 'दीनमित्र' सुरु करुन लेखन केले. तत्कालीन भट - ब्राह्मण, कर्मठ लोकांवर त्यांनी वैचारिक हल्ले केले. भगवंत पाळेकर यांनी 'जागृती' पत्रातून परिवर्तनशील विचार मांडले. स्वराज्य चळवळीत सहभागी होण्यापूर्वी शिक्षण पूर्ण करणे आवश्यक असल्याचे ते सांगतात. त्यांचे धार्मिक विचारही अभ्यासपूर्ण आहेत. संततीनियमानुसार पाळेकरांनी मांडलेले विचार उद्‌बोधक आहेत. श्रीपतराव शिंदे यांचे विचारही महात्मा फुल्यांच्या विचारांशी नाते सांगणारे आहेत. बदलत्या

राजकारणावरही त्यांनी विचार मांडले आहेत. 'विजयी मराठा' या पत्रातून त्यांनी जे विचार मांडले त्यात समाजसेवेचा ध्यास दिसून येतो.

मराठी वैचारिक वाङ्मयात दलित वैचारिक वाङ्मयाचा टप्पाही विशेष स्वरुपाचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापूर्वी गोपाळबाबा वलंगकर यांनी अस्पृश्योद्धारासाठी प्रयत्न केले. १८८८ मध्ये त्यांनी 'विटाळविध्वंसन' ही पत्रिका काढली. आपल्या बांधवाना धर्म म्हणजे काय हे विशद करावे यासाठी त्यांनी 'हिंदू धर्म दर्पण' या नावाची पुस्तिकाही लिहिली. अस्पृश्यांच्या दुःखाला कारणीभूत असलेल्या धर्मग्रंथाचे दाखले देत ते विचार मांडतात. 'अस्पृश्यतेची रुढी ही ईश्वरनिर्मित आहे हे सिद्ध करा!' असे ते म्हणत. यानंतर शिवराम जानबा कांबळे यांनी १९०८ मध्ये 'सोमवंशीय मित्र' हे मासिक सुरु केले. स्वसमाजातील दोष दाखवून त्यांच्या मनात आत्मोन्नतीची दिशा दाखवावी या उद्देशाने त्यांनी लेखन केले आहे. मुरळी प्रथा, वेश्या व्यवसाय, रेडा - बैल बळी प्रथा, मृतमंसाहार, अस्वच्छता अशा चाली नाहिशा व्हाव्यात यासाठी त्यांनी लेखन केले. याच परंपरेतील किसन फागु बनसोडे यांनी आपल्या लेखनातून हिंदू धर्मियांनी पाळलेल्या पारंपरिक रुढींचे विध्वंसन व्हावे यासाठी विचार मांडले. एकूणच अस्पृश्य समाजाची सुधारणा व्हावी हा विषय घेऊन वरील लेखक लिहित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सिद्ध आहे. 'बहिष्कृत भारत', 'मूकनायक', 'समता', 'जनता' या पत्रांमधून त्यांनी मांडलेले विार हे चिकित्सक स्वरुपाचे आहे. माणसाला माणुसकी हे मूल्य प्राप्त व्हावे, त्यांच्यात स्वाभिमान वाढीस लागावा यासाठी त्यांनी लेखन केले. अस्पृश्य मानलेला समाज व स्पृश्य मानलेला समाज यांचे मतपरिवर्तन आणि मनपरिवर्तन व्हावे हा उद्देश त्यांच्या लेखनात आढळतो. 'हिंदूचे धर्मशास्त्र, त्याचे क्षेत्र आणि त्याचे अधिकारी' या लेखात ते म्हणतात की जातिभेद मानणे, स्त्रियांना कनिष्ठ लेखणे यामुळे हिंदू समाज चांगल्या गुणांसाठी मुकला आहे. त्यांच्या राजकीय विचारातही सामाजिक प्रश्नांची चिकित्सा आढळते. स्वातंत्र, समता, बंधुता, हा विचार समाजात रुजावा, बहुजन समाजाला न्याय मिळावा त्यांना माणूस म्हणून मानाने आणि सन्मानाने जगता यावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैचारिक लेखन केले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे वैचारिक लेखन हे धर्म, भाषा, साहित्य, अस्पृश्यता, अशा विविध विषयांवर आढळते. 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' आणि 'वि. रा. शिंदे यांचे लेख, व्याख्याने व उपदेश' या दोन ग्रंथांमधून त्यांच्या वैचारिक चिंतनाची झेप लक्षात येते. 'मुरळी सोडण्याची चाल', 'शेतकरी वर्गाचे प्रश्न', 'मुलींचे शिक्षण', 'अस्पृश्यतानिवारण' अशा प्रश्नांचा त्यांनी घेतलेला वेध महत्त्वाचा आहे. 'समाजसुधारणा यशस्वी का होत नाही ?' या लेखात त्यांनी समाजसुधारणेच्या कार्यावर प्रकाश टाकला आहे. परकियांपेक्षा स्वकीय शत्रुंपासून आपण सावध असले पाहिजे असे त्यांना वाटते.

विनायक दामोकर सावरकर यांच्या लेखनात स्वातंत्र्याची आस आणि प्रखर देशाभिमान आढळतो. राजकीय विचारांसोबत ते चिपळूणकर - टिळकांचे अनुकरण करतात ते सामाजिक विचारांबाबत आगरकरांचे अनुकरण करतात. समाजात चाललेल्या वेडगळ चालींचा ते निषेध करतात. वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, रोटीबंदी यांचा ते स्वदेशी भेड्या असा उल्लेख करतात. श्री. म. माटे यांनी 'विचारमंथन', 'विचारशलाका', 'विचारगुंफा', 'साहित्यधारा' या ग्रंथातून आपले विचार मांडले आहेत. स्वधर्मात राहूनच वर्णवर्चस्व मोडण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असे त्यांना वाटते. स्वराज्य मिळाल्यानंतर समाजसुधारणा होईल यावर त्यांचा विश्वास होता.

रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या व्याख्यान व लेखांचा संग्रह 'धर्मपर लेख व व्याख्याने' या नावाने प्रसिद्ध आहे. विशेषतः त्याची धार्मिक विचारसरणी लक्षात घेण्यासारखी आहे. 'ईश्वरविषयक ज्ञान' या लेखात ते सृष्टीच्या निर्मितीविषयी लिहितात. त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. काही तरी प्राप्त करण्यासाठी ईश्वरभक्ती न करता मनाच्या उन्नयनासाठी ती असावी असा विचार ते मांडतात. नारायण महादेव परमानंद यांनी 'ईर्षा' (१८५७), 'प्रपंचासाठी काही विचार' (१८५७), 'सिंध व तेथील लोक' (१८६३) या लेखातून मांडलेले विचार हे धर्म, संस्कृती, प्रचंड, नीति याबद्दलचे चिंतन मांडतात.

महादेव गोविद रानडे यांनी आपल्या लेखनातून ब्रिटिश राजवटीचे स्वागत केले. त्यांच्या लेखनात समन्वयवादी भूमिका दिसते. ते सतत न्याय, दया आणि मांडलेले विचार किंवा 'प्रजावृद्धीचे दुष्परिणाम' (१८६४) मध्ये मांडलेले विचार हे समाजाला दिशा देणारे ठरतात.

का. बा. मराठे यांनी 'नावल व नाटक ह्यासंबंधी निबंध' (१८७२) या लेख लिहून मराठी समीक्षालेखनाची सुरूवात केली. त्यांची काही भाषांतरत स्वरूपाची ग्रंथरचनाही प्रसिद्ध आहे. याच काळात रा. भि. गुंजीकर यांनी विविधज्ञानविस्ताराच्या माध्यमातून मराठी भाषेविषयी पोटतिडकीने लिहिले. मराठी भाषेचे श्रेष्ठत्व त्यांनी पटवून दिले आहे. स्त्रीशिक्षणासंबंधीचे विचारही त्यांनी मांडले आहेत.

मराठी वैचारिक वाङ्मयाच्या इतिहासात विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांनी 'निबंधमाला' या पत्राच्या माध्यमातून त्यांनी केलेले लेखन, घेतलेली भूमिका, समाजसुधारकांवर केलेली टीका विसरता येत नाही. 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती' पासून ते 'आमच्या देशाची स्थिती' या लेखापर्यंत विष्णुशास्त्रींनी घेतलेली भूमिका 'स्वदेश, स्वभाषा आणि स्वधर्म, यासाठीच होती असे म्हणता येते. समाजसुधारणेपेक्षा देश, भाषा आणि धर्म महत्त्वाचा आहे, याचे त्यांनी समर्थन केले. या काळातच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे वैचारिक लेख प्रसिद्ध होत होते. 'केसरी' मधून त्यांनी ब्रिटिशांच्या नोकरशाहीवर केलेली जहरी टीका आणि 'सरकारचे डोके ठिकाणअवर आहे काय?' हा विचारलेला प्रश्न त्यांचे जहालपण सिद्ध करतो. स्वराज्य वाढीस लागावे, स्वधर्म वाढावा आणि राष्ट्रीय शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी मांडलेले विचार वेगळ्या स्वरूपातले होते. लोकांकडे सिंहाचे बळ आहे यावर त्यांचा विश्वास होता. म्हणून त्यांनी या स्वरुपाचे लेखन केले आहे.

गोपाळ गणेश आगरकर यांच्या लेखनाचा विचार सामाजिकतेच्या अंगाने करावा लागतो. त्यांच्या समग्र लेखनाचा पाया हा विवेकनिष्ठेवर आधारलेला आहे. त्यांनी हिंदू धर्माविरूध्द लेखन केले. समाजपरिवर्तनाच्या भूमिकेतून त्यांनी लेख लिहिले. 'सुधारक' (१८८८) हे साप्ताहिक सुरू करून त्यांनी त्यांची दिशा निश्चित केली. शिक्षण हे शहाणपणा देते, सहशिक्षणामुळे आणि स्त्री पुरूष समाता येते आणि जाणत्या वयातच मुलींचे लग्न झाले पाहिजे हे सांगून ते रूढींची निरर्थकता मांडतात.

शिवराम महादेव परांजपे यांनी 'काळ' हे वर्तमानपत्र सुरू करून विचार आपले मांडले. ब्रिटिश राजवटीमुळे सोयी आल्या हे त्यांना पटत नाही. 'ध्रुवाची गोष्ट खोटीच असली पाहिजे' निबंधात त्यांनी वक्रोक्तीच्या अंगाने विचार मांडला आहे. उपरोध आणि उपहासाच्या आधारे तरूणांमध्ये स्वातंत्र्याविषयीची भावना पेटविणारे विचार शि.म.परंजपे यांनी मांडले आहेत. याच काळात न.चि.केळकर यांनीही आपले विचार मांडले. त्यांच्या लेखनाची प्रकृती टिळकांप्रमाणे जहाल नव्हती. अगदी संयतपणे ते विषय मांडतात. 'दिल्लीचा बादशाही दरबार' (१९११) या

निबंधात त्यांनी पुराणकाळापासून ते इंग्रजी काळापर्यंतच्या बादशहाचे विहंगमावलोकन करताना ते दिसतात. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांचे विचारही टिळकप्रणित असल्याचे आढळतात.

अ. ब.कोल्हटकर यांनी १९१५ पासून 'संदेश' हे पत्र सुरू केले. स्वदेशप्रीती हा त्यांच्या लेखनाचा स्थायीभाव असल्याचे लक्षात येते. लो.टिळक हा त्यांच्या लेखनीचा जिव्हळ्याचा विषय म्हणता येईल. 'माधवाश्रमात शिवाजी' हा गंमत वाटावा असा परंतु गंभीर असलेला निबंध त्यांनी लिहिला. स्वातंत्र्यप्राप्ती या उद्दिष्टाने त्याचे लेखन झालेले आहे. त्यांनी लिहिलेले काही मृत्युलेखही विशेष स्वरूपाचे आहेत. याच विचारसरणीशी निगडित लेखन करणारे. भास्कर बळवंत भोपटकर; त्यांनी १९०५ मध्ये 'भाला' हे पत्र सुरू केले. 'नरकाचा दरबार', 'भिणार की भिडणार?', 'नेट धरा थेट चला' अशा शीर्षकातून त्यांच्या वादग्रस्त व्यक्तिमत्त्वाची ओळख होते.

या काळात द. के. केळकर यांनी भौतिकवादी आणि विज्ञाननिष्ठ विचार मांडले. विनोबा भावे यांनी आपल्या लेखातून अहिंसावादी तत्त्वांचा पुरस्कार केला. दादा धर्मादिकारी यांचे लेखन गांधीवादाच्या अनुषंगाने लक्षात घ्यावे लागते. साने गुरुजी यांनी 'भारतीय संस्कृती' या ग्रंथातून प्राचीन संस्कृतीचे दर्शन मांडले आहे. काकासाहेब कालेलकर यांचे लेखन विचारप्रवर्तक स्वरुपाचे आहे. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांचे वाङ्मय बुद्धिवादी, ज्ञाननिष्ठ आणि राष्ट्रभक्ती अशा विषयांवर आढळते. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी वाङ्मयीन समीक्षेबरोबर महाराष्ट्र एकीकरण आणि मराठवाड्याची स्वायत्तता या विषयांवरही लेखन केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी वैचारिक वाङ्मयाचा इतिहासही अभ्यास करण्यासारखा आहे. यशवंतराव चव्हाण हे राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून प्रसिद्ध असले तरी त्यांच्या भाषणांमधून विविध विषयांवर त्यांनी केलेले चिंतन आढळते. 'सह्याद्रीचे वारे' (१९६२), 'युगांतर' (१९७०), 'भूमिका' (१९७९) अशा काही ग्रंथांचा उल्लेख उत्कृष्ट वैचारिक चिंतन असे करता येते.

विचार हा केवळ वैचारिक वाङ्मयातूनच मांडता येतो असे नव्हे. इतर वाङ्मयप्रकारांमधूनही त्याचे दर्शन होते. मराठी ललित निबंध, 'लघुनिबंध', 'ललित गद्य' किंवा 'ललित लेख', 'प्रवासवर्णन' अशा प्रकारांमधूनही विचार मांडता येऊ शकतात. अशावेळी भावना, आत्मनिष्ठपणा या आधारे त्याची मांडणी केली जाते.

ना. सी. फडके यांनी 'गुजगोष्टी' लिहून 'लघुनिबंध' हा नवीन प्रकार मांडला. त्यांनी कल्पकतेमधून विचारांची मांडणी केली. 'गुजगोष्टी', 'नव्या गुजगोष्टी', 'धूम्रवलये' या संग्रहातून त्यांचे चिंतन दिसून येते. वि. स. खांडेकर यांच्या 'वायुलहरी' सारख्या इतरही संग्रहातून जीवनातील साधे -साधे प्रश्न मांडलेले दिसतात. अनंत काणेकर यांच्या 'शिंपले आणि मोती', 'तुटलेले तारे', 'प्रकाशाची दारे' मधून अंतर्मूख दृष्टी, मिश्कील वृत्ती दिसून येते. या काळात ना. म. संत, वि. पां. दांडेकर, गो. रा. दोडके, इरावती कवे, दुर्गा भागवत, विंदा करंदीकर, ना. ग. गोरे, असे किती तरी लेखक लिहित होते. अलिकडे अनिल अवचट यांच्या लेखातून सभोवतालच्या विविध घडामोडींना दिलेली प्रतिक्रिया आढळते. 'धागे आडवे उभे', 'माणूस' किंवा इतरही संग्रहातून त्यांनी मांडलेले चिंतन आढळते.

एकंदरीत उगमापासून ते सध्यस्थितीत होणाऱ्या लेखनापर्यंतची मराठी वैचारिक वाङ्मयाची वाटचाल लक्षात घेतली तर अे दिसून येते की समाजजीवनातील विविध प्रश्न, सभोवतीच्या विविध घडामोडी, देश आणि परदेशातील घटना या आधारे लेखकांनी केलेले चिंतन

हे समाजप्रबोधनपर, विचारप्रवर्तक, संस्कारशील, प्रश्नांची सोडवणूक करणारे आढळून येते. भाषेच्या अंगानेही हे लेखन वैविध्यपूर्ण स्वरुपाचे आहे.

८.४ समारोप

समाजाला दिशा देणे, समाजामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता या सारख्या विशिष्ट विषयावर तर्कशूद्धपणे, साधारणपणे विचाराची मांडणी करुन विशिष्ट अशा निष्कर्षाप्रत घेऊन जाणारे लेखन म्हणजे वैचारिक वाङ्मय असे म्हणता येते. विचार हा वैचारिक वाङ्मयाचा गाभा मानला जातो. वास्तवाच्या आधारे वैचारिक वाङ्मय आकारास येत असते. विविध प्रश्नांची उकल करुन त्यामागची कारणमीमांसा मांडली जाते. त्यामुळे चिंतन, चर्चा, तर्क, विवेचन या अंगाने विचाराचे स्वरुप स्पष्ट होत जाते.

वैचारिक वाङ्मयामधून काही तत्त्वांचे मांडणी केली आहे. प्रबोधन हे तत्त्व समाजाला शहाणे करण्यासाठी व जागृति करण्यासाठी योजिले जाते. व्यक्तिवादामध्ये व्यक्तिच्या सुख-दुःखाचा विचार मांडला जातो. सारासार विचार करुन सत्याची मांडणी करणे या अर्थाने विवेकवाद हे तत्त्व येते. वास्तवात असलेल्या सजीव - निर्जीवसंबंधाचे चिंतन करणे यातून इहवादी हे तत्त्व येते. प्रयोगाच्या आधारे निरीक्षण करुन शोध घेणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे. तत्त्वांप्रमाणे काही मूल्यांचा निर्देशही वैचारिक वाङ्मयाच्या अनुषंगाने करावा लागतो. स्वातंत्र्य, समता, बंधुता, नीती, सहिष्णुता, करुणा ही मूल्ये वैचारिक वाङ्मयाच्या केंद्रस्थानी असतात. त्याचबरोबर मानवता, प्रेम, अहिंसा, शांती, धर्मनिरपेक्षता अशा अनेक मूल्यांचाहि विचार केला जातो.

इंग्रजी वाङ्मयाच्या आधारे मराठी साहित्यात वैचारिक वाङ्मयाच्या लेखनास आरंभ झाला. आरंभीचा काळ हा इंग्रजी वाङ्मय वाचण्यात गेला. त्यानंतर भाषांतर करण्याचा काळ आला. साधारणतः १८३२ पासून मराठीत स्वतंत्रपणे वैचारिक वाङ्मय लिहिले जाऊ लागले. अशा लेखकांमध्ये बाळशास्त्री जांभेकर यांना पहिला मान द्यावा लागतो. इथू पुढे मराठी वैचारिक वाङ्मयाने प्रौढ, परिपक्व स्वरुप धारण केल्याचे दिसुन येते.

८.५ संदर्भग्रंथ

१) मराठी निबंध : उद्‌गम आणि विकास डॉ. गिरीश मोरे, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद
२) मराठी निबंध : डॉ. म. मा. अळतेकर सूलिचा प्रकाशन पुणे.
३) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास - रा. के. लोचे, कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे.
४) विचार मंथन - स. रा. गाडगीळ, प्रतिमा प्रकाशन पुणे.
५) शतपत्रे - (लोकहितवादी) - गोपाळ हरि देशमुख.

❖❖❖❖

९

वैचारिक गद्य

- संपादित ग्रंथ

पाठ्यरचना :

९.० प्रस्तावना

९.१ अभ्यासाची उद्दिष्ट्ये

९.२ मराठी वैचारिक गद्याची पार्श्वभूमी

९.३ वैचारिक गद्यातील लेख

- ९.३.१ गुलामगिरीची प्रस्तावना
- ९.३.२ विनंती पत्र
- ९.३.३ स्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया
- ९.३.४ सामाजिक समता

९.० प्रस्तावना

द्वितीय वर्ष बी.ए. (मराठी) अभ्यासपत्रिका क्र. ३ साठी वैचारिक गद्य लेख अभ्यासक्रमाला लावण्यात आले आहेत. 'वैचारिक गद्य' या ग्रंथात पंधरा वैचारिक लेखाचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी बारा लेख अभ्यासक्रमाला आहेत. हा वैचारिक गद्य संपादित आहे. वैचारिक गद्याचा अभ्यास करण्यापूर्वी वैचारिक गद्य लेखन म्हणजे काय? आणि मराठी साहित्यात वैचारिक गद्य लेखन कधी सुरु झाले? त्याचे स्वरुप कसे होते? याचा अभ्यास करण्यासाठी पहिल्यांदा मराठी वैचारिक गद्याचा पार्श्वभूमी समजावून घ्यावी लागेल, ही पुढीलप्रमाणे आहे.

९.१ अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१. 'मराठी वैचारिक' म्हणजे काय? हे जाणून घेणे.
२. मराठी वैचारिक गद्याची पार्श्वभूमी जाणून घेणे.
३. मराठी वैचारिक गद्यातील समाजजीवनाचे झालेले चित्रण यांचा अभ्यास करणे.
४. तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक परिस्थिती जाणून घेणे.
५. वैचारिक गद्याचा आशय जाणून घेणे.
६. समाज / प्रबोधन आणि परिवर्तनासाठी सुधारकांचे विचार किती थोर होते, हे लक्षात घेणे.

९.२ मराठी वैचारिक गद्याची पार्श्वभूमी :

इ.स. १८१८ मध्ये पेशव्यांच्या पराभवानंतर मराठी सत्तेचा अस्त झाला आणि भारतात इंग्रजांची सत्ता खऱ्या अर्थाने स्थिर झाली. महाराष्ट्रात इंग्रजांची सत्ता स्थिर झाल्यानंतर प्रारंभीच्या काळात राज्यकारभाराची सूत्रे एलफिन्स्टन, माल्कम यासारख्या दूरदर्शी, कर्त्यव्यतत्पर व मुत्सद्दी अधिकाऱ्यांच्या हाती आली. आपल्या राजकारभाराच्या व धोरणांच्याद्वारे येथील समाजाचा विकास संपादन करण्याच्या कार्याला त्यांनी प्राधान्य दिले. भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार चालू असताना तेथील राज्यांच्या उत्पन्नातून काही रक्कम ऐतद्देशीय लोकांच्या शिक्षणासाठी कंपनीने खर्च केली पाहिजेत, हे ब्रिटिश पार्लमेंटने १८१३ मध्येच ठरविले आणि नवी सनद कंपनीला देताना दरवर्षी कंपनीने कमीतकमी एक लाख रुपये हिंदी लोकांच्या शिक्षणासाठी खर्च केलेच पाहिजे, असे एक कलम घातले होते. पुढे ही रक्कम बंगाल, मुंबई व मद्रास प्रांतांना वाढून देण्यात आली. त्यातूनच त्या त्या प्रांतांच्या गव्हर्नरांनी शिक्षणव्यवस्था सुरु केली. मुंबईत एलफिन्स्टन गव्हर्नर होते. मुंबईला एक इंजिनियरींग व एक वैद्यकीय अशी दोन कॉलेजस आणि पुण्याला एक हिंदू कॉलेज सुरु केले होते. एलफिन्स्टन देशी भाषेतूनच शिक्षण दिले जावे या मताचे ते होते. ज्ञान प्रसारासाठी इंग्रजीतल्या उत्तम ग्रंथांची भाषांतरे छापण्यासाठी त्यांनी भाषांतर खाते सुरु केले. गोडबोले, जांभेकर, हरी केशवजी वगैरे विद्वानांची त्यावर त्यांनी नेमणूक केली. याच संस्थेला 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' असे पुढे नाव प्राप्त झाले. इ.स. १८५७ मध्ये मुंबई विश्वविद्यालयाची कायद्याने स्थापना झाली. नवीन हायस्कूले आणि कॉलेजे उघडून त्याला जोडण्यात आली. अशा प्रकारे ब्रिटिशांनी भारतात शिक्षणप्रसाराला चालना दिली. महाराष्ट्रातही विविध संस्थांची स्थापना करण्यात आली. या कार्यत प्रारंभीच्या काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मोठे कार्य केले. हे नाकारता येणार नाही.

शिक्षणाच्या प्रसारामुळे महाराष्ट्रात नवशिक्षित तरुणांची एक नवी पिढी उदयास आली. पाश्चिमात्य संस्कृती, त्यांनी केलेली भौतिक प्रगती, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता यासारख्या आधुनिक विचारांचे, तत्त्वांचे या तरुणांना ज्ञान प्राप्त झाले. त्यांनी भारतातील आपल्या धार्मिक व सामाजिक जीवनाकडे चिकित्सक भूमिकेतून, आत्मपरीक्षणाच्या जाणिवेतून पाहण्यास सुरुवात केली. त्यातूनच सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींना गती मिळाली. समाजातील अनिष्ठ सामाजिक व धार्मिक परंपरावर टीका करण्याबरोबरच आपल्या विचार, लेखन व कृतीच्या द्वारे समाजात परिवर्तन घडवून आणण्यास या समाजसुधारकांनी सुरुवात केली. त्यात जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, भाऊ दाजी लाड, विष्णुशास्त्री पंडित, महात्मा जोतीराव फुले इत्यादी समाजसुधारकांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

समाजसुधारणेची तळमळ असलेल्या तरुणांनी वृत्तपत्रे व ग्रंथांच्या माध्यमाचा मोठा उपयोग केला. ब्रिटिश शासनामुळे उपलब्ध झालेल्या मुद्रणकलेचा व विचारस्वातंत्र्याचा उपयोग करुन त्यांनी निरनिराळी वृत्तपत्रे सुरु केली. (उदा. 'दर्पण' - संपादक - बाळशास्त्री जांभेकर, 'शतपत्रे' - संपादक - लोकहितवादी, 'निंबंधमाला' - विष्णुशास्त्री चिपळूणकर, 'केसरी' - लोकमान्य टिळक, 'सुधारक'- आगरकर आणि महात्मा फुले, 'शेतकऱ्यांचा असूड', 'इशारा' व 'सार्वजनिक सत्यधर्म' यासारखे वैचारिक लेखन) या वृत्तपत्रांतून परंपरागत आचार, रुढी, अंधश्रद्धा यावर प्रखर टीका करण्याबरोबरच त्यांनी समाजाला नवविचारांचे ज्ञान करुन देण्याचा

प्रयत्न केला. आपल्या ग्रंथामधून स्त्रीयांच्या समस्या, विधवा स्त्रीयांची दयनीय अवस्था, अस्पृश्यांवरील बंधने यावर टीका करण्याबरोबरच नवसमाजाच्या निर्मितीसाठी कोणत्या सुधारणाची आवश्यक आहे हे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यासाठी नवीन संघटनांची निर्मिती केली गेली. शिक्षणसंस्था सुरु करणे, विधवांचे पुनर्विवाह घडवून आणणे यासारख्या प्रत्यक्ष कार्यालाही त्यांनी चालना दिली. भारतीयांच्या सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या गरजेचे प्रतिपादन करण्याबरोबरच ब्रिटिशांच्या अयोग्य धोरणावरही त्यांनी टीका केली.

सारांश, इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणामुळे भारतीय समाजजीवनात आमुलाग्र बदल झाला. एकोणिसावे शतक हे प्रबोधनाचे युग मानले गेले. ह्याच काळात मानवतावाद, लोकशाहीमुल्ये, व्यक्ती स्वातंत्र्य, वैज्ञानिकता, सामाजिक आणि धार्मिक दास्यविमोचन त्यासाठी चळवळी झाल्या. 'शिक्षण आणि सामाजिक सुधारणा' ह्याचे महत्त्व त्या काळातील पिढीला कळाले होते. शिक्षण हे अखंडपणे समाज घडविण्याचे कार्य आहे. माणूस घडविणारे शिक्षण मिळाले पाहिजे आणि शिक्षणाने समाजात समानता आली पाहिजे याच ध्येयाने प्रेरीत होऊन महाराष्ट्रातल्या समाजसुधारकांनी कार्य केले.

९.३ 'वैचारिक गद्य' मधील अभ्यासक्रमासाठी असलेले लेख

१) आपला धंदा कोणता व कसा करावा - दादोबा पांडुरंग तर्खडकर
२) स्त्री विद्याभ्यासः शंका निवारण - बाबापदमनजी
३) 'गुलामगिरी' ची प्रस्तावना - जोतीराव गोविंदराव फुले
४) विनंती पत्र - गोपाळ बाबा वलंगकर
५) सामाजिक समता - मे. पु. रेगे
६) शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय - मुकुंदराव पाटील
७) अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर
८) सख्यत्वासाठी - शांता किर्लोस्कर
९) बुवाबाजी भस्मासूर - दि. के. बेडेकर
१०) भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी - श्रीपाद महादेव माटे
११) बुद्धीचा महिमा - पांडुरंग सदाशिव साने
१२) मुंबई : १९९९ - वसंत बापट

९.३.१ गुलामगिरीची प्रस्तावना - जोतीराव गोविंदराव फुले

महात्मा ज्योतिराव फुले यांनी गुलामगिरी हा ग्रंथ लिहिला असून या ग्रंथाचे प्रयोजन ग्रंथलेखनाविषमचे मत प्रस्तावनेत व्यक्त केले आहे. 'गुलामगिरी' या ग्रंथाची प्रस्तावना म्हणजे हा वैचारित लेख आहे. म. फुले यांनी सर्वप्रथम दलितांच्या प्रश्नाला वाचा फोडली. विशेषतः दलितांवरील अन्यायाला हिंदू धर्मव्यवस्था, चातुर्वण्य व्यवस्था यांनी केलेले अन्याय नियम कारणीभूत आहेत आणि अशा प्रकारे व्यवस्था निर्माण करण्यामागे सवर्ण ब्राह्मणांचा स्वार्थ आहे. याप्रकारचे स्पष्ट मत मांडण्याचे धाडस महात्मा फुले यांनी केले. हिंदू धर्मव्यवस्थेचे सत्य स्वरूप शोधून काढण्याच्या उद्देशानेच त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'ब्राह्मणाचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड' हे ग्रंथ त्यांनी लिहिले.

ब्राह्मण धर्मव्यवस्थेने शुद्रातीशूद्रांना हेतूतःच अज्ञानी ठेवले आणि त्यांची भौतिक, अध्यात्मिक प्रगती रोखली असा स्पष्ट आरोपच महात्मा फुले यांनी केला आहे. शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी म. फुले म्हणतात.

'विद्येविना मती गेली
मतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
इतके सगळे अनर्थ
एका अविद्येने केले'

महात्मा फुले यांनी लिहिलेल्या 'गुलामगिरी' या निबंधात आणि त्याच्या प्रस्तावनेतूनही त्यांची अस्पृश्यांच्या उद्धारासाठीची कळकळ दिसून येते. विशेषतः अतिशय घणाघाती भाषते फुले यांनी सवर्णांनी अस्पृश्यांवर चालवलेल्या अन्यायाचा चांगला समाचार घेतला आहे. शिक्षणाशिवाय तरूणोपाय नाही असे ते म्हणतात. 'गुलामगिरी' च्या प्रस्तावनेत म. फुले लिहितात-

"आज शेकडो वर्षे शूद्रातीशूद्र, ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून सतत दुःखे सोशीत आहेत व नाना प्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत. तर या गोष्टींकडे त्या सर्वांचे लक्ष लागून त्यांनी तिजविषयी नीट विचार करणे व येथुन पुढे भटब्राह्मण लोकांचे अन्यायी जुलमापासून आपली सुटका कशी करून घेणे हाच काळ तो आहे".

म. फुले यांच्या मते ब्राह्मण मंडळी आपली पोटे भरण्यासाठी शूद्रातिशूद्रांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांना व्रत-वैकल्ये, पूजा करायला भाग पाडतात व स्वतः दक्षिणा उकळतात. त्यांनी मुद्दामच धर्मग्रंथात स्वतःबद्दल इतके काही लिहून ठेवले आहे आणि शूद्रांनी ब्राह्मणांस आदर दर्शवणे बंधनकारक करून ठेवले आहे की शूद्र त्याला फसून, त्यांना घाबरू लागले आणि स्वतःला कमी लेखू लागले. हे तत्कालीन वास्तव प्रस्तावनेमधून व्यक्त केले आहे.

बहुजन समाजासाठी स्वातंत्र्याचा, समतेचा विचार आपण का धरतो हे स्पष्ट करताना महात्मा फुले म्हणतात, ". . . जेव्हा मनुष्य स्वतंत्र असतो तेव्हा त्यास आपले मनात उद्‌भवलेले विचार स्पष्ट रीतीने इतर लोकांस बोलून अथवा लिहून दाखविता येतात. तेच विचार त्यास स्वतंत्रता नसल्यामुळे मोठे महत्त्वाचे असून लोकांचे हितावह का असेनात, तथापि ते त्यास दुसरे कोणास कळविता येत नाहीत आणि असे झाले म्हणजे काही काळाने ते सर्व विचार लयास जातात. . ." आपल्या देशात अस्पृश्यांच्या संदर्भात घडत असल्याने म. फुले यांनी अस्पृश्यांना स्वातंत्र्य मिळवून देणे, त्यांना विचारप्रवृत्त करणे, त्यांच्यात स्वाभिमान जागा करणे आपल्या चळवळीचे ध्येय ठेवले होते. ही चळवळ सुरू करताना द. अमेरिका व आफ्रिका या देशातील निग्रोंना अमेरिकन लोक गुलामासारखे वागवत असता, तेथे कशा चळवळी सुरू झाल्या आहेत याची माहिती फुले यांना होती.

म. फुले यांनी अमेरिकेतील गुलामगिरीचे उदाहरण दिले आहे. अमेरिकेत अब्राहम लिंकनने गुलामगिरी प्रथा नष्ट करून टाकली होती. इतरही काही समाजसुधारक गुलामगिरीला विरोध करत होते. त्यांचे म. फुले कौतुक करतात. आपल्या देशातील वर्ण व्यवस्था नाहीशी झाली पाहिजे, दास्य प्रथेलाही असाच विरोध केला पाहिजे व अस्पृश्यतेची दुष्ट रूढी नष्ट केली पाहिजे असे फुले यांना वाटते. अस्पृश्यांवर सवर्णांनी केलेल्या अत्याचाराच्या नोंदी कशा हेतूतः इतिहासातून वगळल्या आहेत त्याबद्दल खंत व्यक्त करताना महात्मा फुले लिहितात- ''आम्ही जे जे हिंदुस्थानचे इतिहास लिहिले. त्यांतील हा एक मोठा अतिमहत्त्वाचा भाग गाळला. त्यांस त्यांचे दुःखाची माहिती एकदा झाली म्हणजे फार वाईट वाटून आपल्या ग्रंथात, जेथे अतिनिकृष्ट दशेस येऊन पोहचलेले व दुष्ट लोकांनी गांजलेले, ज्यांचे दुःखास पारावार नाही अशा लोकांचे स्थितीची उपमा देणे झाल्यास, शुद्रादि अतिशूद्रांच्याच स्थितीची उपमा योग्य साजेल असे वाटेल.''

म. फुले म्हणतात की, ''कवींना दुःखाच्या कविता लिहिताना दलितांच्या दुःखद स्थितीचा उपयोग उपमेसारखा करता येईल कारण त्यांनी उपमा सुचत नसतात''! परशुरामाने संपूर्ण भूमी निःक्षत्रीय केली होती हा पौराणिक संदर्भ फुले देतात. ते म्हणतात की हा परशुराम-ब्राह्मणांचा प्रतिनिधी इतका दुष्ट होता की त्याने केवळ क्षत्रिय पुरुषच संपवले नाहीत तर स्त्रियांना, अर्भकांना, मुलांना, गर्भवतींनाही ठार मारले. अर्थात पुढे त्याने केलेल्या त्या अत्याचारांचे वर्णन ज्यांनी इतिहास लिहिला त्या सवार्णांनी मुद्दामच गाळला असणार. म. फुले यांच्या मते परशुरामाच्या हत्याकांडानंतरही उरलेल्या मूठभर शूद्रातीशूद्रांना भटाब्राह्मणांनी भरपूर छळले असावे. त्यासंदर्भात ते वर्णन करतात.

. . . जातीव्यवस्थेचे उदाहरण देताना म. फुले यांनी नदीवरच्या प्रसंगाचे चित्रण दिले आहे. ''जर कोणी शूद्र नदीकाठांवर आपली वस्त्रे धूत असता त्या स्थळी जर एखादा भट आला, तर शूद्रांस आपली सर्व वस्त्रे गोळा करून, बऱ्याच दूर अंतरावर, जेथून भटाच्या अंगावर पाण्याचा शिंतोडा येण्याचा संभव नसेल, अशा स्थळी जाऊन आपली सर्व वस्त्रे धुवावी लागत असे, अथवा आला असा खोटा भास झाला, तर त्या भटाने अग्नीसारखे रागाने तप्त होऊन जवळचे भांडे त्याचे मस्तक रोखून मोठे त्वेषाने मारावे. त्यामुळे त्याचे मस्तक रक्तबंबाळ होऊन मुर्च्छित होत्साता जमिनीवर धाडकन पडावे, पुढे काही वेळाने शुद्धीवर येऊन आपली रक्ताने भरलेली वस्त्रे घेऊन निमूटपणे घरी जावे, सरकारास जर कळवावे तर सर्व भटशाई पडली, उलटी त्यासच सजा देणार!'' अशी अस्पश्यांना वागणूक दिली जात होती.

समाजव्यवस्थेकडून दलितांवर जे अत्याचार पेशवाईत केले गेले, त्याचे वर्णन महात्मा फुले यांनी केले आहे. त्यानंतर ते म्हणतात की दलितांमध्ये अज्ञान असल्यामुळे एक वाक्यता नाही, त्याचा गैरफायदा ब्राह्मण घेतात. शिवाय ब्राह्मणांनी शूद्र व अन्य अवर्ण जातींमध्ये मुद्दामच भांडणे लावून दिली आहेत जेणेकरून त्यांच्यात कधी एकजूट होणार नाही. कारण शूद्रातीशूद्र सगळे एकवटले तर ते बहुसंख्य होतील, आणि ब्राह्मण अल्पसंख्य ठरतील. त्याची ब्राह्मणांना भीती वाटते. जातीभेद ही शूद्रातीशूद्रांत एकजूट होऊ नये यासाठी योजलेली क्लृप्ती आहे.

शेवटी म. फुले म्हणतात "इंग्रजी राजवटीत शूद्रांची अस्पृश्यतेच्या मानहानीकारक जुलमी रूढीपासून सुटका झाली असली तरी इंग्रज सरकारने दलितांची शिक्षणाची सोय केली तरच खऱ्या अर्थाने ते स्वतंत्र होतील अशी आशा या लेखातून व्यक्त केली आहे."

आपली प्रगती तपासा :

१) अस्पृश्य समाजाबद्दलची म. जोतिबा फुले ची भूमिका स्पष्ट करा.

२) म. फुलेचे शैक्षणिक दृष्टीकोन स्पष्ट करा.

९.३.२ विनंतीपत्र - गोपाळ बाबा वलंगकर

गोपाळ बाबा वलंगकर यांना या विनंती पत्रातून कोकणातील अस्पृश्य समाजाची व्यथा, जाति व्यवस्था, उच्च वर्णीय समाजाकडून होणारा तत्कालीन अन्याय व्यक्त केला आहे. त्यांचे हे पत्र म्हणजे कोकणातील महार समाजाची व्यथा आहे. त्यांच्या पत्रातील मजकुर पुढील प्रमाणे आहे. हिंदू धर्माच्या सर्व जातीला एक शास्त्र म्हणून नाही, तर हिंदू धर्मात नाना शास्त्रे व नाना पुराणे, नाना मते, नाना पंथ जातींच्या अनेकत्वामुळे झाली आहेत. त्या सर्वांत जाती धर्म हे महाशास्त्र होऊन बसले आहे. हिंदू लोक सहा शास्त्रे व अठरा पुराणे ही एकीकडे गुंडाळून ठेवतील पण जाती नियमरुप शास्त्र त्यांच्या डोळ्यापुढे सर्वदा उघडे असते व त्याचा अंमल त्यांजवर निरंतर चालत आहे असे गोपाळ बाबा वलंगकंर यांना वाटते.

गोपाळबाबा वलंगकर म्हणतात रावणाचे राज्य गेले, रामाचे, कृष्णाचे, पांडवांचे, यवनांचे व पेशव्यांचे मराठी राज्य गेले; आणि सर्व एक ब्रह्म जाणणाऱ्या इंग्रज सरकारचे राज्य उदयास आले; पण जातीचे राज्य अद्यापही चालतच आहे त्यांचा जुलूम मोगलाई जुलूमापेक्षा इतर कोणत्याही जातीच्या लोकांवर नसता कोकणातील महारांवर फार कडक रीतीने अंमल करीत आहे; कारण त्यापासून आमचे फारच नुकसान होत असून आम्ही सर्वस्वास मुकले जात आहोत. याची खंत व्यक्त करतात -

आपल्या अस्पर्शत्वाच्या जुलमामुळे आम्हास कोणत्याही शाळेत जाऊन विद्याज्ञान संपादन करुन त्यापासून होणारे कलाकौशल्यादी लाभ करुन घेण्याविषयी इतर जातीप्रमाणे सरळ

मनाने जाता येत नसल्याने आम्ही व आमची संतती ह्या लाभास मुकून अज्ञान स्थितीत राहिलो. आम्हास प्रवासास जाताना, उतरावयास जाण्याची, पाण्याची व अन्नाची सोई कोठे मोकळ्या मनाने होण्यासारखी नसल्याने पशूही न राहण्यासारख्या जागेत राहून अनेक दु:खे व अडचणी भोगाव्या लागतात. आमच्या दयाळू सरकारने सर्व मनुष्यप्राण्याचे सुखसोयीकरिता मार्गात धर्मशाळा, पाण्याचे नळ वगैरे बांधिलेले असून तेथेसुद्धा आम्हांस हे जुलमी लोक राहू न देता व पाणी पिण्यास न मिळू देता धर्मशाळेच्या बाहेर थंडीवाऱ्यावर पडावे लागून अन्नपाण्यावाचून उपाशी राहून काळ क्रमावा लागतो.

आमचे लोक क्षत्रिय धर्माप्रमाणे जिवाची आशा न धरिता हातावर शिरे धरुन लष्करी खात्यात चाकरी करुन जमादार, सुभेदार मेजर, बहादूर, सरदार बहादूर, इ. पदव्या सरकारपासून मिळवून व पुष्कळ पैसाही कमाऊन आलेले असून तो वाढविण्याचे जे साधन व्यापार व उदीम तो करण्याची मोकळीक (नसल्याने) आपल्या ज्या जुलमाने त्याची वाढ न होता तो धुळीस मिळून आम्हांस, आमच्या संततीस दारिद्रावस्थेत राहणे भाग पडले.

इ.स. १८५८ तील राणी सरकारचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला आहे की, आमच्या रयत लोकांपैकी जे कोणी विद्येने, हुषारीने व प्रामाणिकपणाने जी जी सरकारी कामे यथाशक्ती चालविण्यास लायक असतील ती ती कामे सवड असेल त्याप्रमाणे बिनदिक्कत व नि:पक्षपाताने त्या लोकांस ज्ञात किंवा धर्म मनात न आणता द्यावी. तरी आम्हांस मिलिटरी खात्याशिवाय इतर सवलती व सिव्हिल खात्यात (Civil) थोडीबहुत इंग्रजी-मराठी विद्या (तिची मलई तर प्राप्त न होता खरपुडी मात्र) प्राप्त झाली असून कोठे ऑफिसात, पोलिसात, रेल्वे खात्यात, पोस्टात, पट्टेवाल्यात किंवा दुकानदारापाशी चाकरी न मिळाल्यामुळे व्यापार कसा करावा, कलाकौशल्याचे ज्ञान कसे करुन घ्यावे व सिव्हिल खात्यातील राजकीय माहिती व कायदेकानून कसे आहेत, ह्याचे काहीच ज्ञान ह्या आपल्या जुलमामुळे होत नसून फारच हलक्या व नीच चाकऱ्या कराव्या लागतात. कोणीतरी विचार करुन पहा की, चांगली चाकरी मिळत असता कोणी जाणूनबुजून हलकी चाकरी पतकरील काय? असा प्रश्न गोपाळ बाबा वलंगकर व्यक्त करतात.

दलितांची व्यथा मांडतना ते म्हणतात आम्हांस कोकणातील बाजारहाटात किंवा वाणी गुजराच्या दुकानावर काही माल, सवदा अगर कापड वगैरे घ्यावयाचे असल्यास ते चांगले पाहून पारखून, आपल्या हाती मोजून मापून व सूत वगैरे घ्यावयास मिळत नसल्याने व्यापाऱ्याने एक माल लांबून दाखवावा आणि दुसरा माल ठरविलेल्या किंमतीपेक्षा अर्ध्या किंमतीचा पदरात टाकावा. कारण एकदा शिवलेला माल मी परत घेणार नाही हे त्यास पक्के माहीत असते. जर कोणी फिर्याद केल्यास मामलेदार, पोलीस फौजदार, शिपाई वगैरे पवित्र हिंदू असल्याने बिचाऱ्या महारासच लबाड, लुच्चा अशी दुर्वचने बोलून काही दाद न लागू देता २ किंवा ४ दिवस एर्वि घालवून तू शिवलेला माल परत कसा घेता येईल, असे म्हणून हाकून देतात. असे आहे म्हणून कोणी फिर्यादीच्या भरीस न पडता मुकाट्याने जो तो आपापल्या घरची वाट धरतो. अशा रीतीने आम्ही अधिकच दरिद्री होऊन आमच्या पैशावर कोकणचे व्यापारी सधन होऊन चैन भोगीत आहेत.

आम्हांस चांगले घर अगर अंगभर कापडे वापरण्यास अधिकार नाही. जर केले तर महार माजला म्हणून खोत, पाटील लोकांचा डोळा त्याजवर बसून कोणत्याही प्रकारे संकट त्याजवर आणून तो अगदी राखेच्या पुंजीवर बसेपर्यंत त्याचा पाठलाग करतील तेव्हा त्यांस सोडतील.

आम्हांस कोठे एका गावाहून दुसऱ्या गावास आपल्या आप्तास भेटण्यास अथवा तो आजारी असल्यास त्यास औषध वगैरे लवकर घेऊन जाणे असल्यास किंवा कोणी मेला त्यास मुठमाती देण्यास जाण्याचे असल्यास व त्यामध्ये मोठी नदी किंवा खाडी आडवी आली असली व तेथे आपणांस पवित्र मानणाऱ्या हिंदूंची स्वारी असल्यास ते सर्व उतरुन जात तोपर्यंत आम्हांस तेथे तिष्ठावे लागते. अशा हरकतीमुळे आजारी असेल त्याने मरावे वा मेला असेल त्याने माती व्हावी. याप्रमाणे लोकांच्या अभिमानाच्या जुलूमाप्रमाणे आमचे अनेक प्रकारचे नुकसान होते आहे ते विस्तारभयास्तव येथे अधिक न दाखविता थोडेच दिले आहे.

गोपाळ वंलंगकर म्हणतात की, महार हा गरीब, विश्वासू, मेहनती आहे हे सर्वांस प्रसिद्ध आहे, तर ह्याच्या मेहनतीचे फळ आम्ही पवित्र वर्णांनी घ्यावे व ह्यास असाच गरिबीत, दारिद्र अवस्थेत ठेऊन ह्याने गुलामाप्रमाणे आमची सेवासुश्रूषा करावी म्हणून काहीतरी त्यास दूषण ठेऊन देऊन दूर ठेवावा व आपले व्यवहारकार्य साधावे. जर आपण ह्यास जवळ केला तर आपला सर्व व्यवहार त्याच्या लक्षात येऊन हा हुषार झाल्यावर उद्धट होऊन विश्वासू राहणार नाही असे समजून किंवा ह्यांच्या पूर्वजांचे आणि महारांच्या पूर्वजांचे काही कारणांवरुन हाडवैर पडले म्हणून त्यांनी ह्यास दूर करण्याचा प्रयत्न करीत गेले असे ते व्यक्त करतात.

ते म्हणतात उच्च वर्णीय लोक इतर जातीपेक्षा आपणास पवित्र समजून आमचा तिरस्कार करतात तर करतातच; पण इतरधर्मी लोकांस किंवा शूद्रादी अगदी लहान जातीच्या लोकांसदेखील त्याप्रमाणे करण्यास उत्तेजन देतात. म्हणजे ह्या कोकणस्थान वा कोकणात महार, चांभार व मांग ह्याशिवाय वर दर्शविलेल्या सर्व जाती ब्राह्मणांप्रमाणे पवित्र असून, छायास्पर्शांचा वीट मानितात. तर हा नीतीविरुद्ध, बुद्धीचार, सद्धर्माविरुद्ध व सृष्टीविरुद्ध जुलूम आहे यात संशय आहे काय ?

आमच्या ह्या विनंतीपत्रांचा विचार राष्ट्रीय सभेतही झाला पाहिजे. कारण मागील वर्षाच्या सभेत लॉर्ड डफरीन साहेबाने केलेला उपदेश वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाला आहे की, राजकीय मागण्या मागण्यापेक्षा अगोदर सामाजिक सुधारणेचा विचार करावा. लग्नकार्यात शक्तीबाहेर खर्च करणे, व्यापार वाढविणे, ओंगळ चाली टाकणे, यांचा विचार करा. आमच्या ह्या विनंतीचा विचार झाल्यास इंग्रजी लोकांस कळून येईल की, सामाजिक सुधारणेचा विचार ह्या सभेत होत असतो. आम्हा अज्ञजनांसही वाटेल की, सभा आमच्या हिताची आहे. म्हणून सभेचा कोणत्याही प्रकारे मोड न होता वर्षानुवर्षे हिची अधिकाधिक भरभराट होऊन ती चिरायू होवो.

आणखी आमची विनंती आहे की, महाराच्या छायेने सर्व कोकणस्थ पवित्र हिंदूंचे डोके, पोट दुखत असेल अथवा शरीर पोळून त्यावर फोड येत असतील किंवा महाज्वर होत असेल व स्पर्शाने पटापटा मरुन नरकात जात असल्यास आमच्या पत्राचा विचार न करता ते परत पाठवावे किंवा फाडून टाकून आम्हांस कळवावे की, असे खरोखर होते. म्हणजे आम्ही सर्व कोकणस्थ महार हा प्रांत सोडून जेथे हिंदूंचा वाराही लागणार नाही अशा देशात जाऊन राहण्याविषयी सरकारास अर्ज देऊ. पण आपणा सर्व जातीच्या हिंदूंस असे दु:ख देणार नाही.

विनंतीपत्र या लेखातून गोपाळ बाबा वलंगकर यांना दलिताच्या जगण्याची शोकांतिका वेदना आणि वास्तव प्रश्न मांडले आहे त्यांना न्याय मिळावा अशी त्याची अपेक्षा आहे.

आपली प्रगती तपासा :

१) विनंती पत्रातून कोणती मागणी केली आहे. थोडक्यात सांगा.

२) गोपाळ बाबा वलंगकर यांची अस्पृश्य समाजा बद्दलची भूमिका थोडक्यात सांगा.

९.३.३ अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

अस्पश्योन्नतीचा आर्थिक पाया हा डॉ. आंबेडकर यांचा लेख आहे. या लेखाला महाडच्या चवदार तळ्यावर डॉ. आंबेडकरांनी हजारों दलित बांधवाच्या सहकार्याने केलेल्या सत्याग्रहाची पार्श्वभूमी आहे. या सत्याग्रहानंतर चित्रावशास्त्री नावाच्या गृहस्थानी अस्पृश्यांनी स्पृश्यांशी संघर्ष करु नये कारण त्यांची उपजिवीकाच स्पृश्यांनी त्यांना दिलेल्या लहान मोठ्या कामांवर अवलंबून असल्याने स्पृश्यांनी बहिष्कार टाकल्यास अस्पृश्यांना जगणेच कठीण होईल असे विधान केले होते. डॉ. आंबेडकरांनी या विधानाचा आपलेमत व्यक्त करण्यासाठी अस्पृश्यांची आर्थिक स्थिती दुबळी असण्याची कारणे स्पृश्यांनी त्यांना प्रगतीची संधी हेतूपूर्वक नाकारणे यातच आहेत हे लक्षात आणून दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांना सत्याग्रह करायला लावून जणू काही त्यांना मोठ्या अडचणीत आणले असा सूर मुंबईच्या तत्कालीन वर्तमानपत्रातील एका संपादकाने लावला होता. दलित सत्याग्रह करतील तर स्पृश्य त्यांना कामे नाकारतील आणि त्यांचीच उपासमार होईल अशी भीती या संपादकाने व्यक्त केली होती. डॉ. आंबेडकरांनी या लेखातून त्या संपादकाचा समाचार घेतला आहे. त्यांना दलिताबद्दलची भूमिका व्यक्त केली आहे.

डॉ. आंबेडकर चित्रावशास्त्री व तथाकथित सुधारकांना असा प्रश्न विचारतात की, मुंबईतील कामगारांनी भांडवलदारांविरुद्ध संप केला तर तुम्ही त्यांना प्रोत्साहन देता आणि भांडवलदारांनी कामगारांची पिळवणूक तात्काळ थांबवावी म्हणता पण दुसऱ्या बाजूला अस्पृश्यांना मात्र सत्याग्रह न करण्याचा सल्ला देता व त्यांची पिळवणूक करणाऱ्या त्यांना मूलभूत हक्क नाकारणाऱ्या ब्राह्मण सवर्ण लोकांना मात्र "दलितांची पिळवणूक थांबवा" असे सांगण्याऐवजी दलितांनाच घाबरवता हा दुटप्पीपणाच म्हणावा लागेल असे मार्मिक विधान करुन डॉ. आंबेडकरांनी तथाकथित सुधारकांचा हा कावेबाजपणा त्यांच्या लक्षात आणून देतात.

समाजातील दलित वर्गाला सवर्णांचा गुलाम बनवायचे नसेल तर त्यांनी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाले पाहिजे. तसे ते झाले तर कुणीही त्यांची पिळवणूक करु शकणार नाही आणि अपमानही करु शकणार नाही. असे भाकित डॉ. आंबेडकर वर्तवतात. त्यानंतर ते दलितांच्या गुलामीची चिकित्सक, तार्किक कारणमीमांसा करतात. ते म्हणतात की भारतीय समाजात पारंपरिक व्यवसाय करण्याची पद्धत आहे पण महारांना बलुतेदारीत स्वतंत्र असा धंदा, व्यवसाय मुद्दामच दिलेला नसावा. त्यांनी त्रेवर्णिकांची सेवा करावी असे धर्म सांगतो, ते सरकारी वतनदार आहेत असे पूर्वापार म्हटले जात असले तरी त्यांच्यावर अधिकार चालतो तो सवर्णीयांचाच म्हणजे 'सरकार' सर्व लोकांचे आहे त्यामुळे ते म्हणतील ती सर्व कामे - ती अप्रतिष्ठेची असली तरी महारांना मुकाट्याने करावी लागत आहेत. महारांना न्याय देणारे ही सवर्ण आहेत त्यामुळे महारांनी त्यांना सांगितले गेलेले काम नाकारले तर त्यांच्यावर अत्याचार करण्याचे, त्यांना अघोरी शिक्षा करण्याचे सगळे अधिकारही सर्व शासनकर्त्यांच्याच हाती आहेत. त्यामुळे नाईलाजाने महारांना न आवडणारी, न पटणारी गलिच्छ कामेही मुकाटपणे करावीच लागतात.

डॉ. आंबेडकरांनी हिंदु धर्मियांची जुलमी विषमतेवर आधारलेली चातुर्वर्ण्य व्यवस्थाच दलितांसाठी प्रगतीचे दरवाजे बंद करणारी आहे. त्याला विरोध करतात. डॉ. आंबेडकर म्हणतात एखादा मुसलमान किंवा पारशी जर गावाचा मुख्य असला तर त्याने दलितांवर अन्याय केला नसता पण गावोगावी हिंदूचेच पाटील सरपंच धुरीण आहेत त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींसाठीही दलितांवर अन्याय होतो. दलितांनी चांगला पोशाख केला, मेलेल्या गुरांचे मांस खाल्ले नाही तरी त्यांना पाटील शिक्षा करतात, तेव्हा हिंदु धर्मियांनी त्या पाटलांना सवर्ण म्हणून दिलेले अधिकारच त्यांना तसे वागायला प्रवृत्त करतात, असे डॉ. आंबेडकरांना जाणवते. म्हणून महारांनी वतने सोडवित बलुते मागणे सोडावे तरच त्यांची गुलामगिरी, स्पृश्यावलंबी जगणे संपेल असे डॉ. आंबेडकर सांगतात.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर दलितांचा सत्याग्रह हा त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठीही आहे असे आंबडेकर सांगतात. अस्पृश्य सत्याग्रहाच्या परिणामांना घाबरणार नाहीत असा आंबेडकरांना विश्वास वाटतो. स्वत:च्या स्वांतत्र्याचे समान हक्काचे ध्येय दलितांना सत्याग्रहाचे परिणाम सोसण्याचे बळ देईल अशी खात्री डॉ. आंबेडकरांना वाटते. ज्याप्रमाणे सगळे भारतीय इंग्रजांनी चालवलेल्या पिळवणूकीचा बहिष्कार म्हणून परदेशी कापड, वस्तू यांवर बहिष्कार टाकतात त्याप्रमाणेच दलित स्वत:च सवर्णावर बहिष्कार टाकतील. सर्व कामे देऊन आपल्यावर उपकार करत नसून तेही आपल्या सेवेवर अवलंबून आहेत याची आठवण दलित सवर्ण मंडळींना करुन देतील. डॉ. आंबेडकर सांगतात की दलित त्यांच्या वल्गनांना घाबरणार नाहीत. दलितांना सवर्णीयांनी गुलाम केले आहे. आर्थिक दृष्ट्या स्वत:वर अवलंबून ठेवले आहे हे स्पष्ट करताना डॉ. आंबेडकरांनी महाभारतातील एका प्रसंगाचा संदर्भ देऊन भीष्म, द्रोण व शल्यही कौरवाचे गुलाम बनले होते हे केवळ पैशांमुळेच याची आठवण देणारा श्लोक उधृत केला आहे. त्यावरुन त्यांचा व्यासंग जाणवतो.

दलितांच्या वतन व्यवस्थे विषयी डॉ. आंबडेकर सांगतात की जन्माला येणारा प्रत्येक माणूस काही आपला धंदा सोबत घेऊन जन्माला येत नाही. त्याला आपली उपजिविका करण्यासाठी धंदा शोधावाच लागतो हे लक्षात घेऊन महारांनी स्वत:चे वेगळे व्यवसाय, उद्योग सुरु करावेत. त्यांना तो अधिकार आहेच पण धर्मभोळेपणामुळे बरेच महार स्वतंत्र व्यवसाय करायला घाबरतात. ही भीती दूर टाकून महारांनी सर्वणपासून दूर आपल्या स्वतंत्र वसाहती

उभ्या केल्या पाहिजेत तर ते निर्भयपणे आपला वेगळा व्यवसाय सुरु करु शकतील असे डॉ. आंबेडकर सांगतात सवर्णीयांपासून दूर गेल्याने महार स्वतंत्र होतील, स्वेच्छेने आपला व्यवसाय शोधतील, कोणी दुकान सुरु करेल, कुणी शिंपी बनेल पण मानाने जगेल. ते स्वत:च्या जगण्याचा मार्ग शोधतील.

म्हैसूर संस्थांनाच्या राजाने दलितांना स्वतंत्र वसाहत उभी करण्यास मदत केली त्यामूळे त्यांची स्थिती सुधारली हे उदाहरण देऊन डॉ. आंबेडकर इतर गावांतील दलितांसाठी तेथील सवर्णियांनी मदत केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतात. महारांनी शेतीवरच संपूर्ण भार टाकू नये तर त्याखेरीज अन्य व्यवसाय शोधावेत असे डॉ. आंबडेकर सुचवतात महारांना असा स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य पटकन मिळणार नाही पण तरीही प्रयत्नपूर्वक त्यांनी छोटा - मोठा धंदा करावा असे आंबडेकर सुचवतात. महारांनी घरोघरी खादी विणावी, अन्य महारांनी ती विकत घ्यावी असे करत करत महारांनी आपले मूलभूत मानवी हक्क मिळवायचे असतील तर त्यांनी सवर्णांनी लादलेली आर्थिक गुलामगिरी व परावलंबीत्व सोडले पाहिजे या मुद्यावर डॉ. आंबेडकर भर देतात.

अशाप्रकारे दादोबा पांडुरंग, मुकुंदराव पाटील व डॉ. आंबेडकर यांनी सर्वसामान्य भारतीय, शेतकरी व दलित यांच्या आर्थिक स्वावलंबनासंबंधी, दारिद्र्य निर्मुलना संबधीविचार मांडले आहेत. आजही ते उद्‌बोधक आहेत.

९.३.४ सामाजिक समता - मे. पु. रेगे

'सामाजिक समता' या लेखातून मे. पु. रेगे यांनी समाजातील सामाजिक बांधिलकी मानवाचे वर्तन कसे असावे या विषयी विवेचन केले आहे. 'सामाजिक समता', कायद्याने, सवलतीने मिळू शकते का? या प्रश्नावर चर्चा होऊ लागली. मे. पु. रेगे यांनी आपल्या लेखात त्या संदर्भातच तार्किक युक्तिवाद केलेला दिसतो.

मे. पु. रेगे यांच्या मते एखाद्या सामान्य नियमाखाली येणाऱ्या दोन व्यक्तींना जर आपण सारखी वागणून दिली नाही तर आपण त्यांच्यात भेदभाव केला असे होईल. पण काही वेळा नियमच पक्षपाती असतील तर त्यांच्या अंमलबजावणीने समानता येणार नाही. उदा. सर्व ब्राह्मणांना अध्ययनाचा अधिकार आहे पण कुणाही अस्पृश्याला अध्ययनाचा अधिकार नाही हा नियमच पक्षपाती आहे त्यामुळे तो नि:पक्षपातीपणे राबवल्याचा समता येण्याळेवजी असमानताच अधिक येईल. समतेच्या तत्त्वाला आदर्शाचा पाया असण्याऐवजी मानवतेचा पाया असला पाहिजे. माणसामाणसांत त्यांच्या इच्छा-आकांक्षा, आवडी-निवडी, शक्ती यांच्यात फरक असणारच. तसा तो नसावा असा आग्रह धरणे हा अतिरेक आहे त्यामुळे आदर्श समाज निर्माण होईल हा गैरसमज आहे. माणसे एकमेकांसारखी बनवणे हे समतेच्या तत्त्वाचे उद्दिष्ट नसते. तर माणसे एकमेकांसाठी नसली तरी त्यांना समतेने वागावा असे हे तत्त्व सांगते.

रेगेंच्या मते दोन माणसांना वेगळी वागणूक देण्याची कोणती कारणे प्रस्तुत ठरावी हे मानवी तत्वांवर ठरवले पाहिजे म्हणजे आजारी व निरोगी माणसांना वेगळे वागवणे हे आपण मानवी तत्त्वांनी सांगू शकतो पण काळ्या-गोऱ्यांना किंवा ब्राह्मण-दलितांना वेगळे वागवणे हे अमानवी, अमानुष आहे म्हणूनच ते अप्रस्तुत ठरेल. प्रत्येक माणसांकडे बुद्धी असतेच आणि त्यामुळे प्रत्येकजण आपल्या हिताचा विचार करू शकतो. त्याअर्थी माणसे स्वायत्त असतात आणि इतर

कोणतीही माणसे आपल्यासारखीच स्वायत्त आहेत हेही त्यांना कळत असते. समाजात एकत्र राहताना स्वाभाविकच व्यक्तीच्या हिताला मर्यादा पडतात. प्रत्येकाचे हित इतरांच्या हिताशी सुसंगत असावे लागते. आपल्या हितावर येणाऱ्या मर्यादा सर्वांनी स्वेच्छेने स्वीकारलेल्या असाव्या लागतात. त्या जर इतरांनी त्याच्यावर लादल्या तर तिथे विषमता निर्माण होते, असंतोष निर्माण होतो. उदा. दलितांना शिक्षण न देणे म्हणजे त्यांना त्यांच्या स्वहिताचे, विकासाचे मार्ग बंद करणे. पण ही रीत हिंदू धर्मातील विशिष्ट लोकांनी स्वतःचे सर्वाधिक हित साधण्यासाठी मुद्दाम राबवली त्यामुळे दलितांना विषम वागणूक मिळाली.

मे. पु. रेगे म्हणतात, ''व्यक्ती-व्यक्तींत निष्कारण भेद करता कामा नये, एवढेच समतेच्या तत्त्वाचे म्हणणे नसते. माणसे एकमेकांपासून कितीही भिन्न असली तरी ती मूलतः सारखी आहेत व म्हणून त्यांना लाभकारी वागणूक मूलतःसारखी असली पाहिजे असे काही तरी समतेच्या तत्वाचे म्हणणे असले पाहिजे.''

समाजातील माणसामाणसात आवडी-निवडी, इच्छा-आकांक्षा, शक्ती-बुद्धी या वेगवेगळ्या असलेल्या तरी काही मूलभूत गोष्टी माणसांत सारख्याच असतात. प्रत्येकाला जगण्याचा, मालमत्ता, याविषयीचा करार करण्याचा, विचार करण्याचा हक्क असणे हे मूलभूत सारखेपण म्हणावे लागेल. या मूलभूत सारखेपणाला कुठे बाधा आणली गेली तर विषमता निर्माण होते. अर्थात सर्वांना समान मूलभूत हक्क मिळाले तरी एक विषमता शिल्लक राहतेच. ती म्हणजे आर्थिक विषमता. त्यामुळे संपूर्ण समता कोणत्याही समाजात अशक्य ठरते.

'सामाजिक समता' या वैचारिक लेखाचा अभ्यास करताना लेखक मे. पु. रेगे यांनी सामाजिक समतेबाबतची विचारसरणी मांडली आहे. ती उल्लेखनीय आहे. सामाजिक समता याचा अर्थ सर्वांना समान लेखणं, दुजाभाव न करणे, ज्या संधी उपलब्ध असतील त्यांची वाटणी समान करणे तसेच सर्व माणसांना समान वागणूक देणे. समता या अनेक प्रकारच्या असतात. उदा. आर्थिक समता, राजकीय समता, सामाजिक समता कोणत्याही प्रकारची समता समाजातप्रस्थापित करत असताना प्रथमतः मानवानेच पाया रचणे आवश्यक आहे. परंतु माणसा-माणसात फरक असल्याने सर्वांना सारखी वागणूक मिळतेच असे नाही. समाजात सामाजिक समता, प्रस्थापित करताना जात, पंथ, धर्म, वंश, भाषा, प्रदेश या गोष्टी दुर्लक्षीत कराव्या लागतात. कोणत्याही गोष्टीचा निकाल निपक्षपातीपणे लावावा लागतो. परंतु जर हे नियम प्रत्यक्षात पाळले गेले नाही तर मात्र समाजात विषमता वाढते.

सामाजिक समतेची आवश्यकता पटवण्यासाठी ''सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे आहेत म्हणून ती समान आहेत'' असे आध्यात्मिक विधान अनावश्यक आहेत. त्यापेक्षा प्रत्येकाने स्वतःला मिळालेले मूलभूत मानवी हक्क दुसऱ्यालाही मिळतात ना हे पाहिले पाहिजे. स्वतःचे आचरण समान वागणूक देणारे ठेवले पाहिजे असे मे. पु. रेगे यांना वाटते.

प्रत्येकाला स्वतःचे हित साधण्याचे स्वातंत्र्य आहे. हे सामाजिक समतेसाठी अत्यावश्यक ठरते असा निष्कर्ष मे. पु. रेगे काढतात. त्यानंतर ते माणसांतील आर्थिक विषमतेचा तार्किक पद्धतीने शोध घेतात. त्यांच्या सांगण्यानुसार विचारवंत समाजातील विशिष्ट माणसांना वापरून जर एखाद्याने अधिकाधिक सुख मिळविले तरी त्याला विरोध करणार नाहीत कारण समाजात सुख निर्माण होण्यासाठी, मालमत्ता निर्माण होण्यासाठी काही माणसांना विषम वागणूक

मिळणे त्यांना अन्याय वाटत नाही पण मानवतावादी, समतावादी दृष्टीने ही भूमिका चुकीची आहे. समाजात मालमत्ता निर्माण व्हायला पाहिजे, पण त्यासाठी सर्वांचे परिश्रम महत्त्वाचे आहेत आणि मिळालेल्या मालमत्तेचा किंवा सुखाचा सर्वाधिक वाटा एकाच माणसाला म्हणजे भांडवलदारीला मिळणे त्यापेक्षा अन्यायकारक आहे. संपत्ती, मालमत्ता, सुख मिळवण्याचा हक्क कष्ट करणाऱ्यांचाही आहे तो केवळ भांडवदारांनाच असून चालणार नाही असे मे. पु. रेगे स्पष्ट करतात. त्यांच्या मत्ते ज्यांना कंटाळवाणे, कष्टाचे काम करावे लागते त्यांना पगार जास्त मिळाले पाहिजे आणि ज्यांना केवळ बुद्धिचा वापर करून काम करावे लागते आहे त्यांना कमी पगार मिळाला पाहिजे. रेगे या लेखातून सामाजिक समतेबद्दलची मते व्यक्त करतात.

आपली प्रगती तपासा :

१) 'सामाजिक समता' या वैचारिक लेखाचा आशय थोडक्यात लिहा.

२) मे. पु. रेगेची समते बद्दलची भूमिका थोडक्यात सांगा.

❖❖❖❖

१०

वैचारिक गद्यातील लेख

घटक रचना :

१०.१ आपला धंदा कोणता व कसा करावा
१०.२ शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय
१०.३ स्त्री विद्याभ्यास : शंका निवारण
१०.४ सख्यत्वासाठी

१०.१ आपला धंदा कोणता व कसा करावा? - दादोबा तर्खडकर :

१९ वे शतक हे भारताच्या दृष्टीने ज्ञानाचे नवनवीन जाणीवेचे शतक होते. या नव्या जाणीवा पाश्चिमात्यांमुळे आपल्या समाजात निर्माण झाल्या. याच कालावधीत ब्रिटीशांनी भारताचे आर्थिक शोषण करण्यास प्रारंभ केला. उत्पादनाच्या नवनवीन पद्धती व आधुनिक तंत्रज्ञान यांच्या साहाय्याने त्याने औद्योगिक क्रांती सुरू केली. परिणामी त्यांच्या मालाचा दर्जा चांगला असल्याने त्यांचा खप वाढला परंतु याचा उलटा परिणाम मात्र भारतीय कामगार व कारागिरांवर झाला. याच कालावधीत प्रारंभी मुंबई शहराला महत्त्व प्राप्त झाले. तसेच मुंबईत शिक्षणाचे वारे मोठ्या प्रमाणात वाढू लागले परिस्थितीला अनुसरून अनेक साहित्यिकांनी लेखन केले त्यामुळे दादोबा पांडुरंग तर्खडकर, बाळशास्त्री जांभेकर, परशुराम तात्या गोडबोले, नारायण विष्णू पडवळ, बापू छत्रे, हरि केशवजी पठारे, गोविंद नारायण माडगावकर असे अनेक विद्वान साहित्यिक मुंबईतच निर्माण झाले. त्यापैकी दादोबा तर्खडकर यांनी आर्थिक गोष्टींवर आधारित लेखन करण्यास भर दिला त्यातूनच 'आपला धंदा कोणता व कसा करावा' या संदर्भात त्यांनी वैचारिक लेखन केले आहे.

सुरूवातीलाच तर्खडकर यांनी नमुद केले आहे की, मनुष्यामध्ये जातीला महत्त्व नाही आणि असल्यास ते देऊ नये. तसेच धंद्यातही उच्चनिच्च अशी कोणतीही जात नसते. मात्र पूर्वीपासून धंद्यावरून जात भेद मानला गेल्याने जातीमध्ये भेद वाढत चालला आहे. तुम्ही कोणतेही काम करा पण ते मनापासून करा. त्या कामाचा जातीशी कोणताही संबंध जोडू नये. उदा. एकाने कागदावर सुंदर अक्षर लिहीले आहे दुसऱ्याने कागदावर सुंदर चित्र काढले आहे व तिसऱ्याने नकाशा काढला आहे. लिहिणारा यापैकी अक्षर लिहीणारा कारकून उच्च धंद्याचा व जातीचा बाकीचे मात्र निच धंद्याचे हे समजणे फार चुकीचे आहे.

आपला उदनिर्वाह चालविण्यासा आपण जो धंदा स्विकारला असेल, तो मोठ्या सचोटिने, श्रमाने, हुशारीने व लक्षपूर्वक चालविला पाहिजे. अशा गुणांनी आपले गुणांचे परीक्षण व गिऱ्हाईक यांची मने प्रसन्न ठेवली पाहिजेत, म्हणजेच आपला धंदा व लौकिक वाढवून पैसा

मिळतो. त्या शिवाय कोणताही धंदा स्वतंत्रपणे करण्यास लाज न बाळगता उलट प्रतिष्ठा मानून व्यवस्थितपणे केला पाहिजे. आपल्या देशात कारागिरी स्वतंत्र धंदा व दुकानदारी, गायन, वाद्य इ. मनोरंजन कला यांना मान नसल्याने ही सर्व कामे लोक हलकी समजतात व फक्त लिहीणे कारकूनी करून कचेरीत रोजगार मिळविणे ही मोठ्या प्रतिष्ठेची कामे समजली जातात त्यामुळे देशाची फार हानी होते. ती सर्वांनी लक्षात घेतली पाहिजेत.

आपल्याकडे फावला वेळे असेल तर कोणतेही काम अगर धंदा करण्यास लाजू नये असे दादोबा तर्खडकर व्यक्त करतात. ते म्हणतात उदा. सोन्याचे दागिने घडविणे, अंगरखा शिवणे, जोडे शिवणे व इतर छोट्या-मोठ्या वस्तू बनविणे ही कामे करायला हवीत, उलट छोटी कामे करण्यात मनुष्यास लौकीक प्राप्त होतो. उदाहरणा दाखल सांगायचे झाले तर पुण्यातील मोरे शास्त्री साठे हे पाठशाळेत मुख्याध्यापक असताना स्वत:च्या घरी रिकाम्या वेळेत ते महिलांचे दागिने स्वत:च्या हाताने घडवत असत व इतर कामे ही ते करत असत. या कारणास्तव पुष्कळ प्रतिष्ठीत लोक त्यांची निंदा करत परंतु तर्खडकर यांनी मात्र त्यांची स्तुती केली आहे.

सर्वसाधारणपणे प्रत्येक मनुष्याने आपल्याला ज्या धंद्यात रस आहे, जो धंदा आवडीचा आहे, तो धंदा करायला लाजू नये. कोणाला हस्तकलेची आवड असते. कोणाला गाण्याची, वाद्य वाजवण्यांची तर कोणाला व्यापार-धंद्याची आवड असते प्रत्येक मनुष्याच्या ज्ञानाचे कल निरनिराळे असतात. ते लहानपणी मुलांमध्ये समजून येतात. मग आपण तसे कल पाहून मुलांना योग्य ती दिशा दिली पाहिजे. त्यांना आवडत्या कलेनुसार त्यांना शिक्षण दिले पाहिजेत. धंदा व व्यवसायातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नितीमत्ता होय. कोणतेही काम करताना मन प्रसन्न ठेवावे तसेच मनाशी प्रामाणिक राहून सचोटीने व्यवहार करावा.

आपले ग्राहक दु:खी होणार नाही याचा विचार करून धंदा करावा. केवळ अतिरिक्त नात्यापोटी समोरच्या व्यक्तीशी व्यवहार करून नये. हीच गोष्ट आपण आपल्या पुढील पिढीस शिकवणे गरजेचे आहे. एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची ती म्हणजे पैसा व धंदा रोजगार मिळविण्यात आळस, धर्म, परस्परांचा द्वेष या गोष्टी आडव्या येता कामा नये जेणे करून आपल्याच हातून आपले व देशाचे आपण नुकसान करू शकणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. धंदा, व्यवसाय याची निवड कशी करावी आणि ते कोणत्या पद्धतीने करावे या संबंधीचे उपदेश, विचार दादोबा तर्खडकर यांनी या वैचारिक लेखातून सांगितले आहे. त्यांचा हा लेख म्हणजे कोणता व्यवसाय करावा, या विषयी योग्य मार्गदर्शन करणारा आहे.

आपली प्रगती तपासा :

१) 'आपला धंदा कोणता व कसा करावा' या वैचारिक लेखातील आशय थोडक्यात लिहा.

_____

_____

_____

_____

_____

२) 'व्यवसाया विषयी' दादोबा तर्खडकर यांची थोडक्यात मत सांगा.

१०.२ शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालवण्याचे उपाय - मुकुंदराव पाटील :

शेतकरी हा स्वतः उत्पादक असून त्याला कधीकधी पुरेसे अन्नधान्य मिळत नाही. देशाच्या आर्थिक उलाढालीत तसेच व्यापारात शेतीचा प्रमुख वाटा आहे, असे असूनही शेतीकडे शासनाचा पाहण्याचा दृष्टीकोन योग्य नाही. त्यामुळे अलिकडच्या शेतकऱ्यांची स्थिती फारच खालावलेली आहे असे मुकुंदराव पाटिल यांच्या वैचारिक लेखनातून व्यक्त होते.

प्रामुख्याने शेतकऱ्यांची पूर्वीची पार्श्वभूमी पाहिल्यास असे दिसते की त्यावेळचा शेतकरी आजच्या शेतकऱ्यांच्या मानाने समृद्ध नसला तरी खाऊन-पिऊन तो सुखी जीवन जगत होता. कारण त्याकाळी जमिनीच्या वाटण्या नव्हत्या, महागाई नव्हती, शेतकऱ्यांचा काही अपवाद सोडला तर व्यसनाधिनतेचे प्रमाणही कमी होते शिवाय ते घेत असलेले कर्जाचे प्रमाणही कमी होते. त्यामुळे त्याकाळी पैशाचे एवढे मोल नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची देवाण-घेवाण ही वस्तुच्या स्वरूपात होत असे. समाजात सुतार, लोहार, चांभार, कुंभार, नाव्ही, परीट (धोबी) यासारखे बारा बलुतेदार असल्याने तेव्हाच्या शेतकऱ्यास आताच्या शेतकऱ्याप्रमाणे पोटभर अन्न मिळवण्याची चिंता नव्हती. शिवाय नैसर्गिकदृष्ट्या हवामानही उत्तम प्रकारे होते. शेतकऱ्यांच्या शेतात चांगले पिक येत होते त्यावेळी दळणवळणाची सुविधापू नसल्याने खेड्यातील धान्य बहुदा खेड्यातच राहत असे. पूर्वीच्या शेतकऱ्यांच्या गरजाही कमी आणि मर्यादित होत्या. आताच्यासारखे कपडे त्यांना नव्हते. त्यामुळे त्यांच्या खर्चाचे प्रमाणही कमी होते. शेतात उत्पादित केलेल्या पिकावर त्यांच्या गरजा पूर्ण होत होत्या पूर्वीचा शेतकरी आताच्या शेतकऱ्याच्या तुलनेने समाधानी होता. पण आताच्या काळात त्याचे स्वरुप बदलले आहे.

पण आता शेतकरी कुटुंबाच्या लग्नात दिवा-बत्ती, पान-सुपारी, वाजंत्री याचा जिका खर्च होतो तितक्याच खर्चात पूर्वीच्या शेतकऱ्यांचे सगळे लग्न होत असे. एखाद्या कित्येकदा गरीबांची दोन-दोन लग्नसुद्धा होत असत. आताच्या सारखे सत्यनारायणाची पुजा, पंढरपुर, काशी यासारख्या तिर्थक्षेत्रांची यात्रा करणे हे प्रकार पूर्वीचे शेतकरी करत नसत आणि त्यांना परवडत नसे. त्यांचा वायफळ खर्च नसे. परंतु हल्लीचे शेतकरी मात्र कोणत्याही सन समारंभाला, लग्न प्रसंगी मोठे खर्च करतात. त्यांना मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतुद करावी लागते. तसेच अनियमित पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. कोरडा पावसाळा, सतत पावसाळा यामुळे दुष्काळासारखी परिस्थिती उद्‌भवते. अलिकडच्या काळात निसर्गाचे संतुलन बिघडल्याने पिकांचे नुकसान होते. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती खालावते.

अलिकडच्या शेतकऱ्यांमध्ये ज्या प्रमाणात ज्ञान, विद्या हवी आहे त्याप्रमाणात त्यांचा विकास झाला नाही. स्वतःच्या शेताचा विकास करण्यासाठी त्यांच्याकडून योग्य त्या उपाययोजना केल्या जात नाहीत. शेतकऱ्यांनी शेतीची सुधारणा करायची असेल तर बी-बियाणे, रासायनिक खते, आधुनिक तंत्रज्ञान, नवीन अवजारे या सर्व गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक आहे. परंतु शेतकरी मात्र आपल्या पारंपारिक पद्धतीनेच शेती करतात. त्यामुळे त्यांच्या शेतीचा विकास होत नाही. त्यांना योग्य त्या पद्धतीत उत्पादन मिळत नाही असे म्हणावे लागेल. शेतकऱ्यांमध्ये एकजूटीचा अभाव आढळतो. त्यामुळे त्यांच्या समस्या सोडविण्यसाठी कोणी ही पुढे येत नाही. एकजुटीच्या अभावामुळे ते उच्च पातळीवर आपल्या संघटना निर्माण करू शकत नाही, जेणे करून त्यांना न्याय मिळत नाही.

ग्रामीण भागातील शेतकरी लोकांमध्ये जातीसंबंधी एखादा तंत्रा किंवा जातीविरुद्ध एखादी गोष्ट घडल्यास त्याचा फैसला पंचांमार्फत होत असतो. हे पंच म्हणजे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती असतात. समाजाच्या सोयीच्या दृष्टीने पाहिले असता जातीमध्ये दुवर्तन वगैरे प्रकार होऊ नयेत, त्यांच्यावर दबाव टाकावा म्हणून ही पंचांची योजना फारच भक्कम आहे. परंतु यथा राजा तथा प्रजा या न्यायाने खुद्द पंचच दुवर्तनी असले म्हणजे मग जाती प्रकरणाच्या फैसल्याची गोष्ट विचारायलाच नको भारतीय शेतकऱ्यांची सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे शिक्षण, प्राचीन काळापासून आजपर्यंत शेतकऱ्यांमध्ये म्हणावा तसा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदललेला नाही. तो बदलणे आजच्या काळाची गरज असते. शेतकऱ्यांमधील शिक्षणाचा अभाव विचारात घेऊन सावकार, जमिनदार, पाटील, कुलकर्णी यासारखे लोक त्यांचा गैरफायदा घेतात. त्यामुळे शेतकऱ्यांना शिक्षणाची नितांत गरज आहे असे मत मुकुंदराव पाटील यांनी या लेखातून व्यक्त केले आहे.

शेतऱ्यांच्या परिस्थितीला त्यांच्या काही इतर गोष्टीही अवलंबून आहेत त्या म्हणजे त्यांची व्यसनाधिनता, अंधश्रद्धा या व्यसेनच्या आहारी गेल्यामुळे त्यांच्या विकासाला खिळ बसते. परिणामी त्यांना कर्जबाजारी व्हावे लागते. या सर्वांतून मुक्ती घडायची असेल तर शेतकऱ्यांचे शिक्षण महत्त्वाचे आहे. शेतकरी संघटना निर्माण झाल्या पाहिजेत, शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायावर त्यांनी आवाज उठवला पाहिजे त्याचबरोबर आधुनिक पद्धतीने शेती करून आपल्या शेतातून अधिकाधिक उत्पादन घेतल्यास व्यापारी दृष्टीकोनातून शेती केल्यास जगातल्या स्पर्धेत त्याच्या मालाला योग्य भाव मिळेल यासाठी प्रयत्न केल्यास शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

आपली प्रगती तपासा :

१) शेतकऱ्यांची 'निकृष्ट स्थिती आणि ती घालवण्याचे उपाय' या वैचारिक लेखातून मुकुंदराव पाटीलाची भूमिका थोडक्यात सांगा.

_____

_____

_____

_____

_____

२) शेतकऱ्यांच्या निकृष्ट स्थितीला कारणीभूत असणाऱ्या गोष्टीची थोडक्यात माहिती द्या.

१०.३ स्त्रीविद्याभ्यास : शंकानिवारण - बाबा पद्मनजी :

'स्त्रीविद्याभ्यास - शंका निवारण' हा वैचारिक लेख बाबा पदमनजी यांनी लिहिला. या लेखात स्त्रीस्वातंत्र्याचा, स्त्रीशिक्षणाचा व समतेचा पुरस्कार त्यांनी केला आहे. बाबा पद्मनजी हे स्त्री समाज सुधारक, प्रार्थना समाजाचे कार्यकर्ते होते. मराठीतील पहिली कादंबरी 'यमुना पर्यटन' बाबा पदमनजी यांनीच लिहिली, म्हणून त्यांना मराठीतील पहिले कादंबरीकार म्हणून ओळखले जातात. त्यातही त्यांनी तत्कालीन समाजातील विधवांच्या दु:खस्थिती संदर्भात लिहिले होते.

बाबा पदमनजी यांनी या लेखातून तरूण विद्वान व वृद्ध गृहस्थ जो परंपरा मानणारा आहे. बाबा पदमनजी यांनी या लेखातून तरूण विद्वान व वृद्ध गृहस्थ जो परंपरा मानणारा आहे. याचे संभाषण यात व्यक्त होतो. तरूण वृद्ध गृहस्थाला स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो. तर वृद्ध गृहस्थ ते नकारतो हे या लेखातून व्यक्त होते. तत्कालीन सरकारनेच स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी जो कोणी पुस्तके लिहिले त्याला पन्नास रुपयांचे बक्षीस जाहिर केल्याचे सांगतो. पण वृद्धाला ही बातमी आवडत नाही. कारण पैशाच्या अमिषाने लोक अशी पुस्तके लिहितील. घरोघरच्या बायका ते वाचतील किंवा पुरुष ती वाचून बायकांना शिकण्यास प्रोत्साहन देतील आणि त्यामुळे अनर्थ ओढवेल असे त्या वृद्धाला वाटते आहे. त्या वृद्धाच्या मते जे हजारो वर्षापासून चालत आलेल्या धर्मग्रंथात सांगितले नाही ते स्त्रीशिक्षण आपण दिल्यास ते धर्मग्रंथाचा अपमान केल्यासारखे होईल, असे त्या वृद्धाला वाटते.

तरुण विद्वानाला मात्र वाटते की, जे हजारो वर्षात कुणाला सुचले नाही ते जर आता शिकलेल्या लोकांना सुचले असेल तर धर्मशास्त्रात बदल केला धर्मशास्त्र, परंपरा मानणारा वृद्धाला वाटते की स्त्रिया अशिक्षित असल्यानेच संसारात संतुष्ट व तृप्त आहेत. तो तरुण विद्वान त्यांना समजावण्याचा प्रयत्न करतो की, तुम्ही स्त्रियांची उत्तम स्थिती पाहिलेलीच नाही म्हणून तुम्ही त्यांना तृप्त, संतुष्ट समजता. ज्या स्त्रियांच्या मानेवर जन्मापासून मरणापर्यंत सतत पुरुषांचे वर्चस्वआहे, त्यांना स्वातंत्र मिळालेले नाही तर त्या सुखी समाधानी कशा होणार? स्त्रिया मनोमन सुखी नाहीत. पण पुरुषांना त्यांनी दासीप्रमाणे वागावे असेच वाटत असल्याने त्या तशाच समाधानी आहेत असे. पुरुष सोयीस्करपणे समजत आहेत.

स्त्रिया पुरुषांचे जुलूम, अन्या मुकाट्याने सहन करताना दिसत आहेत. कारण त्यांच्याकडे दुसरा पर्याय नाही. शिक्षण दिले तर त्या स्वतंत्रपणे जगू लागतील, अन्याय अत्याचार

सहन करणार नाहीत. आज त्यांच्यात आणि चार पायांच्या पशूत काही अंतर नाही, त्या गायी गुरांप्रमाणे जणू पुरुषांच्या दावणीला बांधल्या गेल्या आहेत, असे सांगून तरुण विद्वान वृद्ध सनातनी माणसाला "विद्या विहिनः पशुः" या संस्कृत वचनाची आठवण देतो.

त्या तरुणाचे वृद्ध माणसाला म्हणणे पटले तरी त्यांच्या मनात अनेक शंका आहेत. कारण त्याला पुर्वपरंपरागत चालत आलेली व्यवस्था पुढे ही चालावी असे वाटते. त्या वृद्धाला वाटते की स्त्रियांच्या व पुरुषांच्या गुणधर्मात फरक आहे. स्त्रिया म्हणजे जणू सापासारख्या आहेत, सापाला जसे दुध पाजले तरी त्याचे विषच होते. तसेच स्त्रियांना शिक्षण दिले तरी त्या दुष्ट, कपटी, नीचच राहतील असे वृद्धाला वाटते. तो तरुण त्या वृद्धाला स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी. तेव्हा तरुण त्यांना परोपरीने समजावून सांगतो की स्त्रिया व पुरुषांचे स्वभाव सारखेच असतात. देवानेच जर स्त्री-पुरुष या दोघांना निर्माण केले असे धर्मशास्त्र सांगते तर त्या दोघांत देव मुद्दाम वेगळे गुणधर्म का ठेवेल? एकाला श्रेष्ठ व दुसऱ्याला कनिष्ठ का बनवेल? तरुणाच्या मते बायकांचा स्वभाव वेगळा नसतो, तर त्यांना सरावाने अनुभवाने घरकामात गती असते आणि पुरुषांना सतत घराबाहेरचे अनुभव घेण्याची सवय असल्याने ते त्यात पारंगत असतात.

त्या तरुणाच्या म्हणणाल्या त्या तरुणाचे एकच विधान वृद्ध गृहस्थ उचलतो की, "स्त्रिया घरकामात योग्य आहेत" त्यांनी तेच काम करावे असा युक्तिवाद करतो. जर स्त्रिया घरकामच करणार असतील तर त्यांना विद्या देण्याची गरज काय? त्यांना काही नोकरी-धंदा करुन पैसे तर मिळवायचेच नसतात आणि सभेत वादविवादही करायचा नसतो, मग त्यांना विद्या शिकवणे वायाच जाणार असे वृद्धाला वाटते. तरूण त्यावर म्हणतो, की विद्येचा उपयोग केवळ पोट भरण्यासाठी पैसे कमावणे किंवा वादविवाद घालणे एवढाच नसतो. विद्येने माणूस हुशार होतो, स्त्रियां शिकल्यावर विद्वान होतील ते योग्य नाही असे तो वृद्धाला सांगतो की त्याने आपला दुराग्रह सोडून विचारपूर्वक बोलावे.

तो वृद्ध धर्मशास्त्र मानणारा आहे म्हणून तो म्हणता जे धर्मशास्त्रात सांगितलेले नाही ते आपण करू नये असेच ठासून सांगतो. तरूण वृद्धाचा राग शांत करण्यासाठी गोड बोलतो आणि आपली धर्मशास्त्रे म्हणजे केवळ रूढी-परंपरा, चाली-रिती यांचा गोंधळ आहे. हे समजावून घेणे गरजेचे आहेत. नव्या युगात काहीच कारण नाही असे आपले मत मांडतो, त्यांच्या मते माणसांनी देशकाल परिस्थिती पाहून वागले पाहिजे. इंग्रजी तरुण विद्वानच्या या स्पष्ट बोलण्याने वृद्ध सनातनी भानावर येतो. पण त्याच वेळी त्याच्या घरातील पुजाअर्चा करणारा उपाध्याय तिथे येतो आणि संभाषणात भाग घेतो. त्याच्या मते स्त्रियांनी पती हाच परमेश्वर मानला पाहिजे, त्याची सर्वकाळ सेवाचाकरी केली पाहिजे, मग तो पती अशक्त, वेडा, व्यसनी, रोगी, वृद्ध कसाही असला तरी चालेल. पुरुषांनी स्त्रियांना कोणतीही महत्त्वाची गोष्ट सांगू नये, त्यांना शिक्षण देऊ नये, शिक्षणापासून त्यांना अलिप्त ठेवावे असे त्या वृद्धाला वाटते.

तरुण विद्वान त्या वृद्धाला सांगतो की तो ज्या धर्मशास्त्रांचे पुरावे देतो आहे तीही माणसांनी, त्यातही पूर्वजांनीच लिहिली असून स्वाभाविकच स्वतःचा स्वार्थच त्यांनी पाहिला आहे. दुसरे म्हणजे स्त्रीचा पती देव झाल्यास खऱ्या देवाची पुजा कोण करेल? माणसे देव कशी होतील? तरुण आपल्या उपाध्यायांशी वाद घालू लागले अशी चिन्हे दिसताच वृद्ध सनातनी उपाध्यायाला घरी जाण्यास सांगतो. या संवादातून शेवटी वृद्ध त्याच्या पूर्वभ्रमाहातून बाहेर काढून

स्त्रीशिक्षण हे कसे आवश्यक, हितकारक आहे हे त्याला पटवून देण्यात तरूण विद्वान यशस्वी झाला आहे. पण तरीही स्त्रियांनी शिकून पुरुषांशी बरोबरी करणे हे भविष्य त्या सनातनी वृद्धांना फारसे आवडणार नाही, असेही ते कबूल करतात.

तरुण त्यांना सांगतो की हा केवळ सवयीचा भाग आहे. एकदा का स्त्रिया शिकून स्वतंत्रपणे वावरणार, आपली मते विचार मांडणार हे आपण स्वीकारले की मग त्या पुरुषांशी बरोबरी करतात याने आपला अहंकार दुखावणार नाही. त्यामुळे आता धर्मशास्त्रांनी स्त्रियांची निंदा केली आहे वगैरे समजूती सोडून देऊन आपण स्त्रियांना शिकण्याची स्वतंत्र होण्याची संधी दिली पाहिजे. वृद्ध सनातनीही शेवटी तरूण विद्यानांची स्त्रीशिक्षणाविषयीची कळकळीने मांडलेली मते समजून घेतो व त्याचे मतपरिवर्तन होते असे बाबा पदमनजी यांनी या वैचारिक लेखातून दाखवले आहे. समाज परिवर्तनांसाठी स्त्री शिक्षण महत्त्व आहे असे या लेखातून व्यक्त होते.

या लेखातून बाबा पद्मनजी यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आहे. स्त्री सुशिक्षित झाल्याशिवाय समाजव्यवस्थेत सुधारणा होणार नाही. स्त्रीयांवरील अन्याय कमी होणार नाही असे त्यांना या लेखातून व्यक्त करायचे आहे.

१०.४ संख्यत्वासाठी - शांता किर्लोस्कर :

संख्यत्वासाठी या लेखातून शांता किर्लोस्कर यांनी 'स्त्री-पुरुष' समानाता यावर लेखातून प्रकाश टाकला आहे. 'संख्यत्वासाठी' या शांताबाई किर्लोस्कर यांचा लेख १९७५ सालातील असला तरी त्यातही पुरुषांनी स्त्रियांचे शिकणे, स्वतंत्र होणे अजून फारसे मानवलेले नाही हेच प्रकर्षाने जाणवते.

स्त्रियांचे राज्य निर्माण होईल अशी काल्पनिक भीती पुरुषांच्या मनात असते कारण त्यांना आपल्या हातची सत्ता जाऊ द्यायची नसते. हे लक्षात घेऊन शांताबाई किर्लोस्कर म्हणतात, की स्त्री-पुरुषांचे नातेच मुळी नैसर्गिक आकर्षणावर आधारलेले आहे. 'तुझे-माझे जमेना पण तुझ्यावाचून करमेना' असा त्यांच्यातील अहकाराचा खेळ चालू असतो. पण हे अहंकार केवळ शारीरिक आकर्षणाचे परिणाम नसून ते समाज व्यवस्थेतील विषमतेचेही परिणाम आहेत असेही शांताबाई स्पष्ट करतात.

समाजातील प्रत्येक स्त्रीला स्वत:चे वेगळे असे अस्तित्व, स्वत:ची वेगळी ओळख हवी असते आणि तीच आपल्या विषम व्यवस्थेत तिला नाकारली जात असल्याने ती अतृप्त, असमाधानी असते. कामगार मजूर म्हणून काम करणाऱ्या स्त्रियांना आपल्या नवऱ्यापेक्षा कमी मजुरी मिळते. शिवाय तिला मिळणाऱ्या मजुरीचा वापर तिला संसाराचा गाडा रेटण्यासाठीच करावा लागतो. त्या पैशातून तिला स्वत:चा विकास साधता येतच नाही. मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशात कसेबसे जीव जगवताना शिक्षण, औषधपाणी या गोष्टी तिच्यासाठी चैनीच्या गोष्टी ठरतात आणि कारकून, शिक्षक, छोटे उद्योगधंदे करणाऱ्या स्त्रियांची परिस्थितीही काही फारशी वेगळी नसते. स्त्रीने अर्थार्जन करावे असे या स्त्रियांच्या घरातील पुरुषांना वाटत असते पण तिच्या पैशांचा संसार चालवताना वापर केल्यावर तिला तिचा स्वत:चा विकास साधण्यास वेळ मोकळीक द्यायला मात्र पुरुष नकार देतात. कारण त्यांना स्त्री स्वातंत्र्य नको आहे. स्त्री ही पुरुषांच्या मर्जी प्रमाणे वागावी अशी त्यांची आस्था असते.

स्त्रिया नवरा शोधताना नेहमी आपल्यापेक्षा वरचढ पुरुष शोधतात आणि मग तक्रार करतात असे पुरुषांचे म्हणणे असते. तर स्त्रियांना असे अनुभव येतात की त्यांना अधिकारी होऊ देण्याची संधी पुरुष हेतूतः नाकारतात. या दोन्ही गोष्टी खऱ्याच आहेत. अजूनही स्त्री आपला विकासाचा मार्ग शोधताना गोंधळलेली असते. कधी ती आपला दुबळेपणा शस्त्रासारखा वापरते तर कधी आपले सामर्थ्य वापरते. शांताबाईच्या मते पुरुषही स्त्रीला समजून घेताना गोंधळलेला असतो. कधी त्याला वाटते की स्त्री त्याला जाळ्यात पकडते आहे आणि त्यामुळे त्याच्या विकासात अडथळा येतो आहे. दुसऱ्या बाजूला काही स्त्रिया पुरुषांची शिकार होण्यात धन्यता मानताना दिसतात आणि मग आपल्याला पुरुष अडवून ठेवतात म्हणून त्याच तक्रार करतात! शांताबाई किर्लोस्करांच्या मते स्त्री-पुरुषांमधील हे सनातन संघर्ष व्यक्तिगत असले तरी ते समाज व्यवस्थेच्या पक्षपाती विचारांतून उध्दभवलेले असतात.

स्त्रियांना एकीकडे अधिकार हवे असतात, मोठेपणा हवा असतो आणि त्याचवेळी स्त्री दाक्षिण्याचीही गरज वाटत असते. शांताबाई स्त्री पुरुषांमधील या पेचांना दुष्ट वर्तुळ म्हणतात. स्वातंत्र्य हवे आणि तरीही एकमेकांचा सहवास, जवळीकही हवी असा हा विचित्र तिढा असतो. कधी स्त्रियांना सर्वस्वी पुरुषांचे होण्यात आनंद वाटतो तर कधी पुरुषांना स्त्रीने सर्वस्वी आपलेच असावे यात आनंद वाटतो. एकूण स्त्री-पुरुष दोघेही परस्परांच्या अस्मितेचे बळी असतात.

शांता किर्लोस्कर म्हणतात की, समाजातील ''प्रत्येक माणूस हे दुहेरी व्यक्तित्व असते. एक तो असतो आणि एक दिसावा असे त्याला वाटत असते. कारण जसे दिसावे असे त्याला वाटते, त्या प्रतिमेची जसे असते त्या प्रतिमेवर सतत जबरदस्ती सुरु असते. त्यासाठी तो केवढा खटाटोप करीत असतो आणि तरीही दाखवण्याची प्रतिमासारखी धोक्यात असते. याबाबतीतले पुरुषांचे यश मोठ्या प्रमाणात स्त्रियांच्या मान्यतेवर अवलंबून असते आणि ती अनुकूल ठेवण्यासाठी तो अखंड जागरुक असतो आपण पुरुषी दिसावे, यशस्वी ठरावे, रुबाबदार दिसावे, आहे ह्या श्रेणीपेक्षा वरच्या श्रेणीचे दिसावे असे बहाणे तो करीत असतो व स्त्रीने शरणतेचा, मान्यतेचाच प्रतिसाद द्यावा ही त्याची अपेक्षा असते.''

शांताबाई किर्लोस्कर म्हणतात जर स्त्रिया मुक्त झाल्या तर स्त्रियांपुढे आपली एक उजळ प्रतिमा निर्माण करण्याच्या खटाटोपातून पुरुषही मुक्त होतील. पण प्रत्यक्षात अजूनही तसे घडताना दिसत नाही. शांताबाई किर्लोस्करांच्या मते स्त्रीची जीवनदृष्टीच आपली समाजव्यवस्था दुबळी बनवून ठेवते, त्यामुळे तिचे विचारही भ्रष्ट होतात. तिला जबाबदाऱ्या टाळाव्याशा वाटतात, ती आळशी बनते. पण हे तिच्या इच्छेने घडत नसते तर हा तिला घडविताना मुद्दाम दडपण्याचा परिणाम असतो. स्त्री इतरांचे संरक्षण, प्रेम, सुरक्षा यावर अवलंबून राहायला शिकते. कधीतरी तिला तिचे परावलंबीत्व जाणवते तेव्हा ती पुरुषाला दोष देते पण तेव्हा पुरुष तिलाच कमी लेखतो. शांताबाईच्या मते या साऱ्यात स्त्री व पुरुष दोघेही दोषी असतात. एकाची हुकूमशाही व दुसऱ्याची वीरूपता लपवण्यासाठी मुळातील विषमता तशीच ठेवून समता सिद्ध करण्याचे वेडे प्रयत्न चालतात, ते चुकीचे आहे ते थांबले पाहिजेत.

स्त्री आपले मनोरंजन कसे करावे हे कळत नाही. तिला सतत मनोरंजनासाठी पुरुषाची गरज भासते. पुरुषाला स्त्रीकडून शरीरसुख हवे असते पण तिचे मन झिजवण्यासाठी वेळ देण्याची त्याची तयारी नसते. शांताबाई किर्लोस्कर म्हणतात, समाजातील की काही पुरुष स्त्रियांना औदार्याने वागवणारेही असतात. त्यांना त्या औदार्याचा अभिमानही वाटतो. पण

संघर्षाचा प्रसंग उद्‌भवला की हेच पुरुष त्या स्त्रियांनाच कृतघ्न ठरवतात. स्त्रीला स्वतःच्या गुणांची आणि पात्रतेची जाणीव असते तिला अशा पुरुषाचा अनुनय करणे हे भीक मागण्यासारखे वाटते. आत्मसमर्थन करताना मग स्त्री दुष्टही होऊ शकते. असे शांताबाई किर्लोस्करांना वाटते.

पुरुष स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाने कळवळतो पण स्त्रिया मात्र बरेचवेळी पुरुष कर्तृत्वशून्य असला तरी त्यांचाच अधिकार मानणे भाग्याचे समजतात. हे चूकीचे आहे ते स्पष्ट करतात. स्वतः सक्षम असतानाही अधिकाराचा वापर करत नाहीत. स्त्रिया पुरुषांना बांडगुळासारख्या चिकटतात. त्यांचे शोषण करतात असेही दृश्य दिसते. स्त्रियांना स्वावलंबी, स्वतंत्र केले तरच हे प्रश्न सुटतील. त्यासाठी स्त्रीला शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्याची संधी मिळणे जरूरीचे आहे तसेच तिला तिचे निर्णयस्वातंत्र्यही असले पाहिजे. शेवटी स्त्रीत्व म्हणजे आगळेवेगळे काही नसून समाजाने घडवलेली ती स्त्रीची मानसिकता असते आणि मुलींना लहानपणापासून 'सख्यत्वासाठी' या लेखातून शांताबाई किर्लोस्कर यांनी स्त्री समस्या, स्त्रीचे जगणे, तिची शोकांतिक, आणि परंपरागत समाज व्यवस्थेने तिला दिलेला दय्यमपणा, लेखातून व्यक्त होतो. शांताबाई किर्लोस्कर यांनी या लेखात स्त्री आत्मभान, आत्मसन्मान जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

आपली प्रगती तपासा :

१) स्त्री मुक्ती बद्दलच्या शांताबाई किर्लोस्कर यांची भूमिका स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖

११

वैचारिक गद्यातील लेख

घटक रचना :

११.१ भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी
११.२ मुंबई १९९९
११.३ बुवाबाजीची भस्मासूर
११.४ बुद्धीचा महिमा

११.१ भाषा भिवृद्धीची सामाजिक दृष्टी - श्रीपाद महादेव माटे

श्री. म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' आपल्या समाजातील तळागाळातील लोकांच्या दु:खाकडे, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाकडे लक्ष वेधले होते. मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी त्यांनी लिहिलेल्या लेखातूनही त्यांची सामाजिक दृष्टी प्रकर्षाने जाणवते. भाषाशास्त्र ही ज्ञानशाखा खरे तर त्याकाळी परिचीत नव्हती. पण श्री. म. माटे यांच्या लेखातील भूमिका समाजशास्त्रीय भाषावैज्ञानिकांची आहे.

भाषेबद्दल मत व्यक्त करताना श्री. म. माटे म्हणतात, कोणतीही भाषा कधीच स्थिर नसते किंवा एका स्थिर भाषेत अनेक अस्थिर भाषा अस्तित्वात असतात. कारण भाषा व्यक्तीचे लिंग, वय, जात, व्यवसाय, शिक्षण, प्रदेश, काळ अशा ना घटकांमुळे सतत बदलत असते. यालाच भाषेतील स्तरभेद असेही म्हटले जाते. श्री. म. माटे यांच्या मते भाषेतील हे स्तरभेद जपले पाहिजेत. विविध स्तरातील माणसांच्या बोलीतील शब्द प्रमाण मराठीत समाविष्ट झाले पाहिजेत. आपले म्हणणे अधिक स्पष्ट करताना माटे यांनी विविध उदाहरणे दिली आहेत. जसे 'ताणणे' हा शब्द आपण कसा वापरतो त्याबद्दल ते सांगतात. कवळ-कवटाळणे हे शब्द कसे व्युत्पन्न झाले असतील त्याबद्दल सांगतात. त्यानंतर हडकणे - वाळणे या शब्दाचे अर्थ परिवर्तन कसे झाले आणि रुपकात्मक अर्थ त्याला कसा होता याबद्दलही माटे सांगतात. 'हरताळ' या शब्दात 'हाट' म्हणजे बाजार आणि 'टाळा' म्हणजे कुलूप असे दोन शब्द आहेत आणि बाजाराचे व्यवहार बंद असणे म्हणजे 'हरताळ' अशी व्युत्पत्ती श्री. म. माटे सांगतात.

जिल्ह्यात धाब्याची घरे असतात. वीज कडाडली की 'धाबे दणाणते'. त्यावरुन प्रदेश, घराचा प्रकार याचाही परिणाम भाषेवर होत असतो आणि मग असे शब्द रुपकात्मक पद्धतीने कवितेत, साहित्यात वापरले की ते रुढ होतात हे माटे नोंदवतात. मराठी भाषेच्या स्वरुपावर ब्राह्मणांचाच प्रभाव आजवर अधिक आहे हे स्पष्ट करताना माटे म्हणतात -

माटे यांच्या मते आता भाषा अधिक व्यापक करायची असेल, वाढवायची असेल तर फक्त ब्राह्मणांच्या वापरातले शब्दच त्यात असून चालणार नाही. विविध धंदे, व्यवसाय करणारे, बलुतेदार, अलुतेदार, वेगवेगळ्या जातींचे लोक जे व्यवहार करतात त्या व्यवहारांशी निगडीत मराठी शब्द जर आता मराठीत समाविष्ट करुन घेतले तर भाषा वाढेल, टिकेल असा आशावाद माटे व्यक्त करतात. 'इंगा फिरवणे' हा शब्द चर्मकाराच्या भाषेतून, 'ठिय्या देणे' सुताराच्या भाषेतून, 'कमान' गवंड्याच्या भाषेतून, 'सुरकुती न पडणे' पराटीच्या भाषेतून, 'घाला नीट न होणे' तेलाच्या भाषेतून, 'समेवर येणे' गवयाच्या भाषेतून असे विविध शब्द व वाक्यप्रचार विविध स्तरांवरील व्यक्ती मराठी भाषेला देऊ शकतात; असे त्यांना वाटत होते.

श्री. म. माटे म्हणतात, "मराठी भाषेतील बहुतेक नागर व प्रौढ रचना ब्राह्मणांनीच केलेली आहे. अर्थात, त्यांना परिचित अशी जी रुपके तीच त्यांनी आरंभी योजिली. त्यांना पुढे साध्या शब्दांची रुपे आली व भाषा समृद्ध झाली." श्री. म. माटे सुतक सोडताना 'स्नान करुन मोकळे होत'ही ब्राह्मणी रुढी होत. प्रारंभी टिळक, चिपळूणकर, आगरकर, परांजपे हेच लेखक लिहित असल्याने या प्रथेचा उल्लेख रुपकात्मक पद्धतीने त्यांनी त्यांच्या लेखात केला आहे. त्यावेळी वाचकही ब्राह्मणच असल्याने 'अवभृथस्नान' हा शब्द त्यांना कळला. यज्ञ संपल्यानंतरचे ते स्नान असते. पण पुढच्या पिढ्यांना हा शब्द अनाकलनीय वाटेल. 'सव्यापसव्य' म्हणजे पूर्वी श्राद्धात करावयाचा एक विधी होता. पण पुढे तो ब्राह्मणांच्या लेखात रुपकासारखा वापरला गेला आणि प्रचलीत झाला.

श्री. म. माटे सांगतात, 'चटपाटणे', 'पाणी लावून तयार असणे', न्हाव्याच्या भाषेतून, 'खळ लावणे' कोष्ट्याच्या भाषेतून, 'सळंग' कोळ्याच्या भाषेतून, 'किरण साधणे' शिकाऱ्याच्या भाषेतून असे बरेच आदान विविध स्तरांतून भाषेत होत असते. शेतकरी 'साधे गडी', 'पिक पोटऱ्यात येणे', 'पिक करपून जाणे', रंगारी 'हात मारणे' हे शब्द प्रमाण भाषेला देऊ शकतील असे सांगून हे बोलीभाषेकडून प्रमाणभाषेत होणारे आदान कसे घडू शकेल याबद्दल श्री. म. माटे सांगतात - "आपल्या समाजात शिक्षण फैलावले पाहिजे व लिहिणे, बोलणे हे व्यवसाय एकाच वर्गाकडे आहेत ते सर्व वर्गात फैलावले पाहिजे. तसे झाले म्हणजे सर्व समाजांच्या निरनिराळ्या वासना, त्यांचे रागलोभ, त्यांच्या आकांक्षा, चित्रविचित्र रुपकांची रुपे धारण करुन पुढे होतील. एकीकडे सर्व समाजाचे मनोगत व्यक्त होण्याचे कार्य होईल व दुसरीकडे शब्दकोश पुष्ट होत जाईल."

श्री. म. माटे यांच्या लेखातून भाषा बद्दलचा समाजाच्या दृष्टीकोन कसा असावा भाषा. भाषा स्विकारावी असेल तर व्यवहारासाठी आणि शिक्षण, प्रशासकीय कार्यालयामध्ये भाषांचा वापर केला जावा असे मत ते व्यक्त करतात.

११.२ मुंबई १९१९ - वसंत बापट :

मराठी साहित्यातील ज्येष्ठ नाटककार म्हणून वसंत बापट यांना ओळखले जाते. वसंत बापट यांनी १९१९ साली मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्यसंमेलनात केलेले अध्यक्षीय केले या भाषण मराठी भाषेच्या प्रेमाने भरलेले होते. भाषेच्या वर्तमान स्थितीतील

दुरवस्थेमुळे जी हानी होते आहे त्याबद्दल खंत व्यक्त करुन बापट यांनी भाषेच्या वाढीसाठी काही उपाय सुचवले होते. त्यांच्या भाषणाच्या हा लेख आहे.

मराठी भाषेच्या, महाराष्ट्रातील जनतेच्या मातृभाषेच्या अवहेलनेमुळे समाजाचं प्रचंड नुकसान होत आहे. असे त्यांनी भाषणातून व्यक्त केले. या वास्तवाकडे वसंत बापट वाचकांचे लक्ष वेधतात. केवळ साहित्यावरच चर्चा करण्यापेक्षा साहित्या ज्या भाषेमुळे निर्माण झाले त्या भाषेच्या दुरवस्थेबद्दल आधी चर्चा व्हायला हवी अशी भूमिका बापट घेतात. ते म्हणतात, "साहित्य संमेलनात साहित्याच्या विकासाचा आढावा घेणं, त्यातील आकृतीबंधांची चिकित्सा करणं, साहित्यातलं सरस-नीरस कोणतं त्याच्यावर बोट ठेवण हीच काम प्राधान्यांन व्हायला हवीत असं विचारवंत म्हणतात... पण साहित्याचा संसार ज्या भाषेच्या अस्तित्वावर उभा राहतो ते अस्तित्वच जर धोक्यात येताना दिसू लागलं तर साहित्यिकांनी अस्वस्थ होणं स्वाभाविक नाही का? मराठी भाषा जर मुमुर्णू झाली, मराठी संस्कृतीला, समाजाला जर घरघर लागली तर मराठी साहित्याचं भविष्य वेगळं सांगाव लागणार नाही."

वंसत बापट म्हणतात - "बालकुमारांच्या शिक्षणाचं आदर्श माध्यम म्हणजे त्यांची मातृभाषा. हे जगातल्या मोठमोठ्या शिक्षणतज्ञांच सांगणं. मातृभाषेत शिक्षण घेण्याचा प्रत्येक बालकाला जन्मसिद्ध अधिकार आहे. तो नाकारण्याचा पालकांना काय अधिकार? आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमात कोंबण्याचा प्रकार आपण केव्हा थांबवणार?"

प्राथमिक शिक्षण व्यवस्थेकडून मराठी भाषेचा गळा चेपला जातो हे व्यक्त करताना वसंत बापट म्हणतात, प्राथमिक शिक्षणापासूनच मराठीची हेळसांड करण्याची रीत आपल्या शिक्षणव्यवस्थेत आहे. त्यांच्या मते प्राथमिक शिक्षणाच्या सर्व स्तरांवर आपण मुलांना अनेक भाषा शिकवल्या पाहिजेत. केवळ विज्ञान आणि गणितालाच महत्त्व आपण अभ्यासक्रमात देतो ते चुकीचे आहे. विज्ञान, गणितातलेच गुण महाविद्यालयातील प्रवेशाचे वेळी मोजणंही चुकीचे आहे. भाषेतील प्राविण्यही तेवढेच गरजेचे आहे. वैद्यक, स्थापत्य, तंत्रज्ञान या विद्याशाखांत मराठी भाषेची गरज नाही हे मानणे चुकीचे आहे. समाजात काम करणाऱ्या सर्वांना त्या समाजाची लोकभाषा येणे आवश्यकच आहे.

मराठींच स्थान शिक्षण, शासन आणि लौकिक व्यवहार या प्रत्येक क्षेत्रात मागे पडत चाललं आहे. याबद्दल वसंत बापट खंत व्यक्त करतात. बालकांना आपखूशीने इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवणाऱ्या पालकांबद्दल बापटांना चीड व्यक्त करतात. आता बाळांसाठी अंगाईही आया मराठीत गात नाहीत तर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास झाला आहे असे कसे म्हणतात येईल? आणि मुले सुद्धा काऊ-चिऊची गाणी म्हणण्याऐवजी 'टिंक्कल् टिंक्कलं' सारखी इंग्रजी बालगीत म्हणतात. पालकांना आपली मुले ए. बी, सी, डी म्हणतात, वन, टू हंड्रेड म्हणतो म्हणून बाळांचे कौतुक करतात.

बापट म्हणतात की, मराठी लिपीच लहान मुलांना शिकवली नाही तर ती मुले मराठी साहित्य सागरात प्रवेश तरी कसा करणार? असा सवाल बापट विचारतात. इंग्रजी वाचणारी मुलेही केवळ रहस्यकथा, शृंगारकथा वाचतात किंवा कॉमिक्स वाचतात हे पाहून वसंत बापटांना त्यांच्या आकलनाची, परिपक्वतेची शंकाच येते. त्यांना वाटते की इंग्रजी शिकणारी काही मुले विदेशी विद्यापीठात शिकायला जातील पण बाकीच्या गळाठ्याच काय? ती मुले नीट इंग्रजीही

बोलू शकणारी नसतील आणि त्यांना मराठीही नीट येत नसेल. या गोंधळेलेल्या मुलांच भविष्य काय असेल असा प्रश्न उपस्थित करतात.

वंसत बापटांना वाटते की शासनाने कायद्यानेच मुलांच्या मातृभाषेच्या शाळेत घालण्याचे बंधन पालकांवर घातले पाहिजे. पालकांना दिलेले व्यक्तिस्वातंत्र्य या गोष्टींपुरते तरी थांबवले पाहिजे. कारण बहुसंख्य पालकांना स्वतःचा विचार करता येत नाही. शिवाय कोणत्याही विद्याशाखेत उच्चशिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांने प्रवेश केला तरी त्या अभ्यासक्रमात त्याला एक प्रश्नपत्रिका मराठी भाषा व साहित्याची अनिवार्यपणे अभ्यासावी लागावी. आपल्याकडे सर्व विद्याशाखेचे शिक्षण केवळ इंग्रजीत दिले जाते आणि मराठीत ते देणे शक्य नाही असे म्हटले जाते. पण बापटांच्या मते हा केवळ भ्रम आहे.

ते म्हणतात की, दुनियेमध्ये किती तरी देशांत सर्व प्रकारच्या शिक्षणशाखांत इंग्रजीची कुबडी घेण्याची गरज भासलेली नाही. इंग्लिश भाषेची सुविधा आपल्याला उपलब्ध आहे तर तिचा उपयोग का करुन घेऊ नये, हा प्रश्न फसवा आहे. आपल्या भाषेच्या ज्ञानकक्षा वाढवण्याऐवजी निमूटपणे भाषेची कोंडी करणारा आहे. वादासाठी इंग्लिश भाषेचा अभ्यास आपल्या आंतरराष्ट्रीय संबंधासाठी जरुरीचा आहे असं मानलं तरी त्याचा अर्थ एवढाच की इंग्लिश भाषा हा विषय म्हणून उत्तम शिकला पाहिजे. माध्यम म्हणून इंग्रजीची गरज नाही अगदी प्राथमिक स्तरापासून मातृभाषेबरोबर इंग्रजी भाषा शिकवावी पण माध्यम म्हणून स्वीकारु नये असे त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. वंसत बापट यांच्या भाषणातून मराठी भाषेची दुरवस्था आपली मराठी भाषा शिकली पाहिजेत. भाषा ही टिकवायसाठी योग्य त्या गोष्टींची अमंलबजावणी झाली पाहिजे असे मत केले आहे.

११.३ बुवाबाजीचा भस्मासूर - दि. के. बेडेकर

समाजात वाढलेल्या बुवाबाजीवर प्रकाश टाकण्यासाठी दि. के. बेडेकरांनी बुवाबाजीचा भस्मासूर हा लेख आहे. समाजात शिक्षणाचा प्रसार होऊनही बुवाबाजी, अंधश्रद्धा यांचा समूळ नायनाट का होत नाही ? असा प्रश्न दि. के. बेडेकर यांना पडला आहे आणि त्या अनुषंगाने ते कारणमीमांसा करतात.

दि. के. बेडेकर नवयुग दिवाळी अंक (१९६४)तील आचार्य अत्रे यांच्या लेखाचा संदर्भ देऊन नारायण महाराजांच्या दुष्कृत्यांचा अत्रे यांनी पर्दाफाश केला होता याची आठवण देतात. तसेच 'सत्यकथा' (दिवाळी १९६४) मासिकातील शरदचंद्र चिरमुले यांच्या 'श्रीशिल्लक' या कथेतही अंधश्रद्धेचे जे विदारक दर्शन घडते त्याबद्दल ते खेद व्यक्त करतात. तसेच ही अंधश्रद्धा किंवा बुवाबाजी केवळ आध्यात्मिक क्षेत्रातच नसते तर राजकीय क्षेत्रातही या गैरप्रकारांचा प्रादुर्भाव झाला आहे असे दि. के. बेडेकर सांगतात. पुष्कळसे राजे, लोकसेवक, पुढारी हेही स्वार्थसाधूच झाले आहेत या वास्तवाकडे बेडेकर यांनी लक्ष वेधले आहे. 'बुवा' होण्याची आणि लोकांची 'पिळवणूक' करण्याची जी प्रवृत्ती असते त्या संदर्भात बेडेकर म्हणतात - ''या ना त्या अमिषाने किंवा धाकाने दुबळ्या माणसांना 'नादी' लावण्याची किमया ज्यांच्या अंगी असते तो आपल्या क्षेत्रात किंवा व्यवसायात 'बुवा' बनतो. त्याचे भोळेव धूर्त शिष्य त्याची आरती करतात. भोळे शिष्य लुबाडले जातात. धूर्त शिष्य बोवांची व आपली तुंबडी भरून घेतात. सारांश

बुवाबाजीचा प्रकार सगळ्या मानवी व्यवहारात सदासर्वदा चालू आहे. विभूतिपूजेचे स्तोम माजणे हे बुवाबाजीच्या रोगाचे मूळ आहे.''

दि. के. बेडेकरांचे असे निरीक्षण आहे की अध्यात्म, तत्त्वज्ञान किंवा काही गूढ असामान्य असे अनुभव मिळविण्याची जिज्ञासा अनेकांना असते व ती श्रद्धान्वित असते. ही श्रद्धा नसलेल्या माणसाला नास्तिक, पाखंडी, संसारात गुरफटलेला म्हणून हिणवले जाते. या भाविकांचे असे म्हणणे असते की नुसत्या बुद्धीने किंवा तर्काने विश्वाचे कोडे सुट नाही. भावनेला व अनुभवाला महत्त्व आहे.

दि. के. बेडेकर प्रश्न उपस्थित करतात की भाविकांना नेमके काय हवे असते ? कोण म्हणतो मला ब्रह्मज्ञान हवे आहे, कुणाला देवाची कृपा हवी असते. पण मग एका सामान्य भाविकाशी बोलल्यावर दि. के. बेडेकर या निष्कर्षाला येतात की खऱ्या साधकाला पूर्ण समाधान मिळते. त्याच्या मनात कोणतीही इच्छा उरत नाही किंवा असल्यास ईश्वर ती पूर्ण करतो.

दि. के. बेडेकर आध्यात्मिक साधनेतील गुरू-शिष्यांच्या नात्याबद्दल म्हणतात, ''. . . हे नाते लौकिक तऱ्हेचे नसते – नुसते शिक्षक व विद्यार्थी यांचे नसते. त्यात एक वेगळाच एकरूपतेचा संबंध असतो. एकदा असा संबंध मानला की गुरूशिष्यातल्या संबंधांना लौकिक अर्थाने आदर, प्रेम इ. भावनांपेक्षा जास्त दृढता येते आणि मग असे एक वातावरण निर्माण होते की बुवाबाजीच्या कमी-अधिक ओंगळ प्रकारांना वाव मिळू शकतो. प्रत्यक्षात घडलेल्या प्रकारांना चव्हाट्यावर आणूनही बुवाबाजीचे प्रकार नित्य नवे घडतच राहतात, याचे रहस्य या वातावरणात आहे व पर्यायाने आध्यात्मिक साधनेच्या मूलभूत उद्दिष्टांत आहे.'' असे त्यांना वाटते.

बेडेकर सांगतात की, ''अध्यात्म मार्गाकडे नेणारी श्रद्धायुक्त बुद्धी अनुभवावर आधारलेली असते आणि हा अनुभव त्या साधकाला आलेला नसतो तर त्यांच्या मार्गदर्शक गुरूला आलेला असतो आणि अनुभव कुणालाही कुठल्याही म्हणजे बौद्धिक किंवा काल्पनिक पातळीवरचा आलेला असू शकतो. त्यामुळे कोणाचाही अनुभव नाकारता येत नाही. नास्तिकांनी भाविकांना ईश्वराचा अनुभव आलेलाच नाही असे म्हणणे त्यामुळेच अयोग्य ठरते. अस्तिकांना आपला अनुभव नेमक्या शब्दात वर्णन करता येत नाही हेही स्वाभाविकच मानले पाहिजे कारण हा अनुभव भावनिक, मनाच्या पातळीवरचा असू शकतो''.

सर्व सामान्य माणसाविषयी बेडेकर सांगतात की, ''सर्वसामान्य संसारी माणसांना पूर्ण समाधानाचे आकर्षण असते. ते ज्या गुरूकडे खेचले जातात त्यांना असे पूर्ण समाधान लाभले आहे यावर साधकांची श्रद्धा असते. हे साधक या गोष्टींवर विश्वास ठेवत असतात की संपूर्ण विश्व ईश्वराने निर्माण केलेले आहे आणि आपल्या बाबतीत जे काही घडते आहे ते केवळ ईश्वराच्या इच्छेनेच घडते आहे. आपल्या गुरूंना ईश्वराबद्दल सगळे काही माहीत आहे आणि ईश्वराला प्रसन्न कसे करायचे हे तेच आपल्याला सांगू शकतील अशी खात्री साधकांना वाटत असते''. बेडेकरांच्या मते गुरू-शिष्यांच्या अलौकिक नात्यातील वातावरणात तोडगा सांगणे कठीण आहे.

त्यामुळेच बुवाबाजीला आळा घालणे कठीण आहे. बेडेकरांच्या मते भोंदू बुवांच्या पापाला चव्हाट्यावर आणून त्यांचा भांडाफोड करणे हा एक मार्ग असू शकतो की ज्याने अंधश्रद्धाळू भानावर येतील पण तोच एकमेव मार्ग असू शकत नाही. बेडेकरांना वाटते की पूर्ण समाधान, पूर्ण

ज्ञान, पूर्ण सामर्थ्य या पूर्णतेच्या उद्दिष्टाबद्दल आपण गंभीरपणे विचार करायला हवा. त्यांच्या मते जीवनात येणारा अपूर्णतेचा अनुभवच सर्वात मोलाचा असतो. प्रत्येक समाधानात थोडे असमाधान असणारच आणि कोणतेही समाधान थोडा काळच टिकते. त्यामुळे अपूर्णता, असामाधान या गोष्टींना स्वाभाविक म्हणून स्वीकारणेच योग्य असते. उलट अशी अपूर्णता कसली आहे ते प्रत्येकाने नीट ओळखले पाहिजे.

बेडेकरांना वाटते की अपूर्णतेचा अनुभव पचवून येईल त्या संकटाला सामोरे जाणे, जीवन संघर्ष करत राहणे हाच मार्ग खऱ्या अर्थाने सुखाचा असतो पण ढोंगी बुवांची, दुबळ्या माणासांची जीवनसंघर्षाची, झगडण्याची प्रेरणाच जणू काही संपलेली असते. ईश्वर पाहिलेला नसणे हा काही माणसांना नकारात्मक अनुभव वाटतो तर मानवतावादींना तोच अनुभव विवेकाचा वाटतो. तरीही आपल्या व्यवहारात अविवेकाचाच भाग अधिक असल्याने ढोंगी साधूंचे फावते.

बेडेकरांच्या मते अपूर्णतेचा अनुभव श्रेष्ठ आहे कारण अपूर्णता जाणवते म्हणूनच आपण जीवनाला वळण लावण्याच्या प्रयत्न करतो. अपूर्णतेला तुच्छ मानू नये उलट अपूर्णता स्वीकारून नम्र व्हावे, इतरांशी सहकार्याने वागावे, भलत्याच आशाआकांक्षांच्या स्वप्नात अडकू नये. त्यामुळेच शांत-समतोल वृत्ती निर्माण होईल. बुवाबाजीच्या आकर्षणातून बाहेर येतील असे त्यांना वाटते. ते म्हणतात- ''मानवी ज्ञानाच्या व सामर्थ्याच्या अपूर्णतेची नम्र जाणीव जर बहुसंख्य लोकांमध्ये दृढमूल झाली तर पूर्णत्वाच्या कल्पनेकडे लोक डोळसपणे पाहू लागतील. साहजिकच पूर्ण ज्ञानाचा किंवा अलौकिक सामर्थ्याचा लाभ अमक्याला झाला आहे व म्हणून त्याला परतत्व गुरू मानून आपले कोटकल्याण होणे शक्य आहे, ही अशी आशा कोणाच्याही मनात उद्‌भवणे कठीण होईल. आजही आपण जेव्हा एखाद्या विषयातील तज्ज्ञ माणसाकडे सल्ला घ्यावयास जातो तेव्हा त्याला सर्वज्ञ समजत नाही. एक तज्ज्ञाचे मत दुसऱ्या तज्ज्ञाशी जोडू पाहतो, ते चुकीचे आहे. हा व्यवहार अपूर्णतेच्या जाणिवेमुळे होणारा डोळस व्यवहार आहे.''

बेडेकरांच्या मते एवढा डोळस व्यवहार केल्यास बुवाबद्दल एखाद्याला आकर्षण वाटणार नाही. पण तसे झाले नाही तर मात्र या ना त्या स्वरूपात बुवाबाजी चालूच राहील. असे त्यांना वाटते.

आपली प्रगती तपासा :

१) बुवा बाजी बद्दल दि. के. बेडेकर यांचे मत थोडक्यात सांगा.

_____

_____

_____

_____

_____

२) बुवाबाजी बद्दल समाजात असणारा गैरसमज कोणता ते सांगा ?

_____

_____

_____

_____

_____

११.४ बुद्धीचा महिमा - पाडुरंग सदाशिव साने

कोकणातील पालखंड या खेडेगावात साने गुरुजीचा जन्म झाला. लहानपणापासूनच शिक्षणाची त्यांना आवड होती. उत्कृष्ट जिवन जगायचे असेल तर विद्या संपादन करणे आवश्यक आहे. असे त्यांचे मत होते. त्यामुळे बिकट परिस्थितही त्यांनी शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. 'भारतीय तत्वज्ञान व संस्कृती' यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी अनेक ग्रंथाचे सखोल वाचन केले. त्यामुळे त्यांनी तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांमधून M.A. ची पदवी संपादन केली. 'श्यामची आई' हे त्यांचे सर्वांत जास्त गाजलेले पुस्तकपुढे काही काळ महाविद्यालयीन स्तरावर व कालांतराने शालेय स्तरावर त्यांनी मराठीचे अध्यापन केले.

साने गुरुजींच्या मते वेद हा भारतीय संस्कृतीचा पाया मानला जातो. वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार आहे आणि आपली भव्य संस्कृती ही ज्ञानावरच उभारलेली आहे. भारतीय संस्कृतीत अंधश्रद्धेला स्थान नाही. परंतू अजूनही काही खेड्यांमध्ये अज्ञानापोटी अंधश्रद्धा पाळल्या जातात. जर संस्कृतीला नवनिर्वाचीत व आधुनिक बनवायचे असेल तर अंधश्रद्धेचे उच्चाटन होणे आवश्यक आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत वेद अनंत आहेत. जसे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद इ. जीवनाला सुंदर करणारा प्रत्येक विचार म्हणजे वेद आहे. काळ व ज्ञान अंनत आहेत. नवीन ज्ञान जसे उदयास येईल तस तसे भारतीय संस्कृती त्याचा स्वीकार करेल. कारण भारतीय संस्कृतीला ज्ञानाहुन दुसरे काहीही पवित्र वाटत नाही. तसेच ज्ञानोपासका बद्दल भारतीय संस्कृतीला नितांत आदर आहे.

साने गुरुजी भारतीय संस्कृती बद्दलचा दाखला देताना ते ऋषीमुनींचा दाखला देतात. भारतीय संस्कृतीत असे अनेक ऋषिमुनी झाले की ज्यांनी केवळ वेद, उपनिशदे, पुराने यांची निर्मितीच केली नाही, तर अखंड तप करुन मोठ्या प्रमाणात ज्ञानार्जन केले. साने गुरुजीच्या मते वेदाला मानणे म्हणजे बुद्धीला मानणे बदलत्या काळानुसार नवीन नवीन विचार उत्पन्न होतात. ज्यांच्यामुळे आपणास नवीन नवीन ज्ञान मिळते. उदा. युरेनेस व नेपच्युन हे ग्रह पूर्वी दिसत नव्हते. परंतु आता ते दिसु लागले. ज्याप्रमाणे प्रत्येक विषयात नवनवीन शोध लागतात जीवनाच्या शास्त्रातही नवीन नवीन विचार उत्पन्न होत असतात.

भारतीय संस्कृती बद्दलच्या वेदांचे महत्त्व सांगताना साने गुरुजी बुद्धीलाही तेवढेच महत्त्व देतात. त्यांच्यामते वेदाला मानणे म्हणजे बुद्धीला मानणे वेदातील सर्वांत पवित्र मंत्र म्हणजे गायत्रीमंत्र या मंत्राची उपासना करुनच मनुष्याच्या पुर्नजन्म होतो. कारण या मंत्रात बुद्धीची निर्मळता मागितली आहे. बुद्धिवान मनुष्य कोणत्याही प्रकारची अजोड कामगिरी करु शकतो. वेद उपनिशद यांच्या आचारे तो आपली संस्कृती जगासमोर मांडू शकतो. वेदधर्म म्हणजे विचाराप्रमाणे वागणे बुद्धीसांगेल त्याप्रमाणे वागणे त्यामुळेच "अंतरीचा ज्ञान दुवा मालवू नको रे" असे भारतीय संस्कृती आपणास सांगते. त्याचाच अर्थ तुझ्या स्वतःच्या ह्रदयातील बुद्धी काय सांगेल ते बघ त्या बुद्धीचा जो आवाज येईल त्याप्रमाणे वाग अमुक ऋषी सांगतो, तमुक तत्त्वज्ञानी सांगतो म्हणून काही तर तुझ्या मनाला जे योग्य व पवित्र वाटेल ते तू कर तसेच तू तुझ्या आत्म्याचा अपमान करु नकोस व बुद्धीचा गळा दाबू नकोस. असे मौलिक विचार भारतीय संस्कृतीच्या साहित्यकृतीमध्ये नमुद केले आहेत.

❖❖❖❖

१२

वैचारिक गद्यातील लेखांचा आशय

घटक रचना

१२.१ वैचारिक गद्यातील लेखांचा आशय
१२.२ समारोप
१२.३ संदर्भग्रंथ सूची

१२.१ वैचारिक गद्य ग्रंथातील लेखांचा आशय :

मराठीतील निबंध हा इंग्रजाच्या आगमनानंतर बेकन, मेकॉले यासारख्यांच्या निबंधलेखनावरुन हळूहळू मराठी साहित्यात जन्माला व आकाराला आला. बेकन, मेकॉले यांचे लेखन औपचारिक स्वरुपाचे असल्याने सुरुवातीला वैचारिक निबंधाला औपचारिक निबंध म्हटले जात असे. मराठीतले पहिले औपचारिक निबंध मराठी 'ज्ञानप्रसारक' या मासिकात १८५० ते १८६६ या कालखंडात प्रसिद्ध झाले. पण ते पुरेसे बांधीव नव्हते. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वैचारिक निबंधाचे जनक म्हणता येईल. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचे निबंध पत्ररुप होते. जे प्रभाकर या नियतकालिकात 'शतपत्रे' या नावाने १८४८ ते १८५० या दोन वर्षात प्रसिद्ध झाले. पुढे १८५७ ला विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर १८६० ते ६५ च्या सुमारास वैचारिक गद्य अधिक समर्थ बनले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'तील लेखामुळे वैचारिक गद्य या प्रकाराला प्रतिष्ठा लाभली.

इंग्रजांचे भारतातील आगमन भारतीयांना पारतंत्र्यात टाकणारे असले तरी त्यांनी विविध ज्ञानशाखांची, उद्योगांची आणि विचारप्रवाहांची सुरुवात भारतात झाली हे नाकारता येणार नाही. इंग्रजांच्या आगमनामुळे भारतात 'बुद्धियुग' जन्माला आले. त्यातून पारलौकिला महत्व देणारी देव-दैववादी दृष्टी दूर ठेवून आपण इहवादी, प्रयत्नवादी, समतावादी झाले पाहिजे असे भारतीय समाजसुधारकांना, नवशिक्षितांना वाटू लागले. वैचारिक गद्यात हाच समतावादी, इहवादी विचार प्रामुख्याने मांडला गेलेला दिसतो. लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, टिळक, शि.म.परांजपे, महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. आंबेडकर, सावरकर, प्रबोधनकार ठाकरे, साने गुरुजी, ना.ग. गोरे, गं.बा. सरदार, श्री. म. माटे यांच्यापासून ते अलीकडच्या प्राचार्य शिवाजीराव सावंत, हरि नरके, आ. ह. साळुंखे, अरुण टिकेकर, नीळकंठ खाडीलकर, रा.ग.जाधव, सुहास पळशीकर आनंद तेलतुंबडे, अतुल देऊळगावकर, हेंमत देसाई या विचारवंतापर्यंत एक खूप मोठी वैचारिक लेखन करणाऱ्यांची परंपरा मराठी वैचारिक निबंधाला लागला आहे. महाराष्ट्रातील समाजाला विचाराने, बुद्धीने सबळ करणाऱ्यांचे काम वैचारिक गद्य

आजवर करते आहे. देशांत आणि महाराष्ट्र सामाजिक सांस्कृतिक घडणाऱ्या घटनाचा वेध वैचारिक लेखन नियतकालिकांतन प्रसिद्ध होते आहे.

इंग्रज भारतात आले तेव्हा भारतातील सर्वसामान्य जनता शेतकरी आणि दलित यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झालेली होती. ही परिस्थिती घालवण्यासाठी कोणते मार्ग अवलंबले पाहिजेत हे समजण्याची वैचारिक प्रगल्भता, बुद्धिसामर्थ्य या गोरगरीबांत नव्हते. त्यामुळे प्रारंभीच्या समाजसुधारकांनी व विचारवंतानी सर्वसामान्यांचे विशेषतः शेतकरी व दलितांचे दारिद्र्य दूर करणे, स्त्री समस्या दुर करणे, सामाजिक वास्तव जाणिव करुन देणे. त्यांचे प्रबोधन आपल्या वैचारिक निबंधातून केलेले आढळते.

या वैचारिक ग्रंथातून स्त्री समस्या, दलित समाजाचे जगणे, त्यांच्या समस्या डॉ. बाबासाहेब आंडबेकराचे विचार, महात्मा फुले यांनी वर्णव्यवस्थेवर केलेला प्रहार, वंसत बापटांचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे मुंबई येथील भाषण, अशा विविध विषयावर आधारित लेख या वैचारिक ग्रंथात आहेत.

'आपला धंदा कोणता व कसा करावा ?' या दादोबा पांडुरंग यांच्या लेखात त्यांनी एकूण आपल्या देशातील दारिद्र्य, बेकारी याची कारणे आपल्या परंपराप्रिय, जुनाट दृष्टिकोनात आहेत हे पटवून दिले आहेत. त्यांच्या मते कोणतेही काम जे माणूस आपल्या उदरनिर्वाहासाठी करतो ते उच्च किंवा नीच नसते आणि धंद्यावरुन जातीश्रेष्ठता ठरवणे चुकीचे आहे. त्यांच्या मते कारकुनी वा भिक्षुकी करण्यापेक्षा सुतार, लोहार, सोनार, कासार, शिंपी, कोष्टी हे अधिक महत्त्वाचे कारण ते समाजाला उपायोगी वस्तू बनवितात. त्यामुळे कष्ट करणाऱ्याला, श्रमिकांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असे दादोबांना वाटते.

तर्खडकर म्हणतात, "फक्त लिहू-वाचू शकणारे अनेक असतील पण त्यांच्यातही श्रेणी आहे. म्हणजे जो ग्रंथ लिहितो, विद्वान आहे तोच श्रेष्ठ ठरतो. केवळ अक्षर ओळख असणारे बरेच असतील पण फक्त साक्षरता त्यांना रोजगार मिळवून देऊ शकत नाही. पैसे मिळविण्यासाठी साक्षरांनीही अन्य कला कौशल्ये शिकून घेतली पाहिजेत तर ते कमावते होतील अन्यथा सुशिक्षित बेकारच बनतील". असे दादोबा सांगतात. वादविवाद, तर्कशास्त्र यांचा अभ्यास प्रतिष्ठेचा ठरेल पण त्यापेक्षा एखादे यंत्र वा वस्तू तयार करणे अधिक उपयोगी ठरेल म्हणून सर्वसामान्य माणसांनी केवळ शिक्षणाच्या मागे लागण्यापेक्षा रोजगार मिळवण्यासाठी कारागिरी करावी. स्वतंत्र उद्योग सुरु करावेत असा मार्गही ते सुचवितात. सुशिक्षित होणे वाईट नाही पण सर्व सुशिक्षितांनी नोकऱ्या शोधण्याचे ठरवले तर त्यांना त्या मिळणार नाहीत. ते बेकार राहतील त्यामुळे सुशिक्षितांनीही सचोटीने, श्रमाने धंदा, व्यवसाय करावा तरच त्यांची आर्थिक प्रगती होईल असे दादोबा तर्खडकर या लेखातून सुचवतात.

'अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया' हा डॉ. आंबेडकर यांचा लेख आहे. या लेखाला महाडच्या चवदार तळ्यावर डॉ. आंबेडकरांनी हजारो दलित बांधवांच्या सहकार्याने केलेल्या सत्याग्रहाची पार्श्वभूमी आहे. या सत्याग्रहानंतर चित्रावशास्त्री नावाच्या गृहस्थांनी अस्पृश्यांनी स्पृश्यांनी संघर्ष करु नये कारण त्यांची उपजिवीकाच स्पृश्यांनी त्यांना दिलेल्या लहान मोठ्या कामांवर अवलंबून आहे. स्पृश्यांनी बहिष्कार टाकल्यास अस्पृश्यांना जगणेच कठीण होईल असे विधान केले होते. डॉ. आंबेडकरांनी या विधानाचा प्रतिवाद करण्यासाठी अस्पृश्यांची आर्थिक

स्थिती दुबळी असण्याची कारणे स्पृश्यांनी त्यांना प्रगतीची संधी हेतूपूर्वक नाकारणे यातच आहेत हे लक्षात आणून दिले. अर्थात डॉ. आंबेडकर नि:पक्षपातीपणे दलितांना त्यांच्या चुकाही दाखवून देतात आणि सुधारण्याचा सल्ला देतात.

दलितांचा सत्याग्रह हा त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठीही आहे असे आंबेडकर सांगतात. अस्पृश्य सत्याग्रहाच्या परिणामांना घाबरणार नाहीत असा आंबेडकरांना विश्वास वाटतो. स्वत:च्या स्वातंत्र्याचे समान हकाचे ध्येय दलितांना सत्याग्रहाचे परिणाम सोसण्याचे बळ देईल अशी खात्री डॉ. आंबेडकरांना वाटते. ज्याप्रमाणे सगळे भारतीय इंग्रजांनी चालवलेल्या पिळवणूकीचा बहिष्कार म्हणून परदेशी कापड, वस्तू यावर बहिष्कार टाकतात त्याप्रमाणेच दलित स्वत:च सवर्णावर बहिष्कार टाकतील. तथाकथित सुधारकांना डॉ. आंबेडकर सांगतात की, दलित त्यांच्या दलितांना सवर्णीयांनी गुलाम केले आहे. आर्थिक दृष्ट्या स्वत:वर अवलंबून ठेवले आहे हे स्पष्ट करताना डॉ. आंबेडकरांनी महाभारतातील एका प्रसंगाचा संदर्भ देऊन भीष्म, द्रोण व शल्यही कौरवाचे गुलाम बनले होते ते केवळ पेशामुळेच याची आठवण करुन दिली आहे.

डॉ. आंबेडकर चित्रावशास्त्री व तथाकथित सुधारकांना असा प्रश्न विचारतात की मुंबईतल्या कामगारांनी भांडवलदाराविरुद्ध संप केला तर तुम्ही त्यांना प्रोत्साहन देता आणि भांडवलदारांनी कामगारांची पिळवणूक तात्काळ थांबवावी म्हणता, पण दुसऱ्या बाजूला अस्पृश्यांना मात्र सत्याग्रह न करण्याचा सल्ला देता व त्यांची पिळवणूक थांबवा असे सांगण्याऐवजी दलितांनाच घाबरवता हा दुटप्पीपणाच म्हणावा लागेल. डॉ. आंबेडकरांना तथाकथित सुधारकांचा हा कावेबाजपणा त्यांच्या धर्मवेडातून आलेला आहे हे लक्षात आणून देतात.

शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय मुकुंदराव पाटीलांनी आपल्या वैचारिक लेखातून व्यक्त केली आहे. दलितांच्या गुलामीची चिकित्सक आणि शेतकऱ्यांची परिस्थिती यांची तार्किक कारणमीमांसा हे मुकुंदराव पाटीलांनी केली आहे. आपल्या देशातील ८० टक्के लोक केवळ शेतीवर अवलंबून राहतात हेही त्यांना खटकते. वेगवेगळी कौशल्ये शिकून शेतकऱ्यांच्या मुलांनी स्वतंत्र उद्योग व्यवसाय केले पाहिजेत असे मुकुंदराव पाटीलांना वाटते. विशेषत: इंग्रजी राजवटीत व्यवसाय बदलाचे स्वातंत्र्य मिळालेले असताना शेतकऱ्यांनी घरातल्या सर्वांना शेतीवर राबवण्याऐवजी काही कुटुंबीयांनी स्वतंत्र व्यवसाय करावा. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणारी तोंडे कमी होतील. आणि शेती फायदेशीर ठरेल असे पाटील सुचवतात.

शेतकऱ्याची समस्या, त्यांचे प्रश्न मुकुंदराव पाटीलांनी मांडले आहेत. शेतकरी शिकत नाहीत याबद्दल मुकुंदराव पाटील नाराजी व्यक्त करतात. केवळ नोकरी मिळवून देणारी साक्षरता त्यांना अपेक्षित नाही. त्यांना शेतकऱ्यांनी विज्ञान तंत्रज्ञान शिकावे व ते शेतीत वापरावे असे वाटते. युरोप - अमेरिकेतील लोक छोट्या जमिनीत खंडोगणती पिक काढतात कारण ते विज्ञानाचा वापर करुन विचारपूर्वक शेती करतात पण आपल्या शेतकऱ्यांना दुसऱ्याचे ज्ञान नको आहे, आपल्या शेतकऱ्यांना परंपराप्रिय मानसिकतेने जगायचे आहे. त्यामुळे शेजाऱ्यांकडेही अधिक चांगले पिकते तो श्रीमंत झाला आहे हे दिसले तरी त्याचे ज्ञान, अनुभव शिकून घ्यावा नवे कौशल्य आत्मसात करावे अशी सकारात्मकता शेतकऱ्यांकडे नाही. यामुळेही ते मागासलेले राहतात, हे मुकुंदराव पाटील यांना जाणवते.

शेतकऱ्यांच्या घरी त्यांच्या स्त्रिया अडाणी त्यामुळे घरे अस्वच्छ, मुलेही अस्वच्छ, परिसर अस्वच्छ असतो, त्यामुळे रोगराई वाढते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या स्त्रीया साक्षर झाल्या पाहिजेत. तरच त्यांचे राहणीमान सुधारेल. सुसंस्कृतता हा प्रकार शेतकऱ्यात का नसावा? त्यांना त्यांचे राहाणीमान सुधारत आले तरच ते सुसंस्कृत होतील असे मुकुंदरावाना वाटते. शेतकऱ्यांच्या मुलांचे बालविवाह, विवाहावरचे अफाट खर्च हुंडा देण्याचे - घेण्याच्या पद्धती असल्यामुळे गोसावी फकिरांना दानधर्म करण्याची अंधश्रद्धा शेतकऱ्यांच्या मध्ये आहे. शेतकऱ्यांची पान-तंबाखूची दारुची व्यसने, तमासगिरणीकडे जाऊन पैसा उधळण्याची त्यांची सवय अशा नानाविधी गोष्टींच्या संदर्भात मुकुंदराव पाटील शेतकऱ्यांच्या दोषांकडे लक्ष वेधतात ते म्हणतात आपले शेतकरी जोपर्यंत आळस झटकणार नाहीत, शिकणार नाहीत, अंधश्रद्धा सोडणार नाहीत, परंपरांची ओझी फेकणार नाहीत, भाऊबंदकीत अडकणार नाहीत, वायफळ खर्च करणार नाहीत तोपर्यंत त्यांचे दारिद्र्य दूर होणार नाही याचा पुनरुच्चार करतात.

शेतकरी लग्नकार्यावर ऐपत नसतानाही वारेमाप पैसा खर्च करतात, सत्यनारायणाच्या पूजा, तीर्थस्थानांना भेटी देणे यात पैसा फुकट घालवतात आणि कर्जबाजारी होतात हे चित्र मुकुंदराव पाटील यांना अस्वस्थ करते. त्यातच काही धूर्त, चतूर शेतकरी इतर साध्याभोळ्या शेतकऱ्यांच्या अडाणीपणाचा गैरफायदा घेऊन त्यांना देशोधडीला लावतात याचीही त्यांना खंत वाटते. गावपंचायती निःपक्षपाती नाहीत त्या गरीब शेतकऱ्यांना न्याय देण्याऐवजी मोठ्या जमिनदारांचाच फायदा पाहतात याचीही मुकुंदरावांना चीड येते. ग्रामपंचायती म्हणजे गावगुंडांची सत्तास्थाने झाली आहेत हे त्यांना खटकते.

शेती करताना नवी हत्यारे वापरणे, स्वावलंबी असणे, शेतमाल विकण्यासाठी व्यापाराचे तंत्र समजून घेणे ह्यामुळे भावी काळात शेती सुधारु शकेल असे मुकुंदरावाना वाटते तसेच शेतीविषयक माहिती, नवे प्रयोग नवी हत्यारे दाखवणारी प्रदर्शने ठिकठिकाणी भरली तर शेतकऱ्यांना शेतीत सुधारणा होईल असे मत व्यक्त करतात.

शांताबाई किर्लोस्कर यांनी 'संख्यत्वासाठी' या लेखातून पुरुष प्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीचे असणारे स्थान, स्त्री समस्याचा वेध या लेखातून घेतला आहे. स्त्रियांना या समस्येतून बाहेर काढले पाहिजे. तिचेवर होणारे अन्याय कमी झाले पाहिजेत. असे मत शांताबाईनी या लेखातून व्यक्त करतात.

दलितांच्या स्वतंत्र वसाहती उभ्या राहाव्यात यासाठी इंग्रज सरकारने पुढाकार घेऊन त्याना मदत करावी असे डॉ. आंबेडकर सुचवतात. म्हैसूर संस्थांनच्या राजाने दलितांना स्वतंत्र वसाहत उभी करण्यास मदत केली त्यामुळे त्यांची स्थिती सुधारली हे उदाहरण देऊन डॉ. आंबेडकर इतर गावांतील दलितांनाही तेथील सवर्णियांनी मदत केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतात. महारांनी शेतीवरच संपूर्ण भार टाकू नये तर त्याखेरीज अन्य व्यवसाय शोधावेत असे डॉ. आंबेडकर सुचवतात महारांना असा स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य पटकन मिळणार नाही पण तरीही प्रयत्नपूर्वक त्यांनी छोटा-मोठा धंदा करावा असे आंबेडकर सुचवतात. महारांनी घरोघरी खादी विणावी, अन्य महारांनी ती विकत घ्यावी असे करत करत महारांनी आपले मूलभूत मानवी हक्क मिळवायचे असतील तर त्यांनी सवर्णांनी लादलेली आर्थिक गुलामगिरी व परावलंबीत्व सोडले पाहिजे या मुद्यावर डॉ. आंबेडकर भर देतात.

अशाप्रकारे दादोबा पांडुरंग, मुकुंदराव पाटील व डॉ. आंबेडकर यांनी सर्वसामान्य भारतीय, शेतकरी व दलित यांच्या आर्थिक स्वावलंबनासंबंधी, दारिद्र्य निर्मुलना संबधीविचार मांडले आहेत. आजही उद्‌बोधक आहेत. ते म्हणतात की भारतीय समाजात पारंपारिक व्यवसाय करण्याची पद्धत आहे पण महाराला बलुतेदारीत स्वंतत्र असा धंदा, व्यवसाय मुद्दामच दिलेला नसावा. त्यांनी त्रेवर्णिकांची सेवा करावी असे धर्म सांगतो, ते सरकारी वतनदार आहेत असे पूर्वापार म्हटले जात असले तरी त्यांच्यावर अधिकार चालतो तो सवर्णीयांचाच म्हणजे सरकार सर्व लोकांचे आहे त्यामुळे ते म्हणतील ती सर्व कामे ती अप्रतिष्ठेची असली तरी महारांना मुकाट्याने करावी लागत आहेत. महारांना न्याय देणारे ही सवर्ण आहेत त्यामुळे महारांनी त्यांना सांगितले गेलेले काम नाकारले तर त्यांच्यावर अत्याचार करण्याचे, त्यांना अघोरी शिक्षा करण्याचे सगळे अधिकारही सर्व शासनकर्त्यांच्याच हाती आहेत. त्यामुळे नाईलाजाने महारांना न आवडणारी, न पटणारी गलिच्छ कामेही मुकाटपणे करावीच लागतात. नाही म्हणण्याच्या जणू त्यांना हक्कच नाही. अपमान झाला पिळवणूक झाली तरी ते तक्रार करुच शकत नाहीत.

हिंदू धर्मियांची जुलमी विषमतेवर आधारलेली चातुवर्ण्य व्यवस्थाच दलितांसाठी प्रगतीचे दरवाजे बंद करणारी आहे असे डॉ. आंबेडकर सांगतात. त्यांच्या मते एखादा मुसलमान किंवा पारशी जर गावाचा मुख्य असता तर त्याने दलितांवर अन्याय केला नसता पण गावोगावी हिंदु पाटील सरपंच धुरीण आहेत त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींसाठीही दलितांवर अन्याय होतो. दलितांनी चांगला पोशाख केला, मेलेल्या गुरांचे मांस खाल्ले नाही तरी त्यांना पाटील शिक्षा करतात, तेव्हा हिंदु धर्मियांनी त्या पाटलांना सवर्ण म्हणून दिलेले अधिकारच त्यांना तसे वागायला प्रवृत्त करतात, असे डॉ. आंबेडकरांना जाणवते. म्हणून महारांनी वतने सोडवित, बलुते मागणे सोडावे तरच त्यांची गुलामगिरी, स्पृश्यावलंबी जगणे संपले असे डॉ. आंबेडकर सांगतात.

महारांना भीती वाटते की वतन सोडले तर जगावे कसे? त्यांना डॉ. आंबेडकर सांगतात की जन्माला येणारा प्रत्येक माणूस काही आपला धंदा सोबत घेऊन जन्माला येत नाही. त्याला आपली उपजिविका करण्यासाठी धंदा शोधावाच लागतो हे लक्षात घेऊन महारांनी स्वतःचे वेगळे व्यवसाय करायला घाबरतात. ही भीती दूर टाकून महारांनी सवर्णपासून दूर आपल्या स्वतंत्र वसाहती उभ्या केल्या पाहिजेत तर ते निर्भयपणे आपला वेगळा व्यवसाय सुरु करु शकतील असे डॉ. आंबेडकर सांगतात सवर्णीयांपासून दूर गेल्याने महार स्वतंत्र होतील, स्वेच्छेने आपला व्यवसाय शोधतील, कोणी दुकान सुरु करेल, कुणी शिंपी बनेल पण मानाने जगेल. स्वतःचा विकास साधू शकेल.

वैचारिक गद्य या गद्यग्रंथात पंधरा लेख आहेत. या लेखातून अस्पृश्यांच्या समस्या शेतकऱ्यांचे प्रश्न, स्त्री समस्या, समाजातील बुवाबाजी, समाजातील भ्रष्टाचार यांवर विचार प्रबोधनपर विवेचन केले आहे. समाजातील समस्या आणि उपाय सूचविले आहेत.

१२.२ समारोप

'वैचारिक गद्य' या संचालित ग्रंथात वैचारिक लेखाचा समावेश आहे. लेख आणि विचारवंत यांचे विविध विषयावरील लेख या ग्रंथात आहेत. या लेखातून व्यवसायाबद्दलची समाजाचा दृष्टीकोन, तर्खडकर व्यक्त करतात. तर स्त्री शिक्षणांची महत्त्व बाबा पद्मजनी यांनी

मांडला आहे. गुलामगिरीची ग्रंथातील प्रस्वावने वरुन महात्मा फुलेंचे समाजाविषयीचे तत्कालीन वास्तवभान लक्षात येते. अस्पृश्यो उन्नतीचा पाया या लेखातून अस्पृश्य समाजाची स्थिती गती डॉ. बाबासाहेब यांच्या लेखातून व्यक्त केला आहे. संस्कृती बद्दलचे मत इरावती कर्वे व्यक्त करतात. या वैचारिक गद्यातून सामाजिक जाणीव समाज वास्तव, समाज परिवर्तन, सामाजिक बांधिलकी वैचारिक लेखातून व्यक्त होते.

१२.३ संदर्भग्रंथ सूची

१) वैचारिक गद्य - (संपादक) - डॉ. वसंत शेकडे, डॉ. धनाजी गुरव, डॉ. श्रद्धा राणे, प्रा. राजेंद्र डोंगरदिवे.

२) मराठी निबंध : उद्‌गम आणि विकास, डॉ. गिरीश मोरे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.

३) विचार मंथन - स. रा. गाडगीळ, प्रतिमा प्रकाशन पुणे.

४) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास - रा. के. लोचे, कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

द्वितीय वर्ष कला (मराठी)
सरावासाठी प्रश्नपत्रिकेचा नमुना

१. भाषेचे स्वरुप स्पष्ट करुन भाषेची वैशिष्ट्ये सांगा. **(२०)**

किंवा

भाषाविषयक असणारे समज गैरसमज सविस्तर स्पष्ट करा.

२. भाषेची विविध रुपे - सादोहरणसह स्पष्ट करा. **(२०)**

किंवा

भाषाभ्यास म्हणजे काय ते सांगून ऐतिहासिक भाषाविज्ञान या विषयी चर्चा करा.

३. टिपा लिहा. (कोणत्याही दोन) **(१०)**
   अ) भाषा शुद्ध - अशुद्ध
   ब) बोलीभाषा
   क) परिभाषा - व्यवसाय भाषा
   ड) परिणामनिष्ठ कार्य / अविष्कारात्मक कार्य

४. वैचारिक गद्य म्हणजे काय ते सांगून वैचारिक गद्याचे स्वरुप स्पष्ट करा. **(२०)**

किंवा

वैचारिक वाङ्मयाची वाटचाल या विषयी माहिती द्या.

५. स्त्रीविद्याभ्यास आणि शंकानिवारण या लेखातून स्त्रीशिक्षणाचे महत्त्व बाबा पद्मनजीने कसे सांगितले आहे ते स्पष्ट करा. **(२०)**

किंवा

'मुंबई १९९९' या लेखातून व्यक्त होणारे सामाजिक वास्तव सोदाहरणसह स्पष्ट करा.

६. टिपा लिहा. (कोणत्याही दोन)
   अ) गुलामगिरीची प्रस्तावना लेखाचा आशय
   ब) सामाजिक समता
   क) व्यवसायाबद्दल तर्खडकरांचे मत
   ड) बुवाबाजीचा भस्मासूर लेखाचा आशय

❖❖❖❖